# घटक-१

## ललित गद्य लेखनाचे स्वरूप

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ ललित गद्य म्हणजे काय ?
१.३ ललित गद्यचे प्रकार
    १.३.१ लघुनिबंध
    १.३.२ व्यक्तिचित्रे
    १.३.३ प्रवास लेख
    १.३.४ अनुभवकथन
    १.३.५ ललित लेख
१.४ स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य
१.५ ललित गद्याच्या मर्यादा
१.६ समारोप
१.७ संदर्भ ग्रंथ

### १.१ प्रस्तावना

'ललित गद्य' या साहित्य प्रकारामध्ये अनुभव कथन, लघुनिबंध, प्रवासलेख, व्यक्तिचित्रे आणि ललितलेखाचा समावेश केला जातो. प्रथम वर्ष कला मराठी अनिवार्य या विषयासाठी नापास मुलांची गोष्ट आणि वडिलधारी माणसे या दोन ललित लेख संग्रहाचा अभ्यास क्रमाचा समावेश केला आहे. त्यासाठी ललित गद्य साहित्याचे स्वरुप समजून घ्यावे लागेल.

### १.२ ललित गद्य म्हणजे काय?

ललित गद्य या लेखन प्रकारामध्ये, 'मी' ला आलेला अनुभव म्हणजेच लेखकाला आलेला अनुभव. मी स्वरुप ठेवूनच विविधतेने लेखक मांडतो या लेखन प्रकारामध्ये अनुभवकथन, लघुनिबंध, प्रवासलेख, व्यक्तिचित्रे,ललितलेख यांचा समावेश होतो.

'ललित गद्य' लेखनाचे विवेचन करताना आनंद यादव म्हणतात की, "ललित गद्य हा आदिम आणि अंतिम साहित्य प्रकार वाटतो. त्याचे स्वरुप इतर साहित्य प्रकार घडण्यापूर्वीच्या अवस्थेतील दिसते कारण, साहित्याचा गाभा असलेल्या सौदर्यानुभवाच्या पातळीवरील 'मी' स्व:त्वाचा शोध हा साहित्य प्रकार स्वाभाविकपणे, स्पष्टपणे, सरळपणे आणि प्रत्यक्ष रीतीने घेत

असतो. बहुतेक सर्व साहित्य प्रकारांना समाविष्ट करुन घेऊ शकण्याचे बळ त्याच्यामध्ये असल्यामुळे, तो अंतिम साहित्य प्रकार म्हणूनही मानावा लागतो.''

ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांच्या मते ललित गद्यामध्ये 'मी' ला आलेले अनुभव मी स्वरुप ठेवूनच विविधतेने मांडण्यात आले. लेखक स्वतःला आलेले अनुभव तो लेख स्वरुपात मांडतो. त्यामध्ये त्याचे अनुभव विश्व, प्रवासवर्णन, अनुभवलेल्या व्यक्तिचित्रे, व्यक्त होतात. या अनुभव लेखातूनच ललित गद्य, निर्माण झाले आहे.

जेव्हा वाङ्मयामध्ये स्वयंविकासी मनाचा आविष्कार सुरु झाला, स्वतःला येणाऱ्या अनेक अनुभवांच्याद्वारे आत्मशोध न्याहाळण्याचे जेव्हा प्रयत्न सुरु झाले, तेव्हा वाङ्मयाला शुद्ध कलावादाच्या पायावर एक स्वतंत्र, स्वयंभू विश्व निर्माण करता आले. यातूनच 'मी'त्वाच्या शोधाला यथार्थ प्रारंभ झाला. त्यामुळे साहित्याच्या सर्व प्रकारानांच प्रत्यक्षा प्रत्यक्ष स्वरुपाने आत्मनिवेदनपरता मोठ्या प्रमाणात लाभली गेली.

वास्तवातील घटित अनुभवांपासून तो मनो वास्तवातील अनुभवापर्यंत ('एक गाव एक पाणवळा', पासून ते 'कोवळी उन्हे' पर्यंत) घडलेले अलिप्तपणे निवेदन करण्यापासून तो मानसिक भावस्थितीचा आत्मग्नतेने अविष्कार करण्यापर्यंत ('पांढऱ्या वरती काळे', 'हाजीपीर' पासून तो 'भावमुद्रा', 'ऋतुचक्र' पर्यंत) बौद्धिक, मुक्तमोकळ्या शैलीदार वैचारिकतेपासून, तो अनुभवात्मक, भावतप्त. चिंतनशीलतेपर्यंत (मनोगते, स्पार्शाची पालवी) पृथक्करणाकडे जाणाऱ्या विवरणशीलतेपासून तो संघटनात्मक आस्वादन शीलपर्यंत (पाहटपाणी, आवडलेली माणसे) अशा विविध स्वरुपाचे लेखन ललित गद्यात सामाविष्ट केली जातात.

लेखक स्वतःला येणाऱ्या अनेक अनुभवांच्याद्वारा आत्मस्वरुप शोधण्याचे, न्याहाळण्याचे जेव्हा प्रयत्न सुरु झाले, तेव्हा वाङ्मयाला शुद्ध कलावादाच्या पायावर एक स्वतंत्र्य, स्वयंभू विश्व निर्माण करता आले यातूनच 'मी' त्वाचा शोधाला यथार्थ प्रारंभ झाला. याचा परिणाम सकृत दर्शनी तर असा दिसतो की, साहित्याच्या सर्व प्रकारांनाच प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरुपात आत्म निवेदनपरता मोठ्या प्रमाणात लाभत गेली. भाव कविता जास्त फोफावली. चरित्रापेक्षा आत्मचरित्रे अधिक लिहिली जाऊ लागली. चांगल्या प्रवासवर्णनांची संख्या वाढत गेली. कथा-कादंबऱ्यांनाही ललित गद्य व्यापू लागले याचा परिणाम होऊनच त्या त्या साहित्य-प्रकाराला नवे नवे अविष्कार, रुप प्राप्त होऊ लागले.

ललित वाङ्मयाचे रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरेन यांनी गद्य, पद्य आणि नाटक असे प्रमुख तीन प्रकार मानले आहेत. येथे ललित गद्याचा अभ्यास करायचा असल्याने ललित गद्याचाच विचार करावा लागेल.

मराठी साहित्यातील शि.म. परांजपे व कोल्हटकर यांनी ललित गद्याला 'निबंधमाला' तर 'वि.स. खांडेकर' यांनी ललित निबंध असे म्हटले आहे.

## १.३ ललित गद्याचे प्रकार

१) लघुनिबंध
२) व्यक्तिचित्रे

३) प्रवास लेख
४) अनुभवकथन
५) ललित लेख

**१.३.१ लघुनिबंध :**

इंग्रजीतील 'Personal Essay' या संकल्पनेच्या आधाराने मराठी साहित्यामध्ये लघुनिबंध हा ललित निबंध प्रकार विकसीत झाला आहे. 'Personal Essay' मधून मी ला आलेला अनुभव, मीचे विचार मुक्तपणे लघुनिबंधातून व्यक्त होतात, लघुनिबंधातून लेखक स्वतःला अनुभव तो व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. फ्रान्सिस बेकन या इंग्रजी लेखकाने प्रथम वैयक्तिक अनुभव सांगण्याऐवजी अनुभवामधील वैचारिकता मांडण्यास सुरुवात केली.

इंग्रजीतील निबंध सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रेंच लेखक मिशेल द मॉतेन यांच्या 'एसायन' ह्या १५८० साली प्रसिद्ध झालेल्या लेख संग्रहापासून प्रेरणा घेऊन इंग्रजीतील आद्य निबंधकार सर फ्रान्सिस बेकन यांनी १५९७ च्या सुमारास मॉतेन, बेकन, जोसेफ ॲडिसन ह्या निबंधकारांच्या लेखनाचा निर्देश मराठीतील 'निबंध' या वाङ्मयप्रकारची चर्चा करताना केला आहे.

१९३० च्या सुमारास ना. सी. फडके यांनी इंग्रजीतील 'Personal Essay' च्या धरतीवर निबंध लिहिले त्याच लघुनिबंधाला 'गुजगोष्टी' असे नाव दिले. त्यानंतर पुढे वि.स. खांडेकर, अनंत काणेकर यांनी लघुनिबंध लिहायला सुरुवात केली. लघुनिबंधाच्या सुरुवातीला खेळकरवृत्ती आणि अखेरीस चिंतनमग्न लघुनिबंध लिहिले गेले. अनंत काणेकर यांच्या पांढरी शिडे (१९७५) त्याच बरोबर शिंपले आणि मोती, तुटलेले तारे या व अशासारख्या लघुनिबंधातून विचार व्यक्त करणे हा प्रमुख हेतू होता. अनंत काणेकराच्या लघुनिबंधातून आठवणी, आख्यायिका, विनोदी किस्से व्यावहारिक अनुभव व्यक्त होतात.

१९३७ ते १९५० या कालखंडामध्ये लघुनिबंधनाना बहर आला. बा. भ. बोरकर 'कागदी होड्या (१९३८), ना. मा. संत उघडे लिफाफे (१९४४)' हे लघुनिबंध लिहिले. १९४१ कुसुमावती देशपांडे यांचे 'दीपदान', माध्यान्ह आणि मध्यरात्र या व अशासारख्या लघुनिबंधातून काव्यत्मका, प्रतिमायुक्त भाषेचा वापर केला आहे. इरावती कर्वे यांची परिपूर्ती (१९४९) भोवरा (१९६०), गंगाजल (१९७२) या लघुनिबंधातून अनुभवांचे चिंतन व्यक्त केले आहे.

१९५० नंतर मात्र ललितगद्य लेखनात दुसरा टप्पा सुरु झालेला दिसतो. लघुनिबंधातील गोष्टी वेल्हाळ उपदेशकाची भूमिका जाऊन स्वैर आत्मविष्काराला महत्त्व आले. वैचारिकतेपेक्षा ललित हा भाषिक गुणधर्म महत्त्वाचा मानुन त्याद्वारे व्यक्त होणारे व्यक्तीमत्त्व केंद्रस्थानी आले. उदा. विंदा करंदीकरांच्या, 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' या ललित गद्यातून स्वैर आत्मनिष्ठ अविष्कार दिसून येतो.

या परंपरेतील लघुनिबंध लेखकांमध्ये दुर्गा भागवत ('पैस', 'ऋतुचक्र' गो.वि. करंदीकर (स्पर्शाची पालवी), ग्रेस, (मितवा), आनंद यादव (स्पर्शकमळे) व्यंकटेश माडगुळकरांचे (नागझिरा) यासारख्या लेखनाचा उल्लेख करता येतो.

munotes.in

### १.३.२ व्यक्तिचित्रे :

ललित गद्याचा हा एक उप प्रकार आहे. या प्रकारच्या ललित गद्यातील आत्मविष्काराचा संबंध हा लहानपण व त्याच्या आठवणी, बालपणीचे आठवणारे खेडेगाव, आजोळ यासारख्या स्थळांशी घटना, यांच्याशी असतो. गतकालीन जीवनात रमणारे व्यक्तीमत्त्व या गद्यातून प्रकट होते. उदा. करंदीकरांच्या 'स्पर्शाची पालवी' मधील कोकण, व्यंकटेश माडगुळकरांच्या 'रानमेवा' मधील हरवलेले बालपण अशी काही उदाहरणे सांगता येतात.

गतकाळातील आठवणी शब्दबद्ध करताना एका व्यापक पातळीवर जाऊन केलेले अनुभवांचे चित्रण श्रीनिवास कुलकर्णी यांच्या 'डोह' व 'सोन्याचा पिंपळ' यामध्ये दिसते. यात केवळ बालपण त्यातील घटना यांचे चित्रण नसून नाहिसा होत चाललेल्या रुढी, परंपरा, श्रद्धा, एकत्र कुटुंबपद्धती त्यातील माणसांचे परस्पर संबंध आणि याद्वारे गुंफलेले समूहजीवन याचे चित्रण आलेले दिसते. या सर्व चित्रणाला गूढतेचा स्पर्श दिसतो.

वरील सर्व ललित गद्यातून जे चित्रण झालेले आहे ते पाहता समकालीन वास्तवाचे दर्शनमात्र या लेखनात घडत नाही. या पार्श्वभुमीवर इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती' मधील लेख वेगळे ठरतात. परिपूर्तीमधील लेखात समकालीन वास्तवाला सामोरे जाणारे इरावती कर्वे यांचे चिंतनशील व्यक्तीमत्त्व प्रकट झालेले दिसते. अनुभवांची व्यामिश्रता हे येथील लेखनाचे वैशिष्ट्य ठरते.

१९६०-७५ या काळात मराठी ललित गद्याची परंपरा समृद्ध झाल्याची वाढल्याचे दिसून येते. मासिके, वर्तमानपत्रे यातून अधिकाधिक ललित गद्य प्रसिद्ध होऊ लागलेले दिसते. उदा. विजय तेंडुलकर (कोवळी उन्हे) रवींद्र पिंगे यांचे लेखन, या शिवाय स्तंभ लेखन, सदर लेखन या स्वरुपात ललित गद्य अवतरले. आस्वादक समीक्षा या समीक्षा प्रकारात ललित गद्याची वैशिष्ट्ये दिसतात. उदा. सरोजनी वैद्य यांच्या 'माती आणि मुर्ती' यामधील पु.शि. रेग्यांच्या 'सावित्री' या कादंबरीची समीक्षा यादृष्टीने पाहता येईल.

### १.३.३ प्रवास लेख :

प्रवासवर्णनपर लेखनामध्ये स्थळ व प्रदेश यांच्या वर्णनाला असणारे महत्त्व १९५० नंतरच्या प्रवासवर्णनामधून कमी झालेले दिसते. प्रवासवर्णनकार 'मी' ने स्थळ व प्रदेश पाहत असताना घेतलेले अनुभव त्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्याला प्राधान्य मिळालेले दिसते. प्रवासात घेतलेल्या अनुभवांचा भावनात्मक कल्पनात्मक असा आविष्कार झालेला दिसतो.

प्रवासवर्णनपर लेखनात विषय-वस्तुला महत्त्व मिळते. 'मी' ला दिसलेला प्रदेश तेथील संस्कृती याबद्दलचे त्याचे अनुभव व्यक्त झालेले दिसतात. 'मी' आणि 'वर्ण्य' विषय या दोन्हींना समान स्थान असते.

### १.३.४ अनुभवकथन :

भूतकाळ किंवा वर्तमान काळातील विशिष्ट घटना, व्यक्ती ठिकाण आणि त्यांच्या संदर्भाने आलेले अनुभवांचे कथन ललित गद्याच्या अनुभवकथन या प्रकारातून होते. बालपणात आलेले आणि भोगलेले असे अनुभव, भूतकाळातील बालपणीचे खेडे, तिथल्या स्मृती-आठवणी, विशिष्ट एखाद्या घटनेत सहप्रवासी असणाऱ्या व्यक्ती आणि या सर्वांसोबत जोडलेल्या भावना

यांची मांडणी ललित गद्यात होते. यामध्ये केवळ 'मी' ला आलेल्या अनुभवांचीच मांडणी 'मी' च्या नजरेतून होत असते. यातील सर्वच अनुभव सुखद असतील असे नाही. तर काही गतकाळात खंतावलेल्या मनाचे शब्दकय संवेदन प्रकट होते. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या 'डोह' या ललित गद्यातून अशा प्रकारचे अनुभवकथन होते.

### १.३.५ ललितलेख :

मराठी वाङ्मय प्रवाहात ललितगद्याचा एक वेगळा आणि समृद्ध असा वाङ्मयप्रवाह आहे. मराठी साहित्याशास्त्रात ललित गद्याचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण ठरतो. ललित गद्य म्हणजे काय हे समजावून घेण्यासाठी आपल्याला पुढील व्याख्या महत्त्वपूर्ण ठरतात.

१) एखादा विषय किंवा स्वानुभव यावर केलेले मुक्तचिंतन म्हणजे ललित गद्य होय.
२) कथा, कादंबरी, नाटक, कविता या साहित्याच्या काटेकोर प्रकारात न बसणाऱ्या आणि संकीर्ण स्वरूपाच्या ललित वाङ्मयास ललित गद्य असे म्हटले जाते.

- साहित्याचे एक निराळे अंग म्हणजे ललित गद्य होय. ललितगद्य हे भावनाप्रधान व रूचीपूर्ण असते. ललित गद्य ही वाङ्मयशाखा विसाव्या शतकात विकसित झालेली गोष्ट आहे. आगरकर, म. फुले, काणेकर, कुसमावती देशपांडे, दुर्गाबाई भागवत, वि.स. खांडेकर, शांता शेळके आदी मान्यवरांनी मराठीमध्ये ललित गद्याची परंपरा समृद्ध केली. साहित्यिक भाषेचा उत्तम नमुना आपल्याला ललित गद्यातून दिसतो. याचे प्रमुख दोन प्रकार सांगितले जातात. १) वैचारिक गद्य २) ललित गद्य
- विचारप्रवणता व बुद्धिनिष्ठता हे वैचारिक गद्याचे वैशिष्ट्य आहे. म.फुले, आगरकर, वि.रा.शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. चे लेखन या प्रकारात मोडते. ज्याचे स्वरुप समाजप्रबोधन, विचार व बुद्धीनिष्ठ आहे.
- ललित, भावनाप्रधान, मिश्किल, अनुभवप्रमाण व व्यक्तिचित्रण स्वरूपाचे लेखन हे ललित गद्यात मोडते.

यामध्ये लघुनिबंध, ललितनिबंध, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे, भावचित्रे, प्रवासवर्णने, विनोदी लेखन, आत्मनिष्ठपर लेखन आदी यामध्ये समाविष्ट होतात.

आनंद यादव यांनी ललित गद्याचे पाच प्रकार मानले आहेत.
१) अनुभवकथन २) लघुनिबंध ३) प्रवासलेख ४) व्यक्तिचित्रे ५) ललितलेक

अशारितीने, प्रवासलेख, आठवणी, ललितलेख अनुभव, लघुनिबंध हे ललित गद्याचे पाच उपप्रकार मानता येतील. 'ललितगद्य' या शिर्षकातील हे पाच उपप्रकार समाविष्ट झालेले असले तरी ते एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. कधी-कधी यातील दोहोंची सरमिसळही होवू शकते. साहित्य प्रकारांच्या अभ्यासाची एक सोय म्हणून वरील उपप्रकार मानावे लागतात.

## १.४ स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य (१९४७ ते १९८०)

१९४१ पासून लघूनिबंध लेखन करणारे गो. वि. करंदीकर यांचे 'स्पर्शाची पालवी (१९५९)' आणि 'आकाशाचा अर्थ (१९६५)' हे दोन लघुनिबंध संग्रह या कालखंडात प्रकाशित

झाले आहेत. त्यांच्या लघुनिबंधातील विचार आणि चिंतन हा त्यांच्या लेखनाचा महत्त्वाचा पैलू आहे. त्याचबरोबर त्यांची काव्यात्म शैली मराठी लघुनिबंधाला नवी आहे.

त्याचबरोबर दुर्गा भागवत यांचे ऋतुचक्र (१९५६), भावमुद्रा (१९६०) व्यासपर्व (१९६२) या व अशासारख्या लघुनिबंधातून अनुभवचिंतन प्रकट होते. त्यांच्या भाषेत संस्कृत शब्द, छोटी आणि पल्लेदार वाक्ये येतात.

१९५६ मधील मंगेश पाडगावकरांचे (निंबोणीच्या झाडामागे) या लघुनिबंधातून 'कविमन' प्रकट होते. माधव आचवल यांचे (किमया) मधून आचवलांचे तीव्र, सूक्ष्म संवेदनशील मन प्रकट होते. १९६५ मध्ये श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या 'डोह' आणि सोन्याचा पिंपळ या व अशासारख्या लघुनिबंधातून बालमन निसर्ग वेडेपण जाणवते.

मधुकर केचे (१९६७) यांच्या 'आखर अंगण' मधून लेखकाच्या गत आयुष्यातील आठवणींच्या दाट छाया विखुरल्या आहेत. त्याचबरोबर १९५१ मध्ये 'कोवळी उन्हे' मधून वैचित्य, भीषणता, नाट्यपूर्णता, काव्यात्मता, हळुवारपणा आदी आशयगुण त्यांच्या लेखनाला लाभले आहेत.

१९७१ ते १९८० या कालखंडात श्री. ज. जोशींचे (१९७८) 'पुणेरी', दि. बा. मोकाशी यांचे (१९७९) संध्याकाळचे पुणे ह्या लिखाणातून व्यक्तिविशेष लाभले आहेत. त्याचबरोबर १९७१ मधील व्यंकटेश माडगूळकरांचे (पांढऱ्यावर काळे) या ललित गद्यामधून (मी) चे समाजजीवन, कुटुंब जीवन आणि प्राणीजीवन यांचे अनुभव प्रकट होतात.

सरोजिनी वैद्य यांचे 'पहाट पाणी' (१९७५) मधील लघुनिबंधातून मानवी जीवनाचे विविध पैलू प्रकट होतात. त्याचबरोबर १९७८ (चिवारीची फुले) मधील लघुनिबंधातून कल्पकता, निसर्ग प्रेम, प्रदेश, शहरे, संस्कृती यांचा वेध घेतला जातो. आनंद यादव (स्पर्श कमळे) मधून शृंगार अनुभव, क्रीडा विलासी भाषा आणि कल्पकवृत्ती या लेखांना लाभली आहे.

१९७९ मधील प्रई सोनकांबळेचे (आठवणींचे पक्षी) बाबा आढावांचे (एक गाव एक पाणवठा), अनिल अवचटांचे (माणसं) या व अशासारख्या ललितगद्यातून विविध जीवन क्षेत्रातील अनुभव विशद केले आहेत.

**ललित गद्याचे गुणविशेष :**

**अ) 'मी' त्वाचा आविष्कार :** ललित गद्यातील 'मी'त्व हे प्रत्यक्षातील असते. कल्पनेतले नसते. यासंदर्भात आनंद यादवांनी ललित गद्य लेखकामधील 'मी' ची विस्ताराने चर्चा केली आहे. त्यांच्यामते - 'मी' केंद्रस्थानी असल्यामुळे आठवणी. अनुभव, लघुनिबंध, प्रवासलेख व्यक्तीचित्रण या लेखन प्रकारातील अनुभवांची रुपनिश्चिती होते आणि म्हणूनच निश्चित घाट नसलेला वाङ्मय प्रकार म्हणून या प्रकाराकडे पहावयास हवे. (संदर्भ ललित गद्याचे तात्विक स्वरुप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८५, पृ. ८८ व ९०).

ललित गद्यातील ‘मी’ त्याच्या आविष्कारासंबंधी या वाङ्मय प्रकाराचीच एक आग्रही मागणी असते. लेखकाचे व्यक्तीमत्त्व सखोल, अनेकपदरी तेवढे त्याचे लेखनही गुणवान बनते. आणि म्हणूनच आत्मनिष्ठा हा ललित गद्य लेखनाचा एक विशेष ठरतो.

**ब) काव्यात्मकता व चिंतनात्मकता :** ललित गद्य लेखक स्वःजीवनातील निवडक अर्थपूर्ण प्रसंगांच्या निमित्ताने होणाऱ्या आत्मविष्कारातून आत्मशोध घेत असतो. स्वतःला शोधण्याच्या प्रयत्नात त्याच्या लेखनामध्ये काव्यात्मकता व चिंतनशिलता अवतरु लागते. उदा. करंदीकरांच्या ‘स्पर्शाची पालवी’ व ‘आकाशाचा अर्थ’ या लेखांमधील काव्यात्मकता व चिंतनशिलता यांचा सुरेख समन्वय दिसतो. तर इरावती कर्वे यांच्या ‘परिपूर्ती’ मध्ये लेखिकेच्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वामुळे विश्वव्यापक दृष्टीकोन आणि चिंतनशिलता निर्माण झालेली दिसते. तर दुर्गा भागवत यांच्या ‘भावमुद्रा’ व ‘व्यासपर्व’ यातील लेखन दुर्गाबाईंच्या चिंतनशिल आणि संवेदनशिल व्यक्तीमत्वामुळे काव्यात्मक पातळीवर जाते. म्हणूनच लेखक जितका त्यासंगी संवेदनशिल असेल तितके त्याचे लेखन ‘मी’ त्वाचा आविष्कार असूनही विश्वात्मक पातळीवर जाऊ शकते.

## १.५ ललित गद्याच्या मर्यादा

ललित गद्य लेखनात काही मर्यादा येतात. या मर्यादा ही लक्षात घ्याव्या लागतील.

‘मी’ ला आलेला अनुभव, आविष्कार हे ललित गद्यलेखनाचे वैशिष्ट्य असते. या त्याच्या वैशिष्ट्यामुळेच त्याला काही मर्यादा पडतात. पहिली मर्यादा म्हणजे ‘मी’ ला आलेला अनुभव व्यक्त करत असताना त्याच्या लेखनात आत्मकेंद्रीयता येऊ शकते.

ललित गद्य लेखकाचे व्यक्तीमत्त्व जर खुजे असेल तर तो आपल्या व्यक्तीमत्त्वाची काल्पनिक चित्रे रेखाटून त्याचे अपुरेपण भरुन काढण्याचा प्रयत्न करु शकतो. त्यामुळे ते लेखन निकृष्ठ दर्जाचे ठरण्याची शक्यता अधिक असते. त्यांच्या लेखनात एक प्रकारची सांकेतिकता व तोचतोपणा जाणवू लागतो.

लेखकाच्या या व्यक्तिमत्वामुळे त्याच्या लेखनातील विषय वस्तुलाही मर्यादा पडते. लेखकाचे अनुभविश्व जर संपन्न नसेल तर त्याच्या लेखनात सांकेतिकता येऊन मर्यादित विषयांभोवतीच त्याचे लेखन फिरत राहते.

ललित गद्य लेखनाची वरील स्वरुप वैशिष्ट्ये व मर्यादा लक्षात घेवून ललितगद्य हा वाङ्मय प्रकार अभ्यासावा लागतो.

## १.६ समारोप

साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, चरित्र हे सारे प्रकार जरी ललित गद्य लेखनाचे प्रकार असले तरी प्रामुख्याने लेख स्वरुपात निर्माण झालेले लघु निबंध, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रे, प्रवासलेख, आठवणी, अनुभव, ललितलेख वैचारिक लेख यांचा विचार

ललित गद्य लेखनात केला जातो. रविंद्र पिंगे यांचे शतपावली व प्रतिभा रानडे यांचे स्मरणवेळा या ललित गद्याचा अभ्यास केल्यानंतर ललितगद्य लेखाचे स्वरुप अधिकतेने समजेल.

## १.७ संदर्भ ग्रंथ


१) वाङ्मयीन शैली आणि तंत्र, प्रा. म.द. हातकणंगलेकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००८.
२) ललित लेखनाचे तंत्र - बालशंकर दोपांडे, साहित्य रसमाला, मुंबई, १९८३.
३) मुक्तगद्य-संकल्पना आणि उपयोजन - वि. शं. चौघुले, मॅजेस्ट्रिट प्रकाशन मुंबई, २००८.
४) मराठी समीक्षेची सद्य:स्थिती-वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११.
५) मराठी निबंध उद्गमन आणि विकास-डॉ. गिरीश मोरे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००९.


❖❖❖❖

munotes.in

# घटक-२

## वडीलधारी माणसे

**घटक रचना :**

२.१ प्रस्तावना
२.२ वडीलधारी माणसे विषयी
२.३ शांता शेळके यांचा परिचय
२.४ वडिलधारी माणसे
२.५ गुरुवर्य माटे
२.६ जोग सर
२.७ साहेब
२.८ मामा वरेरकर
२.९ आशा भोसले
२.१० समारोप

## २.१ प्रस्तावना

प्रथम वर्ष कला मराठी (अनिवार्य) या विषयासाठी दोन ललितलेख संग्रह अभ्यासाला लावण्यात आले आहेत. शांता शेळके यांचा वडीलधारी माणसे आणि अरुण शेवते यांचा नापास मुलांची गोष्ट हे दोन लेखसंग्रह अभ्यासाला लावण्यात आले आहेत.

**वडीलधारी माणसे :**

शांता शेळके यांचा वडीलधारी माणसे या लेखसंग्रहात एकूण अकरा लेख आहेत. त्यातील पहिला वहिनी हा लेखाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश केलेल्याना ही त्यानंतरचे दहा लेख अभ्यासक्रमामध्ये समाविष्ठ करण्यात आले आहेत.

**नापास मुलांची गोष्ट :**

'नापास मुलांची गोष्ट' हा अरुण शेवते यांनी आत्मचरित्रपर लेखाचा संपादित केलेला लेख संग्रह आहे. या लेखसंग्रहातील सामाजिक राजकीय क्षेत्रात आपल्या जिद्धी आणि चिकाटीच्या जोरावर गेलेल्या आणि जीवनात यशस्वी झालेल्यांची यशोगाथा सांगितली आहे.

## २.२ वडीलधारी माणसे विषयी

'वडीलधारी माणसे' हा शांता शेळके यांचा ललित लेख संग्रह आहे. या ललित लेख संग्रहातील दहा लेखांचा अभ्यासक्रमाचा समावेश आहे. 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहाचा अभ्यास करण्यापूर्वी शांता शेळके यांचा परिचय करुन घ्यावा लागेल.

## २.३ शांता शेळके यांचा परिचय

पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे दि. १२ ऑक्टोबर १९२२ रोजी जन्म झाला. त्यांचे प्राथमिक आणि महाविद्यालय शिक्षण पुण्यामध्ये झाले. शिक्षणानंतर त्या काही वर्ष प्र. के. अत्रे यांच्या नवयुग मध्ये उपसंपादक म्हणून काम पाहिले. त्यानंतर मराठी विषयाच्या अध्यापिका म्हणून हिस्लॉप महाविद्यालय नागपूर व मुंबई येथील रुईया महाविद्यालय व महर्षी दयानंद महाविद्यालयात काम केले.

अध्यापिका म्हणून कार्यरत असताना त्यांना साहित्यिकाचा परिचय होत गेला. त्यातूनच त्यांना मराठी साहित्याची आवड निर्माण झाली. या आवडीतून लेखनाकडे त्या वळल्या. मराठी साहित्यात त्यांनी कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रे, बालसाहित्यलेखन त्यांनी केले. या बरोबरच त्यांनी चित्रपटगीत, अनुवाद, समीक्षा लेखन केले आहे. मराठी चित्रपटातील त्यांनी लिहिलेली गाणी लोकप्रिय आहेत. गीत लेखनामुळे त्यांचा लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरी आमोणकर या ज्येष्ठ गायिका बरोबर त्यांचा परिचय झाला. विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केलेले आहे. त्याची अनेक बालगीत ही लोकप्रिय आहेत. नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सार बोर्डावर त्यांनी काम केले होते. १९९६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदही त्यांनी भूषविली. त्यांना मराठी गीत लेखनाचा गदिमा पुरस्कार १९९६ सुरसिंगार पुरस्कार, उत्कृष्ट चित्रपटगीत पुरस्कार यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांच्या साहित्याला मिळाले आहेत.

अशा या प्रतिभावंत कवयित्रीचे ६ जून २००२ रोजी निधन झाले.

## २.४ वडिलधारी माणसे

'वडीलधारी माणसे' हा ललित लेख संग्रहातील लेख संग्रहातील केवळ दहाच लेखांचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. त्यापैकी या घटकात पा पहिल्या लेखांचा अभ्यास करुन नंतर उर्वरित पाच लेखांचा अभ्यास पुढील घटकात केला आहे.

## २.५ गुरुवर्य माटे

**श्रीपादमहादेव माटे - परिचय**

श्रीपाद महादेव माटे यांचा जन्म २ सप्टेंबर १८८६ रोजी शिरपूर (विदर्भ) येथे झाला. त्यांचे बालपण गरीबीत हलाकीच्या परिस्थितीत गेले. त्यांच्या लहानपणीच वडीलांचे निधन झाल्याने त्यांना नातेवाईकांकडे राहावयाची वेळ आली. शालेय शिक्षण घेताना अनंत अडचणींना सामोरे जाण्याची वेळ आली. त्याचे सातारा आणि पुणे येथे शिक्षण झाले. एम.ए. चे शिक्षण पूर्ण झाल्यावर न्यू इंग्लिश स्कूल सातारा येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून रुजू झाले. इंग्रजीचे आदर्श शिक्षक म्हणून ते परिचित झाले. त्यानंतर १९३५ साली पुण्यातील स. प. महाविद्यालयात त्यांची इंग्रजी व मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. माटे सरांना बहुजन विद्यार्थ्यांबद्दल

munotes.in

विशेष आपुलकी होती. ते जसे आदर्श प्राध्यापक होते तसे ते तळमळीचे निष्ठावंत समाजसेवक होते. समाजाबद्दल त्यांना विशेष आपुलकी होती.

त्यांनी लेखनाला सुरुवात वृत्तपत्रातील बातमीपासून केली. नंतर त्यांनी साहित्यिक लेखन केले. बहुजन समाजाची वास्तव त्यांच्या कथामधील त्यांनी मांडली आहे. उपेक्षितांचे अंतरंग, अनामिक, माणुसकीचा गहिवर, भावनांचे पाझर हे त्याचे कथासंग्रह विशेष लोकप्रिय आहेत. या कथालेखनातून बहुजन, उपेक्षितांचे वास्तव चित्रण मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शांता शेळके यांना श्री. म. माटे सरांचा परिचय झाला. विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून ते परिचित होते. शांता शेळके यांनी स.प. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर पहिल्याच वर्षी कॉलेज मधील नियतकालिकात शांता शेळके यांनी 'सौंदर्य समीक्षा' हा लेख वाचल्यानंतर माटे सरांनी लेखिकेचे विशेष कौतुक केले. माटे सरांनी मराठी भाषेवरचे प्रभुत्व, साहित्य शिकवण्याची विशेष लकब यामुळे त्याचा तास विद्यार्थी चुकवत नसत. ज्येष्ठ साहित्यिक आणि नामांकित प्राध्यापक माटे सरांच्या सहवासामुळे बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. श्री. म. माटे सरांच्या मुळे मला साहित्याची विशेष आवड निर्माण झाल्याची प्रांजळ कबुली शांता शेळके यांनी दिली आहे.

वडीलधारी माणसे या ललित लेख संग्रहात त्यांनी माटे सरांच्या आठवणीनं उजाळा दिला असून त्यांचे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू या लेखातून मांडले आहे.

**प्रस्तावना :**

श्री.म. माटे ज्येष्ठ साहित्यिक शांता शेळके यांना शिक्षक म्हणून लाभले माटे सरांच्या सहवास. शिक्षण घेताना सरांनी विद्यार्थ्यांवर केले संस्कार, त्यांची शिकवण त्यांनी साहित्याविषयीचा निर्माण केले की, गोडी आणि साहित्यिक संस्कार यामुळे घडत गेलो असे शांता शेळके यांनी प्रांजळ कबुली दिली आहे. त्याचा आठवणीना उजाळा देणारा हा लेख.

**आदर्श शिक्षक :**

मी बी. ए. च्या वर्गात शिकत होते त्या वेळी म्हणजे एकेचाळीस-बेचाळीस साली आमचा मराठी स्पेशलचा-तेव्हाच्या भाषेत सांगायचे झाले तर मराठी ऑनर्सचा हाच वर्ग होता. माझ्या वेळेला चाळीस-पंचेचाळीस मुलेमुली त्या वर्गात असावीत. बी. ए. ची ती दोन वर्षे मी अत्यंत आनंदात घालवली आणि आमचे मराठीचे प्राध्यापक माटे आणि वाटवे यांची व्याख्यानेही इथेच मनसोक्त ऐकली. पुढे चव्वेचाळीस साली शिक्षण संपवून मी कॉलेजातून बाहेर पडले तेव्हा माझ्यापाशी तीन गोष्टी होत्या. एम. ए. ची पदवी, वाङमयाचे झपाटून टाकणारे उत्कट प्रेम आणि प्राध्यापकांच्या सहवासाच्या अन् त्यांनी मजवर केलेल्या संस्कारांच्या नानाविध सुखद स्मृती. या साऱ्यांमध्ये श्रीपाद महादेव माटे यांच्या अध्यापनाने आणि त्यांच्या व्यक्तिमत्वानेही माझ्या मनावर फार खोल, कधी न पुसणारा असा ठसा उमटवलेला आहे. आपल्या आयुष्यातले काही योग असे असतात की ते भाग्ययोग आहेत हे देखील त्या वेळी आपल्याला कहत नाही. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर मी जेव्हा सर परशुरामभाऊ कॉलेजात नाव घातले तेव्हा असाच एक भाग्ययोग तिथे आपली वाट बघत आहे याची मला सुतराम् कल्पना नव्हती. तो योग म्हणजे तिथे प्राध्यापक या नात्याने श्रीपाद महादेव ऊर्फ बापूसाहेब माटे यांची मला मिळणार असणारी शिकवण आणि त्या

अनुषंगाने घडणारा त्यंचा निकटचा असा सहवास होता. त्यांच्या संस्काराने माझ्यातील साहित्यिक जागृत झाला आणि लेखनाची प्रेरणा मिळाली.

### विद्यार्थी प्रिय शिक्षक

श्री. म. माटे यांचे शिक्षक, लेखक, विचारवंत म्हणून त्यांचे मोठेपण तेव्हाही मला माहीत होते. मी त्यांच्याकडे दुरुन दुरुनच बघत असे. पण मी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला शिकत असतानाच एक अशी घटना घडली की मी मनाने एकदम माटयांच्या फार जवळ जाऊन पोहोचले. त्या वर्षी मी कॉलेजच्या नियतकालिकात 'सौंदर्य समीक्षा' किंवा असल्याच काही वजनदार शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. एका नवथर विद्यार्थिनीचे अगदी नवशिके लेखन होते ते. छपाईचा संस्कार झलेलेही माझे ते पहिलेच लेखन असावे. अंक प्रसिद्ध झाला.

एके दिवशी कॉलेजच्या कॉरिडॉरमधून मी चालले असताना समोरुन येत असलेले माटे अचानक माझ्या पुढयात येऊन थांबले. आपले बारीक डोळे किलबिले करुन त्यांनी माझ्याकडे क्षणभर पाहिले आणि मिश्यांतून हसत ते मला म्हणाले, "तू शांता शेळके ना? कॉलेज मॅगेझिनमधला तुझा लेख वाचला. छान आहे." इतकेच बोलून ते झपाटयाने पुढे निघून गेले. मी इतकी चकित झाले की, औपचारिक काही बोलावे, निदान त्यांचे आभार मानावेत, एवढेही मला सुचले नाही. मी वेंघळ्यासारखी तशीच उभी राहिले. एखादा पहाड माझ्यासमोर चालत येऊन उभा राहिला असता आणि मला शाबासकी देऊन गेला असता तरी मला इतके आश्चर्य वाटले नसते. माटयांच्या दृष्टीने ती गोष्ट अगदी शुल्लक असेल, पण माझ्या लेखी ती विलक्षण अद्‌भूत, रोमांचकारक घटना होती. माझ्या पहिल्यावहिल्या लेखनाची दखल एक फार मोठया माणसाने घेतली होती. नंतर निदान आठवडाभर तरी त्या आनंदाच्या धुंदीत मी हवेतच तरंगत होते. तो प्रसंग माझ्या जीवनात निर्णायक ठरला. कारण पुढे बी. ए. ला कोणता मुख्य विषय घ्यावा हे निश्चित करण्याची वेळ आली तेव्हा संस्कृतचे अतोनात आकर्षण असूनही मी मराठी हाच प्रमुख विषय निवडला. या गोष्टीच्या मुळाशी कुठे तरी माट्यांनी मला दिलेली ती शाबासकी होती असे शांता शेळके यांनी आपले मत व्यक्त केले. यावरुन त्यांची विद्यार्थी प्रियता लक्षात येते.

### विनोदी वृत्ती

माटे सरांना कुठलीही विसंगती त्यांना चटकन् जाणवे आणि मोठ्या गंमतशीर रीतीने ती ते समोरच्या माणसाच्या नजरेला आणून देत. माठ्यांचा विनोद असा सूक्ष्म असे की अनेकदा तर, त्यांचे बोलून झाले म्हणजे तो आमच्या ध्यानात येई. विनोद करताना माटे अतिशय मिष्किल दिसत. त्यांचे बारीक डोळे लुकलुकू लागत आणि मग वरवर साधे दिसणारे असे काही तरी मजेदार ते बोलून जात की, साऱ्या वर्गात, त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'हसण्याचा खोकळा' उडत असे. आम्हाला बी.ए. ला 'लोकमान्य टिळकांचे निवडक निबंध' हे पुस्तक नेमलेले होते. अर्थात असे गंभीर पुस्तक स्वतः आपण होऊन कोण खरेदी करणार? प्रत्येकाची शेजाऱ्याच्या पुस्तकावर भिस्त असे. एकदा हे पुस्तक शिकवत असताना माट्यांच्या लक्षात आले की सगळ्या वर्गात मिळून पुस्तकाच्या फारच थोडया प्रती आहेत. तेव्हा ते इतकेच म्हणाले, "येवढं उत्तम पुस्तक का खरेदी केलं नाही म्हणून प्रत्येकजण शेजाऱ्याला दोष देतो आहे!" यातली गंमत कळल्यावर आम्ही ओशाळलो आणि मग खजिलपणे हसलो.

आमच्या वर्गात पेशवे आडनावाचा एक विद्यार्थी होता. कॉलेज सकाळचे असे. पण पेशवे सकाळीच भरपेट न्याहारी करुन येत असावा. कारण तास सुरु झाला की त्याला हटकून

munotes.in

पेंग यायची. माटे कधी कधी शिकवताना वर्गात फिरत. एकदा असेच फिरता फिरता ते अचानक पेशवे बसला होता त्या बाकापाशी थांबले आणि एकदम त्याला म्हणाले, "पेशवे, झोपेनं राज्यं गेली आहेत बरं का!" पेशवे एकदम दचकून जागा झाला आणि मग अतिशय लाजला, सारा वर्ग हसत सुटला. सरांची विनोदी वृत्ती दिसून येते.

**जेष्ठ कथाकार**

शांता शेळके सरांच्या घरी गेल्या होत्या. माट्यांची कथा आपल्याला खूप आवडली हे त्यांना सांगताना त्यांनी काहीशा आगाऊपणानेच त्यांना म्हणाल्या, "विशेषतः सर, तुम्ही कथेच्या अखेरीस कथानकाला जी कलाटणी दिली आहे ना, ती फारच चांगली साधली आहे." त्यावर माटे विलक्षण मिष्किलपणे माझ्याकडे बघत हसले आणि मग अगदी भोळेपणाचा आव आणून म्हणाले, "असं काय? त्याला कलाटणी म्हणतात का? वा वा ! अग, मला हे तुमचं तंत्र वगैरे काही कळन नाही. मी आपला तक्क्याला रेलून लिहीन बसतो. या अंगाला रग लागली की मी दुसऱ्या अंगाला वळतो. तेवढीच काय ती कलाटणी मला माहीत आहे!"

**रसाळ वकृत्व**

श्री. म. माटे सरांचे वक्तृत्व रसाळ होते. त्या वक्तृत्वाच्या मोहाने आणि विनोदाच्या लोभाने मुले त्यांच्या तासाला न चुकता हजर राहात व त्याचे लेक्चर इतके विद्यार्थ्यांना आवडायचे की तर इतर विषयांची मुलेही त्यांच्या वर्गात येऊन बसत. माटयांचे बोलणे ऐकताना कधी कंटाळा येत नसे. त्यांच्या भाषेत मराठमोळा शब्द येत आणि काही शब्द तर खास त्यांचा स्वतःचाच शिक्का असलेल, त्यांच्याच टाकसाळीत तयार झालेले असत.'प्रपंचाची उस्तवारी', 'भयाचा घुटका', 'काळाची स्तबके', 'भावनांची सूक्ष्म चलनवलने', 'मनबुध्दीची स्फुरणे' या शब्दसंहती त्यांच्या तोंडी सतत येत. त्यांच्या प्रतिमा फार मजेदार असत. गडकरी भराभर उपमा देत जातात हे सांगताना ते म्हणत, "एखादी कुशल गृहिणी जशा तव्यावरच्या गरमागरम गरगरीत फुलक्या सराईतपणे पानात टाकत जाते तशा गडकऱ्यांच्या उपमा एका मागून एक येतात!" मोरोपंतांच्या प्रदीर्घ यमकांचे वर्णन करताना एकदा माट्यांनी मारवाडी बायकांच्या हातभर भरलेल्या लांबलचक हस्तिदंती चुड्याची उपमा त्यांना दिलेली आठवते. एखाद्याच्या प्रपंचाचे काही व्यंग उघडे पडले तर ते सांगताना माटे म्हणत, "बिचाऱ्याच्या संसाराच्या अगदी हिरड्या उघड्या पडल्या बघा." त्यांच्या बोलण्याच्या या विशिष्ट लकबीमुळे, चित्रदर्शी वर्णनामुळे सारा वर्ग सतत हसत राही. काव्यशास्त्र, व्याकरण असे जड विषय शिकवतानाही माटे आपल्या विशिष्ट वक्तृत्वशैलीने त्यात विलक्षण रंगत आणीत. त्यामुळे विद्यार्थी त्याचे लेक्चर चूकवत नसत.

**भाषेवर प्रभुत्व**

माटे सरांचे भाषेवर विशेष प्रभुत्व होते. मराठी भाषेची एक खास जाण, तशी रुची माटयांना होती. आपल्याच सुंदर शैलीची चव तोंडात घोळवत घोळवत ते बोलताहेत असे वाटे. विनोद हे त्यांच्या वक्तृत्वाचे प्रभावी अंग होते, परंतु स्वतंत्र विचार, चिंतनपरता आणि गांभीर्य हे त्यांच्या अध्यापनाचे खरे सामर्थ्य होते. त्यांनी आम्हांला कोणत्याही प्रश्नाचा स्वतंत्र विचार करायला शिकवले. रुढ आणि स्वीकृत परंपरांकडे वेगळया दृष्टीने बघण्याची शक्ती दिली. जातिजमातींची गुंतागुंत, सामाजिक विषमता, संतांचा मानवतावाद, रामदासांची प्रवृत्तिक शिकवण, पंडितकवींचे भाषिक चमत्कार, मानवी मनाच्या अतर्क्य हालचाली, कौटुंबिक नातेसंबंधातला हळुवार गोडवा आणि जिव्हाळा अशा कितीतरी गोष्टींवर माट्यांनी वर्गात

munotes.in

शिकवताना केलेले भाष्य आजही आठवते. या गोष्टींना माटे आपले स्वतःचे वेगळे परिमाण देत आणि मग त्यांकडे बघताना सगळा पारंपरिक दृष्टिकोनाच बदलून जाई.

माटयांच्या छोट्या छोट्या, सूत्रबध्द वाक्यांचा प्रकाश पडला की आशयाची नवनवी अज्ञात विश्वे लख्खकन उजळून जात. 'मानवबुध्दीची स्फुरणे हे माणसाला लाभलेले फार मोठे वरदान आहे.' 'काळाची स्तबके ओलांडून झेपावत पुढे जायला हवे आहे.''स्त्रियांचे दास्य एकदम आणि कायमचे निपटून टाकायला हवे आहे.' यांसारखी मोठयांची ठाम विधाने मनाला एकाच वेळी स्तिमित आणि सचेत करीत. संतकाव्य शिकवत असताना जनाबाई संदर्भात माटे एकदा म्हणाले, "ही जनी स्त्रीत्वाच्या नवाच प्रकाशझोत पडल्याप्रमाणे वाटले." अशा त्यांनी संत जनाबाई बद्दल गौरउद्‌गार काढले आहेत.

## साहित्यिक संस्कार

शांता शेळके यांचे शिक्षण संपल्यानंतर त्यांचे आणि माटे यांचे संबंध अधिक द्दढ झाले. त्या म्हणतात मी थोडेसे लेखन करु लागले होते. त्यामुळे असेल कदाचित. मी माटयाच्या घरी जाऊ लागले. धिटाईने एखादे वाक्य त्यांच्याशी बोलू लागले. एकदा कशी कोण जाणे, शालेय विद्यार्थ्यांसाठी वाचनमाला तयार करण्याची कल्पना माटयांच्या डोक्यात आली. कदाचित ते काम त्यांच्यावर कुणी सोपवलेही असेल. पण त्या सुमाराला मी माटयांच्या घरी सहज गेले असता ते मला म्हणाले, "आली ? बरं झालं. ये अशी. इथं बैस अन् मला दोन-तीन कविता लिहून दे." मी थक्कच झाले. प्रत्यक्ष माटयांसमोर बसून कविता लिहून द्यायच्या ? ते कसे शक्य होतो ? पण त्यांच्याशी जरा चर्चा केल्यानंतर त्यांना काय हवे होते ते मला उमगले. विद्यार्थ्यांसाठी बाळबोध, प्रासादिक आणि मुख्य म्हणजे उपदेशपर असे पद्य त्यांना माझ्याकडून लिहून हवे होते. मी त्यांना दोन वृतबद्ध कविता लिहून दिल्या. बारीक डोळे करुन त्यांनी त्या वाचल्या आणि खूष होऊन म्हणाले, "वाह ! छान ! असंच लेखन हवं होतं मला !" मी मनातून काय ते समजले. सरांच्याकडून साहित्यिक संस्कार माझ्या मनावर झाले.

## साहित्यावर प्रभूत्व माटेसर

माटे सरांचे साहित्यावर प्रभुत्व होते. संतवाङमय, पंडिती वाङमय, टिळक-आगरकरांसारखे विचारवंत, ललित साहित्य या सर्व विषयांवर माटे मुक्तपणे बोलत. या त्यांच्या बोलण्यातून देखील मला खूप काही मिळत असे. कधी कधी मला कॉलेजमधल्या त्यांच्या तासांचीही आठवण होई, व तोच सुखद काळ पुन्हा चालू झाला आहे असे वाटे. या वेळी कितीतरी मराठी शब्दांच्या व्युत्पत्ती त्यांनी मला सांगितल्या असतील. त्यांतल्या काही आजही माझ्या ध्यानात आहेत. 'आगवळ' हा शब्द 'अग्रवलय' पासून झाला, 'घंगाळे' शब्द गंगालयापासून सिध्द झाला, 'आतप्रोत' या शब्दात ताणा आणि बाणा या विणकर व्यवसायातल्या शब्दांचे सुचन आहे, असे ज्ञानाचे कण त्यांच्या बोलण्यातून एकसारखे मिळत राहात. ताणाबाणा म्हणजे वस्त्रातले उभे आडवे धागे हेही मला माहीत नव्हते. मग ओतप्रोत हे त्यांचे संस्कृत मूळ रुप कुठून असणार ? माझे ते अज्ञान बघून माटे हसले आणि म्हणाले, "अग, तू विणकर समाजातली ना ? मग ताणाबाणा हे शब्द तुला माहीत असायलाच हवेत !" असे ते म्हणायचे.

## साहित्याबद्दलची भूमिका :

आयुष्याच्या अखेरच्या काळात माट्यांनी खूप लेखन केले. त्यातले बरेच लेखन आर्थिक निवडीमुळे त्यांना करावे लागले. एकदा मी त्यांच्याकडे गेले असता, एका मासिकाच्या

संपादिका बाई त्यांच्याकडे दिवाळीचा लेख नेण्यासाठी आलेल्या होत्या. माटयांचे काही लेख तयार होते. ते त्यांच्या पुढयात ठेवून माटे म्हणाले, "या मेथीच्या जुडया आहेत. यांतली तुला हवी ती जुडी उचल आणि पैसे देऊन जा." ते ऐकून मला कसेसेच वाटले. मी माटयांना म्हटले, "लेखन आहे ते तुमचं. त्याला मेथीची जुडी काय म्हणता?" त्यावर माटे हसून म्हणाले, "अग, तसंच आहे ते. मेथीची जुडीच ती. जुडी द्यायची अन् मोल घ्यायचं."

**समारोप :**

१९५७ साली माटे गेले. त्यांच्या निधनालाही आता बराच काळ लोटला. आज मागे वळून पाहिले म्हणजे वाङमयीन आणि वैचानिक क्षेत्रांत माटे एखाद्या डोंगरासारखे उभे असलेले दिसतात. त्यांनी केलेले अफाट काम बघून छाती दडपून जाते. अस्पृष्यांसाठी अनेक वर्षे अविरत कार्य केल्यानंतर, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर आल्यावर त्यातून शांतपणे अंग काढून घेण्यात त्यांनी दाखवलेली समंजस निरिच्छता बघून मन स्तिमित होते. माटयांचे कुठलेही लेखन जुने वा कालबाह्य वाटत नाही. उलट नव्या काळाने ज्या नव्या समस्या निर्माण केल्या आहेत, त्यांच्या संदर्भात आज कदाचित ते अधिक अर्थपूर्ण व आवश्यक ठरत आहे. विद्यार्थिदशेत, कोवळ्या आणि अपरिपक्क वयात, माटयांसारखा विचारवंत आणि प्रेमळ गुरु लाभला हे आजही मला माझे मोठे भाग्य वाटते. अशी प्रांजळ कबुली शांता शेळके यांनी दिली आहे.

## २.६ जोग सर

### रा. श्री. जोग - परिचय

रा. श्री. जोग यांचा १५ मे, १९०३ रोजी कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण पुण्यात झाले, त्यांना मुंबई विद्यापीठातून त्यांनी एम.ए. ची पदवी घेतली. पदवीचे शिक्षण घेतल्या नंतर प्राध्यापक म्हणून नाशिक, सांगली आणि पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात नोकरी केली. मराठीचे साहित्य समीक्षक, कवी आणि एक विचारवंत म्हणून रा.श्री. जोग परिचित आहेत.

शिक्षण घेत असताना लेखिका शांता शेळके यांचा जोग सरांशी परिचय झाला. हळूहळू त्यांच्याशी ओळख वाढली तसे लेखिका नेहमीच त्यांच्या घरी जात असत. वाङ्मयविषयक, अभ्यासविषयक नेहमीच लेखिकेला त्यांचे मार्गदर्शन मिळत असे. तेव्हा नुकतेच लेखिकेच्या साहित्याशी संबंध येत होता. त्यामुळे साहित्याबद्दल लेखिकेच्या मनात उत्साह असे. याबद्दल शंका असे या शंकाचे समाधान करुन अधिक चिकित्सकपणे साहित्याचा अभ्यास कसा करावा, याबाबत ते लेखिकेला मार्गदर्शन करत असत. साहित्य तसेच इतर विषयांवर लेखिका आणि जोग सर यांच्यात चर्चा होत असे. जोग सरांच्या वैचारिक प्रगल्भतेचा अनुभव शांता शेळके यांना घेता आला. इतकेच नव्हे तर त्यांच्या सान्निध्यात लेखिकेच्या मनावर अनेक संस्कार होत गेले. लेखिकेला वैचारिक प्रगल्भता दिली असे शांता शेळके प्रांजळ कुबली देतात. त्यांची साहित्याबाबतची अभिरुची सूक्ष्म आणि चोखंदळ केली. याचा फायदा लेखिकेला भविष्यात झाला. त्यांच्याबरोबर झालेल्या ओळखीमुळे लेखिकेने त्यांना जवळून अनुभवले होते. विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार होण्यासाठी त्यांच्या सभोवतालचे वातावरण, मित्र-मैत्रिणींचा सहवास, विविध विचारप्रवाह, ग्रंथसंपदा या गोष्टी महत्त्वाच्या असतात. जोग सरांना यांची जाणीव होती, म्हणून त्यांनी विद्यार्थीच्या साहित्याबद्दलची विशेष आवड निर्माण केली.

रा. श्री. जोग सरांच्या सहवासांने माझे साहित्य लेखन फुलत गेले. साहित्याची विशेष आवड निर्माण झाली. जोग सरांच्या मार्गदर्शनाने माझे व्यक्तिमत्त्व घडत गेले असे लेखिकेने सरांविषयी मत व्यक्त केले आहे.

### रा. श्री. जोग - प्रस्तावना

रा. श्री. जोग हे शांता शेळके यांना शिक्षक म्हणून लाभले. त्यांच्या आठवणी सांगताना शांता शेळके म्हणतात, तीन प्राध्यापक माझ्या आयुष्यात मला भेटले. प्राध्यापक बापूसाहेब माटे, प्राध्यापक के. ना. वाटवे आणि प्राध्यापक रा. श्री. जोग. फर्ग्युसन कॉलेजात शिकवत असूनही विद्यार्थिनी या नात्याने माटे, वाटवे यांच्यापेक्षाही मला जोग सरांच्या अधिक जवळ जाता आले. त्या दृष्टीने माझ्या विद्यार्थिजीवनात जोगांचे स्थान अनन्यसाधारण म्हणावे लागेल.

### ज्येष्ठ साहित्यिक

प्रा. रा. श्री. जोग यांचा प्रत्यक्ष परिचय होण्यापूर्वी ते नाव आमच्या चांगल्या परिचयाचे झाले होते. इतकेच नव्हे तर त्या व्यक्तीच्या स्वभावातल्या काही गमतीदार छटाही आमच्या ध्यानात आल्या होत्या. तेव्हा बी. ए. ला मराठी ऑनर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांना काव्यशास्त्रासाठी जी पुस्तके अभ्यासावी लागत त्यांत द. के. केळकर यांचे 'काव्यालोचन' आणि रा. श्री. जोग यांचे 'अभिनव काव्यप्रकाश' ही दोन पुस्तके प्रमुख होती. आम्ही बी. ए. ची मुले ती दोन्ही पुस्तके अगदी घोटून काढत असू. जोगांचा मला प्रथम परिचय झाला तो 'अभिनव काव्यप्रकाशा' तूनच असे म्हणायलाही हरकत नाही. जोगांची विद्वत्ता, त्यांची रसिकता, त्यांचा अभ्यासूपणा आणि त्यांची विवेचक शक्ती या गुणांच्या जोडीलाच त्यांचा पराकाष्ठेचा मिष्किलपणाही या ग्रंथात जागोजाग प्रकट झालेला आहे. अशी स्थळे निवडून काढून त्यांतली मौज चाखणे, त्यांतल्या सूक्ष्म पण मार्मिक विनोदाने आपल्याला वाटलेली गंमत इतरांच्या अनुभवाला आणून देणे ही त्या काळातली आमची एक मोठी करमणूक असायची. काही कवींच्या काव्यतले छोष दाखवताना कधी 'ऊनोक्ती' (understatement) चा अवलंब करून, कधी मार्मिक अवतरणचिन्हे वापरुन तर कधी वरकरणी स्तुतीचे मिष करुन जोगांनी त्यांच्यावर जी टीका केलेल असे ती विलक्षणखोचक असायची. मला वाटते, एक विद्वान ग्रंथकार, एक चिकित्सक समीक्षक म्हणून दूरत्वाने जाणवणारे जोग जिवंत, हाडामासांची, कुतूहलजनक आणि मनापासून आवडणारी व्यक्ती म्हणून मला जवळीकीने जाणवू लागले.

### जोग सरांची भेट

जोग सरांच्या विषयी शांता शेळके ऐकून होत्या. त्यांना भेटावे असे त्यांना वाटत होते. रा. श्री. जोगांना प्रत्यक्ष पाहण्याचा योग शांताशेळकेना आलेला नव्हता. तो कधी येईल असेही त्यांना वाटले नव्हते. पण पण तो योग आला. जोग त्या वेळी पुकतेच नाशिकवरुन पुण्याला आले असावेत. ते एकेचाळीस साल होते. माझा धाकटा भाऊ तेव्हा फर्ग्युसन कॉलेजात जाऊ लागला होता. एके दिवशी सहज सांगावे तसे त्याने मला म्हटले, "प्राध्यापक रा. श्री. जोग आमच्या कॉलेजात आहेत." त्याचे शब्द ऐकताच मला जेवढ विस्मय तेवढाच आनंद वाटला. आणि त्याच वेळी भावाबरोबर कधी तरी फर्ग्युसन कॉलेजात जाऊन जोगांची ओळख करुन घ्यायची असा मी निर्धार केला. त्या निर्धाराप्रमाणे एके दिवशी मी भावाच्या सोबतीने - आणि वशिल्याने त्याच्याबरोबर फर्ग्युसन कॉलेजात गेले. जोगांनी आम्हाला कॉलेजाच्या लायब्ररीत भेटायला सांगितले होते. फर्ग्युसनची लायब्ररी भव्य आणि काहीशी काळोखी. निदान त्या वेळी तरी ती मला तशी वाटली. तिथे बसून जोगांची वाट बघताना छाती उगीचच धडधडत राहिली. काही वेळाने

जोग आले. भावाने त्यांच्याशी माझी ओळख करुन दिली. त्या पहिल्या भेटीत मी दबकूनच गेले होते. प्रथम मी फारशी बोललेही नाही. जोगांचा भरीव देह, थोराड चेहरा, मुखावरचा गंभीर भाव यामुळे प्रथमदर्शनी तरी मला त्यांचे व्यक्तिमत्त्व फारसे आश्वासक वाटले नाही. खरे तर ते मला प्राध्यापक वाटलेच नाहीत. एखादा यशस्वी डॉक्टर किंवा इंजिनियर असावा तसे ते दिसत होते.

मला जोगांचे भय वाटले. पण एकदा त्यांच्याशी बोलू लागल्यानंतर तो भीतीचा भाव केव्हा ओसरुन गेला आणि मी मोकळेपणाने केव्हा गप्पा मारु लागले ते मला कळलेही नाही. बोलता बोलता जोगांनी अचानक म्हटले, “तुमच्या कॉलेज मॅगेझिनमध्ये तुमची कविता आली आहे. होय ना? मी ती वाचली.” जोगांचे ते शब्द ऐकून मी अवाक झाले. त्यांच्याकडे नुसतीच बघत राहिले. बी. ए. च्या वर्गातल्या-त्याही दुसऱ्या कॉलेजमधल्या-एका विद्यार्थिनीची नवथर कविता वाचून ती त्यांनी ध्यानात ठेवलेली असावी या गोष्टीचे मला विलक्षण आश्चर्य वाटले. माझ्या कवितेबद्दलचे त्यांचे मत विचारण्याचे धाष्टर्य मी अर्थातच केले नाही. रा. श्री. जोगांनी माझी कविता वाचलेली होती. तेवढेच मला खूप होते. मला अमर्याद असा आनंद झाला होता. त्या आनंदाच्या लाटांवर तरंगत मी घरी आले.

**विद्यार्थिप्रिय प्राध्यापक**

रा. श्री. जोग सर हे विद्यार्थिप्रिय प्राध्यापक होते. वर्गात ठराविक तास घेतले म्हणजे आपले शिकवण्याचे काम संपले असे त्यांनी कधीच मानले नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी सदैव मुक्तद्वार असे. वस्तुतः मी वेगळया कॉलेजची विद्यार्थ्यांनी. पण आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांत आणि माझ्यात जोगांनी कधीही भेदभाव केला नाही. जी वागणूक त्यांना तीच मलाही मिळत असे. जोगांनी कधीही भेदभाव केला नाही. जी वागणूक त्यांना तीच मलाही मिळत असे. जोगांच्या घरी गेल्यावर कित्येकदा ते खाली जळमजल्यावर आपल्या मुलांबाळांत बसलेल असे भेटत. पण तसे ते तिथे नसले तर त्यांना भेटण्यासाठी पहिल्या मजल्यावरच्या पुढल्या माडीत सरळ जाता येई. ती जोगांची बैठकीची खोली आणि अभ्यासिकाही. आत गेल्याबरोबर उजव्याहातला जमिनीवर बरणारांसाठी स्वच्छ बिछायत. बसणाऱ्यांसाठी डावीकडल्या भिंतीशी काही खुर्च्या असायच्या.

अर्ध्या भागातल्या दुसऱ्या कोपऱ्यात रस्त्याकडेच्या खिडकीशी जोगांचे टेबल. त्याच्या लगत एक खुर्ची. त्यांचे सारे लेखन, वाचन, अभ्यास तिथ चाले. इंग्रजी, संस्कृत, मराठी पुस्तके ठेवलेली. खोलीच्या भिंतींना तक्तपोशीलगत चौफेर फळ्या मारलेल्या. त्यावर व्यवस्थितपणे रचून ठेवलेली अनेक पुस्तके. फायली. मासिकांचे एकत्र बांधलेले अंक. मला त्या पुस्तकांचे, फायलींचे, मासिकांच्या बांधलेलया अंकांचे फार आकर्षण वाटायचे, पण जोगांच्या जवळ ते मागण्याचा धीर होत नसे. एकदा कशावरुन तरी ‘प्रतिभा’ पक्षिकाबद्दल बोलणे चालले होते. मी सहज महटले, “‘प्रतिमे’चे अंक कुठे पाहायलाही मिळन नाहीत.” त्याबरोबर जोगांनी उठून स्वतःजवळ असलेले ‘प्रतिभे’चे बांधलेले अंक काढून मला दिले. इतकेच नव्हे तर त्या अंकांबद्दल ते किती तरी वेळ उत्साहाने, अगत्याने बोलत नाहिले. ते अंक वाचण्याचे औत्सुक्य कुणीतरी दाखववे याचाच त्यांना आनंद झाला होता. ग्रंथाबद्दल त्यांना विशेष आवड होती.

जोगांच्या त्या माडीवरच्या बैठकीत गेले की एका सुसंस्कृत, समृध्द वातावरणात गेल्यासारखे वाटे. कधी जोग एकटे असत. कधी त्यांच्याकडे इतर विद्यार्थी-विद्यार्थिनी आलेल्या असत. अनेक वाङ्मयीन प्रश्नांवर बोलणे होई. दिलखुलासपणे चर्चा चाले. पण या चर्चेला वादविवादाचे, भांडणाचे स्वरुप कधी येत नसे. एखादा विद्यार्थी बोलण्याच्या भरात क्वचित

आवाज चढवी. पण जोगांचा आवाज कधी चढत नसे. विद्वत्तेच्या किंवा अधिकाराच्या वडीलपणाचा उपयोगक करुन दुसऱ्याचे बोलणे किंवा त्याची मते ते कधी दडपून टाकत नसत. त्यांचा संयम कधी सुटत नसे आणि तोलही कधी ढळत नसे. शांतपणे, समजूतदारपणे ते आपले म्हणणे दुसऱ्यापुढे मांडत आणि कधी कधी फार गमतीदार रीतीने दुासऱ्याची चूक ते त्याच्या पदरात घालत. त्यामुळे चढलेले आवाज आपोआप उतरत. तापलेल्या वृत्ती थंड होत. आणि वादाचा समारोप उभयपक्षी समाधानकारक होई. जोगांच्या सर्व संभाषणावर त्यांच्या त्यांच्या हलक्या, सौम्य,प्रसन्न विनोदाची शिंपण झालेली असे आणि त्यांच्या अभिजात अभिरुचीचे नि औचित्यपूर्ण विवेकाचे त्याला बळकट अधिष्ठान असे. त्यामुळे त्यांच्या अभिजात अभिरुचीचे नि औचित्यपूर्ण विवेकाचे त्याला बळकट अधिष्ठान असे. त्यामुळे त्यांच्या बैठकीतल्या त्या सर्व चर्चांना एक विशिष्ट पातळी आपोआपच लाभे. नंतरच्या काळात खासगी आणि जाहीर रीतीने झालेल्या अनेक वाङ्मयीन चर्चा, संभाषणे, वादविवाद मी पाहिले-ऐकले आहेत. पण जोगांच्या बैठकीतल्या चर्चाइतक्या निर्मळ अन् निरागस वातावरणातल्या चर्चा क्वचितच कधी माझ्या अनुभवाला आल्या असतील.

**भाषेवर प्रभुत्व**

मराठी साहित्यसृष्टीशी शांता शेळके यांचा नुकता कुठे परिचय होऊ लागला होता. मला खूप वाचावेसे वाटे आणि जे वाचले त्यासंबंधी कुणाजवळ तरी खूप बोलावेसे वाटे. शंका विचाराव्याशा वाटत. कुठे काही अपुरेपणा जाणवला तर त्याबद्दल असंतोष व्यक्त करावासा वाटे. जे अतिशय आवडले त्याबद्दल हर्षनिर्भर होऊन ओसंडून जावेसे वाटे. तर जे आवडले नसेल त्याबद्दल कडकडून भांडावेसेसुध्दा वाटे. माझ्या असंस्कारित, असमंजस पण अति उत्सुक मनाची ती एक फार मोठी गरज होती. मग मी केव्हाही हक्काने जोगांकडे जाई जे वाचले असेल त्यावर त्यांच्याशी तासन्तास चर्चा करी. शंका विचारी. वाद घाली. पण जोग शांतपणे, सस्मित मुखाने सारे ऐकून घेत. दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घ्यायची त्यांची नेहमीच तयारी असे. पण आपला मुद्दा ते सोडत नसत. कारण बऱ्याच विचारांती ते मत त्यांनी ठरवलेले असे. आपल्या प्रत्येक विधानाला त्यांच्यापाशी बळकट आधार असे. पुरावा असे. त्यामुळे माझी बाजू अनेकदा लंगडी पडे. पण माझ्या अपक्व विधानांचाही त्यांनी कधी उपहास केल्याचे मला स्मरत नाही की माझ्या अनावर बोलण्याचा त्यांनी कधी कंटाळा केल्याचेही आठवत नाही.

जोग सरांनी विचारांना प्रगल्भता दिली. माझ्या त्या वेळच्या उमेदवारीतल्या अर्ध्याकच्च्या कविता न कंटाळता तपासून दिल्या आणि शुध्दलेखन, वृत्तजातींची निर्दोषता, एकूण रचनेतला रेखीवपणा या बाबतीत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी या नात्याने प्रत्यक्ष अभ्यासात तर जोगांचे मला खूपच साह्य झाले. माझ्या एम. ए. च्या परीक्षेच्या वेळी आपल्या भाषाशास्त्राच्या टिप्पणांच्या वह्या त्यांनी विश्वासाने माझ्या स्वाधीन केल्या इतकेच नाही तर ऐन परीक्षा तोंडावर आली असता आजारामुळे घाबरलेल्या, हताश झालेल्या मला त्यांनी धीर दिला. खरोखर त्यांनी सांगितले म्हणूनच मी तेव्हा परीक्षेला बसले. त्या वर्षी माझी परीक्षा हुकली असती तर पुढे कदाचित कधीच मी एम. ए. झाले नसते. कदाचित माझा पुढचा आयुष्यक्रमही बदलून गेला असता. अशी प्रांजळ कबुली शांता शेळके यांनी दिली आहे.

**विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने विचार विनिमय**

विद्यार्थिदशेत जोगांशी मोकळेपणाने विचारविनिमय करताना क्वचित मी त्यांच्याशी वादही घालत असे. त्यांची सर्वच मते मला आवडत किंवा मान्य होत असे नाही. मी वयाने वाढू

लोगले तसतसे जोगांच्या आणि आपल्या मतांत एक सूक्ष्म अंतर पडत चाललेले मला जाणवू लागले आणि कळत नकळत त्या विषयी असंतोषही वाटू लागला. जोगांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात तर हे अंतर अधिकाधिक वाढत गेले. मराठी नवकवितेवरचे जोगांचे आक्षेप साऱ्यांना माहितच आहेत. त्यातले काही आक्षेप रास्तही होते. परंतु जोगांसारख्या उमद्या, रसिक, काव्यप्रेमी समीक्षकाला मराठी नवकाव्याबद्दल कधी प्रेम वाटले नाही हे एक दुर्दैव आहे असे आजही मनात येते. हा दोन पिढ्यांत पडणाऱ्या अंतराचा परिणाम होता का? असेलही कदाचित. जोगांच्या समीक्षेबद्दल मला फार आदर वाटे. आजही वाटतो. पण त्यांची टीकापध्दती मला नेहमीच वाजवीपेक्षा अधिक आखीवरेखीव, नीटनेटकी वाटे. गुणांची आणि दोषांची संख्या काढून, त्यांची वजावाट करुन एखाद्या कलावंताचे वा कलाकृतीचे मूल्यमापन करणे मूलतःच कुठे तरी फार चुकीचे असले पाहिजे, त्यामुळे अनेक प्रतिभावंतांवर अन्याय होतो, अनेक कलाकृतींचे सूक्ष्म सौंदर्य नकळत हुलकावणी देऊन निसटून जाते आणि साहित्यातले काही अत्यंत मूलभूत नि महत्त्वाचे प्रश्न तसेच अनुत्तरित राहतात असे काहीसे मला वाटे. जोगांच्या रसग्रहणात देखील एक प्रकारचा संथपणा, थंडपणा, अलिप्तता मला जाणवत राही आणि ती माझ्या मनाला खोल कुठे तरी बोचत असे. उत्कृष्ट काव्याचा किंवा कोणत्याही उत्कृष्ट कलाकृतीचा रसास्वाद घेताना मन कसे भरुन, ओसंडून यायला हवे, वृत्ती कशा बेहोष, तदाकार व्हायला हव्यात असे मला वाटे. त्यामुळे जोगांच्या थंड, हिशेबी रसग्रहणात, मूल्यमापनात अपुरेपणा जाणवत राही. पूर्ण समाधान मिळत नसे. शिवाय अशा प्रकारच्या रसग्रहणाने एखाद्या कलाकृतीचे स्वरुप फक्त आपल्याला जाणवते, तिचा आत्मा समजून घेता येत नाही आणि स्वरुप समजावून घेण्याऐवजी आत्म्याला भिडता येणे जास्त आवश्यक आहे असेही मला तीव्रतेने वाटत असे. हे सारे अर्थातच अगदी बिनचूकपणे काही मला जोगांना सांगता येत नसे. पण माझ्या परीने मी ते त्यांना सांगण्याचा अनेक वेळा प्रयत्न करी.

**संस्कृत भाषेवर प्रभाव**

जोग सरांचा जुन्या संस्कृत साहित्यशास्त्राच्या पठडीत तयार झालेले टीकाकार. रसव्यवस्थेवर त्यांचा पक्का भर आणि भरवसा. पण जुन्या संस्कृत साहित्यातल्या अनेक सौंदर्यस्थळांचा देखील अन्वय ही रसव्यवस्था नीट लावू शकत नाही, तिथे ती अपुरी पडते असे मला वाटे. या संदर्भात एकदा जोगांशी झालेली चर्चा मला आठवते. आम्हाला बी. ए. च्या वेळी संस्कृतला भवभूतीचे 'उत्तररामचरित' हे सुंदर नाटक अभ्यासाला नेमले होते. त्यातला 'पुरा यत्र स्त्रोतः' हा प्रसिध्द श्लोक जेव्हा मी वाचला तेव्हा मला अगदी भारावून गेल्यासारखे झाले. जुन्या रसव्यवस्थेत या श्लोकाचे स्थान कुठे आहे असामी जोगांना प्रश्न विचारला, त्यावेळी त्यांनी तया रसव्यवस्थेत तो चपखल बसवून दाखवला. पण त्यांच्या उत्तराने माझे समाधान झाले नाही. 'शाकुंतला' तील 'रम्याणि वीक्ष्य' सारख्या श्लोकाबद्दलही मी जोगांशी असाच वाद घातल्याने मला आठवते. या श्लोकामध्ये जो मनोभाव वर्णिलेला आहे त्याचे सूक्ष्म सौंदर्य रसांच्या ढोबळ स्थूल वर्गीकरणात कुठेच्या लुप्त होते असे मला त्या वेळी देखील वाटायचे. पण जोगांना ते तसे कधी वाटले नाही. जोग सरांचे संस्कृत भाषेवर प्रभाव होता.

**मनमिळावू स्वभाव**

जोग सर शिक्षक, विद्यार्थी, लेखक, वाचक यांच्या समवेत वावरताना मनमिळावू स्वभावाने वावरत. जोगांबरोबर केलेल्या चर्चांचे असे कितीतरी प्रसंग मला आजही वाठवतात. त्या त्या प्रसंगी झालेले मतभेद, वाद, हास्यविनोद सारे स्मरते. त्या चर्चा अनेकदा अर्धवटच राहात. ठाम, निर्णायक उत्तरे त्यांतून मिळत नसत. कित्येकदा जुन्या प्रश्नांतून अधिक गूढ असे

नवे प्रश्न निर्माण होत. पण हे सारे फार रंजक असे. उद्‌बोधक असे. बौध्दिक झटापटीचा आनंद त्यातून मिळे. त्या प्रमाणे आपल्या मनाच्या कक्षा अधिक विस्तार पावल्याचे समाधानही सतत जाणवत राही. आणि हे सारे होत असताना जोगांच्या व्यक्तिमत्वाच्या काही फार विलोभनीय छटा मनावर ठसा उमटवून जात त्यांचे आकर्षण तर विशेष असे.

**सौंदर्यशास्त्राचे गाढे अभ्यासक**

जोग सर सौंदर्यशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. ‘अभिनव काव्यप्रकाश' या त्यांच्या महत्त्वपूर्ण ग्रंथाची निर्मिती झाली. ‘सौंदर्यशोध आणि आनंदबोध’ हा त्यांचा ग्रंथ आधुनिक सौंदर्यशास्त्राची सुरुवात म्हणून आजही लक्षणीय मानावा लागेल. तांब्यांच्या कवितासंग्रहाचे संपादन करताना त्य ग्रंथाला लिहिलेली विस्तृत प्रस्तावना, ‘विरहतरंग’ या आपल्या अत्यंत आवडत्या खंडकाव्याचे केलेले अभ्यासपूर्ण संपादन, ‘अर्वाचीन मराठी काव्य’ या ग्रंथातून आधुनिक मराठी कवितेचा करुन दिलेला साक्षेपी परिचय, कुसुमाग्रजांच्या जोडीने ‘काव्यवाहिनी’च्या भागांचे केलेले संकलन व संपादन - जोगांच्या या सर्व लेखनामागे तयांचे उत्कट काव्यप्रेम आहे तसाच त्यांचा अनेक वर्षांचा व्यासंग आणि त्यांची अपार परिश्रमशीलताही आहे. मराठी रसिकाला काव्याची सुजाण दृष्टी लाभावी, तशीच तयाची रसिकता संस्कारित, निर्दोष, चोखंदळ व्हावी या उत्कट इच्छेतून जोगांचा हा सर्व लेखनपंपंच निर्माण झाला. याच प्रेरणेतून ‘मराठी वाड्मयभिरुचीचे सिंहावलोकन’ सारखा ग्रंथ त्यांनी लिहिला. ‘चर्वण’, ‘विचक्षणा’ सारखे स्फुट टीकालेखांचे संग्रह प्रसिध्द केले. जोगांच्या या लेखनात विविधता आहे, पण त्या सर्वांना जोडणारे सूत्र एकच आहे. अखंड, अव्यभिचारी काव्यप्रेम आणि काव्यविषयक अभिरुची निर्दोष राखण्याची तळमळ त्यांची होती.

**प्रसिध्दी पासून लांब**

जोगांच्या प्राध्यापकाच्या व्यवसायामुळे आणि त्यांच्या लेखनामुळे जी प्रसिध्दी त्यांच्या वाट्याला आली असेल तेवढीच काय ती. आपलीकडे अट्टाहासाने ती मिळवण्याचा त्यांनी कधी खटाटोप केला नाही. काही विद्वान लेखक, टीकाकार, प्राध्यापक आपल्याभेवती शिष्यगणांचे समुदाय जमा करतात. आपली अशी एक स्वतंत्र परंपरा निर्माण करतात. आपले ‘पिठ’ स्थापन करतात. हेही जोगांनी अखेरपर्यंत कधी केले नाही. त्यांच्या स्वभावालाच ते जमण्याजोगे नव्हते. आणि म्हणूनच की काय, जोगांच्याबद्दल अतिशय प्रेमादर मनात बाळगणारे त्यांचे शेकडो विद्यार्थी सर्वत्र आढळून येत असताना देखील जोगांची म्हणून एक प्रस्थापित परंपरा कुठे दिसणार नाही किंवा त्यांच्या शिष्यत्वाची बिरुदे मिरवणारे तरुण लेखक-समीक्षकही कुठे आढळणार नाहीत. शांतपणाने अनेकांच्या मनांमध्ये रुजलेला पण तरीही तयांच्यावर आपले स्वामित्व न गाजवणारा असा विचारवंत विरळा.

जोगांच्या प्रसिध्दिविन्मुखतेची एक मजेदार आठवण सांगण्याजोगी आहे. अनेक वर्षापूर्वी जोग मुंबईला आले होते. त्या वेळी ते माझ्याकडे आले. आचार्य अत्रे तेव्हा कुठल्या तरी वाड्मयीन परिषदेचे अध्यक्ष निवडले गेले होते. कदाचित तो त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचाही समारंभ असेल. पण त्या निमित्ताने जोग बराच वेळ अत्र्यांबद्दल फार भारावून फार चांगले बोलत होते. ते ऐकून मी म्हटले, “हे सारं बोलता आहात तर अत्र्यांना अभिनंदनाचं एक पत्र का पाठवत नाही सर ?” त्याबरोबर जोग एकदम थांबले आणि मग किंचितच हसून पण मनापासून म्हणाले,

"अभिनंदनाच्र पत्र पाठवायला खरचं काही हरकत नाही. पण - पण मग "'नवयुग' मध्ये अभिनंदनाची पत्रं पाठवणारांच्या यादीत नाव छापून येतं ना, ते नको वाटतं मला!" यावरुन प्रसिद्धीपासून लांब राहण्याची त्यांची वृत्ती दिसून येते.

**समारोप**

जोगांच्याबद्दल विचार करु लागले म्हणजे सर्वात विशेष आठवतो-जाणवतो तो त्यांचा समघातपणा. (हा शब्दही जोगांचाच.) नाही म्हटले तरी मला त्यांचा बराच निकट सहवास लाभला. पुष्कळ मोठ्या माणसांच्या बाबतीत मी असे पाहिले आहे की त्यांच्या मनात काही असंतोष धुमसत असतो. काही निराशा दडलेल्या असतात. क्वचित कुठे आपल्याला पुरेसे यश मिळाले नाही ही खंत त्यांना जाणवत असते तर क्वचित आपले योग्य ते श्रेय आपल्या पदरात पडलेले नाही ही बोच त्यांच्या जिवाला सलत असते. एरव्ही ही माणसे कितीही संतुष्ट, प्रसन्न दिसली तरी खासगी संभाषणात केव्हा ना केव्हा तरी त्यांच्या मनाच्या तळातला हा गाळ उधसुन वर येतो. वाणीत कडवटपणा जाणवतो. असंतुष्टतेचा फणकारा उमटतो. कुणाबद्दल तरी अनुदार व कुत्सित उद्‌गार मुखावटे सहज बाहेर येतात. जोगांच्या बाबतीत सांगण्यासारखी गोष्ट ही की इतक्या वेळा त्यांच्याशी इतक्या जवळिकीने बोलणे चाललेले असतानाही त्यांच्या वर्तनात, शब्दात, एखाद्या ओझरत्या उद्‌गारात देखील असा असंतोष कधी प्रकट झाला नाही किंवा इतरांबद्दल अप्रशस्त, अशोभनीय उद्‌गार त्यांच्या तोंडून कधी बाहेर पडला नाही. मी जेव्हा त्यांची विद्यार्थिनी होते तेव्हा अजाण, अननुभवी होते. वृत्तीच्या या निरामय प्रसन्नतेचे, मनाच्या या स्थिर समघातपणाचे मोल मला तेव्हा नीटसे कळले नाही. आता माझे वय वाढल्यावर आणि जीवनाशी अधिक परिचय झाल्यावर जोगांच्या या संयमाचे महत्त्व कळते आहे आणि तो अंगी बाणवणे किती अवघड हेही उमगते आहे.

## २.७ प्रल्हाद केशव अत्रे

**प्रल्हाद केशव अत्रे - परिचय**

मराठी साहित्यातील ज्येष्ठ लेखक म्हणून प्र.के. अत्रे सुपरिचित आहेत. प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म सासवड (पुणे) १३ ऑगस्ट, १८१८ मध्ये झाला. साहित्य, पत्रकारिता, राजकारण, चित्रपट, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात त्यांनी कामे केली. विविध कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्रलेखन, वृत्तपत्र लेखन यांसारखे साहित्यप्रकार लिहुन त्यांनी मराठी संग्रह साहित्यात भर टाकली. हिंदी व मराठीचे चित्रपट निर्माते, एक शिक्षणतज्ज्ञ व राजकारणी म्हणून देखील काम केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी प्रमुख नेत्याची भुमिका बजावली. 'अध्यापन' (१९२३), 'रत्नाकर' (१९२६), 'मनोरमा' (१९२९), 'नवे अध्यापन' (१९३५), 'इलाखा शिक्षक' (१९३९), इत्यादी मासिके त्यांनी काढली. इ.स. १९४० मध्ये प्र. के. अत्रेंनी 'नवयुग' साप्ताहिक सुरु केले. हे साप्ताहिक १९६२ पर्यंत चालू होते. तसेच त्यांनी १९५६ मध्ये 'मराठा' हे दैनिक सुरु केले. अनेक मराठी व हिंदी चित्रपटांच्या त्यांनी पटकथा व संवाद लेखनही त्यांनी केले आहे. 'श्यामची आई' या चित्रपटाचे पटकथा संवाद लेखन केले. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले 'सुवर्णकमळ' मिळाले आहे.

शांता शेळके यांनी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर प्र.के. अत्रे सोबत 'नवयुग' या साप्ताहिकात सुमारे पाच वर्षे काम केले. त्यामुळे नवशिक्या लेखिकेला अत्रेंच्या

रुपाने एक मार्गदर्शक मिळाले. शांता शेळके यांनी 'वडीलधारी माणसे' हा व्यक्तिचित्रसंग्रह लिहिताना प्र.के. अत्रे यांच्याबद्दलची कृतघ्नता व्यक्त करण्यासाठी 'साहेब' हा लेख त्यांनी लिहिला आहे. या लेखामध्ये 'नवयुग' साप्ताहिकात चालणारी विविध कामे, रोजचे नवीन लोकांविषयीचे तसेच अत्रेंच्या लिखाणातील बारीक-सारीक गोष्टी यांविषयीचे अनुभव लेखिकेने नमूद केले आहे. प्र. के. अत्रेकडून लेखिका शांता शेळके यांनी अनेक गोष्टी शिकल्या. शांता शेळके यांची कृत्रिम लेखनशैली प्र. के. अत्रेंनी खोडून टाकून त्यांच्या लेखनात साधे-सरळपणा आणून दिला. अनेक प्रकारची मासिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिकांचे काम करताना त्यांनी अनेक मराठी साहित्यात ज्येष्ठ लेखक म्हणून ते सुपरिचित होते. संयुक्त महाराष्ट्रांच्या चळवळीत त्यांचे विशेष योगदान आहे. अत्रेंनी हिंदी, मराठी चित्रपटही काढले. अशाप्रकारे त्यांनी विविध कार्यक्षेत्रात आपले कर्तृत्व गाजविले. त्यांना साहित्यातील विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**<u>अत्रे सरांची भेट</u> :-**

एम. ए. ची परीक्षा झाल्यानंतर, माझ्या स्वभावाशी, आवडीनिवडीशी आणि काम करण्याच्या कुवतीशीही अगदी विसंगत असा, वर्तमानपत्रातल्या कामाचा पेशा मी पत्करला-याचे अनेकांना आश्चर्य वाटले. पण खरे म्हणजे मुळात 'नवयुग' मध्ये काम करण्यासाठी मी ही नोकरी पत्करलेलीच नव्हती. त्या सुमाराला 'समीक्षक' हे मासिक आचार्य अत्र्यांनी वाढवायला घेतले होते. आणि 'समीक्षक' मध्ये काम करण्यासाठीच त्यांनी प्रथम पुण्याहून मला मुंबईला आणवले होते. पण पुढे 'समीक्षक' नीट चालेनासे झाले. 'गडकरी विशेषांकासारखे काही चांगले अंक' 'समीक्षक' ने काढलेही. पण एकंदरीने अत्र्यांच्या संपादनाखाली 'समीक्षक' ची भट्टी काही नीटशी जमली नाही. ढासळत ढासळत ते अखेर बंद पडले आणि 'समीक्षक' मध्ये काम करण्यासाठी आणलेल्या माझे आता काय करायचे हा आचार्य अत्र्यांच्यासमोर प्रश्न उभा राहिला. तेव्हा त्यांनी मला सांगितले, "तू आता 'नवयुगा'त लिहीत जा." असा सल्ला त्यांनी मला दिला.

**लेखनाची नवीदृष्टी**

मी 'नवयुग' मध्ये काम करु लागल्यानंतर हळूहळू साहेबांनी मला लेखनाची एक नवी दृष्टी दिली. माझे लेखन ते स्वतः तपाशीत आणि त्यातला क्लिष्ट,दर्बोध, गुंतागुंतीचा भाग ते भराभर खोडून टाकत. एखादा लेख मनास आला नाही तर सगळाच्या सगळा लेख ते सरळ उभा फाडून केराच्या टोपलीत टाकून देत आणि सारे काही मला पहिल्यापासून पुन्हा लिहायला लावत. प्रारंभी असे काही झाले की मी फार खट्टू होई. पण साहेब हसून म्हणत, "तोंड वाकडं करायला काय झालं ? जा. ते सारं पुन्हा लिहून काढ." असे म्हणून ते लेखनाला प्रेरणा द्यायचे.

**काव्याची आवड**

अत्रेंना कवितेविषयी विशेष आवड होती. ते काव्याविषयी म्हणायचे "शब्दाला एक 'फील' असतो. एक चव असते. तुला नाही का हे जाणवत ? जातीच्या मराठी माणसाला जाणवले पाहिजे." आणि उदाहरणादाखल एखादे जुने गाणे ते गुणगुणत. त्यातल्या शब्दांचा गोडवा, उच्चारसुकरता, त्या शबदांभेवती असलेली सांस्कृतिक वलये आणि त्यांनी मनात जागृत होणारे असंख्य भावनिक पडसाद - साऱ्यांसंबंधी ते अतिशय रसिकतेने, सहृदयतेने, हळवेपणाने बोलत. 'धाव पाव सावळे विठाबाई का मनि धरिली अढी', 'उठी गोपाळजी जाय धेनूकडे। पाहती सौंगडे वाट तुझी' ही दोन जुनी गाणी त्यांच्या विशेष आवडीची होती. त्याचप्रमाणे बालपणी खेडयामध्ये ऐकलेले एक गाईचे गाणेही त्यांना मनापासून प्रिय होते. त्यातल्या ओळी ते अनेकदा गुणगुणत -

गाई भरुन गाईचे कान
जसे नागवेलीचे पान
गाई भरुन गाईचे डोळे
जसे लोणियाचे गोळे
गाई भरुन गाईची शिंगे
जशी महादेवाची लिंगे
गाई भरुन गाईचे पोट
जशी कापसाची मोट
गाई भरुन गाईची पाठ
जशी पंढरपूरची वाट

आणि मग तृप्तपणे हसून म्हणत, "माझी भाषा या असल्या गाण्यांनी घडवली आहे. गडकरी, बालकवी यांचे संस्कार नंतरचे. आधी मी या गाण्यांतून मराठी भाषा शिकलो." असे शांता शेळके यांनी प्रांजळ कबुली दिली आहे.

**भाषेवर प्रभाव**

अत्रेचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. साहेब स्वतःचे लेखन स्वतः करत. पण तितक्याच सहजतेने आणि सफाईने ते सात-सात आठ-आठ कॉलमांचा मजकूर बसल्या बैठकीत 'डिक्टेट' करुन सांगूही शकत. कुठे वाक्याच्या जुळवाजुळवीसाठी त्यांना थांबावे लागत नसे. कुठे एखाद्या अवघड किंवा विजातीय शब्दाच्या योजनेसाठी डोके खाजवावे लागत नसे, की कुठे आता सुचेनासे झाले म्हणून त्यांच्या लेखनात खंड पडत नसे. त्यावरुन त्यांचा भाषेवरचा प्रभाव दिसून येतो.

ते नेहमी सकाळी बारा साडेबारा वाजता साहेब प्रेसमध्ये येत. आल्याबरोबर घंटा वाजवून मॅनेजरना बोलावीत व सारी पत्रे मागवून ती वाचून काढत. प्रमुख इंग्रजी मराठी वृत्तपत्रे त्यांनी बहुधा सकाळी घरीच वाचलेली असत. पण ऑफिसात आल्यावर जिल्हापत्रे, साप्ताहिके, मासिके सारी एकदा भराभर चाळून होत. त्यातच फोन खणखणत असे. त्यातच परगावची माणसे भेटीला येत. त्यातच एखाद्या सभासंमेलनाचे अध्यक्ष म्हणून जायचे असे. त्यातच कॉलेजच्या वाङयमंडळाचे उद्घाटन करायचे असे. त्यातच नव्या चित्रपटात आपल्याला काम मिळावे म्हणून येणाऱ्या होतकरु स्त्रीपुरुषांच्या जुजबी मुलाखती घ्यायच्या असत. पण 'नवयुग' चा आठवडयाचा लेख कधी चुकला नाही. 'अत्रे उवाच' ला खंड पडला नही. माणसे येत. तेवढयापुरते साहेब लेखनाचे काम बंद ठेवत. गप्पाष्टके झडत. चहाचे कप मागवले जात. कधी जोडीला शेजारच्या हॉटेलातून चिवडाही मागवला जाई. मध्येच हसण्याचा कल्लोळ उसळे. वादविवाद विकोपाला जात. खूप आरडाओरडा होई. पण जरा वेळाने माणसे निघून जात. साहेब आपल्या दोन्ही प्रचंड हातांची कोपरे टेबलाच्या कडेला टेकून ओंजळीत मस्तक धरत आणि डोळे अर्धवट मिटून मला म्हणत, "हां. आपण कुठपर्यंत आलो होतो ?"

मधल्या सगळया गप्पाष्टकांत मी इतकी गेलेली असे, की लेख कुठपर्यंत आला होता ते मला मुळीच आठवत नसे. पण साहेबांच्या डोक्यात लेखाचे सूत्र अखंड असे. ते चटकन सांगत, "अमक्या अमक्या वाक्यापर्यंत आपण आलो होतो. हं. पुढे लिहून घे - " की लेख पुढे चालू. यावरुन त्यांचे मराठी भाषेवरचे असणारे ज्ञान आणि प्रभुत्व दिसून येते.

**साहित्याचा प्रभाव**

लेखन, नाटय, काव्य, वक्तृत्व यांतले काहीच तसे सोपे नाही. सहजसाध्य नाही हे मला आता कळते. पण साहेबांच्या सहवासात सारे सोपे वाटायचे. अवघड, गुंतागुंतीच्या, क्लिष्ट गोष्टींभोवतीही आकर्षणाचे असे वलय ते निर्माण करत, त्यांच्याबद्दल इतके कुतूहल जागृत करत की मनात आपोआप उत्साह भरुन येई. वाटे, जरा प्रयत्न केला तर आपल्यालाही हे सहज जमेल की. ते शिक्षक असताना भूगोलासारख्या रुक्ष विषयातही कसा रस निर्माण करत असतील याची या गोष्टीवरुन कल्पना येई.

**राजकीय सामाजिक लेखन**

साहेबांचा नवा लेख कशाबद्दल असेल याचा आधी अंदाज करणे कठीण असे. तात्कालिक राजकीय किंवा सामाजिक घटनांबद्दल तर 'अत्रे उवाच' मधून लिहिले जाईच. पण काही वेळा स्वतः वाचलेल्या एखाद्या सुंदर पुस्तकाने साहेब असे भरावून जात, की मग आपल्या असंख्य वाचकांना त्या पुस्तकाचा परिचय करुन दिल्याखेरीज त्यांच्याने राहावत नसे. सावरकरांचे 'अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर' आवडले. लगेच 'अत्रे उवाच' मधून त्यावर लेख लिहिला. चार्ली चॅप्लीनचा 'मॉंसिए व्हेर्दू' चित्रपट पाहिला. लगेच त्या चित्रपटाबद्दल आणि चार्ली चॅप्लीनबद्दलही साहेबांनी पान भरुन लेख लिहिला. असेच 'सिरॅनो द बर्जरॅक' बद्दलही त्यांनी लिहिल्याचे आठवते. वारल्यांचा प्रश्न ज्या वेळी सर्वत्र गाजत होता, त्या वेळी अनंत काणेकरांना बरोबर घेऊन साहेब साऱ्या वारली मुलखातून हिंडून आले आणि मग 'वारली मुलुखातील मुशाफरी' म्हणून त्यांनी एक लेखमालाच लिहिली. 'रामदास' बोट बुडाली. त्या घटनेने त्यांचे हृदय इतके व्यथित झाले की 'नवयुग' मध्ये त्यावर अग्रलेख लिहूनच साहेब थांबले नाही तर, 'सारा, तू परत आलीस!' या शीर्षकाची एक करुणरम्य कथाही त्यांनी दिवाळी अंकासाठी लिहिली. याच दुर्घटनेने त्यांच्या मनातल्या एका फार जुन्या स्मृतीला जाग आणली आणि सासवडनजीक असलेल्या चांभळी नदीमध्ये, गावकऱ्यांच्या डोळयांदेखत पुराच्या चढत्या पाण्यात बुडालेल्या विष्णूला 'महापुरात बुडालेला विष्णू' या लेखातून त्यांनी पुन्हा जिवंत केले. मुंबईला झालेल्या प्रचंड वादळात हिंदू कॉलनीतले अनेक वृक्ष उन्मळून पडले. त्या वृक्षांचा विलाप 'नवयुग' मधून सशब्द झाला. बी कवी, साने गुरुजी.

तात्या साहेब केळकर, महात्मा गांधी अशा ख्यातनाम व्यक्तीवरचे लेख साहेब जेवढया अगत्याने लिहित, तेवढयाच कौतुकाने पांडू खाडेसारख्या एखाद्या जॉकीवर किंवा 'मायर्स पंपा' च्या प्रणेत्या के. बी. जोश्यांसारख्या जुन्यापुराण्या, विस्मृतीच्या काळोखात गेलेल्या एखाद्या व्यापाऱ्यावरही त्यांना लिहावेसे वाटे. साहेब हाडाचे शिक्षकच होते आणि आपल्या वाचकांना सारे सांगावे, समजावून द्यावे ही त्यांना उत्कट तळमळ असे. 'नवयुगा' त आवर्जुन स्थान मिळे. केवळ त्यासाठी त्यांनी 'द्रोणाचार्यां' ना म्हणजे वा. ना. देशपांडे यांना आपल्याकडे लिहवयास लावलेले होते.

**ग्रंथ खरेदी आणि वाचनाची आवड :**

पुस्तके वाचण्याइतकीच पुस्तके खरेदी करण्याचीही साहेबांना विलक्षण आवड असे. "इतरांच्या पुस्तकांवरुन मला वाचन किंवा अभ्यास करणे जमत नाही." असे ते हसून म्हणत. एखादे दिवशी फोर्टमध्ये जेवायला म्हणून प्रेसमधून ते बाहेर पडत आणि येताना सहज साठसत्तर रुपयांची पुस्तके विकत घेऊन येत. स्वतःच्या मालकीच्या प्रत्येक पुस्तकावर, मग ते इंग्रजी असो की मराठी असो, आतल्या पानावर 'प्रल्हाद केशव अत्रे' अशी साहेबांची शुद्ध मराठीतली

ठसठशीत वळणदार सही आणि खरेदीची तारीख असे. आवडत्या इंग्रजी नाटककारांची नाटके, रंगभूमिविषयक साहित्य, टीकाबाङमय, चर्चिलच्या 'युद्धस्मृती', इंग्रजी मराठी कवितासंग्रह, कथासाहित्य, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे, विनोदी साहित्य - सर्व विषयांवरची पुस्तके घरात खचून भरली होती. प्रत्येक पुस्तकावर साहेबांच्या हातच्या खुणा असत. उशाशी पाचसहा पुस्तके सतत असायचीच. तुकारामाची गाथा त्यांना फार आवडे. ज्याला वाचायला कंटाळा आहे तो चांगला लेखक कधीच होऊ शकणार नाही, असे त्यांचे एक आवडते सूत्र होते. पहिलवानाला जशी तालीम, गायकाला जसा रियाज तसे लेखकाला अखंड वाचन हवे असे ते म्हणत. ते स्वतः अर्थातच भरपूर आणि सतत वाचत. आपल्या मालकीच्या पुस्तकांबद्दल त्यांना फार प्रेम व अभिमान असे.

साहेबांच्या अभ्यासाच्या पध्दतीत शिस्त आणि परिपूर्णता असे. ती सवय त्यांच्या शिक्षकी पेशाने त्यांना लावली असावी. शिवरामपंत परांजपे वाचायचे ठरवले तेव्हा साहेबांनी त्यांच्या साहित्याचे सर्व खंड विकत आणले आणि खंडाहयाच्या एका मुक्कामात ते बरोबर नेऊन सारे वाचून काढले. युजीन ओ'नील या नाटककाराची नाटके त्यांनी अशीच सलग अभ्यासली. ऑस्कर वाइल्ड हा त्यांच्या खास आवडीचा लेखक होता आणि त्याचे साहित्य ते पुन्हा पुन्हा वाचत. साने गुरुजींच्या 'श्यामच्या आई'वर चित्रपट काढायचे ठरले तेव्हा नुसते गुरुजींचे साहित्य वाचूनच साहेब थांबले नाहीत, तर साने गुरुजींचे कोकणातले गाव, तिथला परिसर, निसर्ग, माणसे -सारे काही ते पाहून आले. लोकहितवादी, जोतिबा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर या सर्वांचे साहित्य वाचले, तत्कालीन समाजजीवनाचे स्वरुप जाणून घेतले आणि मगच त्यांनी 'महात्मा फुले' चित्रपटाची पटकथा-संवाद लिहिले.

**वेळेच महत्व**

अत्रेसरांनी व्याख्यानासाठी एका भगिनीमंडळाला तारीख दिली. तारीख दिली. नंतर विसरतेपणी तीच तारीख, तीच वेळ एका कॉलेजच्या वाङमंडळाच्या उद्‌घाटनालाही दिली. दरम्यान पुण्याला तात्यासाहेब केळकर यांचे निधन झाले. साहेब खंडयाळ्याला होते ते तिथून केळकरांच्या अंत्यविधीसाठी पुण्याला गेले आणि पुण्याहून मुंबईला येताच ऑफिसात केळकरांचा मृत्युलेख लिहायला बसले. तारखेचा घोटाळा त्यांच्या लक्षात आला तेव्हा त्यांनी प्रेसमधल्या लोकांना बजावून सांगितले, "आज मी मुंबईत आहे म्हणून कुणालाही सांगू नका. मी तात्या साहेबांच्यावरच्यावरचा मृत्युलेख लिहायला बसतो आहे." पण चुकून कुणीतरी साहेब प्रेसमध्ये असल्याचे फोनवरुन सांगितले. दुपारी तीन साडेतीनच्या सुमाराला भगिनीमंडळाच्या सेक्रेटरी साहेबांना न्यायला आल्या. थोड्याच वेळात कॉलेजच्या वाङमयमंडळाचे सेक्रेटरीही साहेबांना न्यायला आले. वेळेच्या घोटाळ्यामुळे आणि साहेबांनी शब्द पाळला नाही म्हणून सारेच चिडले. त्यांचे काहीच चुकले नव्हते. त्या साऱ्या मंडळींना तोंड देऊन त्यांना परत पाठवता पाठवता प्रेसमधल्या मॅनेजरच्या, इतर मंडळींच्या नाकी नऊ आले. बाहेर हा गदारोळ चालला होता. आणि त्या साऱ्याचे कारण असलेले साहेब आत निवांतपणे मला लेख 'डिक्टेट' करीत होते. मध्येच मला ते म्हणत, "जरा बाहेर डोकावून ये. वादळ शमले आहे का पाहा!" पण मला काही बाहेर जाण्याचा धीर झाला नाही. असा गोंधळ साहेब अनेकदा करत.

**दिंडवत काव्य लेखन**

साहेब आणि प्रा. के.ना. वाटवे हे कॉलेजमधले वर्गबंधू. साहेब कॉलेजमध्ये असतानाच कविता लिहू लागले होते. मात्र त्या वेळी त्यांच्या कविता अगदी हळव्याहळव्या, स्वप्नाळू,

नाजूकसाजूक असायच्या. 'झेंडूची फुले' अद्याप फूलू लागली नव्हती. याच काळात त्यांनी एक कविता केली होती. 'या लाजऱ्या कवीला पानाआड लपून बसावेसे वाटते.' असा त्या कवितेचा आशय होता. त्यांची ती कविता वाटव्यांनी वाचली तेव्हा ते मिष्किलपणे म्हणाले, "अहो केशवकुमार, तुमची कविता सुंदर आहे. फक्त तुम्हाला लपायला साधे पान पुरेसे होणार नाही बुबा! आता केळीच्या पानामागेच लपलात तर गोष्ट निराळी!" वाटव्यांची ही टीका ऐकून आपण कसे लाजलो होतो त्याचे साहेब मोठ्या मजेने वर्णन करुन सांगत आणि हसत.

साहेबांचे काही जीवनविषयक आडाखे असत. ते नेहमी म्हणत, "आपण आयुष्यात कधी अपयशी माणसाची संगत धरु नये. जो आपल्यापेक्षा अधिक गुणी, अधिक बुध्दिमान, अधिक कर्तबगार आणि अधिक यशस्वी आहे त्याच्याशी स्नेह करावा. त्याची संगत धरावी -"

"पण त्याने आपली संगत धरायला हवी ना?" मी मध्येच विचारी.

त्यावर मिष्किलपणे हसून साहेब म्हणत, "तो त्याचा प्रश्न आहे. त्याचा त्याने विचार करावा. आपण काय करावं ते मी तुला सांगितलं. मी जर गडकऱ्यांच्या सहवासात आलो नसतो तर मी आयुष्यात कधीही लेखक होऊ शकलो नसतो, काहीच होऊ शकालो नसतो."

वार्धक्य, शारीरिक दुबळेपणा, पंगुत्व, विकृती यांचे त्यांना फार भय आणि तिटकारा वाटे. आपल्या बरोबरीची मंडळी म्हातारी होऊ लागली आहेत पण आपण अजून प्रकृतीने धडधाकट आहेत, हे सांगण्यात त्यांना एक खोल समाधान होई. कधी कधी ते सांगत,"कालच तो आपला हा भेटला होता. अगदी माझ्या वयाचा. पण काय त्याची अवस्था झाली आहे म्हणून सांगू! छे छे, मी तर आधी ओळखलंच नाही." मग किंचित अंतर्मुख होऊन ते म्हणत, "म्हातारपण माणसाची काय दुर्दशा करतं! माणसांना टकलं पडतात. त्यांचे दात जातात. ती दुबळी बनतात. तेच तेच बोलायला लागतात -" जरा वेळ ते स्तब्ध राजात आणि मग म्हणत, "माझं जर असं कधी झालं तर मला ते अगदी असह्य होईल-"

**अष्टपैलू व्यक्तीमत्व**

कॉलेजमधून बाहेर पडल्यावर खऱ्याखुऱ्या अर्थाने मी 'साहित्यिक' पाहिला तो साहेबांच्याच रुपाने. ते नुसते 'साहित्यिक' नव्हते तर आणखी इतर किती तरी होते. असे भरघोस, समृध्द, चैतन्यमय, कर्तृत्वसंपन्न आणि कुतूहलजनक व्यक्तिमत्व मी तोवर कधी पाहिलेलेच नव्हते. त्यामुळे माझ्या मनावर त्यांचा जो ठसा उमटला तो पुढे कधीही पुसला गेला नाही. साहेबांनी माझ्या अभिरुचीवर अनेक संस्कार केले. त्यांच्यामुळे मी खूपसे इंग्रजी साहित्य वाचले. नवकाव्य किंवा साहित्यातले अनेक नवे प्रवाह यांच्याशी साहेब समरस झाले नाहीत. उलट या गोष्टींची त्यांनी अनेकदा टर उडवली. परंतु मला नवसाहित्याकडे बघण्याची स्वच्छ, निकोप, निर्मण नजर मिळाली याचे पहिले श्रेय साहेबांनाच द्यायला हवे. 'रविकिरण मंडळा'च्या छायेखालून प्रथम त्यांनीच मला बाहेर काढले. कॉलेजच्या दिवसांतला वृत्तींवर फुललेला कोवळा, अजाण, हळवा मोहर त्यांनी झाडून टाकला आणि तरीही खऱ्या अर्थाने जीवनाची, वाव्याची, इतर कितीतरी सुंदर आणि उदात्त गोष्टींची त्यांनी मला जाण दिली. डोळ्यांवरचा स्पप्नाळूपणाचा तवंग गेला. उसासे, सुस्कारे, आत्मरती, हळुवारपणा गेला आणि कणखरपणाने आयुष्याकडे बघण्याची नवी दृष्टी मिळाली. अनेक अडचणींकडे, विरोधांकडे, विसंगतींकडे अन् विकृतींकडे बघून चडफडण्याऐवजी किंवा हतबल होण्याऐवजी हसून त्यांना तोंड देता येते, हेही मी त्यांच्याकडूनच शिकले.

**समारोप :**

प्र. के. अत्रे हे मराठी साहित्यातील ज्येष्ठ लेखक विचारवंत व्याख्याते, प्राध्यापक, राजकीय विश्लेषक, असे अनेक गुण त्यांच्या अंगी होते. अशा अष्टपैलू व्यक्तीमत्त्व असलेल्या अत्रे सरांचा सहवास शांता शेळके यांना लाभला. त्यांच्या बद्दल या लेखातून त्यांना कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## २.८ मामा वरेरकर

### भार्गवराव विठ्ठल वरेरकर - परिचय

मामा वरेरकर (भार्गवराव विठ्ठल वरेरकर) यांचा जन्म चिपळूण येथे २७ एप्रिल, १८८३ रोजी झाला. मालवण येथे त्यांचे बालपण गेले. त्यांचे प्राथमिक व थोडेसे माध्यमिक शिक्षण मालवण येथेच झाले. मात्र १८९८ मध्ये डॉक्टरी शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना रत्नागिरीला पाठविले. शारीरिक दुबळेपणामुळे त्यांनी आपले डॉक्टरी शिक्षण पूर्ण केले नाही. त्यामुळे ते टपालखात्यात नोकरी करु लागले. त्यांचा परिचय कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्याशी झाला. कीर्तिकरांच्या सहवासातच वरेरकरांच्या साहित्य प्रवासाला सुरुवात झाली. कीर्तिकर हे पुरोगामी विचारांचे असल्यामुळे या विचारांचा प्रभाव वरेरकरांवर पडला. त्यांचे लेखनही पुरोगामी दृष्टिकोनातूनच होऊ लागले. टपाल खात्यातील वीस वर्षांच्या नोकरीनंतर मात्र लेखन हाच व्यवसाय म्हणून त्यांनी स्वीकारला आणि त्यांच्याकडून नाटके, कथा, कादंबऱ्या, रहस्यकथा यांचे विपुल लेखन होऊ लागले. विविध नाटकांचे मराठीत अनुवादही केले. लेखन करताना वास्तव चित्रणावर भर दिला आहे. १९५६ साली त्यांना भारत सरकारकडून 'पद्मभूषण' तर १९५९ साली त्यांनी 'पद्मविभूषण' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मामा वरेरकर यांच्याही पुण्यातील एका सभेच्या निमित्ताने शांता शेळके यांचा परिचय झाला. शांता शेळके त्या काळात महाविद्यालयीन शिक्षण घेत होत्या. पुढे एक लेखिका बनण्याची महत्त्वाकांक्षा लेखिकेला असल्यामुळे त्यांचे वाङ्मयीन वाचन खूप होते. अभ्यासक्रमातही विविध वाङ्मयीन ग्रंथांचा समावेश होता. त्यामुळे मामांची अनेक पुस्तके लेखिकेने वाचली होती. वारंवार भेटीमुळे मामांशी त्यांची चांगली ओळख झाली. मामा लेखिकेला नेहमीच मार्गदर्शन करीत असत. मामांना लेखिकेबद्दल आपुलकी वाटत असे. कोणतीही चूक झाल्यास मामा त्यांना वडीलकीच्या नात्याने रागवत असत. मामांच्या सहवासात लेखिकेची वाङ्मयीन जडणघडण होत होती. लेखिकेच्या मनावर वाङ्मयीन संस्कार होत गेले. 'वडीलधारी माणसे' या व्यक्तिचित्रसंग्रहात शांता शेळके यांनी त्यांच्या जीवनाला वळण देणाऱ्या व्यक्तीविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. या अनेक व्यक्तींपैकी एक व्यक्ती म्हणजे मामा वरेरकर होत.

### मामा वरेरकर - परिचय

मामा वरेरकरांची आणि माझी ती पहिली भेट असली तरी मामांच्या लेखनाशी माझा परिचय या प्रसंगापूर्वी किती तरी आधी झाला होता. आता विचार केला म्हणजे नवल वाटते, आयुष्यात मी पहिली कादंबरी वाचली ती मामा वेरकर यांची. माझे वय त्या वेळी सात आठ वर्षांचे असावे. तेव्हा आम्ही गुजरातेत डांग या भागातल्या चिखलदा गावी राहात होतो. माझे वडील फॉरेस्ट ऑफिसर होते. ते नेहमी फिरतीवर असत. घरी आईला काही करमणूक असावी म्हणून

वडिलांनी 'गृहलक्ष्मी' हे मासिक चालू केले होते. मला वाटते, वसंतराव मराठे हे त्या मासिकाचे संपादक असावेत. 'गृहलक्ष्मी'मध्ये मामांची एक कादंबरी हप्त्याहप्त्याने प्रसिध्द होत होती. कादंबरीचे नाव होते 'कुलदैवत'. आईबरोबर मीही ती कादंबरी वाचत असे. तिच्यातले बरेच तपशील मला अद्यापही आठवतात. कादंबरीची सुरुवात मुंबईतल्या एका चाळीत होते. तीन कुटुंबे असतात. त्यांचा आपापसांत फार घरोबा असतो. या कुटुंबातल्या बायकांची नावे 'बाबलीबाई', 'पुतळीबाई' अशी असतात, आणि मला वाटते, नायिकेचे नाव 'माणक' असते. मला ते सारे वातावरण अपरिचित होते. 'बाबलीबाई', 'पुतळीबाई' ही नावे देशावर वाढलेल्या माझ्यासारख्या मुलीला अगदीच विचित्र वाटली होती. पुढे ही मंडळी गोव्याला जातात. तिथे त्यांचे कुलदैवत असते. गोमंतकात सारस्वत घराण्यांची कुलदैवते आहेत. पण मला तोवर गोवा ठाऊक नव्हता आणि सारस्वतही ठाउुक नव्हते. तरीही मी ती कादंबरी हौसेने आणि कुतूहलाने वाचत गेले. कादंबरीमधल्या एका प्रसंगाने माझ्या बालमनावर त्या वेळी खोल ठसा उमटवला होता. कादंबरीची नायिका माणक गोव्यातील एका मंदिराच्या परिसरात हिंडत असता तिला तिथे काही बायका दिसतात. माणक त्यांची विचारपूस करते. तेव्हा त्यांतली एक प्रौढ काळीसावळी स्त्री प्रसन्न हसू हसून तिला म्हणते, "मुली, आम्ही कुणा गृहस्थाघरच्या नव्हत. आम्ही देवाच्या घरच्या लेकीसुना आहोत!" त्या स्त्रीच्या तोंडचे 'देवाच्या घरच्या लेकीसुना' हे शब्द मला विलक्षण वाटले. ते माझ्या मनाला कुठे तरी खोल जाऊन भिडले. त्या स्त्रिया गोमंतकातल्या देवदासी असतात हे मला आता समजते. त्या वेळी मला देवदासी म्हणजे काय हेही ठाऊक नव्हते. तरीही त्यांना उद्देशून मामांनी वापरलेली 'देवाघरच्या लेकीसुना' ही शब्दसंहिता मला फार आवडली, आजही आवडते. आज त्या आवडीचे थोडे विश्लेषण मला करता येते. घर, प्रपंच, गृहस्थी वातावरण यांना वंचित झालेल्या त्या स्त्रीने स्वतःला व आपल्यासारख्या अनेक जणांना देवाच्या घरातल्या लेकीसुना म्हणवून घेऊन प्रापंचिक नात्यातल्या गोडव्याची, स्थैर्याची आपली अपुरी राहिलेली भूक भागवून घेतली होती आणि म्हणूनच त्या शब्दांनी माझे मन हेलावले होते. हे जे काही तेव्हा मला नकळत जाणवले, त्याबरोबर आणखीही काही धूसरपणे उमगले. आपण जे जगतो तेवढे हे आयुष्य साधे, सरळ, सोपे नाही. त्याला आपखीही एक बाजू आहे आणि ती गूढ, रहस्यमय, गंभीर, कदाचित दुःखपूर्णही आहे असे माझ्या बालमनाला वाटले. त्या काळ्यासावळ्या प्रौढ स्त्रीच्या रुपाने जीवनाचा एक अगदी वेगळा अपरिचित पैलू क्षणभर दिसून पुन्हा लुप्त झाल्याचा भास झाला. आमच्या घरी खूप नाटके असत. त्यांतले मामांचे 'कुंजविहारी' नाटक मी आधी वाचले होते. त्यांतल्या कृष्ण, पेंद्या, मधुमंगल यांच्या संवादांतील विनोदाने खूप हसू येई. 'अरे बघ गाइ बुजाल्या', 'त्याजि भक्तांसाठी लाज' अशी त्यातली गाणीही मला आवडत. पण लेखक म्हणून मामा मला अगदी खरे जाणवले ते 'कुलदैवत' या कादंबरीतील त्या विशिष्ट अशा प्रसंगाच्या वाचनानंतर.

### मन मिळावू स्वभाव

मामांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक विशेष म्हणजे समाजाच्या विविध थरांतल्या अनेक माणसांशी असलेला त्यांचा धनिष्ट संबंध. साहित्यिक हा घराची दारे बंद करुन आपल्या व्यक्तिगत भावविश्वात - खासगी हस्तिदंती मनोऱ्यात- आत्ममग्न होऊन राहणारा कुणी जगावेगळा जीव आहे ही कल्पना मामांनी पूर्ण खोटी पाडली होती. समाजसंपर्क ही मामांच्या मनाची एक निकडीची गरज होती. या संपर्कामुळे मामांचे अनुभवविश्व संपन्न, समृद्ध होत होते. वृत्तपत्रे, चित्रपट, नाटय, संगीत, साहित्य या क्षेत्रांतल्या अनेक लहानमोठ्या माणसांची मामांकडे सतत वर्दळ असे. मामा त्यांच्यामध्ये रमत. त्यांची सुख दुःखे समजावून घेत. याशिवाय अगदी सामान्य माणसेही मामांकडे येत, आणि त्यांच्यांतही मामा मिसळून जात. त्यांना एकूण 'माणूस' या

प्राण्याचेच वेड होते. याच वेडामुळे मामांनी इतर भाषांतही अनेक साहित्यिकांशी मैत्रीचे संबंध जोडले. ते टिकवले, शरच्चंद्र, बंकिमचंद्र या बंगाली साहित्यिकांचे साहित्य मराठीत अनुवादित केले. शरद्‌बाबूंचे साहित्य ही तर मामांनी मराठी साहित्याला दिलेली फार मोठी मोलाची देणगी आहे.

**खादय पदार्थाचे जाणकार**

व्यक्तिशः मला मामांनी फार प्रेम दिले. जिव्हाळा दिला. मी त्यांच्याकडे लिहायला जात असे त्या काळात चिंतामणराव कोल्हटकर मामांचे 'जिवा शिवाची भेट' हे नाटक बसवत होते. त्यांचा परिचय मामांनीच मला करुन दिला. पुष्कळदा मामा आणि चिंतामणराव दोघे मिळून रविवारी बरोबर जेवायला जात. गिरगरवात 'मॅजेस्टिक' सिनेमाशेजारी एक भंडाऱ्याचे हॉटेल होते तिथे ते जेवायला जात. त्यांना हॉटेल मधील खाद्य पदार्थांची विशेष जाण होती.

**ज्येष्ठ साहित्यिक**

मामा वरेरकरांची आयुष्यभर, जवळजवळ साठसत्तर वर्षे अव्याहत लिहित राहिले. साहित्यिकांच्या चार पिढया त्यांनी पाहिल्या. गडकरी-खाडीलकरांचे ते समकालीन होते. फडके, अत्रे, खांडेकर, माडखोलकर आणि रविकिरणमंडळ यांच्या ऐन भरभराटीचा, असामान्य लोकप्रियतेचा काळ त्यांनी पाहिला. पुढे रविकिरणमंडळाचे तेज मंदावले. फडके-खांडेकरांसारख्या लोकप्रिय लेखकांचे पुनर्मूल्यमापन होऊ लागले. परस्परविरोधी मातांचा घुरळा उडवत नवकाव्य, नवकथा आली आणि प्रतिष्ठा पावून स्थिर झाली. त्यांच्याही पुढची साहित्यिक पिढी उमलली. हे सगळे मामांनी आपल्या हयातीत पाहिले. अनुभवले पंधरावीस रुपयांत सबंध पुस्तक प्रकाशकाला विकून टाकण्याचा जमाना गेला आणि कवितेला पंचवीस तर कथेला शंभर रुपये लेखकाने सहज मागण्याचा आणि प्रकाशकाने ते देण्याचाजमाना आला. ज्या स्त्रीच्या मुक्ततेसाठी आणि कल्याणासाठी मामांनी जन्मभर लेखणी झिजवली ती मराठी स्त्रीही नको तेवढी स्वतंत्र झाल्याचे मामांनी प्रत्यक्ष पाहिले. खेडुतांपासून तो शहरी कामगारापर्यंत सर्वांना आपल्या हक्कांची जाणीव झाली. लेखकाला पदवी नाही म्हणून त्याला अवमानिले जाण्याचा काळ जाऊन रुढार्थाने अशिक्षित असलेल्या प्रतिभावंताचे कौतुक होऊ लागले. हे सगळे मामांच्या डोळ्यांदेखत घडले, आणि ते गेल्यानंतर तर पुलाखालून खूपच पाणी वाहून गेले आहे.

समाजातील घडणाऱ्या घटनेवर तडक नाटक लिहिण्याबद्दल मामांची ख्याती होती. या 'तडकपणा' मुळे त्यांच्या लेखनात कधी अपुरेपणा येतो, कधी घाईने मतप्रदर्शन केले जाते, कधी 'सिंगापुरातून' नाटकात सुभाषबाबूंना जपान्यांचे हस्तक ठरवताना झाली तशी अक्षम्य चूकही होऊन राहते. मामांचे लेखन आज वाचताना त्यात आणखी काही उणिवा दिसून येतात. कोणत्याही प्रश्नाच्या पोटतिडिकीमुळे किंवा व्यक्तिगत अभिनिवेशामुळे त्या त्या प्रश्नाबद्दल कलावंताने जी अलिप्तता कटाक्षाने पाळायची असते ती मामांना अनेकदा पाळता येत नाही. मामांचे आवडते शरद्‌बाबू अशा वेळी जो संयम, जी मुग्धता राखतात ती मामांना का राखता येऊ नये याचे मला त्या अननुभवी वयात देखील कोडे पडायचे. कलावंताने सहसा निर्णय देऊ नये, मतप्रदर्शन करु नये हे मामा आपल्या लेखनात अनेकदा विसरतात. मानवी स्वभावाचे काही ठरीव साचेबंद नमुने मामांना प्रिय आहेत आणि ते पुन्हा पुन्हा त्यांच्या नाटक-कादंबऱ्यात आपणास भेटतात. बेफिकीर, काहीसा 'सिनिक' वाटणारा पुरुष आणि सतत सर्व पुरुषजातीवर बडगा उगारुन राहिलेली 'तडफदार' स्त्री हे असे दोन नमुने. मुख्य म्हणजे मामांनी खूप वेगाने आणि वैपुल्याने जन्मभर लेखन केले. त्यामुळे बऱ्याच वेळा मानवी मनाच्या वरवरच्या थरांचेच चित्रण

त्यांच्या हातून झाले आहे की काय, अशी आज शंका येते. पण हे दोष ध्यानी घेऊनही, मामांनी निर्माण केलेली साहित्यसंपदा कौतुकास्पद नाही असे कोण म्हणेल? त्यांच्याइतकी विषयांची विविधता त्यांच्या काळात अन्य कोणत्याही लेखकाने दाखवली नाही आणि त्यांच्याइतक्या पोटतिडिकीने सामान्यांची सामान्य दु:खेही कुणी चव्हाटयावर मांडली नाहीत. 'सारस्वत' नाटकात मामांनी लेखकाचे मुके दु:ख बोलके केले, तर 'दौलत-जादा' नाटकात नाचणाऱ्या गाणाऱ्या तमासगीर स्त्रीचे दर्शन प्रेक्षकांना घडवले. 'सात लाखांतील एक' या कादंबरीत भारतातले एक खेडे त्यांनी साकार केले, तर आयुष्याच्या अखेरच्या काळात लिहिलेल्या 'पुन्हा गोकुळ' या नाटकात कृष्णाच्या वृद्धावस्थेतील जीवनाचा अद्‌भुत साक्षात्कार त्यांनी घडवला. आजच्या लेखकाला देखील लिहिण्याला आव्हान असे त्यांचे लेखन होते.

### समारोप

मामा वरेरकरांनी आपल्या आयुष्यात जीवनाचे बरेवाईट चढउतार पाहिले. आर्थिक अडचणीमुळे रहस्यकथा लिहिणारे मामा पुढे दिल्लीला खासदार म्हणून मानाने, वैभवाने राहिले. साहित्यातली अनेक भांडणे त्यांनी हिरीरीने लढवली त्याबरोबरच अनेक नव्या होतकरु लेखकांना त्यांनी सतत प्रोत्साहनही दिले. त्यांनी उपेक्षा पचवली आणि गौरवही अनुभवला. पण या साऱ्या फेरबदलांचा मामांच्या स्वभावावर फारसा परिणाम झाला होता असे माल वाटत नाही. एका अभिजात शहाणपणाने, संयमाने मामा आयुष्यभर जगत राहिले. स्वतःच्या खास स्वतंत्र, काहीशा विक्षिप्त विनोदबुद्धीने त्यांनी जीवन स्वीकारले, सोसले. मनात कुठे कडवटपणा राहू दिला नाही, आणि जन्मभर अत्यंत निष्ठापूर्वक साहित्यसेवा केली. मामा लेखक म्हणून जगले. लेखक म्हणूनच आयुष्याचा त्यांनी निरोप घेतला. इतका अंतर्बाह्य 'लेखक' माणूस क्वचित आढळून येतो.

## २.९ आशा भोसले - परिचय

### आशा भोसले - परिचय

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर, १९३३ रोजी झाला. संगीत, गायन क्षेत्रातील ज्येष्ठ कलावंत मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची त्या कन्या होत. वडीलांकडून गाण्याचा वारसा लाभलेला आशाताईंनी स्वकर्तृत्वार या क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध केले. त्यांनी मराठी, हिंदी चित्रपटाबरोबरच इतर अनेक भाषेतील चित्रपटात त्यांनी पार्श्वगायन केले. व्यावसायिक क्षेत्रात स्पर्धा असताना येथे संधी मिळणे अवघड होते, तरी सुद्धा अशी संधी मिळवून या क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करण्याचे त्यांच्यासमोर आव्हान होते. या दरम्यान त्यांच्या जीवनात प्रचंड उलथापालथ झाली. भरला संसार सोडून त्यांना दुसरे घर करावे लागले. मराठी चित्रपटाच्या निमित्ताने शांता शेळके यांची आशा भोसले यांच्याशी ओळख झाली. या ओळखीचे रुपांतर लवकरच मैत्रीत झाले. त्यामुळे त्यांना आशा भोसले यांच्याशी अनुभवता आले.

जीवनात येणाऱ्या अनेक अडचणीवर मात करुन आपण यशस्वी झाले पाहिजेत. हे आशा भोसले यांच्याकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. आशाताईंच्या जीवनातील खडतर प्रवास शांता शेळके यांनी पाहिला होता. त्याचबरोबर आशाताईंचे गाण्यावर असलेले प्रेम, यश मिळविण्यासाठी पडेल ते श्रम करण्याची त्यांची तयारी, त्यांचा नम्रपणा, त्यांचा स्नेहभाव, कलावंतांबद्दल त्यांना असलेला आदर, एक कर्तव्यदक्ष गृहिणी या सर्व स्वभाव वैशिष्ट्यांचा

अनुभव परिचय लेखिका शांता शेळके यांना झाला होता. त्यांच्या सर्व गुणांचा परिचय लेखिकेला झाला होता. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या त्यांच्या या सर्व गुणांचा प्रभाव लेखिकेवर पडत होता. आशाताईंच्या सहवासात लेखिकेच्या मनावर अनेक संस्कार होत गेले. आशाताईंचे व्यक्तिमत्त्व त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरले. या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावातून लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाची देखील हळूहळू जडणघडण होत होती. लेखिका शांता शेळके यांना त्यांच्या जीवनात जे काही यश मिळाले. त्यामध्ये आशाताईंचे योगदान मोठे आहे. म्हणून लेखिका शांता शेळके यांना 'वडीलधारी माणसे' या ललित लेख संग्रहातील त्यांच्या सहवासातून त्याचे लाभलेले वेगळे व्यक्तिमत्त्व या लेखातून शांता शेळके यांनी मांडले आहे.

आशा भोसले कष्टाळू वृत्तीच्या आहेत. आपल्या कामात त्या सतत मग्न असायच्या. बरोबर आठ वाजता आशा आली. एरव्ही अशा समारंभांना हौसेने खूप नटूनथटून येणारी आशा आज त्या मानाने फार साध्या पोषाखात होती. कडेला नाजूक झालर लावलेली गुलाबी रंगाची तलम साडी ती नेसली होती. कानांत हिऱ्यांच्या लखलखत्या कुडया आणि हातांत हिऱ्यांच्या बांगडया याव्यतिरिक्त अनय काही अलंकार तिच्या अंगावर नव्हते. केशभूषाही नेहमीचीच साधी. पाठीवर जाड छोटी एक वेणी. मुद्रेवर नेहमीचे प्रसन्न मनमोकळे हसू. गालांवरच्या लाघवी खळ्या सारख्या उमटत मिटत होत्या. आशा येताच तिच्याभोवती चाहत्यांची गर्दी उसळली. तिच्यावर अभिनंदनांचा वर्षाव झाला. फुलांचे भलेथोरले गुच्छ स्वीकारताना आशाची तारांबळ उडाली. मग रीतसर समारंभ सुरु झाला. अनेक जणांची कौतुकपर भाषणे. आशासाठी स्नेह्यांनी आणलेल्या आपुलकीच्या अनेक भेटवस्तू. या समारंभाच्या निमित्ताने हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीने आशाच्या काही निवडक गीतांची ध्वनिमुद्रिका काढली होती. ती तिथे पाहुण्यांना ऐकवण्यात आली. अनेक आवडती पूर्वपरिचित गाणी कानांवर पडत होती. कांचकी चूडियां... खत लिख दे सावरियाके नाम बाबू... झुमका गिरा रे... दम मारो दम... आणि त्याच ध्वनिमुद्रिकेतून वेगवेगळ्या संगीत दिग्दर्शकांनी आशाबद्दलची कृतज्ञता, जिव्हाळा बोलून दाखवला होता. तिची अपार कष्ट करण्याची तयारी, तिच्या स्वरांचा सच्चेपणा, गीतांच्या द्वारा विविध भाव प्रकट करताना दिसून येणारी तिची बुद्धिमत्ता आणि संवेदनाशीलता, तिच्या आवाजाचे नाना रंग यांचे कौतुक केले होते. लताबाईंनी या समारंभात भाषण केले. आशाच्या कर्तृत्वाची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली. ते केवळ बहिणीने बहिणीचे केलेले कौतुक नव्हते. तर एका थोर कलावंताने दुसऱ्या तितक्याच थोरवीच्या कलावंताला ती दिलेली उमदी दाद होती. नंतर आशा बोलायला उभी राहिली. ती फार छान बोलते. प्रामाणिक, तळमळीने भरलेले, आत्मचिंतन करणारे ते गंभीर भाषण आशाच्या आनंदी, थट्टेखोर स्वभावाचा एक वेगळा पैलू दाखवून गेले. आशाने त्या दिवशी आपले गायनगुरु मास्टर नवरंग यांचा भरघोस सत्कार केला. शास्त्रीय संगीताचे पहिले पाठ त्यांनी तिला दिले होते. ज्या निर्मात्याने आपल्या 'सोनाचांदी' या हिंदी चित्रपटात आशाला प्रथमच हिंदी गीते गाण्याची संधी दिली होती त्यांचाही तिने सत्कार केला. मग तिने कोरसमध्ये आपल्याबरोबर गाणाऱ्या गायिकांना भेटवस्तू, पुष्पगुच्छ दिले. भाषणांचा कार्यक्रम आटोपताच आशा व्यासपीठावरुन लगेच खाली उतरली. पाहुण्यांच्या गर्दीत मिसळली. तिथे आलेल्या प्रत्येक व्यक्तीशी बोलली. तिची ध्वनिमुद्रिका सर्व उपस्थित पाहुण्यांना भेटीदाखल मिळाली होती. असा त्यांचा स्वभाव कष्टाळू होता.

### आशा भोसले - परिचय

शांता शेळके यांनी आपला परिचय आशा भोसले यांच्याशी कसा झाला यांचा किस्सा सांगितला आहे. कोल्हापूरला 'प्रफुल्ल' मध्ये विनायक यांच्याबरोबर काम करत होते तेव्हा

लताबाई तिथे नोकरीला होत्या. डावजेकरांनी लताबाईंबरोबर त्यांच्या धाकटया भावंडांनाही जवळून पाहिलेले. आशा अगदी छोटी असल्यापासून डावजेकरांच्या चांगली परिचयाची. त्यांच्या तोंडून तिचे वर्णन ऐकून मला तिला भेटण्याची उत्सुकता वाटू लागली. माझी आशाशी ओळख नव्हीच, पण तिला मी कुठे ओझरते पाहिलेलेही नव्हते. तसा लताबाईंशी माझा परिचय झालेला होता. 'रामराम पाव्हणं' चित्रपटासाठी काही गाणी मी लिहिली होती. त्यांना लताबाईंनी संगीत दिले होते. त्यांच्या या धाकटया बहिणीने गायिलेली काही मराठी गाणी आताच गाजू लागली होती. वसंत प्रभू यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली तिने ध्वनिमुद्रित केलेल्या 'गळ्यात माझ्या तूच राजसा मंगलमणि बांधिले' यांसारख्या गाण्यांनी, मराठी चित्रपटांत इथे तिथे प्रकट होऊ लागलेल्या तिच्या इतर काही गीतांनी मंगेशकर घराण्याच्या सुरेल गळ्याची लखलखीत नोंद माझ्या मनावर पूर्वीच केली होती. पण त्या स्वरांची मालकीण मात्र अद्याप मला दिसलेली नव्हती. आशाला बघण्यासाठी मी उत्सुक झाले. तिच्या स्वभावाचा मी माझ्या मनाशी अंदाज बांधू लागले.

**मनमोकळा स्वभाव**

आशा आणि तिचे पती भोसले  ही दोघेजण कोल्हापूरला आली. योगायोग असा की आमच्या शेजारच्या खोलीतच त्यांचा मुक्काम होता. दोन्ही खोल्यांमधल्या पातळ लाकडी पार्टिशनआडून आशाचे उंच सुरातले लगबग बोलणे, खळखळ हसणे सारखे कानांवर येई. मला खूप गंमत वाटे. लवकरच आशाशी ओळख झाली. पहिल्या भेटीतच आपल्या मनमोकळ्या, लाघवी, थट्टे-खोर स्वभावाने तिने मला भारुन टाकले. तेव्हाची आशा अजून आठवते. डोळ्यांसमोर दिसते. फिक्या मंद रंगाचे साधे पाचवारी पातळ, कोपरापर्यंतच्या बाह्यांचे पोलके, कसल्याही प्रसाधनाचा स्पर्श नसलेला गोल हसरा चेहरा, कपाळावर कुंकवाचा मोठा टिळा, दाट केसांच्या दोन घट्ट वेण्या आणि हातांमध्ये खूपशा सोन्याच्या बांगडया. आमची दोघींची लगेच गट्टी जमली. त्यावेळी कोल्हापूरला भालजींच्या स्टूडिओतच गाण्यांचे रेकॉर्डिंग होत असे. दोन ध्वनिमुद्रणांच्या दरम्यान किती वेळ तरी मोकळा असायचा. मग आम्ही दोघी रेकॉर्डिंगरुमच्या बाहेर पायऱ्यावर बसून गप्पा मारत असू. आपण वाचलेल्या पुस्तकांपासून तो मासेमटणाच्या विविध पाककृतींपर्यंत अनेक विषयांवर आशा बोलत असे. तऱ्हे-तऱ्हेच्या मजेदार गोष्टी, किस्से, विनोद यांचा भरपूर भरणा तिच्याजवळ होता. ते सारे मला सांगून ती मला खूप हसवायची. स्वतःही हसत राहायची. आशा त्यावेळी चित्रपटसृष्टीत नुकतीच आली होती. ती दीनानाथांची मुलगी होती. लताबाईंची धाकटी बहीण होती. तरीही या सृष्टीत तिला आपले स्वतःचे असे पृथगात्म स्थान निर्माण करणे आवश्यक होते. आपल्या कलागुणांवरच तिला तिथे पाय रोवून उभे राहणे भाग होते. पार्श्वगायिका म्हणून आशाला कुठे कुठे कामे मिळू लागली होती. तिथे वय केवळ पोरसवदा होते. स्वभावात त्या वयाला साजेसा मुग्धपणा होता. तिच्या ठायी महत्त्वाकांक्षा होती. मनात भविष्याची अनेक सुंदर स्वप्ने होती. आणि त्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी धडपडण्याची जिद्दही होती. येरव्ही थट्टामस्करीत सतत रंगून जाणारी आशा गाण्यासाठी 'माइक' पुढे उभी राहिली की अगदी वेगळीच होऊन जाई. ती जीव ओतून तळमळीने गाई. आपले शब्दोच्चार निर्दोष, स्पष्ट असावेत याकडे बारकाईने लक्ष देई. गाण्याचे कितीही 'रीटेक' झाले तरी थकत नसे. कंटाळत नसे. तिच्या आवाजाचा कोवळा धारदार सुरेलपणा, त्यातला गोडवा विलक्षण होता  याच शंकाच नाही. पण तिची कष्ट करण्याची तयारीही विस्मयकारक होती. ध्वनिमुद्रित झालेली गाणी, मला वाटते, गावातच एका थिएटरमध्ये ऐकण्याची सोय होती. त्या मोकळ्या थिएटरमध्ये आम्ही गाणी ऐकायला जात असू. आपले प्रत्येक गाणे आशा काळजीपूर्वक ऐके. आपल्याच गाण्याची चिकित्सा करी. शब्दोच्चार बरोबर आले आहेत की नाही याबद्दल इतरांना प्रश्न विचारी. गाणी ऐकताना डोळे मिटून अंतर्मुख होई.

'स्वराज्याचा शिलेदार' हा चित्रपट तसा चालला नाही. त्यातल्या गाण्यांचाही फारसा ठसा कुणाच्या मनावर उमटला नाही. त्यानंतर भालजींनी 'शिवा रामोशी' चित्रपट सुरु केला. 'स्वराज्याचा शिलेदार' मध्ये आशाबरोबर त्या काळातली आणखी एक नामवंत पार्श्वगायिका बोलावलेली होती. पण आपल्यापेक्षा आशाला जास्त मोबदला दिला म्हणून रुसून भांडून ती निघून गेली होती. अर्थात 'शिवा रामोशी' साठी एकटी आशाच पार्श्वगायिका म्हणून कोल्हापूरला आली. 'शिवा रामोशी' ची गाणी मीच लिहिली होती. या वेळीही आम्ही 'आराम' हॉटेलात उतरलो. आशाने आणि मी पुन्हा खूप गप्पा मारल्या. पूर्वपरिचयामुळे स्नेह दृढ झाला होता. 'शिवा रामोशी' मध्ये माझे एक गाणे होते 'रानची मी राणी' या गीतातल्या स्वरयोजनेत फेरफार करत, शब्दांचे तुकडे पाहून 'चि मी राणी' 'चि मी राणी' असे गात, आशा माझ्या शब्दरचनेची थट्टा करायची. त्याच चित्रपटात 'तुकडा चांदुबाचा कुटं हा ठेवू बाई ?' असे एक गाणे होते. चित्रपट ग्रामीण असल्यामुळे माझ्या मूळच्या नागर शब्दरचनेला भालजींनी ग्रामीण वळण दिले होते. या गीताचे शब्द खूप गावंढळ, रासवट पद्धतीन म्हणून गात गात आशा स्वतः हसायची. आणि इतरांनाही हसवत राहायची.

**आदरातित्यथा**

'स्त्री' मासिकाने मला आशाची मुलाखत घ्यायला सांगितले. त्यासाठी मी तिच्या घरी गेले. आशा त्यावेळी माहिमला एका चार खोल्यांच्या ब्लॉकमध्ये राहात होती. त्याच बिल्डिंगमध्ये वरच्या मजल्यावर प्रसिद्ध अभिनेत्री उषा किरण यांचे बिऱ्हाड होते. नेमके काय करण झाले माहीत नाही. पण मूलाखतीचे काही जमले नाही. तथापि मुलाखत मिळाली नाही तरी आशाला तिच्या घरात, संसारात बघणे हा एक आनंददायक अनुभव होता. आशा मोठी हौशी आतिथ्यशील गृहिणी आहे हे त्या भेटीत मला जाणवले. त्यावेळी तिच्या वृद्ध सासूबाई तिच्यापाशी राहात होत्या. हेमंत लहान होता. आशाच्या बाहेरच्या कामांचे प्रमाण एकदम खूप वाढले होते. पण ती कामे सांभाळून ती आपले घरही नेटक्या रीतीने चालवत होती. सैपाकपाणी स्वतः करत होती. आल्यागेल्यांना खाऊपिऊ घालून त्यांची सरबराई ठेवत होती.

त्या दिवशी आम्ही दोघींनी खूप गप्पा मारल्या. आशाने भोपळ्याचे घारगे केले होते ते तिने मला आग्रहाने खाऊ घातले. मीही मधल्या काळात तिची मला आवडलेली गाणी तिला सांगितली. मी तिच्याकडे बसले होते त्याच वेळी मराठी चित्रपट व्यवसायातले एक गृहस्थ तिच्याकडे आले. त्यांना आपल्या चित्रपटात आशान काही गाणी म्हणायला हवी होती. ती त्यांना म्हणाली, "मी कुठल्या स्टूडिओत कधी येऊन गाणी म्हणायची तेवढं तुम्ही मला सांगा. बाकी व्यवहाराची बोलणी भोसल्यांबरोबर करा. माझं काम गायचं. ते मी करीन." माझ्या ध्यानात आले की आशाने कामाची सर्व व्यावहारिक बाजू आपल्या पतीवर सोपवली होती. त्यात ती कुठल्याही तऱ्हेचा हस्तक्षेप करत नव्हती. त्याच दिवशी आणखीही एक गोष्ट मला जाणवली. आशाने घरच्या मंडळींच्या इच्छेविरुद्ध लग्न केले असल्यामुळे माहेर तिला दुरावले होते. पण आईची, भावंडांची आठवण तीव्रतेने तिच्या मनात सतत जागी होती. बोलता बोलता ती मला म्हणाली, "मला माईची, दिदीची अनेकदा आठवण येते. दिवाळीत हृदयनाथला ओवाळता येत नाही याची खंत वाटते." आशा असावी तितकी सुखी नाही असे दिसत होते. तिच्यासमोर नव्या समस्या उभ्या राहिल्या. होत्या त्या तिला भेडसावत असाव्यात. आशाची कलाक्षेत्रातली झपाटयाची प्रगती कुठे तरी तिच्या संसारसुखाच्या आड येऊ बघत होती.

लताबाईच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यांच्यावर 'लता' हे लेखांचे संकलन काढायचे ठरले. त्यासाठी सरोजिनी वैद्य, वृंदा लिमये आणि मी असे आमचे तिघांचे एक संपादक मंडळ होते. 'लता' या ग्रंथासाठी अनेक संगीत दिग्दर्शक, कवी, लेखक, तंत्रज्ञ त्याप्रमाणेच व्यक्तिगत स्नेहीही लिहिणार होते. या ग्रंथात लताबाईंच्या कुटुंबियांनीही लिहावे असे आम्हांला वाटले. आशाचा लेख तर आवश्य हवाच. पण तो मिळवायचा कसा? एक तर ती स्वतः त्यावेळी ध्वनिमुद्रणाच्या कामात अतिशय व्यग्र होती. दूसरे म्हणजे स्वतः लेख लिहिण्याइतकी तसदी तिला द्यावी की आपण तिच्याजवळ बसून, तिला लेख सांगायला लावून तो लिहून घ्यावा याचा संभ्रम पडला होता. पण आम्ही विनंती करण्याचा अवकाश, आशाने ताबडतोब वेळात वेळ काढून, स्वतः प्रयत्न करुन अतिशय सुंदर लेख लिहून दिला लेखाचे शीर्षकही तिनेच दिले होते, 'आमचे छोटे बाबा.' त्या लेखात आशाने दिदीच्या अत्यंत ह्रद्य आठवणी दिल्या होत्या. लेख वाचून मी हरवून गेले. तसेच आतून मला गलबलल्यासारखेही झाले. "फार सुंदर लेख आहे." असे मी आशाला म्हटले. त्यावर संकोचाने ती इतकेच म्हणाली,

"माझ्या साऱ्या भावंडांवर माझं प्रम आहे. खूप प्रेम आहे. पण ते असं जाहीरपणे शब्दांत मांडायचं म्हणजे अवघड वाटतं."

**ज्येष्ठ पार्श्वगायिका**

मी रेकॉर्डिंगच्या खोलीत आशाच्या साडीची आवश्यक ती दुरुस्ती करुन दिली. मग गाणे ध्वनिमुद्रित झाले. साडी खरोखर लकी असावी. कारण 'जिवलगा' आणि 'ही वाट दूर जाते' दोन्ही गाणी खूप लोकप्रिय झाली.

बाळाने चाली दिलेली अनेक गाणी आशाने गायिली आहेत. आरती प्रभू यांची 'ये रे घना ये रे घना' आणि 'गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे' ही गाणी ध्वनिमुद्रित होत होती तेव्हाची गोष्ट. आशाने त्या दोन्ही गाण्यांतले भाव, शब्दांचे वजन प्रथम नीट समजावून घेतले. उच्चारांच्या बाबतीत तर ती फार चोखंदळ आहे. विशिष्ट शब्दांच्या उच्चाराबाबत मनात काही शंका असेल तर ती कवीला, संगीत दिग्दर्शकाला त्याबद्दल मोकळेपणाने विचारते. स्वतःची खात्री करुन घेते आणि मगच गाते. त्या दिवशीही तिने आरती प्रभूंना, बाळला गीताच्या अर्थाविषयी पश्न विचारले. चर्चा केली. बाळबद्दल आशाला कौतुक, अभिमान आहे. धाकटा भाऊ म्हणून आणि वेगळ्या स्वतंत्र पद्धतीची स्वररचना करणारा संगीत दिग्दर्शक म्हणूनही. त्याची गाणी गाताना फार काळजी घ्यावी लागते असे ती आवर्जुन सांगते. शब्दोच्चारांबाबतची निर्दोषता संपादन करताना सुधीर फडके यांच्याकडून आपण बरेच काही शिकलो असे ती मोकळेपणाने मान्य करते. भारतीय विविध भाषांवर तर शेकडो गीते आशाने गायिली ओहेत. पण मराठी चित्रपट संगीताला आशाच्या गळ्याने दिलेली जोड, त्यात निर्माण केलेले सौंदर्य आणि सामर्थ्य केवळ अपूर्व म्हणावे लागेल. 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात' किंवा 'मामाच्या गावाला जाऊ या' सारखे अवखळ प्रसन्न बालगीत असो, 'कुणी तरी बोलवा दाजीबाला' किंवा 'बुगडी माझी सांडली गं' सारखी ढंगदार लावणी असो, 'सहज सख्या एकदाच येइ सांजवेळी' किंवा 'विसरशील खास मला' यांसारखी संयत अभिरुचीची प्रणयगीते असोत, 'पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती' सारखे ज्ञानदेवांचे भक्तिगीत असो किंवा 'का हो धरिला मजवरी राग' सारखी रागदारीने अलंकृत झालेली कोठीवरची लावणी असो; प्रत्येक गाण्यामध्ये संगीत दिग्दर्शकाने दिलेल्या सुंदर स्वररचनेला आशाने स्वतःची काही कल्कतापूर्वक जोड दिली आहे असे आपल्या प्रत्ययाला

आल्यावाचून राहात नाही. आशाच्या गाण्यात विलक्षण नाटय असते. केवळ उच्चारित शब्दच नव्हेत तर दोन शब्दांत तिने सोडलेली मोकळी जागा देखील अर्थगर्भ, सूचक बनते. याची असंख्य उदाहरणे तिच्या गाण्यांत दाखवता येतील.

### आशा भोसले लोकप्रिय

आशाने पार्श्वगायनाच्या क्षेत्रात उदंड यश मिळवले आहे. पण आत्मतृप्तीचा तिला स्पर्श झालेला नाही. आजही ती आपल्या गाण्यासाठी अपार श्रम करते. 'रेशीमगाठी' चित्रपटातल्या गाण्याचे ध्वनिमुद्रण चालले होते त्या दिवशीची एक आठवण सांगण्याजोगी आहे. अंधेरीच्या 'सनी स्टूडिओज' मध्ये रेकॉर्डिंग होते. सकाळी अकराच्या सुमाराला आशा स्टूडिओत आली. आल्याबरोबर साऱ्यांशी हसतमुखाने बोलून, यायला उशीर झाल्याबद्दल संगीत दिग्दर्शक सुधीर फडके यांच्याजवळ दिलगिरी व्यक्त करुन ती लगेच कामाकडे वळली. सुरेश वाडकर यांच्याबरोबर तिची दोन द्वंद्वगीते होती. दुपारी एक वाजेपर्यंत गाण्याची तालीम चालली होती. या अवधीत आशाने संगीत दिग्दर्शकांकडून गीताचा आशय, शब्दोच्चार, स्वरांची वळणे काळजीपूर्वक समजावून घेतली. मग ध्वनिमुद्रण सुरु झाले. दुपारी 'लंच' ची सुट्टी झाली तेव्हा घरुन डब्यातून आणलेले थोडेसे खाणे खाऊन ती पुन्हा माइकसमोर उभी राहिली. रात्री दहा वाजेपर्यंत ती न थकता. न कंटाळता काम करत होती. रात्री दहापर्यंत 'रेशीमगाठी' मधले त्या दिवशीच्या गाण्यांचे ध्वनिमुद्रण संपले. त्या आधीच हिंदीतले संगीत दिग्दर्शक बाप्पी लहरी स्टुडिओत येऊन दाखल झाले होते. कारण रात्री त्यांची दोन गाणी आशा गाणार होती. आम्ही रात्री मोटारने प्रवास करुन पुन्हा पुण्याला येणार होतो. निघण्यापूर्वी मी आशाचा निरोप घ्यायला गेले तेव्हा ती बाप्पी लहरींच्या गाण्यांची रिहर्सल करत होती.

"आता हे काम कधी संपणार ?" मी विचारले.

"संपेल तेव्हा संपेल." आशा म्हणाली, "त्याचा काही नेम नाही. रात्रीचे बारा एक तरी वाजतील. पण आज ही गाणी व्हायलाच हवी आहेत. या गाण्यांची रिहर्सल ऐकणार ? ऐका!"

### विनोदी वृत्ती

आशा भोसले अतिशय विनोदी, थट्टेखोर स्वभावाच्या आहे. तिच्याशी बोलताना तिच्या स्वभावातली ही छटा नेहमी जाणवते. यशवंत देव यांनी 'शब्दप्रधान गायकी' हे सुगम संगीतावरचे पुस्तक लिहिले. त्याचा प्रकाशन समारंभ दादरला झाला. देवांनी हे पुस्तक आशाल अर्पण केले होते आणि त्याचे प्रकाशनही आशाच्याच हातून व्हायचे होते. आशाला वक्तृत्वकलाही साध्य आहे. ती सुरेख बोलते. त्या बोलण्यात जुन्या आठवणी, व्यवसायातले अनुभव सुधीर फडक्यांसारख्या चोखंदळ संगीत दिग्दर्शकाच्या अतिशुद्ध 'ब्राह्मणी' उच्चारांच्य नकला, समोरच्या प्रेक्षकांशी जवळीक साधत केलेले हितगुज सर्व काही असते. प्रकाशनाचे भाषण करताना ती म्हणाली,

### अष्टपैलू व्यक्ती

आशाच्या स्वभावाचे अनेक पैलू माझ्या निदर्शनाला आले आहेत. आशाच्या सर्व हालचाली जलद असतात. बोलणे निःसंकोच, मनमोकळे, लगबगीचे असते. घुटमळणे , रेंगाळणे, हातचे राखून बोलणे तिला कधी ठाऊक नाही. धूर्तपणाने समोरच्या माणसाचा अंदाज घेत डावपेच करणे तिला जमणार नाही. त्याप्रमाणे कुणाच्या भावनांशी खेळ खेळत त्याला नसती आशा लावणे, मनात नसताना कुणाला तोंडदेखला शब्द देऊन त्याला झुलवत ठेवणे हेही तिच्या

स्वभावात बसणारे नाही. एखाद्याचे काम आपल्या हातून होण्यासारखे असेल तर आशा त्याल होकार देईल. आपला शब्द पाळील. पण एखादी गोष्ट होण्यासारखी नसेल तर स्पष्ट नका देईल. तिच्यात एक आकर्षक साधेपणा आहे. त्यामुळे तिच्याशी बोलताना समोरच्या माणसावर तिच्या मोठेपणाचा आधी दबाव आलेला असला तरी तिच्या सहज स्वाभाविक वागण्यामुळे तो माणूसही आपले अवघडलेपण विसरतो. आणि आपोआप मोकळा होतो. तिचे बोलणे तडकफडक असते. त्यामुळे माणसे रेंगाळत, सावकाश पल्हाळ लावत बोलू लागली तर ती अधीर होते, कंटाळते. एकदा ती मला म्हणाली,"माणसं मनात काय असेल ते एकदाची पटकन बोलून का नाही टाकत? ती अशी रेंगाळत, वेळ लावत बोलू लागली की वाटतं, यांच्या तोंडातली वाक्यं ओढून खेचून काढावीत!"

**स्पष्टवक्तेपणा**

तिचा स्पष्टवक्तपणा पण आतून ती प्रेमळ आहे आणि माणसाचे मन जाणणारी आहे. एक लहानसा प्रसंग मला आठवतो. आशा रेकॉर्डिंकहून खूप दमून आली होती. लताबाईंकडेच जेवणाच्या टेबलाशी बसली होती. मध्ये थोडा वेळ मिळाला होता. त्यात काही तरी दोन घास खाऊन दुपारी पुन्हा कामाला जाणार होती. जवळ मानस मुकर्जी हा तरुण बंगाली संगीत दिग्दर्शक होता. मानस कुठल्या तरी बंगाली गाण्याबद्दल आशाला सांगू लागला. ते आपले गाणे तिनेच ध्वनिमुद्रित करावे म्हणून आग्रह धरु लागला. मानसचे बोलणे आशाने मध्येच थांबवले आणि ती त्याला म्हणाली,

"मानस, मला तू जेवू देणार आहेस की नाही?"

**समारोप**

सुविख्यात पार्श्वगायिका श्रीमती आशा भोसले यांच्याबद्दल मला दूरस्थ आदर आहे. अभिमान आहे. थोडीशी भीतीची भावना ही आहे. पण गेली अनेक वर्षे मी जिला आळखत आले आहे त्या आशा नावाच्या मनस्वी, गुणी आणि प्रेमळ मुलीबद्दल माझ्या मनात अपार प्रेम आहे. नुसते प्रेम आणि पुन्हाही प्रेमच.

❖❖❖❖

# घटक-३

# वडीलधारी माणसे - लेख संग्रहाविषयी

**घटक रचना :**

३.१ प्रस्तावना
३.२ वसंत पवार
३.३ दुर्गाबाई
३.४ ह्रदयनाथ
३.५ कोठावळे
३.६ लताबाई
३.७ समारोप

## ३.१ प्रस्तावना

'वडीलधारी माणसे'या ललित लेख संग्रहातील अभ्यासाला निवडलेले त्या लेखांपैकी पाच लेख घटक क्र. दोन मध्ये पाहिले आहेत, तर पाच लेखाचा अभ्यास या घटकात करणार आहोत.

## ३.२ वसंत पवार

**वसंत पवार - परिचय**

मराठी, हिंदी संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध संगीतकार म्हणून वसंत पवार प्रसिद्ध होते. त्यांनी गाणी, कव्वाली, लोकगीते, भावगीते, लावण्या, सवाल-जवाब अशा संगीताच्या वेगवेगळ्या प्रकारात ते मातब्बर होते. लावणी, सवाल-जवाब, भावगीते हे त्यांचे हुकूमी संगीत प्रांत होय. त्या काळातील चित्रपट तमाशा प्रधान, कौटुंबिक नात्यांचे दर्शन घडविणारे, ग्रामीण चित्र मांडणारे होते, अशा चित्रपटांना साजेसे संगीत त्यांनी दिले होते. ते जातिवंत रसिक होते. त्यांच्या कामावर त्यांचे खूप प्रेम होते. एकदा चाली तयार करावयास बसले की अनेक चाली त्यांना सुचत असत. कलेमध्ये रममाण होणारा कलंदर कलावंत म्हणून वसंत पवार ओळखले जात. अनंत माने यांच्या चित्रपटातील गाणे तयार करण्याच्या निमित्ताने शांता शेळके आणि वसंत पवार यांची ओळख झाली.

पवार हे नावाजलेले संगीत-दिग्दर्शक होते. एवढ्या मोठ्या व्यक्तीबरोबर प्रारंभीच्या काळातच काम करण्याची संधी लेखिकेला मिळाली होती. त्यामुळे त्याचे दडपण लेखिकेवर होते.

मात्र आपण विशेष काहीतरी करतो आहोत, ही श्रेष्ठत्वाची भावना पवारांमध्ये नव्हती. त्यांची या वृत्तीमुळे लेखिका पवारांबरोबर लगेचच मोकळेपणाने काम करु लागल्या. कामाच्या निमित्ताने शांता शेळके यांना पवारांना जवळून अनुभवता आले. पवारांकडून लेखिकेने अनेक गोष्टी शिकल्या. त्यांची कामाबद्दलची निष्ठा, त्यांची तळमळ, त्यांचे अतिउत्साही व्यक्तिमत्व, प्रसन्नता या सर्व गोष्टींचा प्रभाव लेखिकेवर पडला. त्यांच्या जीवनात या गोष्टींचा त्यांना खूप फायदा झाला. कलावंतांना घडविणारा, नवोदित कलाकारांना यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देणारे पवार यांनी कलेच्या क्षेत्रात उंची स्थान मिळविले असले तरी व्यवहार आणि प्रापंचिक जबाबदाऱ्यांमध्ये अपयशी ठरले. त्यांनी आपल्या जीवनात केवळ कलेचाच महत्त्व दिले. त्यामधून मिळणाऱ्या मोबदल्याविषयी मात्र त्यांनी विचार केला नाही. म्हणूनच त्यांना उपेक्षित जीवन जगावे लागले. त्यांचा वापर केला जाऊ लागला. त्यांना अधिक श्रम करुनही मोबदला अल्प मिळत असे.

या क्षेत्रातील लोक त्यांच्या स्वभावाचा फायदा घेऊ लागले. त्यामुळे गरीबी, दारिद्र्याचे जीवन त्यांना जगावे लागले. त्यांचा व्यवहार चातुर्य नसल्याचा फायदा घेतला गेला. अनेक चांगले क्षण त्यांच्या आयुष्यात आलेही त्यांच्या गुणांची कदरही केली गेली, निर्मितीचा आनंद त्यांना लाभला. तरीसुद्धा एक स्वास्थपूर्ण आणि सुखी जीवनापासून ते वंचितच राहिले. संगीत क्षेत्रामुळे वसंत पवार यांच्या परिचयातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू शांता शेळके यांनी या लेखातून मांडले आहेत. त्यांना संगीत क्षेत्रातील अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

काही महिन्यांपूर्वी इथल्या 'मॅजेस्टिक' चित्रपटागृहात 'सवाल माझा ऐका' या चित्रपटाच्या पहिल्या खेळाला मी गेले होते. चित्रपट संपल्यावर बाहेरच्या गॅलरीत चित्रपटाच्या पहिल्या खेळाला मी गेले होते. चित्रपट संपल्यावर बाहेरच्या गॅलरीत चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत माने यांच्याशी बोलत होते. एकदम अनंतराव मला म्हणाले, "मागे कोण उभे आहे पाहिलेत काय?"

**वसंत पवार यांच्याशी भेट :**

मी वळून पाहिले. वसंत पवार एकीकडे, माणसांच्या घोळक्यातून काहीसे अलग उभे होते. दृष्टादृष्ट होताच त्यांनी हसून, दोन्ही हात जुळवून नमस्कार केला. त्यांना प्रतिनमस्कार करताना माझ्या छातीत धस्स झाले. पवारांची देहयष्टी आधीच किरकोळ. पण या वेळी ते निम्यानेही उरले नव्हते. डोक्यावरची भली मोठी केसाळ टोपी त्यांच्या कृश खंगलेल्या देहाला अगदी विसंगत दिसत होती. इतकी, की ती केविलवाणी वाटली नसती तर नक्की विनोदी वाटली असती. पवार आजारी आहेत, ते मिरजेच्या दवाखान्यात आहेत हे मी ऐकले होते, पण त्या आजाराने त्यांना इतके खाऊन टाकले असेल याची मला कल्पना नव्हती. मी पुन्हा एकवार पवारांकडे न्याहाळून पाहिले. ते अगदी वेगळे दिसत होते. अपरिचित वाटत होते. ओळख पटत होती ती फक्त ओठांवरच्या अबोल स्मितात आणि हसऱ्या, लुकलुकत्या, बुध्दिमत्तेची साक्ष देणाऱ्या तेजस्वी डोळ्यांत. पवार हसत होते, बोलत होते आणि माझ्या मात्र सारखे मनात येत होते, पवारांचे आता काही खरे नाही. केव्हा काय होईल सांगता येत नाही. माझे मन अगदी उदास होऊन गेले. त्यानंतर चित्रपट व्यवसायातली कुणी मंडळी भेटली की मी त्यांना पवारांबद्दल विचारी. पवार फार आजारी आहेत असे कुणी सांगे तर ते नव्या चित्रांना संगीत देत आहेत असेही कुणी म्हणे. खरे काय त्याचा पत्ताच लागत नसे. मनाची हुरहुर मात्र वाढत राही. आणि शेवटी पवार गेले. एका उत्कट, अतिरेकी, कलंदर जीवनाची अखेर झाली. आपल्यासारख्या

सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने विपरीत, विसंगत, पण पवारांच्या विलक्षण जीवनक्रमाच्या दृष्टीने सुसंगत म्हणावी अशी अखेर.

**संगीत दिग्दर्शक म्हणून परिचित :**

चित्रपटांसाठी गीते लिहिताना अनेकजणांकडून मी अनेक गोष्टी शिकत गेले. असे शांता शेळके कबुली देतात. गीतलेखनाच्या प्रारंभीच्या काळातच एक फार मोठा संगीत दिग्दर्शक मला भेटला, आणि गीते लिहिण्याच्या कामी पूर्ण अनभिज्ञ, म्हणूनच साशंक असलेल्या माझ्या ठायी त्यांनी थोडा तरी आत्मविश्वास निर्माण केला. हा संगीत दिग्दर्शक म्हणजे वसंत पवार. त्या काळी पवारांचे नाव फार मोठे होते. माडगुळकरांच्या अनेक गीतांना त्यांनी सुंदर चाली दिल्या होत्या. ती गीते त्या, चाली माझ्या मनावर ठसल्या होत्या. पवार तेव्हा अनंत माने यांच्याकडे काम करत होते. मान्यांनी एकदम दोनतीन चित्रपटांची गाणी करवून घ्यायचे ठरवले आणि त्यासाठी त्यांनी मला बोलावून घेतले. पुण्याला आम्ही एका हॉटेलमध्ये राहण्याची सोय केली होती.

वसंत पवार यांच्याबरोबर गाणी करायची आहेत हे जेव्हा मान्यांनी मला सांगीतले तेव्हा अर्थातच मला आनंद झाला. पण एवढ्या मोठ्या संगीत दिग्दर्शकाच्या दिग्दर्शनाखाली गीतरचना करणे आपल्याला जमेल का म्हणून मला भीती ही वाटली. आम्ही पुण्याला आल्यावर दुसऱ्याच दिवशी अनंत माने यांच्याबरोबर पवार हॉटेलवर मला भेटायला आले. मी त्यांना पहिल्यांदाच बघत होते. प्रथमदर्शनी जाणवला तो त्यांचा साधेपणा. पायजमा-शर्ट असा त्यांचा पोशाख होता. चेहऱ्यावर आणि वर्तनात पूर्ण निगर्वी वृत्ती. डोळ्यांत मात्र बुध्दिमत्तेची चमक होती आणि त्याबरोबर मिष्किलपणाही होता. मला पवारांच्या अनेक सुरेख चाली आठवत होत्या. 'बाळा जो जो रे' 'अबोली' यांसारख्या चित्रपटांतल्या गाण्यांच्या गोड ओळी मनात भिरभिरत होत्या. त्या चालीत नुसता गोडवा नव्हता तर गाण्याच्या अर्थाची रसिक जाण होती. गाण्यातल्या भावनेशी चाल सुसंगत असावी याची काळजी घेतलेली दिसत होती, आणि शास्त्रीय संगीताच्या बैठकीमुळे त्या हलक्याफुलक्या चालींनाही वजन, कसदारपणा आलेला होता. मी पवारांकडे पहात होते, आणि स्वतःशीच म्हणत होते, यांनीच या चाली दिल्या? माने मला म्हणाले, "यांच्याबरोबर तुम्ही बसा. ते तुम्हाला चाली ऐकवतील. नाही तर तुम्ही तुम्हाला सुचतील तशी गाणी करुन त्यांना दाखवा. ते चाली देतील."

**मन मिळावू स्वभाव :**

मग पवार पेटी घेऊन हॉटेलवर येत. साथीला त्यांचा तबलजी असे. मान्यांनी चित्रपटांतल्या गाण्यांच्या जागा आधी मला सांगितलेल्याच होत्या. तेही जहर असत. वसंत पवार यांची कामाची पध्दत अगदी अनौपचारिक होती. ते गप्पा मारता मारता पेटीवर छान छान गाणी वाजवून दाखवायचे. गोड चाली ऐकवायचे. त्यांच्या बरोबरची बैठक ही अक्षरशः एक मेजवानी असे. जिथे एक चाल हवी असेल तिथे दहा चाली त्यांनी ऐकवाव्यात. कधी भावगीते, कधी लोकगीते तर कधी शास्त्रीय संगीतातल्या चिजादेखील. गाण्यांचा आणि चालींचा अमाप साठा त्यांच्यापाशी होता. या साऱ्याचा जोडील त्यांच्या गप्पा असत. चित्रविचित्र अनुभव असत. विनोदी किस्से असत. माणसांच्या नकला असत. पत्त्यांच्या ट्रिक्स असत. पवारांना विनोदाची विलक्षण जाण होती. बोलण्यातले बारकावे ते चटकन् टिपत. त्यांच्या संभाषणात त्यांची तीव्र बुध्दिमत्ता जाणवे, तसा मनाचा सुसंस्कृतपणही प्रत्ययाला येई.

वसंत पवारांनी सुरेख चाल दिली होती. ती 'दिल्लगी'तल्या गाण्याच्या चालीशी मिळतीजुळती असूनही पुन्हा स्वतंत्र होती. पवारांनी गाण्याचा बाज कोळीगीताचा घेतला आणि कोळीकोळणीच्या नृत्याला ते द्वंद्वगीत दिले. गाण्याला कोरस टाकला, 'चल गोमु बंदरा भरति आली समिंदरा' ही कल्पना आणि हे शब्दही पवारांचे होते. सगळी गाणी छान झाली आणि ध्वनिमुद्रण पुण्यात प्रभात स्टुडिओमध्ये झाले. एक दोन गाण्यांच्या ध्वनिमुद्रणाला माडगूळकर मुद्दाम आले होते. चित्रपटात कोळीगीतावरचे नृत्य भगवान आणि लीला गांधी यांनी केले होते. ही गाणी लोकांनाही फार आवडली होती. पवारांबरोबरचे माझे काम अगदी विनासायास हसतखेळत होऊन गेले आणि मी मुंबईला परत आले.

**साधेपणाचा फायदा लोक घेत :**

पवारांची ही ओढाताण सदाच चालू असे, आणि त्यामुळे अनेकदा त्यांच्या परिश्रमांचा फायदा लोक घेत. वेळप्रसंगी दोन दोन रुपयांवर देखील त्यांच्याकडून गीतांना चाली लावून घेतल्या गेल्याचे मी ऐकले आहे. पवार थोडे शिष्ट असते, गर्विष्ठ असते, किमान पक्षी धूर्त आणि व्यवहारचतुर असते तरी हे असे झाले नसते. पण ते पवारांच्या रक्तातच नव्हते. आणि सिनेमाचे जे व्यावसायिक क्षेत्र त्यांच्या वाट्याला आले होते ते अत्यंत हृदयशून्य, नाना प्रकारच्या आर्थिक बंधनांनी व जबाबदाऱ्यांनी जखडले गेलेले, अनिश्चित, अमानुष असे होते. या व्यवसायात पवारांना चांगली माणसे भेटली नसतील असे नाही. त्यांच्या गुणांची कदर तर त्यांच्या कट्टया शत्रूलाही असलीच पाहिजे. निर्मितीच्या निर्भर आनंदाचे काही बिनमोल क्षणही याच व्यवसायाने त्यांना मिळवून दिले. तरीही, वसंत पवार या व्यक्तीची आणि स्वास्थ्यपूर्ण जीवनाची गाठ तशी कधी पडलीच नाही.

**गाण्यावर विलक्षण प्रेम :**

वसंत पवारांच्या बरोबर काम करण हा एक निखळ आनंदाचा, अविस्मरणीय असा अनुभव असे. समोर पेटी घेऊन ते एकदा बसले की प्राजक्ताचे झाड हलवल्यावर फुलांचा टपटप सडा पडावा तशा या माणसाला चाली सुचताहेतसे वाटे. ते जातिवंत रसिक होते. माडगूळकरांच्या अक्षरशः शेकडो गीतांना त्यांनी चाली लावल्या आहेत. त्या गीतांतले कितीतरी बारकावे, भावनेच्या सुक्ष्मतरल छटा, शब्दांतला गोडवा अतिशय हृद्यपणे पवार उकलून सांगत. गाण्यावर त्यांनी विलक्षण प्रेम केले होते. भिकाऱ्यांपासून तो नायकिणींपर्यंत अनेकांकडून त्यांनी चाली गोळा केल्या होत्या. त्यासाठी द्रव्य वेचले होते. पायपीट केली होती. कष्ट-फुलांसारखे झेलले होते. रक्त आटवले होते.

त्यानंतर जवळजवळ दोन तास पवारांनी एकट्याने मैफल गाजवली. ते गाणी म्हणत होते आणि आम्ही ऐकत होतो. त्या दिवशी त्यांनी कितीतरी लावण्या ऐकवल्या. होनाजीच्या, परशुरामाच्या, पठ्ठे बापूरावांच्या आणि अनेक अनामिक कलावंतांच्या. काही भजने ऐकवली. काही गणगौळणी सांगितल्या. त्यात पठ्ठे बापूरावांच्या त्यांनी सांगितलेल्या दोन ओळी मला अजून आठवतात–

झडकरि यावे सिध्द गणेशा
आतमधि कीर्तन, वरुन तमाशा

**कलावंताला जात नसते :**

वसंत पवार ख्रिस्ती असल्याचे मला ऐकून माहीत होते. पण कलावंताला जात कसली? भेदिक लावण्यांतले अध्यात्मिक बारकावे पट्टीच्या कीर्तनकाराप्रमाणे ते मला उकलून दाखवत होते. मधूनमधून चटकदार भाष्य करत होते. मी स्तिमित होऊन ऐकत राहिले. एव्हाना चाळीतली काही माणसे आमच्याकडे गोळा झाली होती. माझ्या खोलीत दाटीवाटीने बसली होती. आणि सारे जण भान हरपून ऐकत होते. पवारांच्या त्या अवस्थेतसुध्दा विलक्षण शुध्द, स्वच्छ शब्दोच्चार, आश्चर्य वाटेल असे अफाट पाठांतर आणि वाणीचा अप्रतिहत ओघ होता. मध्येच त्यांनी एक लावणी सुरु केली-

**समारोप :**

वसंत पवार मराठी चित्रपटसृष्टीत आले, एकामागून एक चित्रपटांना उत्तमोत्तम संगीत देत राहिले, एक वेडेवाकडे, उत्कट, बेहोष, बेहिशेबी, आकर्षक, कलंदर, केविलवाणे जीवन जगले आणि एके दिवशी अकाली त्या जीवनातून उठून चालते झाले. 'त्यांनी असे वागावयाला हवे होते' किंवा 'तसे वागावयाला नको होते' हे आपण कोण सांगणार? आणि आता त्या सांगण्याचा उपयोग तरी काय?

## ३.३ दुर्गाबाई भागवत

**दुर्गाबाई भागवत - परिचय**

मराठी साहित्यातील जेष्ठ लेखिका दुर्गा भागवत यांचा जन्म १० फेब्रुवारी, १९१० मध्ये मध्यप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांनी संशोधनपर, समीक्षात्मक, वैचारिक, लोकसाहित्य, कथा, चरित्र, संपादन, अनुवाद, बालसाहित्य, ललितगद्य असे विविधांगी लेखन केले. त्याच बरोबर समाजाचा आणि स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यास त्यांनी केला आहे. दुर्गा भागवतांचे मूळ गाव पंढरपूर होय. मात्र आजोबांनी त्यांच्या आईला दिलेल्या वाईट वागणुकीमुळे त्या पंढरपूर कायमचे सोडून मुंबईमध्ये स्थायिक झाल्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईतच झाले. हायस्कूल व त्यापुढील शिक्षण त्यांनी अहमदनगर, नाशिक, धारवाड व पुणे या ठिकाणी घेतले. 'अली बुद्धीस्ट ज्युरिसप्रूडन्स' या विषयात त्यांनी एम.ए. केले. विद्यार्थी दशेत असताना त्यांनी महात्मा गांधीच्या चळवळीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला होता. साहित्य व संशोधन हे कार्यक्षेत्र असणाऱ्या दुर्गाबाईंनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटच्या समाजशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख म्हणूनही दोन वर्षे कार्य केले. १९७५ साली कऱ्हाड येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षस्थान भूषविले. साहित्यातील अनेक नामांकित पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांचा मृत्यू ७ मे २००२ रोजी झाला.

'वडीलधारी माणसे' या व्यक्तिचित्र ललित लेख संग्रहात शांता शेळके यांनी सुप्रसिद्ध मराठी लेखिका दुर्गा भागवत यांचे व्यक्तिचित्रण रेखाटले आहे. स्वभावातच मूळ परखडपणा, फटकळपणा व स्पष्टवक्तेपणा असल्याने दुर्गाबाई त्यांच्या रागद्वेषाबद्दलच प्रसिद्ध होत्या. मात्र शांता शेळके यांचा अनुभव इतरांसारखा नव्हता. त्यांना ज्या दुर्गाबाई भेटल्या त्या अत्यंत प्रेमळ, मनमिळावू व मिश्कील स्वभावाच्या होत्या. त्यांचे वाचन अफाट व अप्रतिम होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनाला लोकजीवनातील विविधांगांचा स्पर्श झालेला दिसून येतो. सतत कार्यमग्न असणाऱ्या दुर्गाबाई एखाद्या व्यक्तीमधील आळशीपणावर विचार करण्यास भाग पाडणाऱ्या होत्या.

तसेच त्यांचा स्पष्टवक्तेपणाही लक्षात राहण्यासारखा आहे. एखाद्या नवोदित लेखकाच्या गुणांचे व त्यांच्या लेखनाच्या गुणांचे कौतुक केले असले तरी नंतरच्या काळात त्यांच्या लेखनातील दोष तितक्याच स्पष्टपणे त्यास सांगत. अशा या कार्यतत्पर, सौजन्यशील, स्पष्टवक्त्या दुर्गाबाईंचे व्यक्तिचित्र शांता शेळके यांनी त्यांच्या 'वडीलधारी माणसे' या ललित लेखसंग्रहात रेखाटले आहे.

**दुर्गाबाईंशी भेट**

मी तेव्हा आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' मध्ये काम करत होते. मामा वरेरकर जवळच राहात. त्यांच्याकडे मी अनेकदा जात असे. एके दिवशी दुपारी मामांकडे दुर्गाबाई आलेल्या असताना तिथे त्यांची आणि माझी प्रथम गाठ पडली. मामांनी आपल्या खास पध्दतीने त्यांच्याशी माझा परिचय करुन दिला. त्या पहिल्या भेटीतच दुर्गाबाईंची दोन वैशिष्ट्ये मला तीव्रतेने जाणवली. एक म्हणजे त्यांचा बोलण्याचा झपाटा आणि दुसरे म्हणजे त्यांचे स्वच्छ निर्मळ, एखाद्या अर्भकासारखे निरागस हसू. त्या पहिल्या परिचयानंतर दुर्गाबाई अधूनमधून, बऱ्याच दिवसांच्या अंतराने पण सातत्याने मला भेटत राहिल्या. मुंबईच्या विशिष्ट जीवनसरणीमुळे आणि माझ्यामागे असलेल्या त्या वेळच्या विविध व्यापांमुळे आवर्जून त्यांना भेटणे मला अशक्यच असे. मग कधीतरी दुर्गाबाई धूमकेतूसारख्या अचानक माझ्या दृष्टिपथात येत. कधी त्या 'सत्यकथे'च्या ऑफिसात भेटत. कधी त्या साहित्य संघातल्या साहित्यिकांच्या अनौपचारिक गप्पांमध्ये हजिरी देत असताना दिसत. कधी फोर्ट विभागात एशियाटिक लायब्ररीमधून संध्याकाळी दमून भागून घरी परतताना आढळत तर कधी चक्क तेव्हा आम्ही राहात होतो त्या दादरमध्येच कुणातरी आजारी व्यक्तीला त्या भेटायला आलेल्या सापडत. पण दुर्गाबाई कधीही भेटोत, कुठेही भेटोत, भेटीमधला खंडित झालेला झालेला धागा सहजपणे जुळवून घेऊन त्या लगेच गप्पा मारायला सुरुवात करत.

**चैत्यन्यशील व्यक्तीमत्व**

दुर्गाबाई भागवत याचे चैतन्यशील व्यक्तीमत्त्व होते. दुर्गाबाई म्हणजे माळरानावरचे वाहते वारे. त्या वाऱ्याचा अखंड वेग त्यांच्या अंगी असे तसेच त्यातले मोकळे सळसळते चैत्यन्यही त्यांच्या ठायी आढळून येई. ते वारे मनातली सारी जळमटे झाडून टाकी, आत साठलेला निराशेचा पालापाचोळा उडवून लावी आणि आपल्या निर्मळ स्पर्शाने वृत्ती उल्लासित, ताज्यातवान्या करी. सतत कार्यव्याप्त असलेल्या, हाती घेतलेल्या उद्योगात आकंठ बुडालेल्या, त्या विशिष्ट वेळी ज्ञानाचे जे नवे दर्शन झाले असेल त्याने अंतर्बाह्य थरारुन निघालेल्या दुर्गाबाई पाहिल्या की स्वतःच्या निष्क्रियतेची, आळशीपणाची लाज वाटायची, पण त्याबरोबरच त्यांच्या त्या उत्साहाने मीही तेवढ्या वेळापुरती का होईना, विलक्षण प्रभावित होऊन जायची. इतका स्फूर्तिदायक सहवास मला दुसऱ्या एकाच श्रेष्ठ साहित्यिकाचा वाटलेला आहे-भाऊसाहेब खांडेकर यांचा. दुर्गाबाई आणि भाऊसाहेब खांडेकर या उभयतांमध्ये मला नेहमीच कुठे तरी खूप साधर्म्य जाणवत आले आहे. आता वाटते, जीवनावद्दलचा अपार आशावाद आणि हाती घेतलेल्या कामावरची उदंड श्रध्दा हेच ते या दोघांमधले साधर्म्य असावे.

दादरला साहित्यिकांचे म्हणजे लेखिकांचे एक संमेलन भरवले. संमेलनाला कोल्हापूरच्या डॉ. सुमती क्षेत्रमाडे या अध्यक्ष म्हणून आल्या होत्या. कार्यक्रमाचा एकूण बाज चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाचा होता. नेहमीच्या प्रथेनुसार संमेलनात एक चर्चा आयोजित केली होती. चर्चेचा विषयही नेहमीचाच म्हणजे साहित्यातली वाढती अश्लीलता हा होता. कसे कोण

जाणे, पण या चर्चेत दुर्गाबाईंना सहभागी करुन घेण्यात आले होते आणि सहसा अशा कार्यक्रमांना न जाणाऱ्या दुर्गाबाई त्या दिवशी आवर्जून आल्या होत्या. आधीच्या काही वक्त्यांनी कथाकादंबऱ्यातल्या विशिष्ट उताऱ्यांचे वाचन करुन साहित्यात वाढत चाललेल्या अश्लीलतेचे दाखले दिले, त्यामुळे अंग शहारल्यासारखे दाखवले आणि एकंदरीत साहित्याच्या अन् पर्यायाने समाजाच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त केली.

### निर्भीड व्यक्तीमत्व

दुर्गाबाईंच्या निर्भीड वक्तृत्वाचा असाच आणखी एकदा मला अनुभव आलेला आहे त्या वेळी मी मुंबईच्या रुईया कॉलेजमध्ये लेक्चरर होते. मराठी विषयाच्या बी. ए. च्या अभ्यासमंडळासमोर व्याख्यान देण्यासाठी मी दुर्गाबाईंना बोलावले. आमंत्रण स्वीकारुन त्या आल्या. त्यांच्या भाषणाचा विषय काय होता ते आता मला आठवत नाही. पण भाषण चालू असताना विषयाच्या अनुषंगाने पुण्याच्या एका नामवंत दिवंगत साहित्यीकावर त्यांनी जे काही कोरडे ओढले, त्यांच्या लेखनातल्या गुळमुळीतपणावर, विसंगतीवर जी कठोर टीका केली ते सर्व ऐकून त्या लहानशा अभ्यासमंडळात एकदम विलक्षण ताण निर्माण झाला. साहित्यक्षेत्रातल्या सर्वच नामावंतांबद्दल आदर बाळगणाऱ्या, त्या क्षेत्रातल्या अनेक जटिल समस्यांशी नुकत्या कुठे परिचित होऊ लागलेल्या बी. ए. च्या विद्यार्थ्यांना अन् विद्यार्थिनींना हे एक विश्वरुपदर्शनच घडत होते. ती कोवळी, अपरिपक्व मुले इतकी भेदरुन गेली की भाषण आटोपून दुर्गाबाई खाली बसल्यानंतर चहाच्या वेळी नेहमीच्या पध्दतीनुसार त्यांच्याशी गप्पा मारण्याचा, त्यांना काही प्रश्न विचारण्याचा एकाही विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला धीर झाला नाही.

### ज्येष्ठ साहित्यीक

दुर्गाबाईंच्या साहित्यासंबंधी थोडक्यात काही सांगावे वा लिहिणे अवघड आहे. पण त्याचे काही ठळक विशेष वाचकाला जाणवतात. असा एक विशेष म्हणजे त्यातून प्रतीत होणारी कालातीतता. दुर्गाबाईंचे काही अपवादात्मक लेखन सोडले तर त्यांच्या बहुतेक सर्व लेखनाचे विषय सनातन स्वरुपाचे आहेत. मग ते ऋतुचक्र असो, डोंगरपर्वतनद्यांचे वर्णन असो, प्राणिसृष्टीतील रती किंवा वात्सल्य अशा भावनांचे चित्रण असो, किंवा भारतीय मनावर सतत आपला ठसा उमटवून राहिलेल्या आणि त्यामुळेच आपल्या सामूहिक जाणिवेत अमर होऊन बसलेल्या महाभारतातल्या भव्य व्यक्तिरेखांचे आलेखन असो. हे विषय काळाच्या विशिष्ट, परिमित तुकड्याशी संबंध असलेले नाहीत. भूत, वर्तमान, भविष्य या साऱ्यांतून अतूटपणे गोवल्या गेलेल्या जीवनाशी ते कायमचे निगडित झालेले आहेत. त्यामुळे या विषयांसंबंधीचे दुर्गाबाईंचे लेखन वाचताना वाचकालाही क्षणमात्र काळाच्या पकडीतून सुटल्यासारखे वाटते. भूत-वर्तमान-भविष्य या तिन्ही कालांतून एकदम सलगपणे संचार करत असल्याची विलक्षण अनुभूती त्याला येते. या कालातीततेने दुर्गाबाईंच्या लेखनाला एक वेगळे परिमाण प्राप्त करुन दिले आहे.

### वाचनाची आवड

दुर्गाबाईंनी अफाट वाचले आहे हे सांगायला नको. या त्यांच्या बहुविध वाचनातून धर्म, इतिहास, काव्य, तत्त्वज्ञान, लोकवाङ्मय इथपासून तो पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अनेक श्रेष्ठ विचारवंतांच्या वैचारिक साहित्यापर्यंत सारे काही येऊन गेले आहे. या साऱ्यांतून मानवी जीवनाचा जो ओघ अप्रतिहतपणे अनुस्यूत आहे त्याचे महत्त्व दुर्गाबाईंना फार वाटते. अशा व्यासंगी व्यक्तींची मने पुढे कुठे तरी एका साच्यात घट्ट बसून जातात. त्यांची मते, त्यांचे

ग्रहआग्रह पक्के होतात. त्यांच्यात एक 'झालेपणा'चा अभिनिवेश संचरतो. दुर्गाबाईच्या बाबतीत असे कधी घडले नाही. त्याचे कारण, त्यांच्यामधला अभ्यासू संशोधकावर मात करुन त्याच्यातली कविमनाची रसिकता, कोवळीक सतत टिकून राहिली आहे. म्हणूनच दुर्गाबाई जुन्यानव्या सर्व गोष्टीकडे ताजेपणाने, स्वागतशील दृष्टीने बघू शकतात. मग रेंदाळकरांसारख्या एखाद्या जुन्या, जरा दुय्यम ठरलेल्या आणि अपेक्षित राहिलेल्या कवीबद्दलची आपली आवड त्या नि:संकोचपणे बोलून दाखवतील. आणि 'वद जादुगारिणी तेव्हा घातलीस फुंकर कसली। ओसाड माळ हा सारा पुष्पांनी भरुनी गेला' यांसारख्या सहसा कुणाच्या ध्यानात न आलेल्या त्यांच्या सुंदर कवितापंक्तीवर मार्मिक भाष्य करुन रंदाळकरांच्या दुर्देवी जीवनात असलेले कवितेचे महत्त्व त्या आपल्या मनावर ठसवतील, तर कधी लेंभ्यांसारख्या पंडिती वळणाच्या कवीचाही 'भेडा नामक रम्य पर्वतचि हा ही नर्मदासुंदरी। रम्य स्थान असे दुजे न नयनी देखीयले भूवरी। चित्तानंदद धौत धौत गिरिच्या शृंगांवरोनी झरे। खाली धावत येउनी घुमविती श्रीशंभुची मंदिरे' असा श्लोक पाठ म्हणून दाखवून आपल्याला चकित करतील! ज्या श्रध्देने राजवाडे, डॉ. केतकर, राजारामशास्त्री भागवत अशा आदरणीय पूर्वसूरींबद्दल त्या बोलतील त्याच जिव्हाळ्याने एखाद्या नव्या बंडखोर लेखक-कवीचेही त्या कौतुक करतील.

**अष्टपैलू व्यक्तीमत्व :**

दुर्गाबाईंचे आणखी एक व्यक्तिमत्त्व अभे असते. त्यात थोडीशी स्त्री असते. थोडासा संशोधक असतो. थोडासा कवी असतो. त्यात थोडीशी स्त्री असते. थोडासा संशोधक असतो. थोडासा कवी असतो. आणि भिरभिरत्या चमकदार डोळ्यांनी, अखंड कुतूहलाने सारी सृष्टी निरखणारे, ती ह्रदयाशी कवटाळू बघणारे, उंचावलेल्या हातांचे एक लहानगे मूलही पण असते! या साऱ्यांचा एकरस रांधा जेव्हा दुर्गाबाईंच्या ठायी बेमालूम घडलेल्या प्रत्ययाला येतो तेव्हा मन चकित होऊन जाते आणि दुर्गाबाई आपल्याला बऱ्याचशा कळूनही पुन्हा आपल्या आकलनाच्या पलीकडेच राहिल्या आहेत असे वाटू लागते. या न कळणाऱ्या दुर्गाबाईंच्या मनाचा एखादा कोपरा त्यांच्या एखाद्या सूत्रबध्द वाक्यातून दिसला न दिसलासा वाटतो. उदाहरणार्थ, निसर्गाचे प्रेम आपल्या ठायी कसे निर्माण झाले हे सांगताना त्या म्हणून जातात, 'जे आपले असते ते असे आपल्याकडे चालत येते.' धर्माची व्याख्या करताना त्या पटकन सांगतात, 'कारुण्य जिवाला भिडले की धर्माचा उगम होतो.' श्रीकृष्णाच्या असीम रुपमोहिनीचे वर्णन करताना 'रसगंधाच्या गाभ्याला फुटलेला स्वरांचा लसलसता कोंभ' अशी विलक्षण सूचक प्रतिमा त्या वापरुन जातात तर द्रौपदीच्या वासनामय, सुंदर, अस्वथ व्यक्तिमत्त्वाचे चित्र रेखाटताना रक्ताने टच्च भरुन रसरशीत झालेल्या तिच्या लालबुंद टपोऱ्या नखांचा संदर्भ द्यायला त्या विसरत नाहीत.

**गाढे अभ्यासिका**

दुर्गाबाईंचा अभ्यास, त्यांचे संशोधन, त्यांचे ललित लेखन चालू आहे. त्यांची जात एकांड्या शिलेदाराची आहे. अभ्यासाचे विषय भूतभविष्याला पालाण घालणारे आहेत. आणि कार्य राजवाडे, डॉ. केतकर, राजारामशास्त्री भागवत अशा गाढ्या पण काहीशा एकारलेल्या विद्वानांशी नाते सांगणारे आहे. त्यामुळेच की काय, समकालीन राजकारण, वाङ्मयीन घटना, समाजकारण यांतल्या तात्कालिन प्रश्नांबाबत दुर्गाबाईंना फारसा रस नसतो. अवतीभवतीच्या प्रसिध्द व्यक्तींबद्दलच्या वदंता, कुचाळ्या, उठणाऱ्या गप्पा यांच्या विषयी त्यांना काडीमात्र कुतूहल नसते. राजकारणातल्या दैनंदिन घटकांचा कीस काढणे, अंदाज वर्तवणे, याची किंवा त्याची बाजू घेणे यात दुर्गाबाई कधी रमत असतील असे वाटत नाही. आणीबाणीच्या काळात लेखकांच्या स्वातंत्र्याच्या बाहून त्या ठाम उभ्या राहिल्या पण एरव्ही दुर्गाबाईंचे मन तात्कालिकापेक्षा

कालातीताशी अधिक दृढपणे जडलेले असते. याची साक्ष कधी कधी फार गमतीदा रीतीने पटते. एकदा बंगालचे सुप्रसिध्द नेते बाबू चित्तरंजन दास यांच्यावर आकाशवाणीसाठी एक भाषण दुर्गाबाईंना तयार करायचे होते. त्यावेळी त्यांच्या राजकीय कर्तृत्वावर बोलण्याऐवजी त्यांच्या 'सागरसंगीत' या काव्यग्रंथाबद्दल आणि त्यातून प्रकट होणाऱ्या त्यांच्या कविमनाबद्दल दुर्गाबाई बोलल्या. ही गोष्ट मला मोठी अर्थपूर्ण वाटते.

**समारोप**

दुर्गाबाई भागवत, ज्येष्ठ लेखिका, समाजशास्त्राच्या अभ्यासिका, विचारवंत स्त्रीवादी अभ्यासिका म्हणून परिचित आहेत. जीवनाच्या मार्गावरची ही चिरप्रवासिनी आयुष्यभर सतत चाललेलीच आहे. हा प्रवास अजूनही संपत नाही. वाटेचा शेवट अजूनही दृष्टिपथात येत नाही. कदाचित या वाटेला शेवटच नसेल. पण दुर्गाबाईंना ती भीती कधी भेडसावत असेल असे वाटत नाही. ज्या वाटेने त्या निघाल्या आहेत तिच्यावरचा प्रवास हा स्वतःच स्वतःचे सार्थक आहे. नुसत्या त्याचालण्यातही विलक्षण आनंद भरलेला आहे. या वाटेने जाताना दुर्गाबाई कधी थकत असतील. कधी त्यांचे पाय भरुन येत असतील. कधी अंगांगात शीण दाटत असेल. कधी 'पुरे झाले हे आता!' असा क्षणिक उद्वेगही मनाला जाणवत असेल. पण पुन्हा रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावरचे एखादे अनोखे गोजिरवाणे पाखरु शीळ घालते, एखादे रंगीत तृणपुष्प डोळे मिचकावून खुणावते, एखादे जुनाट पडके देऊळ साद देते, आणि समोरच्या क्षितिजावरची अनंतरंगी गंधर्वनगरी तर एकसारखीच पालवत राहते. मग दुर्गाबाई पुन्हा एकदा अंगातला शीण झटकून ताठ उभ्या राहतात आणि नव्या उत्साहाने चालायला लागतात. त्यांचा हा चिरप्रवास असाच सतत चालू राहावा.

## ३.४ हृदयनाथ मंगेशकर

**हृदयनाथ मंगेशकर - परिचय**

जेष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांचा जन्म २६ ऑक्टोबर, १९३७ रोजी झाला. त्यांचे वडील पंडीत दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्य कलावंत होते. हृदयनाथ म्हणजे बाळ या टोपण नावाने ते सुपरिचित आहेत. ते चार वर्षांचे असताना त्यांचे वडील गेले. मात्र लहानपणी वडीलांच्या तोंडून ऐकलेल्या चाली त्यांनी अजूनही आठवतात. अमीरखाँ साहेब यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. तसेच घरात ललादीदी, आशा, उषा, मीना या बहिणींचा आदर्श त्यांच्यासमोर होता. अशा गायिका असलेल्या बहिणींच्या संस्कारात त्यांची जडणघडण झाली होती. घरात नेहमी गाण्यांचा सराव करताना संगीत दिग्दर्शकांचे घरात येणे-जाणे, त्यांच्याशी होत असलेली चर्चा या सर्व वातावरणात हृदयनाथ 'बाळ' मोठे होत गेले. संगीताचा असा समृद्ध वारसा लाभलेल्या बाळ यांच्यातही ते गुण प्रभावीपणे दिसू लागले. त्यांचेही संगीतावर अतोनात प्रेम आहे. संगीत क्षेत्रात त्यांनी अनेक प्रयोग केले आणि ते सर्व प्रयोग यशस्वी ठरले. एक प्रयोगशील संगीत-दिग्दर्शक म्हणून त्यांनी प्रसिद्धी मिळविली.

शांता शेळके गीतकार व संगीतकार म्हणून हृदयनाथ मंगेशकर चित्रपट गाण्याच्या रेकॉर्डिंगमुळे त्यांचा परिचय झाला. म्हणजेच संगीत क्षेत्रात फारसे अनुभव नसलेल्या लेखिकेला या क्षेत्रात आनंददायीपणे काम करण्यास प्रेरणा हृदयनाथ यांच्याकडूनच मिळाली. एक सहकारी, मित्र म्हणूनही बाळ यांची शांता शेळके यांना नेहमीच साथ मिळाली. बाळ यांच्याकडून अनेक

गोष्टी लेखिका यांना शिकता आले. हृदयनाथांप्रमाणे मंगेशकर कुटुबीयांचा सहवासही लेखिका यांना लाभला होता. त्यामुळे मंगेशकर कुटुंबीयांना देखील त्यांना जवळून अनुभवता आले. एखादे गाणे तयार करत असताना सर्वांचा असलेला सहभाग, त्यांचा उत्साह, इतरांना प्रेरणा, प्रोत्साहन देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे कलेवर असणारी श्रद्धा, कलेबरोबर माणसांवर असणारे प्रेम, त्यांची आपुलकी या सर्व गोष्टींचा अनुभव लेखिकेने मंगेशकर भावंडांसोबत घेतला होता. बाळ यांच्याप्रमाणे त्यांच्या भावंडांकडूनही लेखिकेला प्रेरणा मिळाली होती. मंगेशकर भावंडांशी लेखिकेचे स्नेहाचे घरगुती संबंध निर्माण झाले होते. त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करताना ते काम कधी त्यांना काम वाटलेच नाही. उलट त्यांच्याबरोबर काम करणे हा मन उल्हासित करणारा अनुभव लेखिका घेत होत्या. 'वडीलधारी माणसे' या व्यक्तिचित्रसंग्रहात हृदयनाथ मंगेशकर यांच्या सहवासात शांता शेळके यांना त्यांचे भावलेले स्वभाव चित्र रेखाटले आहे.

**हृदयनाथ मंगेशकर यांच्याशी भेट :**

मंगेशकर कुटुंब त्या वेळी नाना चौकामध्ये नाना शंकरशेट यांच्या वाड्यात जळमजल्यावर राहात होते. चित्रपट दिग्दर्शक दिनकर पाटील यांचे बिऱ्हाड तिथेच माडीवर होते. दिनकरराव तेव्हा आपला 'रामराम पाव्हणं' हा चित्रपट काढणार होते. त्या चित्रपटाची गाणी लिहिण्यासाठी मी त्यांच्या घरी जात असे. लताबाई आणि त्यांची कुटुंबीय मंडळी तिथेच खाली राहतात हे मला माहीत होते. तेव्हा सुध्दा लताबाई फार कार्यव्यग्र असत. त्यातून वेळ काढून 'रामराम वाव्हणं' चे संगीत त्या देणार होत्या. पण मला त्या दिनकररावांच्या घरी एकदाच, आणि त्याही पाचदहा मिनिटांपुरत्याच भेटल्या. एरव्ही त्या कधी भेटल्या नाहीत. त्यांची धाकटी भावंडे अर्थातच तेव्हा फार छोटी असणार. मीना, आशा, उषा, हृदयनाथ ही मुले गावदेवीला असलेल्या शाळेत जात असत. हेही मला पुढे कळले. येवढी गोष्ट मात्र खरी की यांतले कुणी तरी आपल्याला निदान ओझरते दिसावे अशी मनातून फार उत्कंठा वाटत असतानाही त्या वेळी या भावंडापैकी कुणालाही बघण्याची संधी मला मिळाली नाही.

बाळाची आणि माझी पहिली भेट मोठ्या गमतीदार रीतीने झाली. ती मात्र मला स्पष्टपणे आठवते. ही भेट मुंबईच्या 'ईरॉस' थिएटरमध्ये झाली. मी तेव्हा फिल्म सेन्सॉर बोर्डावर होते आणि मंगेशकरांच्या 'सुरेल चित्र' ने काढलेला 'माणसाला पंख असतात' हा चित्रपट सेन्सॉर होण्यासाठी आमच्याकडे आला होता. त्या दिवशी चित्रपट बघणाऱ्या कमिटीवरील सदस्यांत मी होते. चित्रपट बघून झाल्यावर 'ईरॉस' थिएटरच्या वरच्या मजल्यावर मध्यभागी असलेल्या वर्तुळाकार गॅलरीच्या कठड्याला रेलून मी आणि बाळ बोलत होतो. ती त्यांची आणि माझी ओळख. मी बहुधा चित्रपटातल्या गाण्यांबद्दल बोलत असेन. गाणी खांडेकरांनी लिहिली होती. त्यांच्या चाली मीनाताईंनी दिल्या होत्या. त्यांतली 'ये जवळी घे' या गाण्याची चाल मला फार आवडली होती. बाळ तेव्हा फारसे बोलले नाहीत. माझ्या ध्यानात राहून गेला तो त्यांचा सावळा सडपातळ उंच बांधा, मोठाले डोळे, खास मंगेशकर वळणाची जिवणी आणि भोवती तळपत असलेले 'मंगेशकर' या नावाचे झगमगते वलय.

**मन मिळावू स्वभाव :**

हृदयनाथ मंगेशकर आणि त्यांचे सर्व भावंडे यांचा मनमिळावू स्वभाव मला भावला. चित्रपटाच्या, गाण्याच्या निमित्ताने त्यांचा संपर्क वाढत गेला. पुन्हा बरीच वर्षे गेली आणि एके दिवशी दादरच्या आमच्या बिऱ्हाडी बाळ अचानक आले. त्यांच्याबरोबर होते ग. रा. कामत. मंगेशकरांना 'सूनबाई' नामक चित्रपट काढायचा होता आणि त्याची गाणी मी लिहावीत अशी

त्यांची इच्छा होती. त्या दिवशीही बाळ फारसे बोलले नाहीत. बोलण्याचे सर्व काम ग. रा. कामत यांनीच केले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पेडर रोडवर असलेल्या 'प्रभुकुंज' मधल्या मंगेशकरांच्या निवासस्थानी मी जावे असे ठरले आणि चहा घेऊन बाळ व कामत निघून गेले.

'सूनबाई' चे संगीत सुप्रसिध्द बंगाली संगीत दिग्दर्शक सलिल चौधरी देणार होते. ते ऐकून मी मनातून घाबरुन गेले. मूळ बंगाली गाणी सलिलदा मला समजावून सांगणार होते, त्यांच्या चाली ऐकवणार होते आणि त्या चालींवर मला मराठी गाणी लिहायची होती. बंगालीचा मला गंध नव्हता. पण स्वतः लताबाई, सलिलदा आणि इतर मंगेशकर भावंडे यांनी मला प्रोत्साहन दिले. त्या वेळीच संगीत दिग्दर्शनात बाळना खूप सर आहे हे माझ्या ध्यानात आले. गाणी झाली. ती मी केली म्हणण्यापेक्षा सगळ्यांच्या सहकार्याने आणि उत्तेजनाने ते काम शेवटाला गेले असे म्हणणेच वस्तुस्थितीला अधिक धरुन होईल.

**आपुलकी जिव्हाळा स्वभाव :**

या चित्रपटाच्या काळात एक झाले. मंगेशकर कुटुंब मला अधिक जवळून बघायला मिळाले. त्यांच्या घरगुती अनौपचारिक वागण्याचा सुखद अनुभव आला. सुरुवातीला माझे काम संपले रे संपले की मी तिथून काढता पाय घ्यायची . पण पुढे तिथे थांबावेसे वाटू लागले. गप्पांत, कानांवर पडणाऱ्या गाण्यांत मन रमत गेले. मुख्य म्हणजे ही माणसेच इतकी लोभसवाणी होती की त्यांच्या संगतीत वेळ घालवताना मला आनंद होऊ लागला होता. ती एका प्रदीर्घ अशा जिव्हाळ्याच्या स्नेहाची सुरुवात होती. मात्र हे त्या वेळी माझ्या ध्यानी आले नाही.

'सूनबाई' चित्रपटानंतर हळूहळू आणखीही इतर चित्रपटांची गाणी मंगेशकरांबरोबर मी करत राहिले. त्या वेळी भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांना लताबाई 'आनंदघन' या नावाने संगीत देत होत्या. 'मोहित्यांची मंजुळा', 'साधी माणसे', 'मराठा तितुका मेळवावा', 'तांबडी माती' असे चित्रपट एकामागून एक होत होते. त्यांतल्या काही चित्रपटांत एक एक, दोन दोन गाणी मी लिहिली तर 'मराठा तितुका मेळवावा'आणि 'तांबडी माती' या चित्रपटांतली सगळीच्या सगळी गाणी लिहिण्याची संधी मला मिळाली. त्यांतला अपवाद दोन गाण्यांचा. 'मराठा तितुका मेळवावा' या चित्रपटातले 'अखेरचा हा तुला दंडवत', आणि 'तांबडी माती' मधले 'येग रामाच्या बानाचा'ही दोन गाणी बाबांनी - भालजी पेंढारकरांनी - लिहिली होती.

**मंगेशकर कुटुंबातील संगीत सहवास :**

तो फार आनंदाचा काळ होता. लताबाई चाली देत होत्या पण मीना, उषा, बाळ सगळीच भावंडे त्या कामात रमलेली होती. त्या निमित्ताने अनेक गोड चाली लताबाई तयार करत होत्या. अत्यंत सुरेल गळ्यांतून त्या तिथल्या तिथे गाइल्या जाताना मला ऐकायला मिळत होत्या. एखादे गाणे कसे तयार होते ते मी प्रत्यक्ष बघत होते. सगळ्यांना हौसेने, आवडीने, सहकार्याने काम चालले होते. गाण्यात इतके रमलेले आणि त्यासाठी होणारे कष्टही आनंदरुप मानणारे असे दुसरे कुटुंब तोवर मी कधी पाहिलेच नव्हते. तशी आधीही मी चित्रपटांसाठी गाणी लिहिली होती. त्यांत दत्ता डावजेकर, वसंत पवार, सुधीर फडके असे नामवंत आणि प्रतिभाशाली कलाकर संगीत दिग्दर्शक म्हणून मला लाभले होते. पण तरीदेखील तिथे बहुधा एकाच व्यक्तीबरोबर आणि त्याच्याच मार्गदर्शनाखाली मी गाणी लिहीत गेले. इथे मात्र घरातले सगळेच गाण्यामध्ये जाणकार आणि त्या विषयात मनःपूर्वक रस घेणारे होते. प्रत्येकाची गाण्यात गुंतवणूक जाणवायची. प्रत्येकाला काहीतरी नवीन आठवायचे. प्रत्येकाने काही तरी नवीन सुचवायचे.

**काव्य लेखांची प्रेरणा :**

'तांबडी माती' चित्रपटात 'अपर्णा तप करिते काननी' असे एक गाणे आहे. त्याची चाल लताबाईंनी आपल्या आजीच्या तोंडून ऐकलेल्या 'कुठे तुझे पंचपती दावि गे मला' या स्त्रीगीताच्या चालीची पुनर्रचना करुन बांधलेली आहे, तर त्याच चित्रपटामधले 'जा जा रानीच्या पाखरा जा रं माहेरा' हे गाणे असेच त्यांनी आपल्या बाळपणी खानदेखात आजोळी ऐकलेल्या 'मेरे छल्ले जो घूम गये ढूंढ जमादार' या हिंदी लोकगीताच्या चालीवर केले आहे. पण ही मूळ गाणी घरात सगळ्या भावंडांना पाठ होती. सगळेजण ती गाऊन दाखवीत. मग एका गाण्यावर कुणी थांबत नसे. एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे अशी गाणी सगळ्यांनी मनसोक्त गायची अन् मी ती ऐकायची. फार गंमत वाटे. 'मराठा तितुका मेळवावा' चित्रपटाची गाणी तर इतकी सहज आणि हसतखेळत होऊन गेली की आपण काही काम करतो आहोत असे मुळी मला वाटलेच नाही. लताबाईंनी अतिशय गोड चाली दिल्या होत्या हे तर झालेच, पण त्यांनी माझ्याकडून कामही फार चांगल्या रीतीने करुन घेतले. या वेळी बाळ सतत अवतीभोवती असायचे. या चित्रपटातले शेवटचे गाणे 'मराठी पाऊल पडते पढे' हे असून ते बरेच लांब आहे. त्यामध्ये रामदासांचा एक श्लोक हवा होता. पण गाण्यातल्या आशयाला अनुरुप असा नेमका श्लोक मला आठवेना. बाळ मिष्मिलपणे म्हणाले,

"शांताबाई, तुम्हीच एक श्लोक लिहा आता."

"मी ?" मी चकित होऊन विचारले.

"हो. भुजंगप्रयात वृत्तात लिहा. लोकांना तो रामदासांच्या रचनेसारखा साधारण वाटला म्हणजे झाले! बाळ म्हणाले.

आणि भुजंगप्रयात वृत्तात तो श्लोक मी लिहिला. 'मराठा तितुका मेळवावा' हे अगदी शुभलक्षणी चित्र होते. गीतरचना करताना इतका आनंदाचा आणि मन:प्रसन्नतेचा काळ तोवर मी फार क्वचित अनुभवला होता. गाणी करण्यापासून, चाली लावण्यापासून, गाणी बसवण्यापासून तो 'मेहबूब' स्टुडिओतल्या अखेरच्या ध्वनिमुद्रणापर्यंत सारा वेळ कसा गेला ते कळले देखील नाही. याच चित्रपटाची आणखी एक आठवण आहे. त्यात 'शूर आम्ही सरदार' असे एक गाणे आहे आणि ते गाणे बाळनी गाइले आहे. त्याची चाल चांगली आहे आणि घोडयांच्या टापांच्या आवााजाचा त्यात सुरेख अंर्तभव केलेला आहे. चाल अर्थात लताबाईंनी बांधली होती. पण बाळ रिहर्सल करत असताना त्यांच्या तोंडून गाणे अधिक चांगले वाटायचे. एकदा मी म्हटले,

"बाळ, ही चाल किती चांगली वाटते नाही ?"

"होय, चागलीच आहे. हा 'हंसध्वनी' राग आहे शांताबाई. आम्हाला तो फार आवडतो. तुम्ही दिदीचं ते गाणं ऐकलं नाही का ? 'जा तोसे नाही बोलू कन्हैय्या' ?"

"हो. ऐकलं आहे ना! तेही फार सुंदर गाणं आहे."

"तो राग 'हंसध्वनी'च." बाळ म्हणाले, "आणि ती चाल मूळ कोणत्या गाण्यावरुन घेतली आहे, माहीत आहे का ?"

**शास्त्रीय संगीताची जाण :**

मी शास्त्रीय संगीत या विषयात पूर्ण अडाणी. मला चाली, राग, ताल कशातलेच काही कळत नव्हते. मग बाळांनी मला मूळ गाणेही ऐकवले. 'वातापि गणपतीं भजेऽ हं' अशी ती संस्कृत रचना होती. बाळचे हे एक मोठे विलोभनीय स्वभाववैशिष्ट्य आहे. एका गाण्याच्या संदर्भात ते अनेक गाणी, शास्त्रीय चिजा ऐकवतील. त्यांचे राग, ताल समजावून सांगतील.

त्यांतल्या रचनेच्या खुब्या दाखवतील. अद्याप त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी गाणी लिहिली नव्हती. पण त्यांना संगीत दिग्दर्शनात रस आहे आणि त्या क्षेत्रात त्यांचा अधिकारही आहे हे माझ्यासारख्या अनभिज्ञ व्यक्तीलाही त्यांच्या तोंडून गाणी ऐकताना, त्याबद्दलची माहिती त्यांच्याकडून समजावून घेताना जाणवत होते.

हृदयनाथ मंगेशकरांचे (बाळच्या) संगीतशिक्षणाचे इतर तपशील मला कळू लागले. वडील गेले त्यावेळी बाळचे वय जेमतेम चार वर्षांचे असेल. पण त्या काळी दीनानाथांच्या तोंडून ऐकलेल्या चाली, चिजा त्यांना लख्ख आठवतात. अमीरखां साहेबांसारख्या श्रेष्ठ शास्त्रीय गायकाचा गंडा बांधून बाळनी त्यांच्याकडे अनेक वर्षे शस्त्रीय संगीताचे अध्ययन केलेले आहे. अमीरखां साहेबांविषयी त्यांच्या मनात निरतिशय प्रेमादर आहे. याखेरीज श्रवणभक्तीने तर त्यांनी किती अन् कोणकोणत्या प्रकारची गाणी ऐकलेली असतील याचा अंदाज करणे अवघड आहे. घरात दिदीच्या गाण्यांच्या रिहर्सलच्या निमित्ताने चित्रपटसृष्टीतलेही अनेक थोर दिग्दर्शक त्यांनी जवळून पाहिलेले ऐकलेले असणार. वडिलांकडून नाट्यसंगीत जसे परंपरेनेच रक्तात भिनले तसे उर्दू गझल सारखे ढंगदार संगीतप्रकारही अवगत झाले. गझल हा काव्यप्रकार बाळना उत्तम माहीत आहे इतकेच नाही तर मीर, दाग, गालिब, जौक यांसारखे थोर गझलकार त्यांनी मुळातून वाचून त्यांचा अर्थ समजावून घेतला आहे. त्यांचा अभ्यास केला आहे. याखेरीज पंजाबी, कानडी, गुजराती या भाषांतल्या चिजाही त्यांनी कितीदा तरी मला ऐकवल्या आहेत. हे सर्व तपशील अर्थात मला एकदम कळले असे नाही, पण बाळबरोबर गप्पा मारताना, त्यांच्या तोंडून गाणी ऐकताना या गोष्टींचा मला हळूहळू प्रत्यय येऊ लागला.

आणि अशातच कधी तरी 'जिवलगा' हे गाणे झाले. त्या आधी बाळनी हिज मास्टर्स व्हॉइससाठी गाणी केली होती. 'चांदणे शिंपीत जासी' हे त्यांचे गाणे आशताईने गाइले होते तर 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या' हे गाणे दिदीने गाइले होते. त्यांच्या या दोन्ही चाली लोकांना खूप आवडल्या होत्या. 'जिवलगा' हे, मला वाटते, मी बाळबरोबर केलेले पहिले गाणे. 'हूँ तो गयी' अशी दीनानाथांच्या तोंडून ऐकलेली एक मारवाडी चीज बाळच्या ध्यानात होती आणि त्या चिजेवर त्यांना गाणे करुन हवे होते. एकदा त्यांनी ती चीज मला ऐकवली आणि "या चिजेवर गाणे जमेल का?" म्हणून विचारले. खरे तर त्या चिजेवर बाळनी दुसऱ्या एका गीतकाराकडून आधी गाणे लिहून घेतले होते पण त्यांना स्वतःला ते विशेष आवडले नव्हते. म्हणून त्यांनी मला पुन्हा गाणे लिहिण्याची सूचना केली. मला मोठे अवघड वाटले. मी बाळना म्हटले,

"त्या पहिल्या गीतकारांना राग नाही का यायचा?"

बाळ हसून म्हणाले, "ते रागावणार नाहीत, त्यांना तुमचं नावही मी सांगितलंय!"

आणि मी गाणे लिहिले. 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे' असे ते गाणे तयार झाले. गीताची अस्ताई आणि अंतरे चालीच्या हिशेबाने रचनेला तसे कठीण नव्हते. ते लिहून झाले. पण 'हूं तो गयी' या सुरुवातीच्या वजनालाच मला शब्द सुचेना. काम अडले. अडले म्हणजे चांगलेच अडले. शेवटी बाळ म्हणाले-

"शांताबाई, एक सुचवू का? इथं 'जिवलगा' हा शब्द कसा वाटेल?"

**संगीतकार हृदयनाथ मंगेशकर :**

मला तो शब्द एकदम आवडला. त्या एका शब्दाने पुढच्या सगळ्या गाण्याला एक वेगळे अर्थपरिमाण, एक वेगळा उठाव मिळाला. गाणे आशताईने गाईले. बाळबरोबर केलेली माझी ती पहिलीच गीतरचना. ती लोकांना फार आवडली. या गाण्याचा राग 'श्रीगौरी' असल्याचे बाळनी

मला सांगितले. गाण्यात त्यांनी थोडी सरगम टाकली आहे तीही सर्वांच्या पसंतीला उतरली. हे गाणे बसत होते तेव्हा एक गोष्ट मला जाणवली. बाळच्या चाली अवघड असतात. तशा काही अगदी सोप्या आणि गोड चालीही त्यांनी बांधल्या आहेत. नाही असे नाही. पण एकूण स्वररचना अवघड, चटकन आकलन न होणारी आणि अतिशय रससिध्द व समर्थ गळयांनाच पेलणारी. या संदर्भात खूप नंतरच्या काळातली एक गोष्ट मला आठवते. आरती प्रभू यांच्या 'गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे' या गाण्याचे ध्वनिमुद्रण हिज मास्टर्स व्हॉइसच्या स्टुडिओत चालले होते. संगीत दिग्दर्शन बाळचे होते आणि गायिका होत्या आशाताई. मी त्या वेळी स्टुडिओत होते. आरती प्रभूंच्या गाण्यात एक ओळ होती, 'आलो होतो तुझ्याकडे काही श्वासांसाठी फक्त' त्या ओळीची रिहर्सल करताना आशाताई विनोदाने म्हणाल्या,

"आमच्या बाळच्या गळ्यातून काढताना हीच ओळ त्याला सांगावीशी वाटते. अशा अवघड चाली करतो की गाणारांना म्हणायची वेळ येते, 'आले होते तुझ्याकडे दोन श्वासांसाठी फक्त'. बाबा, जरा श्वास घ्यायला थोडा अवकाश ठेव!"

**अपारकष्ट करण्याची वृत्ती :**

बाळच्या संगीत दिग्दर्शनाखाली मी एका चित्रपटाची गाणी लिहिली. चित्रपटाचे नाव 'पवनाकाठचा धोंडी.' एव्हाना बाळची काम करण्याची पध्दत मला थोडीफार माहित झाली होती. 'प्रभुकुंज' मधल्या त्यांच्या घरी जेवण्याच्या खोलीला लागून आणखी एक लहानशी खोली आहे. ती संगीताची, स्वररचनेची, रिहर्सलची, रियाज करण्याची, तालीम देण्याची, थोडक्यात ती बाळची खोली. तिथे बसून दिदी, उषाताई अनेकदा रिहर्सल करतात. बाळ पेटीवर चाल वाजवून दाखवत आहेत, आणि दिदी गात आहेत किंवा उषाताई गात आहेत असे दृश्य कितीदा तरी पाहिलेले डोळ्यांसमोर येते. माझी बाळबरोबरची बहुतेक गाणी मी त्याच खोलीत बसून केली. चित्रपटांची गाणी, ध्वनिमुद्रिकांसाठी केलेली गाणी, कोळीगीते, गणपतीची गाणी तिथेच झाली. माई, मीनाताई, उषाताई, मुले अधूनमधून डोकावत आहेत, बाळचे कुणी शिष्य तिथे तालीम घेत आहेत, तासातासाने चहा येत आहे, मध्येच कुणी मित्रमंडळी आली तर काम बाजूला राहून गप्पा आणि हास्यविनोद चालत आहे असे त्या खोलीत घालवलेले आनंदाचे तासन्तास आठवतात. बाळच्या त्या खोलीत अनूप जलोटांच्या तोंडून मी दोन गझल ऐकले होते. त्यांची पुढे पत्नी झालेली सोनाली सेठ ही बाळची शिष्या. ती नियमाने येऊन बाळकडे गाणे शिकत असे. आपल्या अनेक गीतांच्या स्वररचना बाळनी तिथेच केल्या. गालिब, मीरा, ज्ञानेश्वर यांच्या गीतांना तिथेच चाली लावल्या. आणि त्या तयार होत असता बाळच्या तोंडून मनसोक्त ऐकायलाही मिळाल्या.

**संगीत परंपरेचा वारसा :**

बाळ यांना त्यांच्या वडीलांकडून संगीताचा वारसा लाभला होता. कधी लहर आली तर हातचे काम बाजूला ठेवून बाळ म्हणायचे, "थांबा. एक वेगळी सुरेख चीज आठवली आहे. गावीशी वाटते. ऐका." आणि मग ते ती चीज गाऊन दाखवत. भोवताली जमलेली मुडळी तल्लीन होऊन गाणे ऐकत राहात. त्या खोलीतल्या वातावरणातील अणूअणूने अशी किती गाणी ऐकली असतील. स्वतःमध्ये सामावून घेतली असतील. खोलीतले वातावरण फार छान आहे. दारातून आत पाऊल टाकताच समोर भिंतीवर विवेकानंदांचा फोटो दिसतो. मीरेचा छोटा पुतळा नजरेत भरतो. डाव्या हाताच्या भिंतीला टेकून ठेवलेले बाबांचे दीनानाथांचे-तंबोरे, उजवीकडे भिंतीला लावलेल्या छोट्या अलमारीत बाळच्या आवडीच्या निवडक काव्यग्रंथाचा छोटा संग्रह, त्यांच भिंतीवर बाबांचा सुंदर फोटो आणि तिथे गालिच्यावर पुढ्यात पेटी घेऊन बसलेले बाळ.

साथीला त्यांचे अनेक वर्षांचे तबल्यावरील सहकारी आणि जिवलग मित्र रमाकांत नायडू. चहा मधून मधून हवाच. लहर लागली, कामान मन छान रंगले तर ती रंगत वाढवण्यासाठी पान. अशा त्या ठिकाणी बसून ऐकलेली किती गाणी, मारलेल्या गप्पा आणि केलेल काम मला आठवते. ते सूर, तो हास्याविनोद मनात जागा होतो आणि आता ते दिवस गेले म्हणून हुरहूरही वाटते.

'पवनाकाठचा धोंडी' या चित्रपटासाठी बाळनी एक सुंदर चाल काढून ती मला दिली. मीराबाईच्या एका गाण्याची ती चाल होती. गाण्याचे शब्द होते, 'सावरे मैं तो जागी सारे सारे सोये' चाल फार गोड होती. चित्रपटातल्या एका भूपाळीसाठी त्या चालीवर गाणे लिहायचे होते. खरे तर आता चालीवर गाणी लिहिण्याचा थोडाबहुत सराव मला झाला होता. पण काय असेल त असो, या विशिष्ट चालीवर चांगले शब्द मला टाकताच येईनात. चार पाच दिवस मी त्या चालीशी खूप झटापट केली आणि शेवटी हे काम आपल्या हातून होणार नाही या निर्णयावर आले. बाळना मी तसे सांगितले. ते हसले आणि म्हणाले,

"ठीक आहे. तुम्हाला सुचेल तसं गाणं तुम्ही लिहा. मी चाल देईन."

"पण बाळ," मी म्हटले, "चाल फार गोड आहे हो. तिचा मोह सुटत नाही."

बाळ पुन्हा हसू लागले. मग ते म्हणाले,

"आपण असं करु. तुम्ही पाहिजे त्या वजनाचं गाणं लिहा. मी ती मूळची चाल त्या गाण्यात जरा फेरफार करुन बरोबर वापरीन. ठीक आहे?"

हा वेळपावेतो मंगेशकर मंडळींशी माझे चांगले स्नेहाचे, घरगुती संबंध निर्माण झाले होते. त्यामुळेच त्यांच्याकडचे काम मला कधी काम वाटले नाही, किंवा त्याचे कधी माझ्यावर दडपणही आले नाही. उलट तिथले काम हा एक मन उल्हासित करणारा असा अनुभव वाटायचा. माझा संकोच हलके हलके मावळला. मी गप्पांत, हसण्याबोलण्यात, थट्टाविनोदात सामील होऊ लागले. आणि मग या घराची अपल्याला अधिक जवळून ओळख होत आहे, घराचे आणि अर्थात घरातल्या मंडळींचेही स्वभावविशेष, त्यांचे आदर्श आपल्याला जाणवत आहेत असे माझ्या निदर्शनाला येऊ लागले.

**संगीत एक दैवत :**

संगीत हे या घरातले आद्य दैवत. दुसरे दैवत श्रीमंगेश. तिसरे दैवत बाबादीनानाथ. ती सर्व मुलांना स्फूर्ती देणारी अदृश्य पण चैतन्यमय शक्ती. मात्र या घरात नुसते गाणे नव्हते. इथे साहित्यप्रेम, कलाप्रेम होते. चित्रपटसृष्टीतल्या थोर कलावंतांपेक्षाही इथे साहित्यिकांची, कवींची जास्त कदर केली जाई. गो. नी. दांडेकर, बाबासाहेब पुरंदरे हे जिव्हाळ्याचे कौटुंबिक स्नेही होते. त्यांच्या भेटी इथे वारंवार व्हायच्या. शंकर वैद्य येत. हिंदीतले प्रसिध्द गीतकार मजरुह सुलतानपुरी हे एक असेच जवळचे मित्र. मजरुह साहेब तिथे भेटायचे. पंडित नरेंद्र शर्मा हे आणखी एक आदरणीय व प्रिय स्नेही. मुले त्यांना 'पपाजी' म्हणत. या घरांतल्या माणसांना साहित्याची आवड होती. काव्याची चांगली जाण आणि अनोनात गोडी होती. शिवाजी महाराज, समर्थ रामदास, राम गणेश गडकरी, स्वातंत्र्यवीर सावरकर, भाऊसाहेब खांडेकर यांच्याविषयी सर्व मंगेशकर भावंडांना प्रेम आणि आदर वाटे. सावरकर, खांडेकर यांच्याशी लताबाईंचा बालवयापासून संपर्क आलेला. कोल्हापूर येथील निवासामुळे विनायकांच्या 'प्रफुल्ल' कंपनीशी संबंधित असलेले खांडेकर घरातल्या वडिलधाऱ्या माणसांप्रमाणेच या मुलांना जवळचे वाटत. एकदा आजारात खांडेकर या घरातच पंधरावीस दिवस मुक्कामाला येऊन राहिले होते. सावरकरांचा उल्लेख लताबाई जिव्हाळ्याने 'तात्या' असा करत तर खांडेकरांना त्या 'भाऊ'

munotes.in

म्हणून संबोधत. शिवाजी महाराजांबद्दल अनन्यसाधारण भक्तिभाव, कडवी हिंदुत्वनिष्टा, उत्कट देशप्रीती ही या भावंडांची आणखी उल्लेखनीय वैशिष्ट्ये. हळूहळू मला जाणवू लागले की साहित्याची आणि काव्याची आवड हाही मला या घराशी जोडणारा एक दुवा आहे. गडकरी माझे, माझ्या पिढीचे आवडते दैवत. लताबाईंना आणि त्यांच्या सर्व भावंडांना गडकऱ्यांची काव्यनाटके तोंडपाठ. 'पुण्यप्रभाव,' 'राजसंन्यास,' 'भावबंधन' या नाटकांतले अनेक संवाद, कोट्या साऱ्यांच्या जिभेवर खेळत. त्याला माई-लताबाईंच्या आईदेखील अपवाद नव्हत्या. जबर पाठांतर, सूक्ष्म व चोखंदळ रसिकता, मार्मिक विनोदबुध्दी हे गुण सर्वांच्याच ठायी कमी अधिक प्रमाणात होते. मुख्य म्हणजे गाण्याइतकेच गप्पा मारणे, भरपूर हसणेही साऱ्यांना प्रिय. अशा या हसत्याखेळत्या, प्रसन्न, विनोदप्रेमी आणि संगीताने भारलेल्या घरात माझा जीव कधी आणि कसा गुंतत गेला ते माझे मलाही उमगले नाही.

**साहित्यावरील प्रेम :**

या साऱ्यांत साहित्यप्रेम हे बाळच्या आणि माझ्या स्नेहाला एक विशेष कारण ठरले. बाळची अभिरुची नव्याकडे झुकणारी आणि स्वागतशील आहे असा मला प्रत्यय येऊ लागला. वाचनाची आवड घरात तशी साऱ्यांनाच होती. पण त्याबद्दलची निश्चित मते, आग्रह, त्याबद्दल चर्चा करण्याचे औत्सुक्य बाळमध्ये अधिक प्रमाणात होते. मराठी साहित्यातले नवे समर्थ लेखक, नवे प्रवाह, त्यात होणारे नवनवे प्रयोग याविषयी एक निकोप आणि सुजाण कुतूहल त्यांच्या ठायी आढळून येई. काव्याची बाळना विलक्षण ओढ होती. हिंदी आणि उर्दू कवी त्यांनी बरेच आणि सूक्ष्म जाणकारीने वाचलेले असावेत असे त्यांच्या बोलण्यावरुन वाटायचे. मराठीच्या संदर्भात सांगायचे तर केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवींपासून तो समकालीन करंदीकर, सुर्वे, ग्रेस, महानोर, आरती प्रभूंपर्यंत त्यांचे काव्याचे वाचन चौफेर होते. एकूण मराठी साहित्यातले नवे चैतन्यप्रवाह ते उत्कट कुतूहलाने न्याहाळत होते. बाळचे वाचनही खूप असे. 'मौज,' 'मॅजेस्टिक' यांच्या गिरगावातल्या ऑफिसांत ते अधूनमधून फेरी मारत आणि अनेक नवी पुस्तके खरेदी करुन घेऊन येत. जी. ए. कुलकर्णी, तेंडुलकर, दळवी, पानवलकर हे त्या काळात गाजत असलेले लेखक. त्यांचे साहित्य बाळ प्रयत्नपूर्वक मिळवून वाचत. आरती प्रभू हे त्यांना कवी म्हणून फार प्रिय होते तसा चिं. त्र्यं. खानोलकर हा नाटककार, कादंबरीकार म्हणून कुतूहलाचा आणि चिंतनाचा विषय होता. यामुळे बाळबरोबर होणाऱ्या गप्पा जास्तीत जास्त साहित्याविषयीच असत. काही नवे, चांगले वाचनात आले तर त्याबद्दल भरभरुन बोलायची मला आवड आहे. बाळनाही ती हौस होती. तेव्हा मी घरी गेले आणि बाळ भेटले तर लगेच आपण नवे काय वाचले ते ते सांगत. त्यावर चर्चा करत. आवडीनिवडी, अनुकूल प्रतिकूल मते आग्रहाने व्यक्त करत.

असे वाङ्मयीन संदर्भांनी रंजक झालेले बाळबरोबरचे किती तरी संवाद मला आठवतात. गडकरी हे आमचे दोघांचेही दैवत. 'राजसंन्यास' मधली दीनानाथांनी गाइलेली गीते माझ्या आग्रहावरुन बाळनी मला गाऊन दाखवावीत. गडकऱ्यांचे अनेक विनोद एकमेकांना सांगत आम्ही त्यांतली गंमत पुन्हा पुन्हा अनुभवत असू. गो. नी. दांडेकर यांची शिवशाहीवरील कादंबरीमाला त्या सुमाराला प्रकाशित होत होती. बाळना त्यातली 'झुंजारमाची' कादंबरी फार आवडली. मी ती वाचलेली नव्हती. बाळनी मला ती दिली. आवर्जून वाचायला सांगितली. 'अजगर' ही खानोलकरांची कादंबरी प्रसिध्द झाली. तिच्यात असलेल्या विशिष्ट प्रसंगाबद्दल, वर्णनांबद्दल तिच्यावर टीकेची झोड उठली. त्या टीकेने बाळ अस्वस्थ झाले. एकदा त्या कादंबरीविषयी ते माझ्याशी खूप वेळ बोलले. मग म्हणाले,

असे आपण वाचलेल्या साहित्याबद्दल बाळ सतत बोलत. ती  त्यांची फार मोठी मानसिक गरज व भूक असे. जी. एं. च्या  कथा त्यांनी अगदी सुरुवातीपासून वाचल्या होत्या. त्यावर ते मार्मिक भाष्य करत. जुने कवी, लेखक त्यांच्या आवडीचे होते, पण  नवे लेखक. कवी, नाटककार, साहित्यातले नवीन अविष्कार याविषयी त्यांना फार जिव्हाळा वाटे. तसाच वाङमयातील नवनव्या घटनांबद्दलही त्यांना उमाळा असे. मुख्य म्हणजे श्लीलअश्लीलतेच्या सांकेतिक कल्पना, पारंपरिक कर्मठ नैतिकता यांना सहज बाजूला सारुन, अतिशय निर्मळ, सहानुभूतिपूर्ण  दृष्टिकोन बाळगून नव्या साहित्याशी ते सहज समरस होत.

**नाविण्याची ओढ :**

बाळबरोबर मी खूपच काम केले. आम्ही सगळेच तेव्हा नव्या  कल्पनांनी, नव्या ओढीने, नव्या उत्साहाने भारुवून गेलो होतो. त्या वेळी मी जी गाणी केली त्यांत त्या साऱ्यांचे प्रतिबिंब उमटले आहे असे मला वाटते. बाळमधल्या  कलावंताच्या सृजनशक्तीला तेव्हा बहर आला होता. त्याच सुमाराला त्यांनी 'ही वाट दुर जाते' 'जाईन विचारित रानफुला,' 'हे श्यमसुंदर मनमोहना' ही माझी गाणी स्वरबध्द केली. त्यांपैकी पहिली दोन गीते तर कविता म्हणूनच 'सत्यकथे'त आली होती. बाळनी त्या कविता वाचल्या होत्या. ते मला म्हणाले,

"शांताबाई, ही गीतेच आहेत. मी त्यांना चाली लावतो." 'ही वाट दूर जाते' ही गझलच्या वजनात लिहिलेली कविता आहे. बाळनी तिला चाल लावली आणि ती मला ऐकवली. मी बुचकळ्यात पडले. खरे म्हणजे ती चाल मला आवडलीच नाही. कळली नाही असे म्हणावे हवे तर. मी चाचरत बाळना तसे सांगितलेही. पण आपल्या स्वररचनेबद्दल ते मात्र निःशंक होते. जरा हसून ते मला म्हणाले,

"चाल चांगली आहे. लोकांना आवडेल तुम्ही बघा."

एके दिवशी अचानक मला साक्षात्कार झाला. चाल खरोखर चांगली आहे. बाळच्या अनेक चालींबद्दलचा हा माझा अनुभव आहे. सुरुवातीला त्या ऐकणाराला जरा विचकवतात. आपण  नेहमी जे ऐकतो त्यापेक्षा हे काही वेगळेच आहे असे वाटते. अनेकदा तर त्या चाली आधी आवडतच नाहीत. पण मग त्या हलके हलके मनात मुरायला लागतात. गुप्त लिपीतली अक्षरे प्रकट व्हावीत तशा अंतरंगात उमटतात आणि मग आपली इतकी पकड घेतात की सोडतच नाहीत. बाळनी केलेल्या स्वररचना अवघड असतात असे बऱ्याच जणांचे  मत आहे. पण मला वाटते, अवघडपणापेक्षा त्या चालीत आणखी काहीतरी असते. या स्वररचनांना आपणही सामोरे जावे लागते. पूर्वग्रहरहित दृष्टीने  त्यांच्याकडे बघावे लागते. त्या रचना आपल्याकडून  काही प्रतिसाद मागत असतात, आणि तो प्रतिसाद आपण देऊ शकलो नाही तर त्या  आपल्याला भिडत नाहीत. आपल्याशी जवळीक साधत नाहीत. मला वाटते  हे बाळच्या प्रतिभेचे वैशिष्ट्य आहे. मन दचकवून सोडणारी अनपेक्षितता, साहसी प्रयोगशीलता, नव्या वाटावळणांनी जाणे, पूर्वी कधी न गेलेल्या ठिकाणी आपणाला नेऊन सोडणे आणि तिथले अदृष्टपूर्व सौंदर्य दाखवणे हे बाळच्या स्वररचनांचे वेगळेपण आहे, तेच त्यांचे सामर्थ्यही आहे. म्हणूनच बाळच्या चालींबद्दल तीव्र प्रतिक्रिया होताना दिसतात. त्यांच्या काही चालींना अपरंपार लोकप्रियता लाभली तर काही चाली लोकांना अजिबात आवडल्या नाहीत. बाळच्या काही स्वररचना सुरुवातीला लोकांपर्यंत पोहोचल्या नाहीत. पण कालांतराने लोकांना त्या उमगल्या. सांकेतिकता, परंपरेने मळलेल्या वाटा सोडून जो कलावंत काही नवे, वेगळे करु बघत असतो त्याच्या वाट्याला हे येतच असते.  ठरीव वाटेने जाणाऱ्या कलाकाराला यश मिळते. पण ते माफक, कांबट, मचूळ  असते. नवे साहस

करणाराला, स्वतःला बेधडक झोकून देणाऱ्याला नेहमीच धोके पत्करावे लागतात. मग कधी मोठे यश लाभते तर कधी मोठे अपयशही पदरात पडते. बाळना स्वतःला हे कळत नसेल असे थोडेच आहे! त्यांच्या काही चाली बिघडल्या आहेत, काही फसल्या आहेत हे ते स्वतःही मान्य करतील. पण अशी अपयशे ध्यानात घेऊनही बाळ हा गांभीर्याने, उत्कटतेने स्वररचनेकडे बघणारा एक कलावंत आहे याबद्दल दुमत होऊ नये. बाळच्या चालींमागे शास्त्रोपासना, सखोल सांगीतिक ज्ञान आहे, व्यासंग, परिश्रमशीलता आहे तशी विचारांची ठाम आणि पक्की बैठकही आहे. कुणी मनःपूर्वक ऐकणारा असेल तर त्याच्याशी मोकळेपणाने चर्चा करण्याची, आपली भूमिका त्याला समजावून सांगण्याची बाळची सिध्दता असते. पाडगावकरांची 'जिप्सी' ही कविता बाळना फार आवडते, त्याचप्रमाणे केशवसुतांच्या 'झपूर्झा' या कवितेच्या पुढील ओळीही ते वारंवार म्हणून दाखवतात-

नांगरल्याविण भुई बरी
असे कितीतरि
पण शेतकरी
सनदी तेथे कोण वदा
हजारांतुनी एखादा....

मला वाटते, बाळची ही आवड सूचक आहे. त्यातून त्यांची कलाविषयक भूमिका स्पष्ट होते. बाळमध्ये जो संगीतकार आहे तो असा 'आपणच घडलेले आपणच मोडू बघणारा' भटक्या जिप्सी आहे आणि न नांगरलेली भुई नांगरणारा, तिथून नवनवी समृध्द पिके काढू बघणारा 'हजारांतला एखादा' सनदी शेतकरीही आहे.

**प्रयोगशील संगीतकार :**

बाळ हे प्रयोगशील संगीतकार आहेत. आतापर्यंत त्यांनी ज्या गीतरचना स्वरबध्द केल्या त्यांतली विविधता पाहिली तरी बाळच्या कलात्मक साहसी वृत्तीचा प्रत्यय येतो. कोळीगीतांची मूळ कल्पना बाळची. बंगालमध्ये खांद्यावरुन पालखी वाहून नेणारे भोई असतात ते 'पालखी चोले पालखी चोले' सारखी तालबध्द गीते गाऊन त्या तालावर पावले टाकतात. त्यामुळे खांदयावरचे ओझे त्यांना सुसह्य वाटते. या गीतांच्या पध्दतीने समुद्रावरील लाटांच्या हेलकाव्याशी लय व ताल साधणारी कोळीगीते करुन बघावीत असे प्रथम बाळच्या मनात आले. त्या कल्पनेचे मूर्त स्वरुप म्हणजे कोळीगीते. त्या गीतांचे सगळे यश बाळचे, त्यांच्या स्वररचनांचे आहे. गीतांत 'दर्या', 'लाटा' या शब्दांची अर्थपूर्ण पुनरुक्ती करावी ही कल्पनाही त्यांचीच. कोळीगीते हा एक प्रयोग होता. पण तो अतिशय यशस्वी ठरला. संस्कृत भगवद्गीतेचे दोन अध्याय स्वरबध्द करावेत असे लताबाईंच्या मनात आले. बाळनी परिश्रमपूर्वक चाली बसवल्या. आता अनुष्टुभ् छंदाला चाल लावावी की नाही, मुळात गीताच स्वरबद्ध करावी की नाही हा वादाचा विषय होऊ शकेल- नव्हे, तसा तो झालाही. पण हा एक अभिनव प्रयोग होता हे कुणाला नाकारता येणार नाही. ज्ञानदेवांच्या विराण्या निवडून बाळनी त्यांना चाली लावल्या आणि लताबाईंनी त्या गाइल्या तेव्हा ज्ञानदेवांनी इतकी उत्कृष्ट गीते लिहिली आहेत हे नव्या पिढीतल्या कित्यंकांना प्रथमच कळले.गालिबचे गझल बाळनी स्वरबध्द केले तेव्हा माझ्यासारख्या अनेकांनी त्या गझलांचा अर्थ साक्षेपाने समजावून घेतला आणि स्वरांच्या आनंदाबरोबर काव्याचा आनंदही अनुभवला. एरव्ही मराठी जाणणाऱ्या किती लोकांना गालिब कळलेला असेल? मीरेच्या गीतांचया दोन्ही ध्वनिमुद्रिका बाळच्या कल्पकतेची, व्यासंगाची, रसिकतेची, आणि स्वररचनासामर्थ्याची साक्ष पटवतात. विशेषतः 'चाला वाही देस' या ध्वनिमुद्रिकेमध्ये मीरेच्या जीवनप्रवासाची म्हणून

स्वतःची जी एक कल्पना बाळनी मांडलेली आहे, तिला अनुसरुन गीतांची जी संगती लावली आहे ती मन अंतर्मुख करणारी आहे. 'शिवकल्याण राजा' असो, 'आजोळची गाणी' असोत, 'आदिनाथची गाणी' असोत किंवा 'जैत रे जैत' चित्रपटातील 'मी रात टाकली', 'जांभुळपिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजं जी' सारखी गाणी असोत, बाळनी किती विविध प्रकारच्या स्वररचना केल्या आहेत, किती वेगवेगळी कलात्मक आव्हाने स्वीकारली आहेत हे बघून मन स्तिमित झाल्याविना राहत नाही.

**मनमिळावू, कष्टाळूपणा :**

सार्‍याच मंगेशकर भावंडांत कलेवरील अव्यभिचारी निष्ठेबरोबर कष्टाळूपणा, जिद्द आणि चिकाटी आहे. हे गुण बाळमध्येही आढळून येतात. चाली बसवताना ते खूप कष्ट घेतातच. पण संगीत दिग्दर्शक म्हणून स्टूडिओत गाणी ध्वनिमुद्रित करताना पुन्हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचे एक वेगळेच दर्शन घडते. माझी तर अनेक गाणी त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली ध्वनिमुद्रित होताना मी ऐकली, पण त्यांच्या इतरही अनेक ध्वनिमुद्रणाच्या वेळी मी स्टुडिओत हजर राहिले आहे. एरव्ही गप्पांत, थट्टामस्करीत, हसण्याखिदळ्यात तासन्‌तास रंगणारे बाळ रेकॉर्डिंगरुममध्ये एकदम वेगळेच बनून जातात. त्यांची बहुसंख्य गाणी हिज मास्टर्स व्हॉइसच्या स्टूडिओत ध्वनिमुद्रित झालेली आहेत. रेकॉर्डिंगच्या वेळी बाळ अतिशय दक्ष, एकाग्र, तल्लख असतात. गायकगायिकेच्या स्वरापासून तो प्रत्येक वाद्याच्या विविध सुरावटीपर्यंत सर्वत्र त्यांचे बारीक लक्ष असते. ते थोडेसे ताणलेल्या मनःस्थितीतही असतात. अशा वेळी गप्पा, फालतू विनोद कुणी केले तर ते त्यांना मुळीच आवडत नाही. दिदी, आशाताई अशा तोलामोलाच्या गायिका गात असतात. पण बाळ त्यांनाही भीत नाहीत. आपल्याला हवा तो परिणाम मिळेपर्यंत ते पुन्हा पुन्हा गाणे घेतात, आणि गोड शब्दांत पण निक्षून म्हणत राहतात, "दिदी, अजून एकदा." किंवा "आशाताई" "जरा जोर लगाके गाइये." या कलावंत भावंडांना एकत्र काम करताना बघणे हा एक सुंदर, अविस्मरणीय अनुभव आहे.

**ज्येष्ठ संगीतकार :**

व्यक्तिशः मला संगीतकार म्हणून बाळ जसे थोर वाटतात तसे मित्र म्हणूनही ते फार जवळचे, जिव्हाळ्याचे वाटतात. कसलीही अतिशयोक्ती न करता वा उपचार न बाळगता मी म्हणेन की माझ्यातला गीतलेखक बाळनी घडवला आणि जोपासला. आतापर्यंत जेवढ्या संगीत दिग्दर्शकांबरोबर मी गीतरचना केली त्यांतली जास्तीत जास्त गीते मी बाळबरोबर केली आणि जास्तीत जास्त लोकप्रियताही त्याच गीतांना लाभली. बाळकडे मी गाणी लिहू लागले त्या वेळेपर्यंत चित्रपटांतली काही तुरळक गीते सोडल्यास सुधीर फडके यांनी संगीत देऊन स्वरबध्द केलेल 'तोच चंद्रमा' हे एकच गीत माझ्या नावावर ठळकपणे नोंदले गेले होते. चित्रपटाबाहेरचे, ध्वनिमुद्रिकेसाठी लिहिलेले असे ते गीत होते आणि त्याला खूप लोकप्रियता लाभली होती. त्याच्या खालोखाल वसंत पवार यांनी चाल दिलेले चित्रपटाबाहेरचे माझे आणखी एक गीत लोकांच्या पसंती उतरले होते. 'चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरुन जा' हे ते गीत. ते माणिक वर्मा यांनी गाइले होते. पण अशी ही दोन गीते आणि 'हा माझा मार्ग एकला' या चित्रपटातल्या गीतासारखी काही मोजकी गीते सोडली तर गीतलेखिका म्हणून मला हा वेळपावेतो काही फारसे नाव किंवा प्रतिष्ठा नव्हती. मला मुळात आत्मविश्वास फार कमी. खरे सांगायचे तर गीतरचना या प्रकाराबद्दल अनेक कारणांनी माझ्या मनात एक न्यूनगंडच निर्माण झाला होता. माझ्या ठिकाणी असलेला हा गंड, ही मरगळ प्रथम लताबाईंबरोबर गीते करताना जरा कमी झाली आणि नंतर बाळबरोबर काम करताना तर गीतरचना हे अवघड, कटकटीचे काम न वाटता ते एक

आनंददायक आव्हान वाटू लागले. बाळना स्वत:लाच इतका आत्मविश्वास वाटे की तो ते माझ्याही मनात संक्रमित करीत. बाळची बहुतेक गाणी चालीवर बांधलेली असतात असा एक सार्वत्रिक समज आहे. पण तो खरा नाही. आधी गाणे द्यावे आणि मग बाळनी त्याला चाल द्यावी असेही अनेकदा घडते. पारंपरिक गाणी तर मूळ तयारच होती. त्यांना बाळनी नंतर किती रसानुकूल चाली दिल्या ह्याची साक्ष ज्ञानदेवांच्या विराण्या, मीरेची गीते देतील. गालिबच्या गझलांबाबतही तेच म्हणता येईल. व्यक्तिशः माझी अनेक गीते मी आधी लिहिली आणि मग बाळनी त्यांना स्वरबध्द केले. गणपतीची गाणी, 'ही वाट दूर जाते', 'जाईन विचारित रानफुला', 'मी डोलकर डोलकर', 'पहा टाकले पुसुनी डोळे' अशी किती तरी कवितागीते मी प्रथम लिहिली होती. पण बाळनी चाल बांधली आणि मग त्यावर मी गीत लिहिले असेही अनेकदा झाले आहे. अशी काही गाणी किती सहजासहजी होत गेली हे आज आठवले तर माझे मलाच आश्चर्य वाटते. एकदा बाळनी 'माथे तेरे चांदका टीका अंगपे हीरे जडे है दुल्हनिया तू है सजनिया प्यारी' असे एक हिंदी गीत मला ऐकवले. त्या चालीने मला इतकी भुरळ घातली की मी बाळना म्हटले, "बाळ, मी यावर गाणं लिहिते." आणि 'शालू हिरवा पाच नि मरवा' हे गाणे मी लिहिले. ते उषाताईंनी गाइले आहे. अशीच एकदा 'राजसंन्यास' मधील गाणी बाळ गात होते. त्यातले 'साजणि बाई सजवि मजसि करि घाई' हे सुंदर गाणे गाता गाता बाळ एकदम मला म्हणाले, "फार गोड चाल आहे ही. यावर गाणं लिहिता? " मलाही ती कल्पना आवडली. मग मी 'प्राणविसावा लहरी सजण कुणि दावा' हे गाणे त्या चालीवर लिहिले. पुढे तेही उषाताईंनी गाइले.

चित्रपटांसाठीही बाळबरोबर मी पुष्कळ गाणी लिहिली. दुर्दैवाने काही चित्रपट निर्मात्यांना पुरे करता आले नाहीत त्यामुळे ती गाणी वाया गेली. अलीकडे बाळबरोबर मी केलेला आणि आम्ही दोघांनीही आमच्या परीने काही प्रयोग करुन पाहिलेला असा चित्रपट म्हणजे 'महानंदा'. त्यात बाळनी गोव्याकडील कोकणी चाली दिल्या होत्या व त्यावर मी कोकणी भाषेत गीतरचना केली होती. अर्थात ते आपले मी पुस्तकातून, गीतांतून आत्मसात केलेले कोकणी! पण ही गाणी त्या मानाने लोकांना फारशी आवडली नाहीत. त्यातले 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश' हे गीत मात्र अगदी अनपेक्षितपणे लोकांना आवडले. पुढे या गीताबद्दल संगीतकार म्हणून बाळना, गायिका म्हणून आशाताईला आणि गीतकार म्हणून मला - आम्हा तिघांनाही सूर सिंगार संसदची पारितोषिके मिळली.

मंगेशकर मंडळींची व माझी ओळख झाली तेव्हा आम्ही दादरला राहात होतो. बाळ तिथे अनेकदा येत. चहा पीत, गप्पा मारत, निघून जात. एकदा मला नागीण झाली. तापाने मी फणफणले. एकदम वाटले बाळना फोन करावा. मी फोन केला आणि अर्ध्या तासात ते आले. दुखण्याने की तापाने की कशाने कोण जाणे, मला एकदम अतोनात रडू कोसळले. बाळना फारसे आश्चर्य वाटले नाही. त्यांची बाळपणातली अनेक वर्षे पायाच्या दुखण्याने अंथरुणावर पडून गेली आहेत. म्हणून की काय - आजार, दुखणेकरी माणूस, दुखण्यात माणसाला वाटणारे एकाकीपण, मनाला येणारी विकलता याची त्यांना चांगली कल्पना असावी. त्यांच्यामध्ये सोशिकपणाही फार आहे. त्यांनी नाना प्रकारच्या गप्पा मारुन माझी उदासीनता घालवली. मग ते निघून गेले. असाच आणखी एक प्रसंग आठतो. तेव्हाही काही घरगुती अडचणीमुळे आम्ही दोघे-मी आणि प्रभुणे - अत्यंत त्रस्त मन:स्थितीत होतो . मी सहज बाळना फोन केला. खरे तर आमच्या उद्विग्नतेबद्दल मी काही बोलले नव्हते. पण मला वाटते, माझ्या बोलण्याच्या सुरातूनच बाळना त्याही चाहूल लागली असावी. ते मला म्हणाले, "तुम्ही दोघे ताबडतोब टॅक्सी करा. आमच्याकडे या. खूप गप्पा मारु. मलाही आज गप्पांची लहर आली आहे." आम्ही बाळकडे गेलो. खूप गप्पा झाल्या. आम्ही

तिथेच जेवलो. आणि मग बाळनी आम्हाला घरी पोहोचवून दिले. अडचणी होत्या त्या होत्याच. पण मनाची मरगळ मात्र पार नाहीशी झाली होती. ही सगळीच मंगेशकर भावंडे अशी दिलदार आहेत. संवेदनशील. न बोलता आपली सहानुभूती दुसऱ्यापर्यंत पोहोचणारी. स्नेहाला सतत जागणारी.

आणि बाळबरोबर झालेली भांडणेही मला आठवतात. लताबाईंच्या गाण्यांच्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे झाली तेव्हा 'लता' हे पुस्तक सत्कार समितीतर्फे प्रकाशित होणार होते. त्याच्या संपादनात काही कटकटी झाल्या होत्या. मी फार उदास मनःस्थितीत होते. त्यातच फोर्टमध्ये 'गेलार्ड' या हॉटेलात प्रेस कॉन्फरन्स ठेवली होती. पण मी सगळा राग त्यांच्यापुढे बोलून दाखवला. तेव्हा मला रडूही फार चटकन यायचे. तसे ते कोसळण्याच्या बेतात होते आणि त्यांनी फार पोक्तपणा दाखवला. ते शांतपणे मला म्हणाले, "आता आत जाऊ या. तुम्हाला चहा आवडतो ना? चहा घेणार ना?" त्यांनी मला हॉटेलात नेले. कुठल्या कुठल्या इंग्रजी, मराठी वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तिथे आलेले होते. मी आपली एका टेबलापाशी मुकाट्याने बसून राहिले. बाळनी मला आग्रहाने खायला लावले. चहा दिला. एव्हाना माझा राग गेला होता. कॉन्फरन्स संपल्यावर आम्ही बाहेर आलो. मी टॅक्सीने घरी जायला निघाले. तोवर बाळनी तयार पाने करुन आणली आणि एक पान माझ्यासमोर धरुन म्हणाले, "चहा झाला. आता पान खाणार ना?" त्यांचे ते बोलणे, पान पुढयात धरणे इतके गंमतशीर होते, मला खूप हसू कोसळले.

**कामावर नितांत प्रेम :**

वेळेत आपले काम पुर्ण करावे अशी त्यांची काम करण्याची वृत्ती होती. वेळेचे त्यांना महत्त्व होते. आम्ही कोळीगीते केली तेव्हाची गोष्ट आठवते. बाळना गाणी लवकर हवी होती, आणि माझ्याने तर ते काम होत नव्हते. कदा बाळ असेच चिडून नव्हे तर शांतपणे मला म्हणाले, "तुमच्याने हे काम होत नसेल तर नाही म्हणा. मी दुसऱ्या गीतकाराकडून गीते करवून घेतो. मला थांबायला वेळ नाही कारण दिदीच्या तारखा मी घेऊन ठेवल्या आहेत. ती परेशातून येताच रेकॉर्डिंग करावे लागेल." त्यांच्या बोलण्यात एक अक्षरदेखील वावगे नव्हते. मला मात्र ते फार लागले. मी अगदी वाईट मनःस्थितीत घरी आले. नंतर दोन दिवस जिवाचा आटापिटा करुन मी तिन्ही कोळीगीते तयार केली व ती बाळकडे नेऊन देण्यासाठी त्याच्या घरी गेले. बाळ त्या वेळी कुठे बाहेर गेले होते. मी गाणी घरता कुणाकडे तरी दिली. सोबत एक चिठ्ठी ठेवली आणि तशीच तिथून निघाले. जिना उतरताना जिन्याच्या वळणावरच नेमके बाळ भेटले. मी तुटकपणे म्हणाले, "गाणी तयार करुन आणली आहेत. आवडली तर बघा." माझा घुस्सा बाळना कळला असावा. ते अगदी मिष्किलपणे हसले आणि म्हणाले,

"वर चला. गाणी बघू या तरी."

"नको. उशीर झाला आहे. मी जाते."

**समारोप :**

असे हे बाळ हृदयनाथ मंगेशकर. तरुण पिढीचे आवडते संगीत दिग्दर्शक आणि माझ्या खास आवडीचे संगीतकार. लताबाईंच्या बरोबरीने बाळनी मला स्नेह दिला. आपुलकी दिली. माझ्या आनंदात या मंडळींनी आनंद मानला. माझ्या दुःखात मला आधार व प्रेम दिले. बाळइतकीच भारती माल आवडते. विचार केला म्हणजे वाटते, जुने दिवस किती भरभर निघून गेले. बाळचे लग्न झाले. मुले मोठी झाली. माझ्याही आयुष्यात अनेक घटना घडल्या. बऱ्यावाईट. मध्यंतरी केवढा तरी काळ लोटून गेला आहे आणि आता तर माझी मुंबईही सुटली आहे. तरी

कधी कधी बाळ इथे येतात. त्यांच्या इथल्या घरी मी जाते. पुन्हा पहिल्यासारख्याच गप्पा रंगतात. जुन्या आवडत्या गाण्यांची, कवितांची उजळणी होते आणि मला वाटू लागते, आता बाळ पेटी पुढयात ओढून घेतील. भारतीला फर्स्टक्लास चहा करायला सांगतील. अन् मला म्हणतील, "शांताबाई, आपल्याला गाणं करायचं आहे. नवीन चाल तयार केली आहे. ऐका-"

## ३.५ कोठावळे

### कोठावळे - परिचय

केशवराव कोठावळे यांचा जन्म २१ मे, १९२३ रोजी झाला. त्यांना मॅट्रिक होण्यापूर्वीच आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडावी लागली होती व त्यानंतर फूटपाथवर पुस्तकविक्री सुरुवातीला केली. त्यानंतर सिनेमाची तिकीटे विकणे यांसारखी फुटकळ कामे करुनही त्यांनी आपले दिवस घालविले. काही दिवस त्यांना राहण्यासाठी जागा नसल्याने ते मौज प्रेसच्या जागेत येऊन आश्रय घेत असत. मात्र या परिस्थितीतून आपण बाहेर पडू असा मनाशी ठाम निश्चय करुन त्यांनी आयुष्यातील यशाच्या शिखराकडे वाटचाल सुरु केली. त्यांची ही वाटचाल त्यांना औदुंबराच्या झाडाखालच्या मॅजेस्टिक सिनेमा (मुंबई) जवळच्या एका लहानशा दुकानापासून गिरगावातील प्रसाद चेंबर्स मधल्या अद्ययावत कार्यालयापर्यंत घेऊन गेली. केशवराव कोठावळे यांनी 'मॅजेस्टिक प्रकाशन' ही मराठी ग्रंथ प्रकाशन संस्था काढली. एक यशस्वी प्रकाशक म्हणून पुढे येण्याआधी त्यांनी अतिशय खडतर आयुष्य जगून यशाचे शिखर गाठले. केशवराव यांची प्रकाशन संस्था तत्कालीन लोकप्रिय प्रकाशने मौज, पॉप्युलर, कॉन्टिनेन्टल यांसारख्या मराठी पुस्तकांचे प्रकाशन करणाऱ्या प्रकाशन संस्थांच्या ओळीत येऊन बसले. १९६४ मध्ये त्यांनी 'ललित' नावाचे मासिक काढले. या मासिकातून आजही बाजारात येणाऱ्या नवीन पुस्तकांची माहिती व परीक्षणही असते. प्रकाशन व्यवसायात अल्पावधीत यशाचे शिखर गाठणारे केशवराव यांचा मृत्यू ५ मे, १९८३ रोजी झाला.

पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने शांता शेळके यांचा परिचय कोठावळेशी झाला. त्यांच्या सहावासाने त्यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू शांता शेळके यांनी 'वडीलधारी माणसे' या ललित लेख संग्रहाच्या निमित्ताने रेखाटले आहे. एका इंग्रजी पुस्तकाचे रुपांतर शांता शेळके यांनी करावे यासाठी कोठावळे स्वतः त्यांना भेटण्यास गेले. तेव्हापासून शांता शेळके या कोठावळे यांना ओळखत होत्या. व्यावहारिक ते कौटुंबिक पातळीवरच्या संबंधामध्ये कोठावळे यांनी कधीही सरमिसळ केली नाही. त्यांचे रुढ पुस्तकी शिक्षण झाले नसले तरी त्यांना लेखनाची प्रचंड आवड होती. 'वासिलीचे भाग्य' सारख्या काही रशियन बालकथांचीही भाषांतरे त्यांनी केली आहे. कोठावळ्यांना साहित्य व प्रकाशनाचे क्षेत्र याबाबत सर्वश्रूत ज्ञान होते. त्यामुळे कोणत्या लेखकाला कोणते लेखन जमेल व कोणत्या पुस्तकाचा खप किती असेल याबाबत कोठावळे अतिशय अचूक अंदाज बांधत. असे हे व्यवहारिक सौजन्यशील, मैत्री भावयुक्त 'केशवराव कोठावळे' लेखिका शांता शेळके यांनी आपल्यासमोर 'कोठावळे' या लेखसंग्रहातून मांडले आहे.

### कोठावळे यांच्याशी भेट :

केशवराव कोठावळे यांचा आणि माझा प्रथम परिचय झाला तो दिवस मला आजही चांगला आठवतो. आम्ही तेव्हा दादरला राहात होतो. माझा तो काळ फार बिकट होता. मी बेकार होते. घरात दुखणी चालू होती. इतरही अनेक अडचणी होत्या. अशा सुमाराल एके दिवशी दुपारी

माझा पत्ता काढून कोठावळे आमच्या घरी आले. ते प्रकाशक आहेत हे मला ठाऊक होते. पण त्यांची माझी प्रत्यक्ष भेट अशी ही आताच होत होती. कोठावळे आले. खोलीमध्ये दारालगत एक खुर्ची होती. तिच्यावर ते बसले आणि म्हणाले,

"तुमच्याकडे एक काम आहे."

"कसले?" मी थोडयाशा निरुत्साहानेच म्हटले. मी माझ्या चिंतेत व्यग्र होते. दुसऱ्याच दिवशी घरात एक मोठे ऑपरेशन व्हायचे होते, आणि वेळेवर गरज पडली तर दोन एकशे रुपये तरी हाताशी हवे होते. ते पैसे कसे आणि कुठून मिळवावेत याचा विचार मी करत होते.

**लेखकांबद्दल आदरभाव :**

कोठावळे आपले काम मला सांगू लागले. इंग्रजीतल्या 'प्रिझनर ऑफ झेंडा' या सुप्रसिद्ध कादंबरीचे रुपांतर त्यांना माझ्याकडून करुन हवे होते. हे काम मी चांगले करु शकेन असे त्यांना वाटत होते. त्यासाठी ते माझ्याकडे आले होते.

"मला कादंबरीचे भाषांतर नको आहे." ते म्हणाले, "रुपांतर हवे आहे. मराठी नावे, मराठी वातावरण घालून तुम्ही हे रुपांतर करावे अशी माझी इच्छा आहे..."

कोठावळ्यांच्या बोलण्याकडे माझे नीटसे लक्षही नव्हते. पण कामाचे स्वरुप समजताच एक कल्पना माझ्या मनात चमकली. उद्या आपल्याला पैशांची गरज आहे. या कामापोटी तेवढे पैसे आपण 'ॲडव्हान्स' म्हणून मागितले तर? माझी गरज निकडीची होती. खरे तर लेखनापोटी हक्काने आधी पैसे मागावेत अशी काही कुणी मी नामवंत वगैरे लेखिका नव्हते. आणि लेखक-प्रकाशक या नात्याने कोठावळ्यांशी माझा पूर्वी कधी संबंधही आलेला नव्हता. मी पैसे मागणे सर्वथा गैर आहे हे मला कळत होते. पण माझी अडचण माल स्वस्थ बसू देईना. मी धीर करुन कोठावळ्यांना म्हटले,

"मी हे काम करीन. पण त्यासाठी दोनशे रुपये तुम्ही मला आधी द्याल का?... जरा अडचण होती म्हणून..."

कोठावळेही काही त्या वेळी फार मोठे प्रकाशक नव्हते. पण माझी निकड त्यांना जाणवली असावी. माझा नाइलाजही त्यांना कळला असावा. त्यांनी अवांतर प्रश्न विचारले नाहीत. जादा कुतूहल दाखवले नाही. ते इतकेच म्हणाले,

"पैसे देईन मी. पण आता या क्षणी माझ्याकडे इतकी रक्कम नाही. संध्या-काळपर्यंत मी तुमच्याकडे पैसे पोहोचते करतो. चालेल ना?"

मी नुसतीच मान हलवली. मला आतून दाटल्यासारखे झाले होते. कोठावळ्यांनी आपला शब्द पाळला. त्या दिवशी संध्याकाळी दोनशे रुपये त्यांनी माझ्याकडे धाडून दिले. सोबत चिट्ठीचपाटी नाही. पोचपावती नाही. काहीसुद्धा नाही. मला हा अनुभव अगदी नवीन होता.

पण सांगण्यासारखी गोष्ट पुढेच आहे. त्या दिवशी ज्या कामापोटी कोठावळ्यांकडून मी दोनशे रुपये घेतले होते ते काम नंतर दोन वर्षे मी करु शकले नाही. माझ्या वेगवेगळ्या व्यापांत,

अडचणींत 'प्रिझनर ऑफ झेंडा' चे रुपांतर रेंगाळतच राहिले. पण कोठावळ्यांनी माझ्यामागे तगादा लावला नाही. दिलेल्या पैशांचा तर त्यांनी कधी उच्चारसुद्धा केला नाही. कुठे तरी, कधी तरी एखाद्या ठिकाणी ते भेटत. भेटले की सौम्यपणे हसत आणि हलकेच म्हणत,

"आपलं काम चालू आहे ना ?"

बस्स. इतकेच.

दोन वर्षांनंतर 'प्रिझनर ऑफ झेंडा' चे रुपांतर 'ओट घटकेचा राजा' या नावाने मी कोठावळ्यांना करुन दिले. त्यांना ते आवडले. काही दिवसांनी ते मला म्हणाले,

"याच पुस्तकाचा पुढचा भाग आहे..."

"होय. 'रुर्ण्ट ऑफ हेंटझॉ.'" मी म्हटले.

**स्नेहभाव :**

कोठावळ्यांशी जडलेला स्नेह पुढे कौटुंबिक पातळीवर वाढत गेला. त्यांचे बंधू तुकारामशेट, त्यांची मुले, मुली, त्यांच्या पत्नी ही सर्वच माणसे खूप परिचयाची झाली. अगदी घरगुती नात्याने वागू लागली. खरे म्हटले तर कोठावळ्यांचे जे खास लेखक होते त्यांत मी कधीच नव्हते. त्यांनी माझी पुस्तके प्रकाशित केली. तीही संख्येने फार आहेत असे म्हणता येणार नाही. पण तरीही कोठावळ्यांनी मला अतिशय आपलेपणाने वागवले. व्यावहारिक औपचारिकपणा, सावधपणा सोडून ज्याच्याशी मनमोकळेपणाने बोलता येईल असा एक सभ्य, दिलदार, सच्चा आणि विश्वासार्ह स्नेही त्यांच्या रुपाने लाभला होता, आणि हे नाते माझ्याप्रमाणेच इतरही कितीतरी लेखकांशी त्यांनी जोडले होते. मित्र म्हणून कोठावळे आपल्याला किती जवळचे झाले होते हे आता ते गेल्यानंतर फार तीव्रतेने जाणवत आहे.

**प्रकाशन म्हणून नावलौकिक :**

प्रकाशक म्हणून त्यांना नावलौकिक मिळविले ते आपल्या कष्टाळू वृत्तीमुळे. कोठावळे झपाटयाने मोठे होत गेले. मुंबईला त्यांनी 'प्रसाद चेंबर्स' मध्ये ऑफिस थाटले. पुण्याला दुकान उघडले. नारायण पेठेत स्वतःचे मोठे, सुंदर घर बांधले. प्रेस सुरू केला. केशव कोठावळे या पोरसवदा तरुण पुस्तकविक्रत्यांचे केशवराव झाले. केशवशेठ झाले, मालक झाले. बघता बघता बडया प्रकाशकांत, महत्त्वपूर्ण व्यावसायिकांत त्यांची गणना होऊ लागली. पण कोठावळे स्वतः कधी बदलले आहेत, आपले मोठेपण दुसऱ्यांपुढे मिरवत आहेत असे त्यांच्या गेल्या वीसपंचवीस वर्षांच्या परिचयाच्या काळात मला केव्हाही जाणवले नाही. मी पाहून ठेवले आहे; आर्थिक, व्यावसायिक, कलाक्षेत्रविषयक - कोणतेही मोठेपण लाभले की माणसे कळत नकळत थोडी तरी बदलतातच. आणि नाही म्हटले तरी तो बदल आपल्याला जाणवतो. कधी कधी का बदल दुसऱ्या माणसाच्या ध्यानात येऊ नये म्हणून माणसे धूर्त चलाखीने अधिक मोकळेपणाचा आव आणतात. जादा सलगीने बोलतात. थट्टाविनोद करुन समोरच्या माणसाला आपण बरोबरीने वागवतो आहोत असा आभास निर्माण करतात. पण त्यामुळे समोरचा माणूस फसत नाही. उलट, झालेला बदल त्याला अधिकच तीव्रतेने जाणवत राहतो. कोठावळ्यांच्या बाबतीत हे काहीही, कधी सुद्धा घडले नाही. ते होते तसेच साधे, अकृत्रिम, लोभ करणारे आणि लोभ लावणारे राहिले. मॅजेस्टिकशेजारच्या माडीवर असलेल्या अतिशय अडचणीच्य गोडाउनमध्ये मी त्यांना भेटले आहे. ब्राह्मण सभागृहासमोरच्या दुकानात त्यांच्यासमोर बसून बाहेरच्या हॉटेलातून त्यांनी मागवलेला कढत लाल चहा पीत त्यांच्याशी गप्पा मारल्या आहेत. प्रसाद चेंबर्समधल्या त्यांच्या सुसज्ज खासगी खोलीत 'ललित' च्या दिवाळी अंकाबद्दलचे त्यांचे मनसुबे त्यांच्या तोंडून ऐकले आहेत. आणि पुण्याला त्यांनी घर बांधल्यावर तिसऱ्या मजल्यावरच्या त्यांच्या प्रशस्त सुंदर

दिवाणखान्यातही अनेकदा तास न् तास त्यांच्याबरोबर बोलत हास्यविनोदाचा आनंद लुटला आहे. कोठावळ्यांची अशी स्थलांतरे होत गेली. त्यांनी घेतलेली प्रत्येक जागा आधीच्या जागेपेक्षा जास्त मोठी, जास्त वैभवसूचक, जास्त अधिकार दर्शवणारी होती. पण या साऱ्या बदलांत कोठावळे स्वतः कधी बदलले आहेत असे दिसले नाही. केव्हाही गेले तरी कोठावळ्यांचे तेच तोंड भरू 'याऽऽ' असे भरघोस स्वागत, तेच मनमोकळे हसू आणि दोन मिनिटांत सुरु होणारा तोच गप्पांचा अप्रतिहत ओघ. अगदी त्यांच्या अखेरच्या भेटीपर्यंत यात कधी बदल झाला नाही.

**संवेदनशील वृत्ती :**

कोठावळे हे रुढ अर्थाने अशिक्षित होते हे त्यांच्या बाबतीत वारंवार आवर्जुन सांगितले जाते. त्यांचे पुस्तकी शिक्षण झालेले नव्हते ही गोष्ट खरीच आहे. पण फार तरुण वयात त्यांनी व्यवसाय सुरु केला. अनेक अडचणींतून मार्ग काढला. माणसांचे बरेवाईट असंख्य नमुने त्यांनी पाहिले. लेखकांसारख्या एकीकडे अति तरल, संवेदनाक्षम तर दुसरीकडे पार बेभरंवशाच्या, हट्टी, लहरी आणि स्वतःच्या मानापमानाबद्दल पराकाष्ठेच्या हळव्या असणाऱ्या विचित्र, तऱ्हेवाईक जमातीशी त्यांचा अत्यंत जवळून संबंध आला. परिस्थितीचीही अनेक बरीवाईट वळणे त्यांनी अनुभवली. त्यांतून कोठावळे घडत गेले. घडता घडता खूप काही शिकत गेले. आणि एक अंकभूत शहाणपणा मुळातच लाभलेला असल्यामुळे या साऱ्यामधून परिस्थितीचा अंदाज बांधायला, व्यवहाराचा, मनुष्यस्वभावाचा अन्वयार्थ लावायला ते शिकले. कोठावळे तसे कमी बोलत. माणसांबद्दल सहसा मते देत नसत. पण मला वाटते; प्रत्येक माणूस, प्रत्यक लेखक त्यांनी स्वतःशी छान जोखलेला असे. लेखकांचे चमत्कारिक अनुभव कोठावळ्यांना आले नसतील असे कसे म्हणावे? प्रत्येक संपादकाला, प्रकाशकाला ते येतातच. पण कोठावळ्यांचे 'लेखक' या गोष्टीवरच मुळी अत्यंत प्रेम होते. इतक्या लेखकांना इतकी वर्षे इतक्या जवळून पाहिल्यानंतर या प्रेमात थोडा खंड पडायला, मनाला क्वचित थोडा कडवटपणा यायला हरकत नव्हती. पण कोठावळ्यांच्या बाबतीत तसे काही कधी घडले नाही. लेखकांबद्दलचे त्यांचे आकर्षण अखेरपर्यंत कायम होते. या आकर्षणात एक बालसुलभ उत्सुकता, कुतूहल, निर्व्याजपणा होता. तसाच अनुभवांतून सिद्ध झालेला खोल समंजसपणाही होता. लेखक, लेखन, पुस्तके ही कोठावळ्यांची 'पॅशन' होती. कुण्या एका काळी कोठावळ्यांनी स्वतः लेखक होण्याची महत्त्वाकांक्षा मनात बाळगली होती. काही रशियन बालकथांची त्यांनी भाषांतरे केली होती. मी त्यांतले एकच भाषांतर वाचले होते. त्याचे नाव होते 'वासिलीचे भाग्य.' त्यावरुन मी कोठावळ्यांना अनेकदा चेष्टेने विचारत असे -

"वासिलीचे भाग्य पुन्हा कधी उजाडणार? तुम्ही पुन्हा कधी लिहिणार?" त्यावर कोठावळे नुसते हसत अन् म्हणत-

"मी कसला लिहितो आता? आता लेखकांनी लिहायचे अन् आम्ही ते छापून प्रसिद्ध करायचे!"

**लेखकांना लिहिण्याचे प्रोत्साहन :**

कोठावळ्यांनी खूप लेखकांना लिहिते केले. मुंबईपुण्यासारख्या वाङमयीन वातावरणातले लेखक तर त्यांनी जोडलेच, पण अशा मोठ्या शहरांपासून दूर, आडबाजूला, खेडयापाडयांत राहणाऱ्या किंवा आजच्या वाङमयीन विश्वापासून काळाने मागे पडलेल्या लेखकांचेही लेखन त्यांनी आवर्जुन 'ललित' मधून छापले. 'स्वागत' सारख्या सदरांमधून नवोदितांचे फोटो, परिचय दिले. सतत प्रसिद्धीच्या झगमगाटात वावरत असलेल्या नामवंतांना याचे मोल वाटणार नाही. पण अप्रसिद्ध, दूरस्थ, होतकरु लेखकांच्या दृष्टीने हे सारे किती महत्त्वाचे, किती उत्तेजनपर, मनाला

केवढा आनंद देणारे असले पाहिजे बरे! ललितलेखक कोठावळ्यांनी लिहिते केले यात फारसे नवल नाही. पण रुढ अर्थाने ज्यांचा साहित्याशी कधी संबंध आलेला नाही अशा, व्यवसायाच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत कर्तबगारी गाजवलेल्या नामवंतांकडूनही त्यांनी त्यांच्या व्यावसायिक जीवनावर, अनंभवांवर पुस्तके लिहून घेतली. दामू धोत्रे या सर्कसपटू कलावंताकडून त्यांनी 'वाघ सिंह माझे सखेसोबती' हे पुस्तक मिळवले. चित्रपटक्षेत्रातल्या. नामवंत कलावती दुर्गाबाई खोटे यांच्याकडून त्यांचे आत्मचरित्र लिहवून घेतले. माया परांजपे याच्याकडून सौंदर्यप्रसाधनशास्त्रावरील पुस्तक त्यांनी तयार करवले. तर मंगला बर्वे यांच्याकडून पाकशास्त्रवरचे पुस्तक त्यांनी सिद्ध केले. यापैकी माया परांजपे यांच्याकडून कोठावळ्यांनी लेखन कसे करवून घेतले ते मी अगदी जवळून पाहिले आहे. त्यासाठी कोठावळ्यांनी अपरंपार श्रम केले. केवढा तरी पत्रव्यवहार केला. चित्रे वारंवार काढवून ती दुरुस्त करुन घेतली. त्यांतून ते देखणे पुस्तक आकाराला आले. ही झाली एका पुस्तकाची गोष्ट. अशी इतर किती तरी पुस्तके असतील. ललित साहित्याची तर कोठावळ्यांना चांगली जाण होतीच. पण इतर खपाऊ साहित्याचाही त्यांना एक अचूक अंदाज असे. आचार्य अत्रे म्हणत- 'उत्तम साहित्याचा मला मुळी सुवासच येतो!' कोठावळ्यांनाही चांगल्या खपाऊ पुस्तकाचा असा सुवास येत असला पाहिजे. पुस्तके छपाईसाठी निवडताना काही साहित्यिक मित्रांशी ते विचारविनिमय करत. त्यांचा सल्ला घेत. पण अखेरचा निर्णय स्वतः कोठावळ्यांचा असे, आणि तो सहसा कधी चुकत नसे.

**लेखकांच्या लेखनाविषयीची जाण :**

कुठल्या लेखकाला कुठला लेखनप्रकार जमेल याचे कोठावळ्यांचे स्वतःचे एक गणित असायचे. 'ठणठणपाळ' तसा 'ललित' च्या जन्मापूर्वीचा. पण त्याला जपले, जोपासले, फुलवले कोठावळ्यांनी. आज वाचकांच्या स्मृतीपलीकडे गेलेल्या जुन्या लेखकांनाही त्यांनी काही ना काही निमित्त काढून पुन्हा लिहायला लावले, आणि कित्येक आळशी लेखकांकडून त्यांनी आश्चर्य वाटेल इतके भरपूर लेखन लिहून घेतले. एखादी गोष्ट सुरु केली की ती दाती धरुन शेवटपर्यंत न्यायची ही चिकाटी त्यांच्याइतकी फारच थोडया संपादक प्रकाशकांच्या बाबतीत मी पाहिली असेल. माझा स्वतःचाच अनुभव सांगते. 'ललित' साठी एखादा लेख कोठावळ्यांनी मला लिहायला सांगितला की तो लगेच लिहिणे कधी माझ्याकडून व्हायचे नाही. मग कोठावळ्यांची स्मरणपत्रे, फोन सुरु होत. अशी दोन चार स्मरणपत्रे आली की मी लिहायला सुरुवात करी. तोवर त्यांचे आणखी एखादे स्मरणपत्र येऊन धडकायचे. या त्यांच्या चिकाटीबद्दल मी त्यांची अनेकदा थट्टाही करत असे. लेखाबद्दल त्यांचा फोन आला की 'स्मरणपत्राची वाट बघते आहे!' असे मी त्यांना म्हणत असे. कोठावळ्यांच्या चिकाटीचा, तगाद्यांचा हा अनुभव माझ्याप्रमाणे इतरही कितीतरी लेखकांना आला असेल!

**सौजन्यशीलवृत्ती :**

कोठावळे अत्यंत सौजन्यशील होते. इतक्या वर्षात मी त्यांना कुणावर चिडलेले, संतापलेले पाहिले नाही, आणि अपशब्द तर कधीच त्यांच्या तोंडून ऐकलेला नाही. इतक्या प्रदीर्घ व्यावसायिक वाटचालीत तेढी, तुसडी, दुष्ट, शिष्ट, आपमतलबी किंवा निखळ लबाड माणसे कोठावळ्यांना भेटली नसतील असे कसे म्हणावे? पण अशा माणसांविषयी कोठावळे सहसा कधी काही बोलत नसत. आपले अनुभव ते आपल्यापाशीच ठेवत. कचित कधी बोललेच तर आश्चर्य वाटावे, इतक्या आलेप्तपणे त्या व्यक्तीचे, त्या अनुभवाचे ते वर्णन करत. एकदा अशाच एका माणसाबद्दल ते बोलत होते. केठावळ्यांविषयी त्या माणसाच्या मनात एक खुनशी आकस, एक दुस्वास होता. पण कोठावळ्यांनी तो सगळा अनुभव इतक्या सहजपणे, गमतीने सांगितला की

munotes.in

मला नवलच वाटले. मनाचा तोल जाऊ न देता कोठावळे शांतपणे बोलत होते. हा शांतपणा, संयम आणि समतोलपणा कोठावळ्यांना  त्यांच्या व्यवसायात फार उपकारक ठरला असला पाहिजे. कोठावळे वेगवेगळ्या माणसांना कसे जपत, त्यांचे स्वतंत्र रागलोभ कसे सांभाळत आणि हे सारे त्या संबंधित व्यक्तींनाही कळू न देता ते कसे साधत याच्या अनेक आठवणी आज मनात गोळा होत आहेत. कोठावळे एकदा 'साहित्य सहवासा' त आले होते. नंतर ते गिरगावात जाणार होते. मलाही त्या दिवशी गिरगावात काही काम होते. कोठावळ्यांनी आपली गाडी आणली होती. ते मला म्हणाले, "चला. तुम्हाला गिरगावात सोडतो." मी त्यांच्याबरोबर निघाले. वाटते त्यांना आठवण झाली. चित्रकार पद्मा सहस्त्रबुद्धे यांच्याकडे त्यांचे काही चित्राचे काम होते. कोठावळ्यांनी गाडी हिंदू कॉलनीत पद्माबाईंच्या घराकडे वळवली. गाडी थांबवून ते हळूच मला म्हणाले-

"अंऽ, पद्माईंचे अन् तुमचे संबंध कसे काय आहेत?"

"म्हणजे काय?" मी चकित होऊन विचारले.

"नाही." कोठावळे अडखळत बोलले, "त्याचं असं आहे, काही माणसांचं एकमेकांशी काही बिनसलेलं असतं. म्हटलं, तुमच्या बाबतीत तसं काही असलं तर! तुम्ही इथे गाडीत थांबा. मी वर जातो. चित्राबद्दल पद्माबाईंशी बोलतो अन् लगेच परत येतो."

मला हसू कोसळले. हसत हसत मी म्हणाले-

"कोठावळे, पद्माबाईंशी माझी चांगली मैत्री आहे."

"हां. मग ठीक आहे." कोठावळे समाधानाने म्हणाले. आम्ही दोघेही पद्माबाईंकडे गेलो. मला कोठावळ्यांच्या बोलण्याची राहून राहून आठवण येत होती. हसू सेत होते. त्या एका लहानशा प्रसंगाने कोठावळ्यांच्या स्वभावाचा एक निराळाच पैलू दिसल्यासारखे वाटले. इतक्या विविध प्रकारच्या माणसांना त्यांच्या आपापसांतल्या मतभेदांसकट ते कसे सांभाळत असतील याचा थोडा अंदाज आला.

**लेखकांवर अपार प्रेम :**

लेखकांवर कोठावळ्यांचे प्रेम होते हे तर खरेच. पण त्यांच्या स्वभावातले बरेवाईट कंगोरेही त्यांना चांगले ठाऊक असत. कधी तरी विषय निघाला म्हणजे एखाद्या लेखकाचे ते फार सुरेख, यथार्थ वर्णन करत. त्याच्या स्वभावातल्या बारीक सारीक खाचाखोचा दाखवून देत. कोठावळ्यांना खास त्यांची स्वतःची अशी एक विनोदबुद्धी होती. ती अशा वेळी निदर्शनाला येई. एकदा एका नामवंद लेखकाचा विषय निघाला. त्याच्या गुणवत्तेबद्दल कुणाचेच दुमत असायचे कारण नव्हते. आम्ही दोघेही त्या लेखकाविषयी अगदी मनापासून आणि भारावून जाऊन बोलत होतो. एकदम मी कोठावळ्यांना म्हटले.

"त्यांचं एखादं पुस्तक तुम्ही का काढत नाही?"

कोठावळे क्षणभर थांबले. मग ते हसून मला म्हणाले,

"त्यांचं पुस्तक काढायला माझी हरकत मुळीच नाही. पण मला ते पुस्तक कसं मिळणार?"

"का?" मी विचारले.

कोठावळ्यांना खूप हसू आले. हसत हसत ते म्हणाले, "आहो, 'अस्वलास वेसण खाशी घालून फिरे दरवेशी' असा प्रकार आहे ना?"

असेच एकदा आणखी एका नामवंत लेखकाबद्दल बोलणे चालले होते. कोठावळ्यांच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्या गिरगावातल्या दुकानी काही लेखक गप्पा मारण्यासाठी जमत असत. हे बहुतेक लेखक होतकरु होते. त्यांतच हा नामवंत होता. अर्थात त्याला नाव नंतर मिळाले. त्या काळी तोही नवशिकाच होता. कोठावळ्यांची व त्या लेखकाची तेव्ह गट्टी जमली होती. पुढे तो लेखक झपाटयाने मोठा होत गेला. मधून मधून कोठावळ्यांना तो घरी बोलवी. एखाद्या कार्यक्रमात, समारंभात त्यांचा अंतर्भाव करी. पण कालांतराने ते सरे कमी होत गेले. नंतर तर त्या लेखकाने आपल्या खास मित्रांच्या वर्तुळातून कोठावळ्यांना वगळूनच टाकले. आता ही हकीगत सांगताना कुणाच्याही स्वरात थोडा खेद, राग, कडवटपणा येईल की नाही? पण कोठावळे स्वतःच्या नव्हे, तर कुणा तिऱ्हाईत माणसाच्या जीवनातली घटना आपण सांगत आहोत अशा गमतीदार रीतीने हा अनुभव कथन करीत होते. त्यातली त्यांची काही वाक्ये अशी -

"मी घरी गेलो... जेवायला गेलो. वाटलं, अरे आपण जवळ जवळ येतो आहोत बरं का! मग एकदा खास जवळच्या साहित्यिक मित्रांच्या खासगी बैठकीत मला आमंत्रण आलं. वाटलं, वा! आपण खूपच जवळ आलो की! मित्रांच्या खासगी वर्तुळात आपल्याला स्थान मिळालं. पण पुढं..."

"पुढं काय?" मी विचारले.

"पुढं कुठे काय? पुढं काहीच नाही. तेच तर सांगतो आहे ना मी तुम्हाला?" कोठावळे म्हणाले आणि स्वतःच खदखदून हसत सुटले.

स्वतः कोठावळ्यांच्या स्वभावात असा हिशेबीपणा, तरतमभाव कधी आढळायचा नाही. ते व्यवहाराला चोख होते. हिशेबीही होते. लेखाचा मोबदला वाढवून द्या म्हटले तर खळखळ करत. परंतु हा हिशेब मैत्रीत त्यांनी कधीच ठेवला नाही. तिथे प्रकाशक कोठावळे अदृश्य होऊन त्यांच्यामधला जिव्हाळ्याचा मित्र प्रकट होत असे. गरज पडली तर मी त्यांच्याकडे निःसंकोचपणे पैसे मागत असे. त्यांनी अशा वेळी कधीच 'नाही' म्हटले नाही. पण हे पैसे देतानाही मदत केल्याचा, उपकार केल्याचा आव नसे. चेष्टा करत, हसत हसत ते नड भागवायचे. मला परदेशी जायचे होते तेव्हा मी काही पैसे त्यांच्याकडे उसने मागितले. आकडा सांगितला तेव्हा ते घाबरल्यासारखे करुन म्हणाले,

"अरे बाप रे! येवढे पैसे कसे देणार?"

मला सगळे खरेच वाटले. मी हिरमुसून गप्प बसले. पण दुसऱ्याच क्षणी ते हसत हसत म्हणाले

"पण आता तुम्ही येवढया परदेशी जाणार. म्हणजे मग पैसे दिलेच पाहिजेत. नाही का?"

ते माझी थट्टा करत होते हे आता कुठे मला उमगले.

एकदा कोठावळ्यांचा वाढदिवस होऊन गेल्यानंतर दोन दिवसांनी मला ते कळले. मी त्यांना फोन करुन म्हटले, "जरा उशिरा का होईना, मी वाढदिवसाच्या शुभेच्छा देते आहे!" त्या साध्या गोष्टीने कोठावळे इतके आनंदून गेले! लगेच माल ते म्हणाले,

"दुपारी कुठे जाऊ नका. मी तुमच्या घरी येतो. आपण एखाद्या हॉटेलात जेवायला जाऊ या."

**लेखकांविषयी विशेष आदरभाव :**

त्या दिवशी कोठावळ्यांनी एका भारी हॉटेलात आम्हाला जेवायला नेले. सुभाष भेंडे यांनाही त्यांनी निमंत्रण दिले होते. कोठावळ्यांचा वाढदिवस आम्ही साजरा करण्याऐवजी माझ्या शुभेच्छा त्यांनीच साजऱ्या केल्या! लेखकावरचे कोठावळ्यांचे प्रेम असे उचंबळून व्यक्त होत असे. त्यांची दुकाने, घर म्हणजे लेखकांचा अड्डा असे. लेखक म्हटला म्हणजे तो लहान असो, मोठा असो, नामवंत असो की बिननावाचा असो, आपला असो कि दुसऱ्या प्रकाशकाचा असो, कोठावळे सारख्याच आपुलकीने त्याचे स्वागत करत. सारख्याच स्नेहाने त्याच्याशी वागत. बोलत. कोठावळ्यांचे अनेक प्रकाशन समारंभ मी पाहिले आहेत. त्यांच्या घरातल्या जवळपास साऱ्या लग्नसमारंभांना मी हजर राहिले आहे. अशा ठिकाणी कोठावळ्यांची आतिथ्यशीलता, जिव्हाळा आतून जाणवेल असा उत्कट असायचा. त्यांच्याकडचे असले समारंभ म्हणजे छोटी साहित्य संमेलनेच असत. महिनोमहिने एकमेकांना न भेटलेली साहित्यिक मित्रमंडळी अशा ठिकाणी हटकून भेटायची, गप्पा रंगवायची. हास्यविनोद करताना हरखून जायची. आणि त्यांच्या त्या अनंदाने स्वतः कोठावळे अगदी मनापासून खूष व्हायचे. त्यांची ही खूषी वेगवेगळ्या प्रकारे प्रकट होत असे. असाच एक प्रसंग आठवतो. कोठावळ्यांकडच्या एका लग्नाच्या मेजवानीला मी गेले होते. लेखकांचे एक मोठे टोळके आपापसात गप्पा मारत उभे होते. दुसरी पंगत पडण्याच्या बेतात होती. कोठावळे घाईघाईने आले आणि हलकेच म्हणाले,

"ही पंगत अर्धा तास उशिरा झाली तर चालेल ना?"

"का बरं? उशीर कशासाठी?" कुणी तरी सहज विचारले.

"जिलबीचा खास ताजा घाणा घालायला मी सांगितलाय म्हणून म्हणतो." कोठावळे म्हणाले, "या जिलब्या थोडया मऊ पडल्या असतील. तुम्ही गरमागरम ताज्या जिलब्या खा."

असे हे कोठावळ्यांचे लेखकांबद्दलचे अगत्य. ते अगदी लहानसहान गोष्टींतून देखील व्यक्त होई.

**समारोप :**

लेखक, पुस्तके, साहित्य, साहित्यविषयक घटना हे कोठावळ्यांच्य कुतूहलाचे, आनंदाचे निधान होते. त्यांचे सारे आयुष्य हाच मुळी एक साहित्योत्सव होता. त्यांची प्रकाशने, त्यांचे 'ललित' मासिक, त्यांच्या साहित्यिक गप्पा, त्यांचे लेखकांशी जडलेले ॠणानुबंध हे सारे त्या उत्सवाचेच वेगवेगळे आविष्कार होते. आणि स्वतःच्याही नकळत मराठी वाचक, मराठी लेखक त्यात गुंतत गेला होता. गेली अनेक वर्षे कोठावळे आणि त्यांचा सगळा वाङमयीन पसारा हा आपल्या मनाचा, जाणिवेचा, सांस्कृतिक वातावरणाचा एक अविभाज्य घटक होऊन बसला आहे. या साऱ्यांची इतकी सवय होऊन गेली होती, की कधी काळी यात खंड पडेल असे वाटतच नव्हते. एक सुंदर मैफल सतत चालू होती. त्या भरल्या मैफलीतून कोठावळे अचानक उठून गेले. त्यांचे आपल्या आसपास असणे आपण गृहीत धरले होते. आता ते नाहीत ही वस्तुस्थिती स्वीकारणे फार जड जाते आहे. फारच जड जाते आहे.

## ३.६ श्रीमती लता मंगेशकर

श्रीमती लता मंगेशकर गानसम्राज्ञी म्हणून सर्वांना सुपरिचित आहेत. भारताला नव्हे तर संपूर्ण जगाला त्यांच्या गाण्यानी मोहिनि घातली आहे. त्यांचा जन्म २८ सप्टेंबर, १९२९ रोजी

इंदूर संस्थानात त्यांचा जन्म झाला. सुरुवातीला त्यांनी वडिलांच्या मार्गदर्शनाखाली गायनाचा रियाज सुरु केला. घरातच गायनाचा वारसा असल्यामुळे वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीच त्यांच्या गाण्याचे ध्वनिमुद्रण झाले. १९४२ मध्ये अभिजात अभिनेत्याकडे आणि गायकाकडे शिक्षण सुरु करुन नंतर उस्ताद अनामत अली खान, वसंत देसाई, सलील चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चालींवर गाणी म्हटली. अनेक गाजलेल्या मराठी, हिंदी चित्रपटांचे श्रेय लता मंगेशकरांच्या गायनाला जाते. जवळजवळ पाच हजार चित्रपटांतून तीस हजारांच्यावर गाणी त्यांनी गायली आहेत. या कार्याबद्दल त्यांचे गिनिज बुकमध्ये नाव नोंदविले गेले. १९९० नंतर त्यांनी चित्रपट निर्मितीचे काम हाती घेतले.

२००१ मध्ये त्यांचया उत्तुंग कार्याबद्दल त्यांना 'भारतरत्न' हा पुरस्कार देण्यात आला. गीतकार शांता शेळके व पार्श्वगायिका लता दिदी यांचा ध्वनिमुद्रणाच्या निमित्ताने शांता शेळके आणि लताबाई यांचा संपर्क आला आणि सतत होणाऱ्या भेटीतून त्यांच्यात चांगली मैत्री झाली. शांता शेळके, लताबाईंच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्या होत्या. व्यावसायिकच नाही तर खाजगी जीवनातही काही अडचणी आल्या तर लताबाई लेखिकेला मार्गदर्शन करीत असत. लताबाईंच्या सहवासाचा प्रभाव लेखिकेवर होता. या प्रभावातूनच लेखिकेने लताबाईंच्या अनेक आठवणी 'लताबाई' या लेखात सांगितल्या आहेत. त्यांचा आढावा या लेखाद्वारे घेता येईल. चित्रपट, संगीत क्षेत्रातील नामांकित पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

**लेखिकेची भेट :**

संध्याकाळचे सात वाजून गेले आहेत. मुंबईच्या फोर्ट विभागातल्या 'शिराम' या अँटिक्स विकणाऱ्या दुकानात खरेदीसाठी आलेल्या लताबाई खरेदी आटोपून बाहेर पडतात. पटांगणात उभ्या असलेल्या आपल्या गाडीत येऊन बसतात. दुपारचे रुकॉर्डिंग, नंतरचे हिंडणे, खरेदी यामुळे त्या खूप दमल्या आहेत. इतक्यात पंधरासोळा पारशी शाळकरी मुली तिथे येतात. लताबाईंची गाडी त्यांनी ओळखली आहे. त्या बाहेर आल्या की त्यांचा ऑटोग्राफ घ्यावा असा या मुलींचा बेत आहे. मी त्या मुलींचे उत्सुक हसरे चेहरे, डोळ्यांतली अपेक्षा बघते. मला प्रश्न पडतो, इतक्या दमलेल्या लताबाई या एवढया मुलींना सह्या देतील? पण लताबाईंनी केव्हाच त्यांचक हसून स्वागत केलेले असते. गोळा झालेल्या मुलींची त्या प्रेमाने विचारपूस करतात. आणि मग एकूण एका मुलीची छोटी वही, ऑटोग्राफ बुक, कागदाचा सुटा कपटा - जे काही पुढयात येईल त्यावर त्या सही करतात. साऱ्या मुली आनंदाने परत गेल्यावर मगच त्या आपल्या ड्रायव्हरला गाडी तिथून बाहेर घ्यायला सांगतात.

**मनमिळावू स्वभाव :**

असाच आणखी एक प्रसंग. माझी तेव्हा लताबाईंशी नुकतीच कुठे ओळख होऊ लागली होती. त्या दिवसांत एकदा त्यांनी मला सुप्रसिद्ध जादूगार के. लाल यांचे जादूचे कार्यक्रम बघण्यासाठी आपल्याबरोबर नेले. त्यानंतर दोनतीन दिवसांनी मी त्यांच्या घरी गेले तेव्हा त्या घरातल्या मंडळींना आपण पाहिलेल्या कार्यक्रमातल्या गंमती सांगत होत्या. मध्येच त्यांनी के. लाल यांच्या बोलण्याची  नक्कल सुरु केली. के. लाल यांची निवेदनपद्धती, त्यांचे विशिष्ट उच्चार, कार्यक्रम सादर करताना प्रेक्षकांची मने वेधून घेण्यासाठी त्यांनी वापरलेल्या युक्त्या, त्यांच्या बारीकसारीक लकबी यांचे असे हुबेहुब चित्र लताबाईंनी ऐकणारांसमोर उभे केले की, घरातल्या माणसांना हसता हसता पुरेवाट झाली. लताबाई नकला छान करतात असे तोवर मी नुसती ऐकून होते. पण त्या नकलांचा दर्जा इतका वरचा असेल याची मला कल्पना नव्हती. खरे

म्हणजे के. लाल यांचा तो कार्यक्रम लताबाईंबरोबर मीही पाहिला होता. पण तेव्हा माझ्या ध्यानात आले. ती नक्कल बटबटीत नव्हती. केवळ इतरांना हसविणारीही नव्हती. लताबाईंचे सूक्ष्म अवलोकन, त्यांची स्मरणशक्ती, पाहिलेल्या वा ऐकलेल्या गोष्टींतला गंमतीदार तपशील नेमका टिपून घेणारी त्यांची तल्लख विनोदबुद्धी या साऱ्यांचा त्यातून प्रत्यय येत होता. त्यांची नाटयाची जाणही स्पष्ट होत होती.

गेल्या पंचवीससव्वीस वर्षात लताबाईंची जवळीक, त्यांचा सहवास आणि स्नेह मला लाभला. त्या काळात ध्यानात राहून गेलेल्या त्यांच्या असंख्य आठवणीतल्या या दोन आठवणी.

**गायनावर प्रभुत्व :**

लताबाईंशी माझा प्रथम संपर्क आला तो चित्रपटांतली गाणी लिहिण्याच्या निमित्ताने. त्या वेळी त्या 'आनंदघन' या नावाने मराठी चित्रपटांना संगीत देत होत्या. त्यांच्याबरोबर काम करायचे या कल्पनेने प्रथम माझ्या मनावर मोठेच दडपण आले होते. पण प्रत्यक्षात तो एक अतिशय सुंदर, सुखद अनुभव ठरला. गाणी करताना त्या पुढयात पेटी घेऊन बसत. "मला पेटी फार चांगली वाजवता येत नाही हं!" असे हसत हसत म्हणून पेटीवर मला चाली सांगत. 'मराठी तितुका मेळवावा', 'तांबडी माती', 'मोहित्यांची मंजुळा' अशा चित्रपटांची गाणी मी त्यांच्याबरोबर केली. ही गाणी करताना त्या त्या चालींचा उगम त्या मला सांगत. काही गाणी आपल्या आजीकडून ऐकलेल्या जुन्या लोकगीतांच्या चालीवर त्यांनी बसवली आहेत तर 'रेशमाच्या रेघांनी' ही लावणी त्यांनी एका कानडी गाण्याच्या चालीवर स्वतंत्र चाल बांधून केली आहे. सहजता, सोपेपणा, चालींचे अस्सल मराठमोळ वळण आणि विलक्षण गोडवा ही त्यांच्या स्वररचनेची वैशिष्टये मला प्रामुख्याने जाणवली. काम करताना मला कंटाळा आला, काही सुचत नाहीसे झाले तर त्या माझ्यासाठी चहा मागवत. आणि म्हणत, "काम राहू द्या. आज आपण नुसत्या गप्पाच मारु." मग तोही वेळ फार मजेत जाई. त्या वेळी त्यांच्या तोंडून गाणी ऐकणे, गीतांची चाल, शब्दरचना यांवरचे त्यांचे भाष्य ऐकणे हा एक अतिशय आनंददायक अनुभव असे. त्यांच्याबरोबर काम करताना मनाने मी कशी मोकळी होत गेले, माझा प्रारंभीचा संकोच कसा मावळला हे माझे मलाही कळले नाही.

**गाण्याच्या रेकॉर्डिंग मधील आठवणी :**

सुरुवातीच्या काळात माझ्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणाला मी हजर राहात असे. लताबाईंशी जसा अधिक परिचय झाला तशी त्यांच्या गाण्यांच्या रेकॉर्डिंगलाही मी त्यांच्याबरोबर जाऊ लागले. त्यांची ही बहुतेक गाणी हिंदी चित्रपटांतली असत. पण हिंदीप्रमाणे मी लताबाईंची बंगाली, गुजराती, मराठी गाणीही खूप ऐकली. ताडदेवचा रेकॉर्डिंग स्टुडिओ, तिथून जवळ असलेले फिल्म सेंटर, दादरची बॉंबे लॅबोरेटरी, वांद्रयाचा मेहबूब स्टूडिओ ही मुंबईतली चित्रपटगीतांच्या ध्वनिमुद्रणाची प्रमुख ठिकाणे आहेत. पण परळचा शांतारामबापूंचा राजकमल स्टुडिओ आणि ताडदेवचा शशांक यांचा छोटा पण सुसज्ज स्टुडिओ इथेही लताबाईंची ध्वनिमुद्रणे मी ऐकली आहेत. कधी मी लताबाईंच्य घरी जाऊन त्यांच्याबरोबर स्टुडिओत जाई तर कधी माझ्या घरुन त्यांना फोन करुन त्यांचे गाणे कुठल्या स्टुडिओत होणार आहे हे आधी त्यांना विचारुन घेई आणि माझ्या कॉलेज मधून परस्पर तिकडे जाई. त्याही मला हौसेने बरोबर नेत. कधी एखादे गाणे त्यांच्या दृष्टीने विशेष चांगले किंवा वेगळे असेल तर त्या मला फोन करुन सांगत, "उद्या अमुक अमुक ठिकाणी माझे रेकॉर्डिंग आहे. येणार का?"

**गायनावर नितांत प्रेम :**

लताबाईंच्या अशा ध्वनिमुद्रणाच्या कितीतरी आठवणी सांगण्याजोग्या आहेत. त्यांच्या गाण्यातली समृद्धता, वैपुल्य यांच्या जशा त्या निदर्शक आहेत तशा कलाकार म्हणून आणि माणूस म्हणूनही लताबाईंचे मोठेपण त्या व्यक्त करणाऱ्या आहेत. एक प्रसंग मला आठवतो. त्या दिवशी मेहबूब स्टूडिओत त्यांचे रेकॉर्डिंग होते. सहसा एका दिवशी एकापेक्षा अधिक गाणी त्या हल्ली करत नाहीत. पण त्या दिवशी कशी कोण जाणे, दोन गाणी त्यांना करायची होती. शिवाय आणखी एका गाण्याचे पहिले कडवे, प्रारंभीच्या ताना ध्वनिमुद्रित करणे आवश्यक होते. कारण निर्मात्यांना ती टेप त्या दिवशीच रातोरात कलकत्त्याला पाठवून द्यायची होती. तो गुरुवारचा दिवस होता. गुरुवारी लताबाईंचा उपास असतो. सकाळी त्या नुसती कॉफी घेऊन आल्या होत्या. पहिली दोन गाणी झाल्यावर त्या थोडासा वेळ काढणार होत्या, आणि जवळच खारला पंडित नरेंद्र शर्मा यांचे घर होते, तिथे जाऊन उपासाचे काही खाऊन येणार होत्या. मी स्टुडिओत गेले तेव्हा पहिल्या गाण्याची रिहर्सल चालू होती. लताबाईंनी मला आपला बंत सांगितला. त्या म्हणाल्या,

"ही दोन गाणी झाली की आपण पंडितजींकडे जाऊन येऊ. मग उरलेलं लहानसं रेकॉर्डिंग आहे ते मी नंतर उरकून टाकीन."

पण त्या दिवशी लताबाईंना काही खायला मिळावे असा योगच नव्हता. पहिली दोन गाणी आटपायला मुळी चार वाजून गेले. लताबाईंनी मुकाटयाने फराळाची आशा सोडून दिली. आपल्या ड्रायवहरबरोबर पंडितजींच्या घरी तसा निरोप पाठवला. थोडीशी कॉफी घेतली आणि तिसऱ्या गाण्यासाठी त्या माईक समोर उभ्या राहिल्या. सर्व काम आटोपून घरी जायला त्या दिवशी त्यांना सात साडेसात वाजले असतील.

त्याच दिवशी घडलेला आणखी एक लहानसा प्रसंग माझ्या ध्यानात राहून गेला आहे. त्या दोन गाण्यांतल्या एका गाण्याबरोबर कोरस होता. कोरसला नेहमीच्या गायिका हजर होत्या. गाणे संपल्याबरोबर त्यांतली एक आत आली आणि एकदम खाली वाकून लताबाईंचे पाय धरुन गहिवरल्या स्वरात म्हणाली,

"लता, तुम सचमुच दवी हो. कितनी अच्छी गाती हो. भगवान तुम्हे सदा सुखी रखे!"

**सहकलाकाराविषयी प्रेम :**

तिच ते पाय धरणे बघून लताबाई विलक्षण अवघडून गेल्या. त्यांना फार चमत्कारिक वाटले. त्यांनी तिला उठवून आपल्या शेजारी बसवले. तिला कॉफी दिली. अत्यंत मायेने तिची विचारपूस केली. ती गायिका जरा सावरली. ती गेल्यावर लताबाई म्हणाल्या,

"ही चाँद एके काळी फार चांगली गात असे. तिला थोडंफार नावही होतं. आज तिची परिस्थिती बिकट आहे. आणि पोटासाठी बिचारी 'कोरस' मध्ये गाते आहे." चाँदला बघून लताबाईंचे मन फार विषण्ण झाले होते, आणि अंतःकरण हेलावून गेले होते.

लताबाईंची गाणी ऐकत असताना मला त्यांच्याबरोबर हिंदीतल्या इतरही किती गायक-गायिकांची गाणी ऐकायला मिळाली. आशा, उषा यांच्याबरोबरची त्यांची द्वंद्वगीते मी ऐकली, तशीच महंमद रफी, किशोरकुमार, मुकेश, हेमंतकुमार यांच्याबरोबरची त्यांची अनेक द्वंद्वगीते ऐकायला मिळाली. नौशाद, मदन मोहन, बर्मनदा, रोशन अशा बुजुर्ग संगीतदिग्दर्शकांपासून तो कल्याणजी आनंदजी, लक्ष्मीकांत प्यारेलाल अशा त्या वेळी जरा नव्या असलेल्या

संगीतदिग्दर्शकांपर्यंत अनेकांची गाणी करताना मी त्यांना पाहिले. बरेच गायक हे लताबाईंचे वर्षानूवर्षांचे सहकारी. बरोबरीने काम करणारे कलावंत. त्यांच्याशी लताबाई खूप खेळीमेळीने वागत. किशोरकुमार त्यांनरा 'लता' च म्हणत. ते गाण्यासाठी स्टुडिओत आले की अगदी धमाल उडवून देत. सैगलपासून अनेक जुन्या गायकांच्या ते हुबेहुब नकला करत. गाताना मजेदार आविर्भाव करत. एकदा एका द्वंद्वगीतात नायक वेलीवरची फुले की फळे काहीतरी तोडत आहे असे वर्णन कवीने केले होते. ते गाणे गाताना किशोरकुमार यांनी गाण्याच्या ठेक्यावर फुलेफळे खुडण्याचा अभिनय सुरु केला. ते बघताना लताबाईंना हसू आवरेना. शेवटी त्या म्हणाल्या, "किशोर, अब ये तुम बंद नहीं करोगे तो मैं गाऊँगीही नही!" मग किशोरकुमारांचे हातवारे थांबले आणि दोघांचे गाणे ध्वनिमुद्रित झाले.

**सहनशीलवृत्ती :**

एक आठवणीत राहून गेलेला प्रसंग. ताडदेवच्या स्टुडिओत एका हिंदी चित्रपटातल्या गाण्याचे ध्वनिमुद्रण चालू होते. लताबाई मुकेशबरोबर गात होत्या. त्या दिवशी काय झाले कुणास ठाऊक. मुकेशना काही केल्या गाणे जमेना. पाचसात रीटेक झाले. संगीत दिग्दर्शकाने गाणे ओ. के ही केले. परंतु मुकेश मात्र मनातून नाराज होते. लताबांच्या ते ध्यानात आले. त्या मुकेशना म्हणाल्या, "मुकेशभय्या, तुम्ही अगदी काळजी करु नका. तुमचं गाणं छान झालेलं आहे. पण तरीदेखील तुमचं पुरेसं समाधान झालं नसेल तर दोन दिवस थांबा, मी कोल्हापूरला जाऊन येणार आहे. मी आल्यानंतर आपण स्टुडिओ 'बुक' करु अणि हे गाणं पुन्हा रेकॉर्ड करु. मी तशी व्यवस्था करीन." त्या दिवशी मी तिथे हजर होते. घरी येताना मी लताबाईंना म्हटले, "लताबाई, तुम्ही मुकेशना किती धीर दिलात. येरव्हीसुद्धा तुम्ही गाताना खूप सहनशीलपणा दाखवता, कधी चिडत नाही. कंटाळत नाही. कसं जमतं हे तुम्हाला?"

त्यावर लताबाई म्हणाल्या, "गाण्यांचं रेकॉर्डिंग ही तशी फार अवघड गोष्ट आहे . संगीत दिग्दर्शक, गायक, वादक, रेकॉर्डिस्ट हे सगळेच अशा वेळी फार नाजूक मन:स्थितीत असतात. त्यात गाणाराच्या मनावर तर विशेष ताण असतो. गाणं नीट जमत नाही असं वाटलं तर गायक हवालदिल होतो. आपल्यामुळे बरोबरच्या आर्टिस्टला पुन्हा पुन्हा गावं लागत आहे, एकसारखे रीटेक होताहेत असं दिसायला लागलं तर त्याला आणखीच अवघडल्यासारखं होतं. अशा वेळी त्याला धीर देणं, सांभाळून घेणं साऱ्यांचंच कर्तव्य असतं. मुकेशभय्या फार मोठे कलावंत आहेत तसेच ते फार सेन्सिटिव्ह आहेत. त्यांच्या मनाला आज किती त्रास झाला असेल ते मी ओळखू शकते. मागं काही वर्षापूर्वी मी सायनसमुळे आजारी होते त्या वेळी मीदेखील अशा मन:स्थितीतून गेले आहे. अशा वेळी गाणाराला किती वाईट वाटतं ते मी अनुभवलं आहे."

**स्पष्ट व निर्दोष शब्दोच्चार :**

लताबाईंचे स्पष्ट व निर्दोष शब्दोच्चार हे त्यांचे एक वैशिष्टय समजले जाते. पण ही गोष्ट त्यांनी परिश्रमाने साध्य केली आहे. संस्कृतच्या श्लोकांची त्यांना संथा देण्यासाठी या मुलांच्या बालपणी त्यांच्या वडिलांनी - दीनानाथांनी-शिक्षक ठेवले होते. त्यामुळे शुद्ध शब्दोच्चाराचे लताबाईंना बाळपणापासून वळण लागलेले आहे. मराठी साहित्याचे, काव्याचे त्यांचे वाचन चांगले आहे. गडकऱ्यांचे 'भावबंधन' सारखे नाटक, त्यांच्या अनेक कविता लताबाईंना पाठ आहेत. बी कवी, तांबे, माधव जूलियन, बालकवी यांच्या कविता ध्वनिमुद्रित करताना ते कवीही त्यांनी कसून वाचले. हे सर्व करताना उच्चारांच्या निर्दोषतेकडे त्यांनी बारकाईने लक्ष पुरवले आहे. उच्चाराबद्दल त्या किती साक्षेपी व जागरुक असतात याचे एक उदाहरण मला

आठवते. मी कोळीगीते लिहिली. ती लताबाई गाणार होत्या. मी कोळी भाषेतही लोकगीते वाचून साधारण तशी शब्दरचना केली होती. पण तेवढयाने लताबाईंचे समाधान होईना. त्या मला म्हणाल्या, "शांताबाई, तुम्ही कोळी नाही आणि मीही कोळी नाही. शब्दाचे खास कोळ्यांच्या वळणाचे उच्चार झाले नाहीत तर गाणी बिघडतील. तेव्हा आपण वरळीकर आणि पार्टीच्या कलाकारांना बोलावून घेऊ. मी त्यांच्याकडून सर्व उच्चार नीट समजावून घेते आणि मगच गाणी रेकॉर्ड करु."

आणि त्यांनी तसेच केले. कोळी कलाकारांकडून त्यांनी शब्दांचे विशिष्ट उच्चार, त्यांचा खास ढंग व लय, 'बाई' ऐवजी 'बाय' म्हणणे या साऱ्या बारकाव्यांचा तपशील समजावून घेतला. गाण्यांची रिहर्सल त्यांना ऐकवली आणि मगच कोळीगीते ध्वनिमुद्रित केली. लताबाईंच्य बंगाली गाण्यांची अनेक ध्वनिमुद्रणे मी ऐकली आहेत आणि बंगाली शब्दांच्या योग्य उच्चारांबद्दलचा त्यांचा साक्षेपही पाहिला आहे. बंगालमध्ये दसऱ्याला कालीपूजेच्या खास पूजा ध्वनिमुद्रिका काढतात. त्यासाठी कितीतरी गाणी लताबाईंनी गाइली आहेत. सलिल चौधरींपासून मानस मुकर्जीपर्यंत अनेक बंगाली संगीतदिग्दर्शकांची बंगाली गाणी त्यांनी केली आहेत. अशा वेळी केवळ गाण्याचे शब्द आणि त्यांचे उच्चार समजून घेऊन त्या थांबत नाहीत तर त्या काव्याचे मर्महीत्या जाणून घेतात. लताबाईंना काव्याची चांगली जाण आहे आणि संवेदनाशील वृत्तीमुळे चांगल्या कल्पनांचे सौंदर्यही त्यांना भिडते. त्यांनी गाइलेले 'शात भाई चंपा जागो रे जागो रे' हे गाणे बंगालीमध्ये खूपच लोकप्रिय झाले होते. कोळीगीतांचे बंगालीमध्ये रुपांतर सलिल चौधरी यांनी केले व मग ती बंगाली कोळीगीतेही बंगालीमध्ये गायली. लताबाईंनी एकदा मला 'मोनीहार' (मणिहार) या आपल्या बंगाली चित्रपटगीतांची ध्वनिमुद्रिका दिली. त्यातली गाणी फार गोड होती. त्यांच्यामुळेच मला बंगालीबद्दल हौस आणि ओढ निर्माण झाली. लताबाईंनी रवींद्र संगीतही गाइले आहे आणि सलील चौधरी, हेमंतकुमार, बासू भट्टाचार्य, हृषिकेश मुकर्जी यांच्याबरोबर त्या बंगालीत छान बातचीत करु शकतात. उर्दुबद्दलही हेच सांगता येईल. उर्दुचे आपले उच्चार निर्दोष व्हावेत म्हणून त्यांनी अनेक वर्षे एक उर्दू शिक्षक नेमले होते. या 'मास्टरजीं' कडून त्यांनी उर्दुचा पद्धतशीर अभ्यासही केला.

**रिहर्सल करुन गाणे गात :**

लताबाईंची व्यावसायिक ध्वनिमुद्रणे मी खूपच ऐकली. त्यात त्यांचे एक वैशिष्टय माल जाणवले. एखादे गाणे शास्त्रीय संगीतावर आधारलेले, रागदारीचे, जरा अवघड असले तर लताबाई त्या संगीतदिग्दर्शकांच्या घरी जाऊन तिथे रिहर्सल करत. नौशाद, एस. डी. बर्मन, मदन मोहन, सलिल चौधरी यांच्या घरी त्यांनी केलेल्या अशा अनेक रिहर्सलना मी त्यांच्याबरोबर गेलेली आहे. एरव्हीचे साधे गाणे स्टुडिओत लिहून घेऊन तिथल्या तिथे बसवून ते गाण्याचा लताबाईंचा नेहमीचा परिपाठ. पण अवघड गाण्यांची त्यांनी आधी कसून रिहर्सल केलेली असते, आणि परिश्रमांची मागणी करणाऱ्या गाण्याला ते परिश्रम लताबाई भरपूर देतात. त्यांची ध्वनिमुद्रणे ऐताना आणखी एक गोष्ट मला विशेष जाणवली. राजकपूर, देव आनंद, बी. आर. चोप्रा, एन. पी. सिप्पी हे या व्यवसायातले फार मोठे निर्माते-दिग्दर्शक. त्यांचे चित्रपट प्रचंड बजेटचे. आणि ते देशभरच नव्हेत तर देशाबाहेरही चालणारे. उलट एखादा मराठी, गुजराती किंवा बंगाली चित्रपट हा मर्यादित बजेट असलेला. त्याचा प्रेक्षकवर्गही त्या त्या प्रांतापुरता, भाषेपुरता मर्यादित. पण गाणे गाताना हा भेदभाव लताबाईंच्या मनात अजिबात नसायचा. मोठया चित्रपटातले हिंदी गाणे त्या जेवढया कसोशीने गात तेवढेच सर्वस्व पणाला लावून त्या मराठी, गुजराती किंवा बंगाली गाणेही ध्वनिमुद्रित करत. विशेषतः या कमी बजेटच्या निर्मात्यांकडून त्यांनी कधी पैसेही घेतलेले

नाहीत. कित्येकदा निर्मात्याने दिलेली रक्कम त्यांचे मनापासून आभार मानून त्यांनी हसतमुखाने त्याला परत केलेली आहे. यातही कसली आढयता किंवा उपकार केल्याचा भाव नसे. असायची केवळ आस्था, सौजन्य.

**मनमिळावू स्वभाववृत्ती :**

लताबाईंचे गाणे ध्वनिमुद्रित होताना ऐकले हा खरोखरी मोठा आनंददायक अनुभव असे. गाणे बसत असताना संगीत दिग्दर्शकांशी गप्पा मारणे, त्यांना विनोद, कोटया ऐकवणे हे सारखे चालू असे. मी बाजूला अवघडून बसलेली. पण लताबाई त्या निर्मात्याशी, संगीत दिग्दर्शकांशी, एखाद्या बडया पाहुण्याशी माझी ओळख करुन देत. मला परक्यासारखे वाटू नये हा त्यात हेतू असे. पुढे पुढे कल्याणजीभाई, लक्ष्मीकांत प्यारेलाल, राहूलदेव बर्मन यांच्याशी माझीही चांगली ओळख झाली होती. लताबाईंचे गाणे ऐकायला कधी कधी बाहेरची माणसेही येत. त्यात निर्मात्यांचे स्नेही, त्यांच्या घरातली बायकामुले, कधी राखी किंवा पुनम छिल्लाँसारखी चित्रपटातली अभिनेत्री, कधी एखादा परदेशी चाहता अशा विविध प्रकारची मंडळी असत. ती रेकॉर्डिंग रुममध्ये येऊन लताबाईंची ओळख करुन घेत. त्यांची स्वाक्षरी मागत. खरे तर गाण्याची रिहर्सल चालू असता असा विक्षेप लताबाईंना रुचत नसणार. पण हा भाव त्या चेहऱ्यावर चुकूनसुद्धा दाखवत नसत. ऐकूणच ‘पब्लिक’ विषयी त्यांच्या मनात आपुलकी आहे. आपल्या पाच मिनिटांच्या भेटीने वा चार शब्द बोलल्याने जर या माणसांना आनंद वाटत असेल तर तो त्यांना का नाकारावा अशी त्यांची भावना असे.

अनेकदा मोठया चित्रपटाचा मुहूर्त लताबाईंच्या ध्वनिमुद्रणानेच व्हायचा. मग ‘माइक’ पुढे नारळ फोडणे, त्याला फुलांचा हार घालणे, सर्वांना पेढे वाटणे हा कार्यक्रम असे. लताबाईंसाठी निर्मात्याने भला थोरला पुष्पगुच्छ आणलेला असायचा. पेढयांची मोठी बॉक्स त्यांना घरी नेण्यासाठी दिली जायची. मग फोटोंचा कार्यक्रम तर हवाच. एरव्हीसुद्धा गाण्याचे ध्वनिमुद्रण झाल्यावर लताबाईंना अनेक फोटोंसाठी उभे राहावे लागे. कधी कवी त्यांना गाणे वाचून दाखवत आहे, कधी संगीत दिग्दर्शक चाल समजावून सांगत आहे, कधी निर्माता त्यांच्या हातात पुष्पगुच्छ देत आहे व त्या हसतमुखाने त्याचा स्वीकार करत आहेत, कधी गाणे ऐकायला आलेल्या मंडळींना त्यांच्याबरोबर आपले फोटो काढून घ्यायचे आहेत अशा कितीतरी ‘पोजेस’ लताबाईंना घ्याव्या लागत. चित्रपटाच्या पब्लिसिटीसाठी काही फोटो हवे असत. एकदा गाणे ध्वनिमिद्रित झाले की लताबाई थकून कंटाळून गेलेल्या असत. स्टूडिओतून कधी बाहेर पडू असे त्यांना झालेले असे. पण कुणाचे मन मोडू नये म्हणून हे सर्व फोटो त्या काढू देत. अगदी प्रसन्न चेहरा करुन फोटोसाठी उभ्या राहात आणि सगळी सर्कस करत. सर्वांच्या आनंदात आपणही सामील होत. एखाद्या वादकाने काही विशेष सुंदर वाजवले असेल तर त्याला तोंड भरुन शाबासकी देत. क्वचित इतरांच्या नकळत एखादी हिरवी नोट त्याला बक्षीस देऊन टाकत.

**कलाकारांविषयी कौतुक :**

अशा हिंडतना लताबाई फार मजेत असत. गाणाऱ्या कलांवतांच्या नकला करुन दाखवत. रेकॉर्डिंग करुन घरी आल्या की त्या दिवशीच्या गाण्याचे वर्णन करत. बरोबर गाणाऱ्या गायकाचा विशिष्ट तना, गाताना झालेला त्याचा गोंधळ, शब्दोच्चारातल्या गंमती सारे हुबेहुब करुन दाखवत. विशेष म्हणजे त्या नकलातुन त्या स्वतःलाही वगळत नसत. एखाद्या गाण्यात त्यांना एकच एक तान पुन्हा पुन्हा घ्यावी लागली असली तर “अहाहा! काय तान होती पण! मी आपली सारखी सारखी तीन तान घेते आहे. तेच तेच गाते आहे!” असे म्हणून आपलीच नक्कल

करुन भरपूर हसत. पण बरोबरचा गायक उत्तम गाइला असेल तर तेही तितक्याच कौतुकाने सांगत. संगीत दिग्दर्शकाने विशेष सुंदर चाल दिली असेल तर दिवसभर म्हणत, "वा! काय छान चाल बांधली आहे. कमाल आहे!" सलिल चौधरी, एस.डी. बर्मन यांच्या काही गाण्यांच्या ध्वनिमुद्रणानंतर त्यांच्या चालींचे लताबाईंनी तोंड भरुन कौतुक केलेले मी ऐकले आहे. पण कधी कधी असेही व्हायचे. एखादा संगीत दिग्दर्शक जुनीच एखादी चाल घेई. तिच्यात नाममात्र बदल करी. आणि ती नवी म्हणून लताबाईंना ऐकवी. त्या वेळी त्या काही बोलत नसत. पण नंतर हळूच म्हणत, "कसली आली आहे नवी चाल? आतापर्यंत एक हजार एक वेळा ही चाल चित्रपटांमध्ये वापरुन झाली आहे." नुसते इतकेच म्हणून त्या थांबत नसत तर रेकॉर्डिंगवरुन परत येताना ती चाल यापूर्वी कधी कधी, कुठे कुठे, कोणकोणत्या चित्रपटांतून येऊन गेली आहे हे ती ती गाणी गुणगुणून आपले विधान त्या पुराव्यानिशी सिद्ध करत. गमतीची गोष्ट अशी की की त्यातली किती गाणी त्यांनी स्वतःच गाइलेली असायची.

ही झाली लताबाईंची व्यावसायिक ध्वनिमुद्रणे. पण याखेरीज त्यांनी आपल्या हौसेने, आनंदासाठी आणि एका सांस्कृतिक कर्तव्यबुद्धीने इतर अनेक गीते ध्वनिमुद्रित केली. भगवद्गीतचे दोन अध्याय, ज्ञानदेवांच्या विराण्या आणि पदे, तुकारामाचे अभंग, 'शिवकल्याण राजा' मधली गीते, गालिबचे गझल, मीरेच्या गीतांचा दोन ध्वनिमुद्रिका हे सारे लताबाईंनी अगत्याने ध्वनिमुद्रित केले. कामांची तुफान गर्दी व रेटा असताना त्यातून वेळ काढून ही गाणी त्यांनी गाइली. हे काम लताबाईंनी एका वेगळ्या भावनेने आणि मनःपूर्वक केले. त्यामुळे त्यांना काही वेगळा आनंद, कृतार्थता लाभली असावी. 'चाला वाहि देस' हे मीरचे गाणे त्यांनी ध्वनिमुद्रित केले त्या दिवशी त्या फार प्रसन्न मनःस्थितीत होत्या. "बरेच दिवस योजलेलं एक काम माझ्या हातुन पार पडलं आज मला फार समाधान वाटतंय." असे त्या म्हणाल्या आणि दिवसभर ध्वनिमुद्रणाचा ताण पडलेला असतानाही घरी गेल्यानंतर त्या कितीतरी वेळ आनंदाने गप्पा मारत राहिल्या.

**कलाकारांबद्दल आदरभाव :**

कलेच्या क्षेत्रात स्वतः इतक्या नामवंत असणाऱ्या लताबाई इतर कलाकारांबद्दलही मनात आदर बाळगतात. सैगल, अमीर खांसाहेब। बडे गुलामअली खां यांसारखे गानतपस्वी कलावंत लताबाईंना आदरणीय वाटतात यात नवल नाही. पण नॅट किंग कोल, बालमुरलीकृष्णा, भीमसेन अशा समकालीनांबद्दलहि पराकाष्ठेचे प्रेम व आदर त्यांच्या ह्रदयात आहे. मद्रासला पी. सुशीला या अभिनेतीचा सत्कार झाला त्यावेळी लताबाई प्रमुख पाहुण्या गेल्या होत्या. मद्रासच्या या मुक्कामात पहिली महत्त्वाची गोष्ट त्यांनी केली ती म्हणजे बालमुरली कृष्णाच्या सर्व ध्वनिमुद्रिका त्यांनी विकत घेतल्या. इतकेच नव्हे तर नंतर आपल्या वडिलांच्या - दीनानाथांच्या - पुण्यतिथीला त्याला मुंबईला आमंत्रण देऊन मुंबईकर श्रोत्यांना त्याच्या गायनाचा लाभ त्यांनी घडवला. भीमसेन जोशींबद्दल त्यांच्या मनात असाच आदरभाव आहे. पुण्याच्या कॉर्पोरेशनने लताबाईंचा गौरव केला. त्यांना मानपत्र दिले, त्यावेळी भीमसेन जोशी आपण होऊन या कार्यक्रमात एक अभंग गाऊन गेले. सर्व कार्यक्रम सुंदर झाला होता. नंतर मी लताबाईंना विचारले,

"आजच्या कार्यक्रमात तुम्हाला सर्वांत कोणती गोष्ट आवडली?"

क्षणाचाही विलंब न लावता लताबाई चटकन म्हणाल्या, "भीमसेनजींनी आपण होऊन माझ्या सत्कारप्रसंगी यावे, गावे, ही मला सर्वांत मोठी गोष्ट वाटली. येवढ्या मोठ्या कलाकाराने या कार्यक्रमात भाग घ्यावा हा माझा मोठाच गौरव आहे -"

**गाण्यावर प्रेम :**

लताबाईंचे गाण्याचे प्रेम आणखीही एका प्रकारे व्यक्त होत असते. त्यांची कामे रोज चालू असतात. अशात एखादे ध्वनिमुद्रण काही कारणाने रद्द झाले तर शाळकरी मुलांना अचानक सुट्टी मिळाल्यावर व्हावा तसा आनंद लताबाईंना होतो. अशा वेळी त्या गाडी काढत आणि निव्वळ फिरण्यासाठी किंवा बरेच दिवसांचे राहून गेलेले शॉपिंग करण्यासाठी बाहेर पडत. कामाचा व्याप नसे. समोर भरपूर मोकळा वेळ असे. अशा वेळी लताबाईंचे वेगळेच रुप प्रकट व्हायचे. त्या अत्यंत प्रसन्न मनःस्थितीत असत. मग त्यांना गाण्याची लहर येई. असे त्यांचे सहज, निर्हेतुक, केवळ स्वतःच्या आनंदासाठी गाइलेले गाणे ऐकणे हा एक विलक्षण सुंदर अनुभव असे. मग लताबाई कधी सैगल, नूरजहाँ यांची खास आपल्या आवडीची गाणी गात, तर कधी जुन्या मराठी नाटकातले नाट्यसंगीत ऐकवत. चित्रपटातले गाणी मधल्या म्यूझिकसकट त्यांना पाठ असावीत यात नवल नाही. पण जुन्या नाट्यसंगीताचे त्यांचे पाठांतरही तितकेच पक्के आहे. 'भावबंधन' मधली अनेक गाणी त्यांना पाठ आहेत. कारण त्या नाटकात त्यांनी स्वतः काम केलेले आहे. पण एकदा अशा भ्रमंतीत 'स्वयंवर', 'सौभद्र', 'संशयकल्लोळ', 'मानापमान' यातली किती तरी सुंदर गाणी त्यांनी मजेत मनाचया मुक्त लहरीत मला ऐकवली. 'सौभ्रदा' तली 'बहुत दिन नच भेटलो सुंदरीला' ही प्रसिद्ध दिंडी जुने नट म्हणत असत त्या पद्धतीने, तशा तना घेऊन त्यांना गाइली. 'नच सुंदरि करु कोपा' हे गाणे झाले. त्यानंतर 'सुजन कसा मन चोरी' हे 'स्वयंवर' मधले गाणे त्यांनी अतिशय गोड हळव्या नाजूक पद्धतीने, गाण्यातल्या प्रेमार्ततेचा, रुसव्याचा भाव विशद करत गाइले. मग त्या म्हणाल्या "आपल्याकडचे नाटकातले नट गाण्याचं शास्त्र जेवढं सांभाळतात तेवढे त्यातल्या हळुवार भावना समजावून घेऊन का गात नाहीत कोण जाणे! आता असल गाणं किती नाजुकपणे गायला हवं. ते आपलं उगाच काहीतरी थिरथिरेपणानं गातात!" मला लताबाईंचे ते विधान मार्मिक वाटले. त्यातही त्यांचा तो 'थिराथरेपणानं' हा शब्द माझ्या विशेष ध्यानात राहुन गेला.

चित्रपटसंगीत, नाट्यसंगीत, रागदारीच्या चिजा या तर मातबर गोष्टी झाल्या. पण यापेक्षा आणखीही काय काय तरी लताबाईंच्याकडून अशा वेळी ऐकायला मिळे. कधी त्या 'रामरक्षे'तला एखादा श्लोक ऐकवत. कधी रामदासांचे 'मारुति स्तोत्र' म्हणत. कधी 'घरे सुंदरे सौख्य नानापरीचे। परी कोण जाणेल हे अंतरीचे' सारखा श्लोक अत्यंत आर्तपणे गाऊन दाखवत तर कधी 'का रे नाठवीसी कृपाळू देवासी पोशितो जगासी एकलाची' सारखा तुकारामांचा अभंग थेट शाळकरी मुलांच्या सुरात, त्या चालीत ऐकवत. एकदा त्यांनी 'जाईजुईच्या झाडाखाली फुलांचा भडिमार ग' अशी एक ओळ मला गुणगुणून दाखवली. मी विचारले, "हे कुठल गाणं आहे?" त्यावर लताबाई म्हणाल्या, "लहानपणी आमच्या दारासमोर येणाऱ्या एका भिकारणीच्या तोंडून ऐकलं होत हे मी." लताबाईंच्या आजी म्हणजे माईंच्या आई ही एक अजब व्यक्ती त्यांच्या घरात होऊन गेली. या आजी उत्तम सतार वाजवत आणि अतिशय गोड गात. कधी आठवण झाली तर लताबाई आजींच्या तोंडून ऐकलेली जुनी गाणी खास आजीच्या पारंपरिक चालीत म्हणून दाखवत. 'दोन प्रहर रात्र झाली ऋषि आले भोजना। निद्रिस्त आम्ही होतो त्यांनी केली गर्जना' हे द्रौपदीचे किंवा 'कुठे तुझे पंचपती दावि गे मला' असे कीचकाचे गाणे लताबाईंच्या गळ्यातून फार सुंदर वाटे. लोकगीतांच्या चालीचा गोडवा त्यात पुरेपूर भरला असे.

**छोट्या सुबक वस्तुची आवड :**

या बालवृत्तीचाच एक आविष्कार म्हणजे लताबाईंना असलेली छोट्या, सुबक, सुंदर वस्तूंची आवड. त्यांच्या ड्रेसिंग टेबलावर, ड्रावरमध्ये, कपाटात अशा किती तरी वस्तू बघायला मिळत. आणि त्यात सारखी भर पडत असे. छोटी चित्रे, काचेच्या, चंदनाच्या, हस्तिदंताच्या पेट्या व डब्या, रंगीबेरंगी कार्डे, माळा, बाहुल्या, प्राण्यांच्या प्रतिकृती, वापरलेल्या आणि न वापरलेल्या सेंटच्या चित्रविचित्र आकारांच्या बाटल्या अशा वस्तूंचा केवढातरी संग्रह त्यांच्यापाशी आहे. देशातल्या देशात दिल्ली, मद्रास, कलकत्ता, बंगलोर अशा ठिकाणी लताबाईंना वारंवार जावे लागते. गेल्या काही वर्षात गाण्यांच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने परदेशातही त्यांचा केवढा तरी प्रवास झाला आहे. या प्रवासात असल्या वस्तू खरेदी करण्याची लताबाईंना भारी हौस. बरे, ही खरेदी केवळ स्वतःसाठी होईल असे नाही. त्यातल्या कितीतरी चिजा घरच्या मंडळीसाठी, मित्रमैत्रिणींसाठी आणलेल्या असतात. आणि त्या त्यांना देऊन टाकण्यात लताबाईंना अतिशय आनंद वाटतो. स्वतःजवळची एखादी वस्तू कुणाच्या तरी मनात भरली आहे, कुणी तिचे विशेष कौतुक केले आहे असे ध्यानात आले तर अचानक कधीतरी ती वस्तू त्या माणसाला त्या देऊन टाकतात. त्याला चकित, आनंदित करतात. त्याच्या आनंदाने स्वतः आनंदित होतात.

**नीटनेटकेपणा :**

स्वतःजवळच्या वस्तू नीटनेटक्या ठेवणे ही लताबाईंची आणखी एक आवड. एकुणच त्यांच्या स्वभावात कमालीचा नीटनेटकेपणा, चोखंदळपणा, टापटीप आहे. कपाटात शेकडो साड्या असतात. पण प्रत्येक साडीवरचा ब्लाऊज ठरलेला. त्या साडीवर तोच ब्लाऊज हँगरला लावून ठेवलेला दिसेल. त्यात कधी चुकून सुद्धा बदल व्हायचा नाही. कागदपत्रे, फोटाचे आल्बम, भेटीदेखील आलेल्या वस्तू, शाली, कोट, स्वेटर प्रत्येक वस्तू जिथल्या तिथै अगदी व्यवस्थित ठेवलेली असते. त्यामुळे आपल्याजवळच्या इतक्या सामानातूनही पाहिजे त्या वेळी पाहिजे ती वस्तू, फोटो, पत्रे, सेंट्स - नेमके त्या शोधून काढतात. सुट्टीच्या दिवशी जरा सवड मिळाली तर सारे कपाट, ड्रेसिंग टेबल, ड्रॉवर्स स्वतः उघडतील. सामान बाहेर काढतील. स्वच्छ कपड्याने धूळ पुसून काढतील. लहान लहान वस्तू ओल्या फडक्याने पुसतील आणि सारे पुन्हा जिथल्या तिथे नेटके लावून ठेवतील. यामध्ये वस्तूंचा लोभ नसतो. त्यांच्या सौंदर्याची, नाजुकपणाची कदर असते. जपणूक असते. कुठल्याही सुंदर कलापूर्ण गोष्टींचा अपमान व्हावा हे लताबाईंना आवडत नाही. त्या दुःखी होतात.

**भेटवस्तू देण्याची आवड :**

माणसांना भेटी देणे, वस्तू देणे ही लताबाईंच्या अत्यंत आवडीची गोष्ट. घरातल्या तर सर्व माणसांचे वाढदिवस त्या प्रेमाने साजरे करतातच पण मित्रमंडळींना, त्यांच्या मुलाबाळांना देखील वाढदिवसाच्या निमित्ताने भेटी पाठवणे सतत चालू असते. भेटवस्तू देण्याचीही लताबाईंची खास पद्धत आहे. कुणाला काही कसे तरी देण्यात त्यांना गंमत वाटत नाही. भेटीची वस्तू शोभिवंत कागदात नीट गुंडाळतील. चिकटपट्टी लावून कागदाच्या कडा बंद करतील. पुस्तके, साड्या अशा वस्तूंना कागद गुंडाळणे सोपे आहे पण अडनेड्या आकाराच्या सेंटच्या बाटल्या, बाहुल्या अशा वस्तू देखील लताबाई इतक्या रेखीव नेटकेपणाने 'पॅक' करतात की बघतच राहावे. त्यानंतर त्यावर सुबक आकाराचे एक छोटे कार्ड लावतील. आपल्या हाताने शुभेच्छा व अभिनंदन लिहितील. खाली स्वतःची सही करतील. मग ती वस्तू त्या व्यक्तीकडे प्रेमाने, इतमानाने पाठवून देतील.

**शिवाजी विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी :**

अलिकडे अगदी शेवटी त्यांच्याबरोबर प्रवास करण्याची संधी मला मिळाली ती लताबाई कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाची डॉक्टरेटची पदवी घेण्यासाठी कोल्हापूरला गेल्या तेव्हा. योगायोग असा की, त्यावेळी घरात आजार, कामे अशा अडचणींमुळे कुणालाच त्यांच्याबरोबर येता येणे शक्य नव्हते. लताबाईंनी मला बरोबर येणार का म्हणून विचारले. मी लगेच तयार झाले. पहाटे आम्ही मुंबईहून निघालो. छोटी फियाट गाडी होती. सोबत ड्रायव्हर व त्याचा दहा वर्षाचा मुलगा एवढे दोघेजण होते. प्रवासात लताबाई ट्रॅन्झिस्टरवर कुठली तरी क्रिकेटची मॅच ऐकत होत्या. मध्येच त्यांनी टेपवर 'रझिया सुलताना' आणि 'शंकर हुसेन' या चित्रपटांतली त्यांनी स्वतःची, त्यांना आवडलेली दोन गाणी मला ऐकवली. कोल्हापूरपर्यंतचा प्रवास अगदी मजेत झाला. लताबाईंनी अनेक गमती सांगून मला खूप हसवले होते. वाटेत सातारला एका छोट्या हॉटेलात आम्ही मजेत खाल्लेही होते. कोल्हापूर हाकेवर आले आणि कळले, गुळाचे की कसले तरी भाव वाढल्यामुळे शेतकरी खूप चिडले आहेत आणि कोल्हापुरात जाणारे बाहेरचे एकूण एक रस्ते त्यांनी रोखले आहेत. मोठीच पंचाईत झाली. रस्ते कधी मोकळे होणार आणि आम्ही गावात केव्हा पोचणार काहीच पत्ता लागेना.

शेवटी ड्रायव्हरने एका आडरस्त्याला, झाडांच्या सावलीत गाडी थांबवली. दिवसभराच्या प्रवासाने माझे पाय आंबून गेले होते. अंग दुखत होते. चहा फार हवासा वाटत होता. वाटेत असे थांबावे लागेल याची मला भयंकर चीड आली. पण कुणावर चिडायचे तेही कळेना. लताबाई मात्र शांत होत्या. त्या म्हणाल्या, "चला खाली उतरुन जरा पाय मोकळे करु. नाही तरी आता आपण काय करु शकणार ?"

आम्ही खाली उतरलो. रस्त्याच्या कडेला वडाची, पिंपळाची, पिंपरणीची झाडे उभी होती. सूर्य मावळतीला टेकला होता. त्याचे तिरपे किरण झाडांच्या गर्दीतून भाल्यासारखे घुसले होते. रस्त्याच्या लगत खाली एक छोटासा ओढा वाहत होता. खेड्यातल्या बायका तिथे धुणी धूत होत्या. एकूण वातावरण रम्य होते. लताबाईंनी कॅमेरा काढला. भराभरा फोटो घेतले. मगजवळची थोडी बिस्किटे काढून त्यांनी ती मला दिली. आपण खाल्ली. एकीकडे थट्टाविनोद, कोट्या चालूच होते. मी मात्र रडकुंडीला आले होते. इतक्यात दोन तरुण मुले सायकलीवरुन दोनदा तीनदा त्या रस्त्याने गेली. ती दुरुन लताबाईंकडे बघत होती. शेवटी ती जवळ आली. नमस्कार करुन उभी राहिली. मग त्यातल्या एकाने नम्रपणे लताबाईंना म्हटले, "आम्ही आपल्याला ओळखले. इकडे कुठे ?"

लताबाईंनी आपण कोल्हापूरला कशासाठी जात आहोत ते त्यांना सांगितले. आणि वाटेत आपल्याला का थांबावे लागले त्याचाही खुलासा केला. ती मुले म्हणाली, "आम्ही मारवाडी आहोत. हे पेठ नावाचं गाव आहे. आम्ही कापडाचे व्यापारी. जवळच आमचं इथं गोडाऊन आहे. आपण तिथे येऊन जरा विश्रांती घ्या. चहापाण्याची व्यवस्था करतो. आपण आमच्याकडे आलात तर आम्हाला फार बरं वाटेल."

लताबाईंनी लगेच होकार दिला. त्या दोघा भावांनी आम्हाला आपल्या गोडाऊनमध्ये नेले. तिथे त्यांचे नोकरचाकर होते. आम्हाला प्यायला पाणी मिळाले. चहाचीही व्यवस्था झाली. तेवढ्यातल्या तेवढ्यात त्या दोघा भावांनी कुटूनतरी केळी संत्री अशी फळे आणवली. लताबाईंचा पाहुणचार केला लताबाईही गप्पा मारण्यात रमल्या. मारवाडामधले त्या मुलांचे गाव, त्यांची

कुलदेवता, इथल्या त्यांच्या धंद्याचे स्वरुप या साऱ्या गोष्टींची त्यांनी आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्या इतक्या शांत, प्रसन्न होत्या. जणू संबंध दिवसभराचा मोटारीचा प्रवास त्यांनी केलेलाच नव्हता. जणू त्या थकलेल्याच नव्हत्या. जणू प्रवासात आलेल्या विक्षेपाचा त्यांच्या मनावर परिणाम झालेलाच नव्हता. लताबाई शांत असल्या तरी त्या दोघा भावांना लताबाईंची झालेली गैरसोय बघून वाईट वाटत होते. शेवटी त्यातल्या एकाने विचारले, "आम्हाला आपल्यासाठी काही करता येईल का?" क्षणभर विचार करुन लताबाई म्हणाल्या, "येवढच करा, तुमचा फोन आहे का?" "हो. आहे." "मग मी दोन फोन करते. एक कोल्हापूरला स्टुडिओत अन् दुसरा मुंबईला घरी. मी अजून आले नाही म्हणून स्टुडिओत लोक काळजी करत असतील. अन् घरी माझा फोन नाही म्हणून स्टूडिओत लोक काळजी करत असतील. अन् माझा फोन नाही म्हणून ती मंडळीही चिंतेत असतील." लताबाई म्हणाल्या.

दोन्हीकडे फोन केल्यावर मगच त्यांना हायसे वाटले.

### साधेपणा, मनमिळावू स्वभाववृत्ती :

लताबाईंच्या स्वभावात काही गमतीदार विरोध आहेत. रेकॉर्डिंगला जाताना अतिशय साध्या, प्रायः अलंकारविहीन असणाऱ्या लताबाई एखाद्या दिवशी पाचूची अंगठी हौसेने बोटात घालून जातील. रोजच्या कामात साध्या सुती किंवा बंगाली साड्या नेसणाऱ्या लताबाई सेंट वापरतील तो मात्र अगदी निवडक. खूप महागाचा, 'खैवर', 'ताज' सारख्या उंची हॉटेलात भावंडांना, मित्रमैत्रिणींना जेवू घालणाऱ्या लताबाई त्यांच्यासह पूर्वी सिनेमाला जात त्या आधी फॅमिली सर्कलची तिकिटे काढून जात. सर्वसामान्य प्रेक्षकांत मजेने बसत. चित्रपटव्यवसायातले प्रीमियर शोज, त्यानंतरच्या पार्ट्या, समारंभ, धनिकांघरची जेवणाची आमंत्रणे यांना नकार देणाऱ्या लताबाई साध्या गरीबाऊ घरात जाऊन तिथला साधासुधा पाहुणचार आनंदाने घेतील इतकेच नव्हे तर आपल्या विलक्षण साधेपणाने, मनमोकळ्या अकृत्रिम हसण्याबोलण्याने, अत्यंत प्रसन्न व्यक्तित्वाने त्या घरातल्या लोकांना अगदी खूप खूष करुन टाकतील. साऱ्या सुंदर आणि वैभवसंपन्न गोष्टींचा रसिकपणे आस्वाद घेणाऱ्या लताबाई पुन्हा त्या साऱ्यांतून तेवढ्याच निर्लेपपणे बाजुला होतील. आता मित्रमैत्रिणींच्या, भावंडांच्या मेळाव्यात बसून हास्यविनोदात रंगलेल्या लताबाई दुसऱ्या घटकेला तितक्याच मनःपूर्वकतेने, एकाग्र तन्मयतेने गाण्याच्या रिहर्सलमध्ये गढून गेलेल्या दिसतील. लताबाईंना माणसांची फार आवड आहे. त्यांचा मित्रपरिवार विविध स्वरुपाचा, मोठा आहे. पण या साऱ्या मेळाव्यात अत्यंत रमणाऱ्या लताबाई अगदी एकट्या देखील मजेत राहू शकतात. पन्हाळ्यावरच्या आपल्या बंगल्यात त्या विश्रांतीसाठी जातात तेव्हा फक्त स्वतःच्या संगतीचे सुख त्यांना पुरेसे वाटते. मग त्या रामकृष्ण परमहंसांची पत्रे, ग्रंथ वाचतात. आवडत्या विवेकानंदांचे पुन्हा एकदा पारायण करतात किंवा शिवचरित्रात अबगाहन करतात. नाहीतर मग त्या आपला कॅमेरा काढतात आणि मावळता सूर्य, एखादे लहान मूल, एकाकी निष्पर्ण वृक्ष, उमलते फूल अशांची छायाचित्रे घेण्यात रमतात. त्या उत्कृष्ट फोटो काढतात.

### स्नेहभाववृत्ती :

मला स्वतःला लताबाईंनी भरभरुन स्नेह दिला. मुंबईला मी होते तेव्हा माझ्या बारीकसारीक अडचणी, तशाच मोठ्या समस्या त्या आस्थेने, सह्रद्रयतेने समजून घेत. सल्ला विचारला तर तोही देत. माझ्या कामात त्यांनी सतत रस घेतला. त्यांचा परिचय झाला तेव्हा मला माणसांत बसणे उठणे, वाद्यविषयक गप्पा मारणे यांची अतिशय आवड होती. ते लताबाईंच्या

ध्यानात आले असावे. एकदा त्या म्हणाल्या, "शांताबाई, माणसं आवडणं, गप्पा आवडणं हे सारं ठीक आहे, त्यात काही वावगं नाही. पण तुम्हाला एक सांगू? कधी कधी तुम्ही अगदी एकट्या राहायला शिका. केव्हातरी स्वतः स्वतःच्याच संगतीत राहणं फार चांगलं असतं. आपलीच आपल्याला एक वेगळी ओळख पटते."

माझ्याबद्दल त्यांना वाटणारी आस्था अनेक रीतींनी प्रकट होत असे. वांद्र्याला 'साहित्य सहवास' मध्ये आम्ही फ्लॅट घेतला. त्याबद्दल त्या सतत चौकशी करत. फ्लॅट आमच्या ताब्यात आला तेव्हा त्यांनी एकदा मला विचारले, "आता वास्तुशांती करणार की नाही?" फ्लॅटचे पैसे भरता भरता मी जिकिरीला आले होते. शेवटचा हप्ता देताना तर माझी अगदी तारांबळ उडाली होती. मी काहीशा विरक्तपणे म्हटले, "मी कसली वास्तुशांती करणार? ते खर्चाचं काम आहे..." आणि मग एकदम काही कल्पना सुचून मी म्हणाले, "तुम्हीच येऊन गणपतीच्या चित्राची पूजा कराल का? आम्ही तीच वास्तुशांत समजू."

मी असे म्हटले खरे. पण लताबाई येतील असे मला खरोखर वाटत नव्हते. एक तर त्या आजारी होत्या. दुसरे म्हणजे हृदयनाथचे लग्न ठरले होते. त्याची खरेदी, पत्रिका वाटणे हे सारे काम चालू होते. पण लताबाईंनी माझ्या विनंतीला तात्काळ मान दिला. गुढी पाडव्याच्या मुहूर्त साधून त्या 'साहित्य सहवास'मध्ये आल्या. बरोबर मीनाताई, त्यांची मुले, ड्रायव्हर होता. आल्यावर त्यांनी गणपतीची पूजा केली. पथ्य असल्यामुळे त्या काही खाणार नव्हत्या. पण कपभर दूध त्यांनी घेतले. बराच वेळ आमच्याकडे घालवला. फ्लॅटचे तोंड भरुन कौतुक केले. आणि तिथून मग त्या पत्रिका वाटण्यासाठी बाहेर पडल्या. त्यांच्या दिलदार, स्नेहशील स्वभावाचे एक सुंदर दर्शन त्या दिवशी मला घटले.

**साधेपणा निर्मळ स्वभाव :**

फार तरुण वयात कीर्तीचे, संपत्तीचे, लोकप्रियतेचे लोटच्या लोट अंगावर कोसळले. पण त्या कशाचेही ओझे लताबाईंनी होऊ दिले नाही. एवढ्याशा कीर्तीने, पैशाने, मानसन्मानाने माणसे किती बिघडतात. त्याखाली ती कशी मोडून जातात. लताबाईंनी सारा मोठेपणा अंगावरुन असा सहज जाऊ दिला आहे. त्यामुळेच त्या इतक्या साध्या, निर्मळ, स्वाभाविक राहिल्या आहेत. मान-सन्मानाबद्दलची त्यांची निरिच्छता गंमतीदार रीतीने व्यक्त होत असते. स्वतःची सुंदर रेकॉर्ड असेल तर ती त्या कौतुकाने ऐकवतील. पण स्वतःला मिळालेली मेडल्स, मानचिन्हे मात्र सहज विसरुन जातील. त्यांच्या घरी मी जाई तेव्हा एखादे नवे मानचिन्ह घरात दिसे. कधी एखादे मेडल मिळालेले असे. कधी बंगालच्या किंवा मद्रासच्या फिल्म जर्नालिस्ट असोसिएशनचे गौरवाचे मानपत्र धाडलेले असे. पण त्याविषयी लताबाई स्वतः चुकूनही बोलत नसत. मी कुतुहलाने विचारले तर थोडक्यात त्याची माहिती देऊन वेगळाच विषय सुरु करत. त्या तिरुपती मंदिराच्या आस्थान गायिका आहेत. खैरागड युनिव्हर्सिटीने त्यांना डॉक्टरेट दिली आहे. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' पदवी दिली आहे. इतरही अनेक गौरव त्यांच्या पायाशी लोळण घेत आले आहेत. पण हे सारे त्यांनी सहजपणे स्वीकारले. चित्रपट व्यवसायातली पंचवीस वषे पूर्ण झाली. वृत्तपत्रांनी लताबाईंबद्दल लेख लिहिले. सर्वत्र त्यांचे गौरव झाले. 'हिज मास्टर्स व्हॉइस' ने त्यांच्या सन्मानार्थ ताजमध्ये थाटाची पार्टी दिली. पण या साऱ्या सोहळ्यात लताबाई तशाच साध्या होत्या. वेळी स्वतःचीही थट्टा करत होत्या. सत्कार समारंभ संपला. माणसांची घरी सुरु असलेली वर्दळ संपुष्टात आली. गौरवाच्या पुष्पमाळा, पुष्पगुच्छ यांचा सुगंधही ओसरला. आणि एके दिवशी लताबाई हसत हसत म्हणाल्या,

**समारोप :**

लताबाई गायन क्षेत्रात देशात नाही जगात आपले नाव लौकिक त्यांनी मिळविले आहे. भारतरत्न हा सर्वोच्च बहूमान त्यांनी मिळविले आहे. इतके यश संपादन करुनही त्यांनी आपल्यातील साधेपणा त्यांनी जपला आहे. विनोदी, प्रसन्न वाटणाऱ्या लताबाई ?अंतर्यामी एक उदास सुर आहे. कसल्याही ऐहिक गोष्टीच्या उणिवेतून तो सूर निर्माण झालेला नाही. खोल विचारी, संवेदनशील, कलांवत ह्रदयाला जाणवणाऱ्या असीम करुणेतून त्या सुराचा उगम झाला आहे. मानवी जीवनाच्या मुलभूत एकाकीपणातून, व्यथेतून वेदनेतून तो सूर उमटलेला आहे. या सुराने लताबाईंना श्रेष्ठ कलावंत केले. त्यानेच गाढ सहानुभूती त्यांना दिली. दुसऱ्याच्या दुःखाशी चटकन समरस होण्याची शक्ती त्यांना दिली. आणि त्याबरोबरच अपार सोशिकपणाही त्यांना दिला. मोठ्या कलावंताचे हे सर्वश्रेष्ठ वैभव लताबाईंना लाभले आहे. त्याने त्यांना फार थोर केले आहे. त्याबरोबरच त्यांना अत्यंत नम्रही केले आहे.

❖❖❖❖

munotes.in

# घटक-४

## मराठी लेखनाचे नियम व विरामचिन्हे

**घटक रचना :**

४.० प्रस्तावना
४.१ विरामचिन्हाचे प्रकार
४.२ विरामचिन्हाची उदाहरणे
४.३ सरावासाठी
४.४ संदर्भ ग्रंथ सुची

## ४.० प्रस्तावना

मराठी व्याकरणामध्ये विरामचिन्हे महत्त्वाची आहेत. आपण वाचताना किंवा लिहिताना अर्थ नीट लक्षात यावा म्हणून विरामचिन्हाचा वापर केला जातो. आपल्याला शब्द वा वाक्ये यामध्ये कमीअधिक वेळ थांबावे लागते. हे थांबणे कोठे व किती असावे हे समजण्यासाठी जी चिन्हे वापरतात. त्यांना 'विरामचिन्हे' म्हणतात.

'विराम' म्हणजे विश्रांती असा त्याचा अर्थ आहे. ही विश्रांती कोठे-किती घ्यावी हे दाखविण्यासाठी जी चिन्हे वापरतात त्यांना विरामचिन्हे असे म्हणतात. अशी विरामचिन्हे दोन प्रकारची आहेत. १) अर्थबोधक, २) विरामदर्शक. उदा. पूर्णविराम (.) हे विरामदर्शक आहे तर प्रश्नार्थक ( ?) हे अर्थबोधक आहे.

## ४.१ विरामचिन्हाचे प्रकार

विरामचिन्हांचे नेमके किती प्रकार पडतात याविषयी व्याकरणकारांमध्ये मतभेद दिसत असले तरी सर्वानुमते ते मुख्यतः खालीलप्रमाणे पडताना दिसतात.

१) पूर्णविराम (.) वाक्याच्या शेवटी देतात.
२) अर्धविराम (;) मोठ्या वाक्यात मध्येच वाक्यांश पूर्ण झाला असता देतात.
३) स्वल्पविराम (,) वाक्याच्या मध्ये वा शब्दानंतर थोडेच थांबायचे असल्यास हे देतात.
४) प्रश्नार्थक चिन्ह ( ?) वाक्यात प्रश्न केला असता हे देतात.
५) उद्गारवाचक चिन्ह ( !) वाक्यात भावप्रदर्शनासाठी हे देतात.
६) अवतरण चिन्हे ('-') व ("-") वाक्य लहान असता एक, पण चित्तवेधासाठी दोन देतात.
७) कंस (कौंस) ( ) व *( )* स्पष्टीकरणासाठी एकेरी व वाक्यातील गौणवाक्यासाठी दुहेरी कंस वापरतात.

munotes.in

८) अपसारण चिन्ह (-) मजकुराच्या स्पष्टीकरणासाठी वापरतात.
९) विग्रह चिन्ह (-) सामासिक शब्दातील अवयवांची तोड करण्यासाठी वापरतात.
१०) संयोग व समन्चय चिन्ह (-) तोडलेले शब्द जोडण्यासाठी वापरतात.
११) अपूर्ण विराम वा उपपूर्ण विराम चिन्ह (:) तपशिलासाठी वापरतात.

## ४.२ विरामचिन्हाची उदाहरणे

| क्र. | चिन्ह-नाम | चिन्हरुप केव्हा देतात? | प्रत्यक्ष उदाहरण |
|---|---|---|---|
| १. | पूर्णविराम | १. वाक्य पूर्ण झाले असता | १. त्याने भाषण केले |
| | | २. संक्षेपार्थाने | २. उदा. वि.सू. (विशेष सूचना) |
| २. | अर्धविराम | १. दोन वाक्यांचा संयोग व वियोग दाखविताना | १. ते गेली; व लगेच आले |
| | | २. उभयान्वयी अव्ययांनी ती जोडली असता | २. ती आली होती; पण लगेच निघून गेली |
| ३. | स्वल्पविराम | १. अल्पांशाने थांबविण्यासाठी | १. तुम्ही जा, पण लवकर या |
| | | २. दोन शब्द तोडण्यासाठी | २. वाघ, सिंह, हत्ती, अस्वल हे जंगली प्राणी आहेत. |
| | | ३. संबोधनप्रसंगी | ३. शाम, तू जा. |
| ४. | प्रश्नार्थक चिन्ह ? | प्रश्नार्थक वाक्याअंती | पाऊस पडला काय ? |
| ५. | उद्‌गारवाचक चिन्ह | ! | भावना व्यक्त करण्यासाठी |
| ६. | अवतरण चिन्हे | ‘ ’ “ ” | १. संभाषण दर्शविण्यासाठी तसेच उद्‌गार दर्शविण्यासाठी (एकेरी) |
| | | | २. एखाद्या वाक्यावर जोर देण्यासाठी (दुहेरी) |
| | | | ३. “प्रेमाने मन जिंकता येते.” |
| ७. | कंस (कौंस) ( ) | १. स्पष्टीकरणासाठी (एकेरी) | १. मराठी राज्याच्या खरा वारस शिवाजी (संभाजी पुत्र) हा त्यावेळी फक्त सहाच वर्षाचा होता. |
| | | २. एका वाक्यात दुसरे वाक्य असता (दुहेरी) | २. संत म्हणतात की, ‘तुकारामांनी लिहिलेली गाथा (अभंगांची (संग्रहाची) गाथा) इंद्रायणीत बुडविली होती.’ |
| ८. | अपसारण | १. पहिला मजकूर जास्त स्पष्ट करण्यासाठी किंवा | १. रात्र अतिशय शांत व रमणीय होती - ती शरदातील पौर्णिमाच होती. |
| | | २. मध्येच सुचलेला मजकूर घालण्यासाठी (मोठी रेघ) | |

munotes.in

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | विग्रहचिन्ह | सामासिक शब्दातील निरनिराळे अवयव भिन्न करण्यासाठी (लहान रेघ) | अमर-अकबर-अँथोंनी मित्र होते आपले कोल्हापूर शहर समृद्ध आहे |
| १०. | संयोग वा समन्वय चिन्ह | पहिल्या ओळीतील सुटलेला शब्द जोडण्यासाठी | विदर्भातील लोक हुशार आहेत. |
| ११. | अपूर्णविराम वा उपपूर्ण (विरामचिन्ह) | एखाद्या बाबीचा तपशील देण्यासाठी | तुम्ही याल तेव्हा सोबत सर्व शालेय साहित्य : खडू, फळा, डस्टर, फूटपट्टी इ. घेऊन या. शाळेतील सर्व इयत्तांची मुले शाळा सोडून गेली : पहिली, दुसरी, तिसरी व चौथी. |

## ४.३ सरावासाठी

पुढील उताऱ्यामध्ये विरामचिन्हाचा वापर करुन शुद्ध करुन लिहा.

**उतारा क्रमांक १**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असे शास्त्रज्ञ सांगतात. काही शास्त्रज्ञांच्या मते तर समाज करुन राहण्याची वृत्ती ही मानवाच्या उपजत प्रवृत्तीपैकीच एक प्रवृत्ती आहे. मनुष्याला समाज करुन राहणे आवडते, इतकाच याचा अर्थ असेल तर या विधानाला हरकत घेण्याचे कारण नाही, पण समाज एकत्र टिकवून धरण्यास जे गुण अंगी लागतात ते मानवाच्या अंगी सहजच असतात, उपजतच ते त्याला प्राप्त झालेले असतात, असा जर शास्त्रज्ञांचा अभिप्राय असेल तर मग मात्र त्यांच्या विधानावर अनेक शंकानुशंका, अनेक आक्षेप मनात निर्माण होऊन त्याची सत्यता मनाला पटेनाशी होते. आतापर्यंतच्या मानवाच्या चरित्राकडे पाहिले तर स्वार्थ, मत्सर, अहंभाव, संकुचित दृष्टी इत्यादी गुणांमुळे माणसाची स्वभावतः विघटनेकडेच प्रवृत्ती असते आणि संघटना घडविण्यासाठी त्याला अनंत प्रयत्न करावे लागतात. जिवाचा आटापिटा करावा लागतो, आणि इतकेही करुन पुष्कळ वेळा अपयशच पदरी येते, असे दिसते. अनेक कारणांमुळे छिन्नभिन्न, विघटित झालेल्या समाजाला संघटित करुन त्याला स्वधर्म, स्वदेश यांची सेर करण्यास प्रवृत्त करणारा मनुष्य हा महापुरुष ठरतो, त्याला लोक विभूती समजतात.

युद्धपूर्व काळापेक्षा युद्धोत्तर काळात महाराष्ट्रातल्या नियतकालिकांचे स्वरुप बदलले आहे. आकांक्षा, अभिरुची व ज्ञान या बाबतीत बदलेला वाचकवर्ग लक्षात घेऊन धोरण आखल्यास वृत्तपत्रे यशस्वी होतील गतकाळात पुढाऱ्यांपुढे ब्रिटिश सत्तेशी अन्यायनिवारणार्थ संग्राम करणे, जनजागृती करणे हीच ध्येये होती. याकरिताच त्यांनी वृत्तपत्रांत लेखन केले. गतकाळातला संपादक हा देशभक्त व देशभक्ता हा संपादक होता. हालअपेष्टा भोगूनही संपादक जनतेच दुःखे मांडते. वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा नसून एक धर्म होता, हे जुन्या वृत्तपत्रांवरुन कळते. ऐषारामात राहण्यासाठी वृत्तपत्रांचा मार्ग नव्हता. संपादकांचा व्यवसाय निर्धनतेचा व सोशिकतेचा होता.

## ४.४ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी
२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.
३) व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे.
४) व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
५) व्यावहारिक मराठी - भाग - २ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड.
६) व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार - प्रा. चंद्रहास जोशी
८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖❖❖❖

munotes.in

# घटक-५

## वृत्तपत्रांसाठी वृत्त लेखन

**घटक रचना :**

५.० प्रस्तावना
५.१ वृत्तलेखन
५.२ 'वृत्त' म्हणजे काय... ?
५.३ बातमीविषयी
५.४ आंतरराष्ट्रीय बातमी
५.५ वृत्तांत लेखन (वर्तमानपत्रासाठी)
५.६ संदर्भ ग्रंथसूची

### ५.० प्रस्तावना

विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील वृत्त लेखन (बातमीलेखन) परिचय व्हावा यासाठी 'वृत्तलेखन' व 'वृत्तांत लेखन' अभ्यासकाला लावण्यात आला आहे. 'वृत्तलेखन' किंवा 'वृत्तांत लेखन' आठ गुणासाठी विचारले जाते.

### ५.१ वृत्तलेखन

समाजामध्ये प्रसारमाध्यमाना महत्त्वाचे स्थान आहे. आज अनेक प्रसार माध्यमे असली तरी वर्तमानपत्राचे महत्त्व कमी झाले नाही. वर्तमानपत्र लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. सकाळी उठल्यानंतर काही व्यक्तींना वर्तमानपत्र वाचण्याची सवय आहे. तर काही चहा पीत वर्तमानपत्र वाचतात. तळागाळातील साक्षर माणसांपासून ते उच्चभ्रू माणसांपर्यंत सगळ्यांना वर्तमानपत्र वाचण्याची आणि बातम्या ऐकण्याची सवय असते. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील देशातील आणि विदेशातील सर्वप्रकारच्या घडामोडीची माहिती बातम्यामधून प्रसिद्ध होते. वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचल्याने वाचकाचे ज्ञान वाढते. समाजामध्ये घडणाऱ्या घटनाचा स्वतःच्या समाजजीवनावर कोणता परिणाम होतो काय... ? असाही विचार तो करतो. म्हणजे स्वतः आणि स्वतःबरोबर समाजाचा विचार करायला भाग पाडते. म्हणून वर्तमानपत्र लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो.

### ५.२ 'वृत्त' म्हणजे काय...?

'वृत्त म्हणजे बातमी' आजच्या आधुनिक विज्ञानयुगामध्ये प्रसारमाध्यमांना महत्त्वाचे स्थान आहे. 'वृत्त' लोकांपर्यंत पोचवण्याची वेगवेगळी प्रसारमाध्यमे आहेत. या प्रसारमाध्यमांमध्ये

वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शनसंच (टि.व्ही.) ही प्रमुख माध्यमे आहेत. तर आज इंटरनेटच्या माध्यमांतून 'वृत्त' प्रसारीत केले जाते. या सर्व माध्यमाचा विचार केल्यास पहिल्यापासून आजपर्यंत 'वृत्तपत्रे' हे प्रभावी माध्यम बनले आहे.

**'वर्तमानपत्र' विषयी :**

'वर्तमानपत्र' हे दृश्य आणि वाचनीय असे प्रसारमाध्यम आहे. जगातील आणि देशातील प्रमुख भाषाबरोबरच प्रादेशिक भाषामधून वर्तमानपत्रे निघतात. किमान लिहिता वाचता येणारे लोक आज वर्तमानपत्र वाचतात. सर्वसामान्य लोक वर्तमानपत्र विकत घेऊन वाचू शकतो. कारण वर्तमानपत्राची किंमत कमी असते. जे वर्तमानपत्र विकत घेत नाहीत असे व्यक्तीसुद्धा वाचनालयामध्ये जाऊन अथवा शेजाऱ्याच्या घरी वर्तमानपत्र येत असल्यास ते घेऊन वाचतात. म्हणजे वर्तमानपत्र वाचणारा एक वर्ग आहे. त्यांना वर्तमानपत्र वाचायला नाही मिळाल्यास अस्वस्थ वाटते. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत वर्तमानपत्र लोकप्रिय माध्यम आहे.

मराठीमधील पहिले वृत्तपत्र म्हणून बाळशास्त्री जांभेकरांच्या दर्पणाला मान देतो. 'दर्पण' १९३२ मध्ये सुरु झाले. हे वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये होते. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी केसरी आणि आगरकरांचे सुधारक हे वृत्तपत्र सुरु झाले. या वृत्तपत्रांची तत्कालीन कामगिरी महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रातील बातम्याचा परिणाम समाजमनावर राजकारणावर होतो. म्हणजेच लोकांना भडकावणे लोकांची समजूत घालणे, त्यांना जागृत करणे, समाजात घडणाऱ्या विविध क्षेत्रातील घटनांची माहिती वर्तमानपत्रातील बातम्यांमुळे होते. वर्तमानपत्र हे नित्य नव्या आणि ताज्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. अलिकडच्या काळात वर्तमानपत्रातून अर्थविषयक, शिक्षणविषयक आणि सांस्कृतिक घडामोडीसाठी वर्तमानपत्रातून खास राखीव पाने असतात. वर्तमानपत्र वाचकांचा दैनंदिन घडामोडींबरोबरच आपल्या आवडीच्या क्षेत्रातील बातम्या वाचतात.

मराठी भाषेतील लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ, लोकमत, पुढारी, तरुण भारत, नवाकाळ अशी महत्त्वाची दैनिक आहेत. प्रत्येक जिल्हानुसार, भागानुसार काही दैनिक प्रकाशित होतात. उदा. गोवामध्ये गोमंतक, ठाणे जिल्ह्यात गावकरी, कोकणामध्ये सागर अशी काही दैनिक आहेत. प्रत्येक वर्तमानपत्राची प्रत्येक दिवसाची पाने ठरलेली असतात. पहिले पान, संपादकीय पान, जाहिरातीचे पान, शहरी भागातील बातम्यासाठींचे पान, प्रादेशिक बातम्यासाठी पान, सांस्कृतिक बातम्याचे पान, क्रीडाविषयक घडामोडीच्या बातम्या असणारे शेवटचे पान असते. तर आठवड्यातील काही दिवस खास पुरवण्या काढल्या जातात. त्यामध्ये युवावर्गासाठी पुरवणी, महिलावर्गासाठी पुरवणी तर रविवारसाठी खास पुरवणी अशा पुरवण्याही असतात. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर देशातल्या, परदेशातल्या स्थानिक शहरातील आणि भागातील प्रमुख बातम्याचा समावेश असतो. आतील संपादकीय अग्रलेखाच्या पानावर स्थुलमानाने संपादकीय अग्रलेख, संपादकीय स्फुटलेखन, दिनविशेष लेख वाचकाचा पत्रव्यवहार असा मजकुर असतो. वर्तमानपत्राच्या आतील पानाची विभागणी केलेली असते. प्रादेशिक बातम्याचे पान, विदेशी, देशी बातम्या, शहरातील विशेष घडामोडी, क्रीडा विषय आणि सांस्कृतिकविषयक बातम्या असे बातम्याची विभागणी पानावर केलेली असते. या व्यतिरिक्त नाटक सिनेमा यांच्या जाहिराती, वेगवेगळ्या कंपन्यांचे घोषणापत्र, निविदा, स्थानिक कार्यक्रम, दिनविशेष, न्यायालयीन नोटीसा, रेडियो टिव्हीवरील कार्यक्रमाची माहिती दिलेली असते.

दररोज प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रातून एवढा मजकूर तयार केला जातो. हा मजकूर तयार करताना तो चुकू नये, त्यातील आकडेवारी योग्य असावी याची खबरदारी घेतली जाते. या व्यतिरिक्त वर्तमानपत्रातून पीटीआय व युएनआय या वृत्तसंस्थांकडून पुरविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या बातम्या प्रसिद्ध कराव्या लागतात. एवढा सगळा लेखनाचा मजकूर तयार करताना तेवढीच जबाबदार व्यक्ती म्हणजे संपादक, कार्यकारी संपादक, उपसंपादक, विभागीय संपादक, सहाय्यक संपादक, वार्ताहर, त्याचबरोबर कॉम्प्युटर ऑपरेटर या सर्वांचा समावेश असतो.

## ५.३ बातमीविषयी

बातमी मिळवणे हे वार्ताहराचे एक कौशल्ये असते. समाजामध्ये अनेक घटना घडतात. त्यापैकी काही घटना ह्या बातमीचा विषय असतात तर काहींना बातमीचा विषय करावा लागतो. 'युवराज पाटील यांची कोनाडगावच्या सरपंचपदी बिनविरोध निवड' किंवा 'संजय गायकवाड यांची पनवेल, आरपीआय शहराध्यक्षपदी निवड'. 'कल्याणमध्ये घरफोडी' बदलापूरमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अतिवृष्टीमुळे सांगलीत ओल्या दुष्काळाची भीती, हे बातीमीचे विषय होतात.

तर आपल्या आजूबाजूच्या परिसरामध्ये, समाजामध्ये काही घटना घडत असतात. त्या शोधून त्यावर बातमी तयार केली जाते. त्याला 'शोधवार्ता' असे म्हणतात. उदा. आपल्या शारीरिक व्यंगावर मात करुन शिक्षण घेण्यासाठी धडपडणारा अपंग विद्यार्थी, सेवाभावीवृत्तीने काम करणारा तरुण, समाजामध्ये विविध क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, कृषीक्षेत्रात प्रयोग करुन अधिक उत्पादन घेणारा शेतकरी या 'शोधवार्ता' म्हणून ओळखले जातात. त्या शोधून काढण्यासाठी जागृत वार्ताहर असावा लागतो.

बातमीविषयी जॉन बोगार्ट यांच्यामते "जेव्हा कुत्रा माणसाला चावतो, त्यात बातमी नसते. तर माणूस कुत्र्याला चावला ही बातमी होते." म्हणजे दैनंदिन घडामोडींपेक्षा वेगळी घटना घडली की तो बातमीचा विषय ठरतो. बातमीदाराला बातमीतले बातमीपण ओळखता आले पाहिजे. बातम्या मिळविण्यासाठी वार्ताहर अथवा बातमीदार जागरुक असतो. बातम्या मिळविण्यासाठी बातमीदारामध्ये स्पर्धा लागली असते.

**बातमी लेखनातील दक्षता :**

बातमी लेखन करत असता बातमीदाराने किंवा वार्ताहराने काही विशेष दक्षता घ्याव्या लागतात. कारण वर्तमानपत्रातून बातमी प्रसिद्ध झाल्याने, त्यांचे समाजात काही प्रतिक्रिया उमटत असतात. बातमीलेखनातील मजकुर सत्य अथवा वास्तवाची मांडणी करणारा असावा लागतो. बातमी लेखनासाठी पुढील क्षमता घ्यावी लागते.

१) बातमी कमी शब्दात अधिक माहिती देणारी असावी.
२) बातमीच अश्लीलपणा किंवा ओंगळपणा असू नये.
३) बातमी एखाद्या व्यक्तीची जाणीवपूर्वक बदनामीकारक असू नये.
४) समाजाला वास्तव माहिती देणे हाच उद्देश असावा.
५) वादग्रस्त बातमी असल्यास दोन्ही बाजूची मते व्यक्त करावीत.

वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध करताना काही विशेष बातम्यांना अग्रक्रम द्यावा लागतो. कारण अशा बातम्या वाचकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. उदा. राजकीय घडामोडी, क्राईम बातम्या, प्रसिद्ध व्यक्तीचे निधन, महत्त्वाच्या आपत्तीकालीन घटना याविषयी बातम्या महत्त्वाच्या असतात. त्या दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध कराव्या लागतात. अशा बातम्याची माहिती गोळा करुन प्रसिद्ध करण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये स्पर्धा लागलेली असते. वर्तमानपत्रातील स्पर्धेमध्ये आपले वर्तमानपत्र टिकवण्यासाठी अशा बातम्या अधिक माहितीनुसार प्रसिद्ध करण्यासाठी स्पर्धा लागलेली असते. त्यासाठी प्रत्येक वर्तमानपत्राचे बातमीदार आपल्या वर्तमानपत्राचा दर्जा टिकवण्यासाठी अशा बातम्या व फोटो प्रसिद्ध करण्यासाठी कष्ट घेतात.

**बातमी लेखन :**

वर्तमानपत्रातील बातमीतून बातमीदार वाचकांशी सुसंवाद साधत असतो. त्यामुळे बातमीची भाषा सर्वसामान्य वाचकालाही कळावी अशी असावी लागते. वर्तमानपत्राची पानाची संख्या फारच कमी असते. त्यामुळे प्रसिद्ध होणारी बातमी ही कमी शब्दात जास्तीतजास्त माहिती देणारी असावी याची दक्षता घेतली जाते. बातमीचे लेखन करताना प्रामुख्याने पुढील सहा गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते.

१) कुठे... ?
२) केव्हा... ?
३) कोणी... ?
४) कशासाठी... ?
५) कोणाला... ?
६) कसे... ?

बातमीचे लेखन करत असताना सर्वात महत्त्वाचा भाग पहिल्यांदा व त्यानंतर कमी महत्त्वाचा भाग असावा लागतो. बातमी लिहिताना ही शिस्त पाळली म्हणजे वृत्तपत्र संपादकाला बातमी काटछाट करताना सोपे जाते. बातमीच्या इतर भागाला धक्क न लागता बातमीतील कमी कमी महत्त्वाचे भाग तो खालच्या बाजूने काटत जातो. वाचकांच्या दृष्टीने अशा बातमीची मांडणी महत्त्वाची असते. वाचक बातमीतील महत्त्वाचा भाग वाचून इतर बातमीचा मजकूर आपल्या वेळेनुसार वाचत असतो. हे लक्षात घेऊन बातमी तशी लिहिली जाते.

वर्तमानपत्रातील बातमी विषयानुसार बातमी लेखनाची शैलीही बदलते. सांस्कृतिक कार्यक्रमाची बातमी लेखन करताना रंगतदार शैली साहित्यिक भाषेत लिहिली जाते तर संमेलनाच्या बातम्याही अशाच स्वरुपाच्या असतात तर सभेची बातमीही सभेतील महत्त्वाच्या घडामोडीचे, ठरावाचे, सभेतील निर्णयाची माहिती देणारी असते. पोलीस ठाण्यातील बातम्या आणि न्यायालयीन बातम्या या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या माहिती देणाऱ्या असतात.

बातमी लेखन करताना पुढील काळजी घ्यावी.

१) साध्या सोप्या भाषेत बातमी लेखन असावे.
२) छोटी छोटी वाक्यरचना असावी.
३) बातमी नेमकी, अचूक असावी
४) बातमी अर्धवट नसावी.
५) बातमी लेखनातून निंदानालस्ती वा बदनामी करण्याचा हेतू बातमी नसावा.

६) बातमी समाजाच्या भावना दुखावणारी चेतावणी देणारी नसावी.
७) बातमी रुढ संकेताचा भंग किंवा कायद्याचा भंग करणारी नसावी.

**वर्तमानपत्रातील इतर मजकूर :**

दररोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र केवळ बातम्यासाठीच वाचली जात नाहीत तर बातम्या आणि बातमीपत्राच्या ऐवजी इतर बरीच माहिती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केली जाते. वर्तमानपत्रातून संपादकीय, अग्रलेख, स्फुटलेख, सांस्कृतिक इतिवृत्ते, वाचकाचे पत्रव्यवहार स्थानिक कार्यक्रम वैचारिक लेख आकाशवाणी व दूरदर्शनवरील दैनंदिन कार्यक्रमांची माहिती दिनविशेष, बाजारभाव, हवामानाचा अंदाज, अर्थव्यवस्थेतील तेजीमंदी, क्रीडाविषयक घडामोडी इत्यादी मजकूर प्रसिद्ध केला जातो.

## ५.४ आंतरराष्ट्रीय बातमी

१) **आशियाई बाजारपेठा धोक्यात**

**नवी दिल्ली :**

युरोपातील आर्थिक पेचप्रसंगामुळे आशियाई बाजारपेठेवर मोठा विपरित परिणाम जाणवत आहे. हा पेचप्रसंग लवकर सुटला नाही तर मोठे संकट कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आर्थिक पेचात सापडलेल्या युरोपीयन राष्ट्रांना मदत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पुढाकार घेतला आहे. भारतासारख्या उगवत्या बाजारपेठांनीही यासाठी लागणारा निधी उभारण्याची तयारी दर्शवली आहे. गेल्या काही महिन्यांपासून युरोपातील अनेक राष्ट्रे मंदीच्या खाईत लोटली गेली आहेत. युरोपातील आर्थिक पेचप्रसंगाची झळ अन्य मोठ्या राष्ट्रांनाही बसत आहे. आशियाई बाजारपेठाही याला अपवाद नाहीत. या आर्थिक संकटावर लवकरात लवकर तोडग्याची आशियाई बाजारपेठा प्रतिक्षा करीत आहेत.

२) **चीनमध्ये खाणीत स्फोट; २९ ठार**

**बीजिंग / पीटीआय :**

चीनमधील मध्यवर्ती हुनान प्रांतात एका सरकारी कोळशाच्या खाणीत शनिवारी झालेल्या भीषण स्फोटात किमान २९ जण ठार झाले आहेत. शनिवारी संध्याकाळी ६ च्या सुमाराला ही दुर्घटना घडली. गेल्या काही महिन्यात झालेल्या भीषण खाण दुर्घटनांमुळे चीन चांगलाच हादरला आहे.

दुर्घटनेच्या वेळी हेंजयांग शहरातील कोळसा खाणीत ३० कामगार होते. त्यापैकी सहाजणांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. त्यांच्या नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. दुर्घटनेनंतर तात्काळ बचावकार्याला सुरुवात झाली. सुमारे ४० जण मदतकार्यात गुंतले असून दुर्घटनेमुळे खाणकामगारांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

munotes.in

## राष्ट्रीय बातमी

३) **सागरी राज्यांसाठी १५० गस्तीनौका**

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

सागरी क्षेत्रातील टेहळणी आणि सुरक्षाअधिक मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने १५० गस्ती नौका खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सागरी सुरक्षा योजे या दुसऱ्या टप्यात या गस्तीनौका खरेदी करण्यात येणार असून या गस्तीनौका महाराष्ट्र तसेच गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल तसेच दमण, दीव, लक्षद्वीप, पाँडेचरी आणि अंदमान-निकोबार या सागरी किनाऱ्यावरील राज्यांना देण्यात येणार आहेत. गस्ती नौकांच्या खरेदीसाठी निविदा काढण्यात आल्या असून यातील ३० नौका पुढील वर्षाच्या मध्याला दाखल होतील अशी अशा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अधिकाऱ्याने व्यक्त केले.

४) **मनालीतील बर्फवृष्टी**

**मनाली (वृत्तसंस्था) :**

भारतातील पर्यटकांचे मुख्य आकर्षण बिंदू असलेले मनाली शहर पर्यटकांच्या गर्दीने अक्षरक्षः फुलले आहे. नेमका याच क्षणाला बर्षवृष्टीला आरंभ झाल्याने पर्यटकांचा आनंदही द्विगुणित झाला. धर्मशाळा, शिमला, सोलन, नन्हा, चांबा आणि मांडी या परिसरामध्ये देखील सौम्य बर्षवृष्टी झाल्याचे वृत्त आहे. मनाली शेजारच्या पर्यटनस्थळांवरील तापमानामध्ये विक्रमी घसरण झाल्याचे दिसून आले.

५) **भारत सेमीफायनलमध्ये**

**चंदीगड (वृत्तसंस्था) :**

विश्वचक कबड्डी स्पर्धेत सलग पाचवा विजय मिळविताना यजमान भारताने उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला आहे. भारताने कॅनडाला ५१-२४ अशा गुणफरकाने नमवत बाजी मारली. इंग्लंड आणि जर्मनी संघानीही आपापले सामने जिंकले. इंग्लंडने ऑस्ट्रेलियाला ४५-३२ ने तर जर्मनीने अफगाणिस्तानला ६२-२६ ने पराभूत केले. दुसरीकडे सहभागी होण्यासाठी आलेले जर्मनीचे ६ आणि नेपाळचे ५ खेळाडू पतियाळा येथे झालेल्या सामन्या दरम्यान जखमी झाले. प्राथमिक तपासणीनंतर खेळाडूंना भटिडाच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जर्मनीच्या तीन नेपाळच्या दोन खेळाडूंना डॉक्टरांनी तीन आठवडे विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.

## राज्यातील बातमी

६) **अमरावतीत कापूस परिषद**

**अमरावती :**

विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी १ नोव्हेंबर २०११ रोजी शेतकरी संघटनेतर्फे विदर्भ विभागीय कापूस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी विदर्भातील हजारो शेतकऱ्यांकडून न्यायालयाकडे अर्ज भरुन देण्यात येणार आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेचे जगदीश बोंडे, विजय काणेकर, दिलीप परदेशी पत्रकार परिषदेत दिली.

७) **मुंबई नाक्यावर अपघात**

**नाशिक :**

मुंबई नाक्यावर ट्रक-मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातामुळे नागरिकांनी संतप्त होऊन रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. दुपारी साडेबाराच्या सुमारास (ट्रक क्र. एम.एच.०९.१३१३) ने समोरुन येणाऱ्या मोटारसायकल (एमएच-०९-८२९२) स्वाराला धडक दिली. या अपघातात सायकलस्वार विजय सावंत (वय ३५) व सन्मान कोरे (वय २८) हे दोघे गंभीर जखमी झाले असून नाशिकच्या शासकीय हॉस्टिटलमध्ये त्याचे उपचार चालू आहेत. ट्रकचाल रामाण्णा पेरजी (वय ४२) यांचे नाका पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नाशिक हायवेनाका पोलिस करत आहेत.

८) **कोल्हापूर १३ मे रोजी पोलिस भरती**

कोल्हापूर येथे १३ मे रोजी पोलीस भरती आयोजित केली असून या भरतीतून १२० पोलीस शिपाईची निवड करण्यात येणार आहे. ही भरती सकाळी ८ वाजता रत्नागिरी महाविद्यालयाच्या पटांगणावर होणार असून इच्छुक पात्र उमेदवारांनी शैक्षणिक गुणपत्रक, प्रमाणपत्र रेशनकार्ड झेरॉक्स, सरपंच, पोलीस पाटील यांचा दाखला घेऊन उपस्थित राहणे. शारीरिक पात्रता चाचणीतील पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेऊन निवड करण्यात येणार आहे. याची इच्छुकांनी नोंद घ्यावी.

९) **चंद्रपूर जिल्ह्यात डेंग्यूचे थैमान**

**चंद्रपूर :**

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक डेंग्यू, मलेरियाने मोठ्या प्रमाणात थैमान घातलेल असून, त्याला आवर घालण्यासाठी वैद्यकीय सुविधा अपुरी पडू लागली आहे. अचानक उद्‌भवलेल्या या आजारामुळे परिसरात अंधश्रद्धेलाही मोठ्या प्रमाणात उधाण आले आहे. वरोडा येथे मागील पंधरा दिवसांच्या कालावधीत डेंग्यू, मलेरियाने आठ जणांचे बळी घेतले आहेत, तर मारडा येथेही याच आजाराने एकजण दगावला. मागील पंधरा-वीस दिवसांपासून तर या आजाराने कहरच केला आहे.

## प्रादेशिक बातमी / स्थानिक बातमी

१०) **मध्य रेल्वेचा उद्या मेगाब्लॉक**

**मुंबई :** रेल्वे मार्ग दुरुस्तीसाठी मध्य रेल्वेने रविवारी (ता. ६) ठाणे-कल्याण डाऊन जलद मार्गावर व हार्बर मार्गावर वाशी ते बेलापूर दरम्यान अप व डाऊन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

पश्चिम रेल्वेवर रविवारी ‘जंबो ब्लॉक’ नाही. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. ठाणे-कल्याण दरम्यान सकाळी ११ ते ४ या वेळात ‘मेगाब्लॉक’ असेल या वेळेत सर्व डाऊन जलद लोकल ठाणे-कल्याण दरम्यान डाऊन धीम्या मार्गावर चालविण्यात येणार आहेत. हार्बर मार्गावर सकाळी १०.४८ ते सायंकाळी ४.१ दरम्यान बेलापूर ते वाशी दरम्यान वाहतूक बंद राहील.

११) **दोन मुलींचा बुडून मृत्यू**

**कल्याण : वार्ताहार**

काटेमानवली जवळच्या गावातील एका खदाणीत पडून दोन मुलींचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

काटेमानवली गावच्या हद्दीतील खदाणीमध्ये कपडे धुण्यासाठी मनिषा नारायण शिंदे (१५) आणि तिची बहीण चांदणी या दोघी गुरुवारी दुपारी गेल्या होत्या. कपडे धुताना तोल गेल्यामुळे मनिषा खदाणीत पडली. त्याचवेळी खदाणीत हात धुण्यासाठी आलेल्या चंद्री गायकवाड (१०) हिने तिचा हात पकडून बाहेर खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र तीही खदाणीत पडली आणि दोघींचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणाची कोळसेवाडी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

१२) **बदलापुरातील वर्षा मॅरेथॉनमध्ये हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग**

**बदलापूर : वार्ताहार**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बदलापूरात आयोजित करण्यात आलेल्या वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुषाच्या गटात सतिश रकते याने तर महिल्यांच्या गटात अस्तमी मोईल हिने अव्वल स्थान पटकावले. शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. एकूण अकरा गटात झालेल्या या स्पर्धेत बदलापुरातील साठ शाळांमधील सात हजाराहून अधिक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

सकाळी दहा वाजता कात्रप चौक येथून या स्पर्धेच्या पहिल्या फेरीला सुरुवात झाली. दुपारी चार वाजेपर्यंत विविध अकरा गटात ही स्पर्धा घेण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत सुर्यकांत भोसले यांनी त्याचे विजेतेपद पटकावले. उर्वरित आठ गटांमध्ये नितेश म्हस्कर, गुलाब म्हस्कर, प्रशांत म्हात्रे, प्रियांका भोपी, हर्षदा म्हात्रे, योगेश सोनावणे आणि राजेश्री म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले.

munotes.in

१३) **शेअर बाजारवर कार्यशाळा**

**ठाणे :** मनियोग टेक्निकल सर्व्हिसतर्फे ६ ऑगस्ट रोजी बांद्रा येथील चोप्रा ॲकेडमी रिझवी चेंबर येथे सकाळी अकरा वाजता, संध्याकाळी सहा वाजता दादर येथील कबुतरखाना डिसिल्व्हा शाळेसमोर स्नेहलता राणे गर्ल्स स्कूलमध्ये शेअर बाजारावर मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश लाटणेकर या वेळी मार्गदर्शन करणार आहेत. ९८९००३९२३२

१४) **शनिवारी माहिती अधिकार कट्टा**

**ठाणे :** स्टेशन रोडवरील मो.ह. विद्यालयात शनिवार ६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ ते ८ यावेळेत माहिती अधिकार कट्टा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी कट्ट्यावर लोकपाल विधेयकाविषयी चर्चा होणार आहे. भारतीयांना माहितीचा अधिकार मिळवून देणाऱ्या अण्णा हजारे यांच्या चळवळीला कसा पाठिंबा देता येईल, याविषयीही यावेळी विचार केला जाणार आहे.

१५) **गोरेगाव येथे काव्य संमेलन**

**गोरेगाव :** गोरेगाव येथील मराठा सांस्कृतिक मंडळाच्या 'कवितांगण' व्यासपीठातर्फे ४४ वे कविसंमेलन संपन्न झाले. सुप्रसिद्ध लेखिका माधवी कुंटे यांनी या कविसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. सदर व्यासपीठ केवळ कवींना त्यांच्या कविता सादर करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे. सदर कविसंमेलन महाराष्ट्राच्या विविध भागातून ४५ कवींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी मनोहर धुरंधर यांच्या 'माझा चष्मा... माझी दृष्टी' या कवितेला प्रथम पारितोषिक देण्यात आले. सुरेशचंद्र जोशी यांच्या 'उदेक' या कवितेला द्वितीय पारितोषिक देण्यात आले, तर वीणा देव यांच्या 'निसर्गाची देवता' या कवितेस तृतीय पारितोषिक देण्यात आले आहे. याशिवाय र.अ. वायंगणकर, रवींद्र सोनवणी, मृदुला दामले, डी.एम. भट, नरेंद्र पाटील यांच्या कविता उल्लेखनीय असल्याचे परीक्षकांनी सांगितले. पुढील कविसंमेलन जानेवारी २०१२ च्या पहिल्या आठवड्यात होणार आहे.

१६) **रोजगार मेळाव्यास**

**मुंबई :** रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व अश्वमेध फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११/११/११ या दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला. या मेळाव्यास तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यात सातवी नापास ते पदवीधर शिक्षणप्राप्त बेरोजगारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. रिलायन्स, ओबेरॉय हॉटेल, सैफी हॉस्पिटल आणि अन्य नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी १८७८ बेरोजगारांच्या मुलाखती घेतल्या.

१७) **रिक्षा परमिटराज बंद करा**

**प्रतिनिधी**

सध्या रिक्षा परवाने वाटपात चाललेला परमिटराज तत्काळ बंद करावा, अशी मागणी रिक्षा चालक मालक सेवा संघाचे अध्यक्ष राजाराम बापू पाटील यांनी केली आहे.

रिक्षा परमिट वाटपाचा घोळ फक्त शासनाने कागदावरच मिटविलेला आहे. मुख्यमंत्र्यांनी परिवहन खात्याला याबाबत आदेश देऊनही त्याचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. नेमकी परमिट कोणाला दिली जात आहेत यावर नियंत्रण नाही. रिक्षा चालकांची राज्यात संख्या किती, किती लोकांना परवाने दिले आहेत. याचा काहीही हिशोब शासनाकडे नाही. मुंबई ठाण्यात तर दलालांनी रिक्षा परवान्यांवर कब्जाच केला आहे. रिक्षा पासिंग वेळी लॉक बुक तपासले जायचे ते सुद्धा आत तपासने आरटीओ बंद केले आहे. याचा फायदा स्थानिकांपेक्षा परप्रांतियांनी अधिक उठविला आहे. चेसी नंबर, रिक्षा नंबर, इंजिन नंबर आदींची माहिती स्थानिक पोलिसांच्या दप्तरी असणे गरजेचे आहे. तरच हे परमिटराज कमी होईल. असेही राजाराम पाटील यांनी सांगितले.

❖❖❖❖

# घटक-६

# वृत्तांत लेखन

**घटक रचना :**

६.१ प्रस्तावना
६.२ वृत्तांत लेखनाविषयी
६.३ वृत्तांत लेखन कसे करावे
६.४ वृत्तांत लेखन (वर्तमान पत्रासाठी)
६.५ वृत्तांत लेखन म्हणजे घटनेची सविस्तर माहिती
६.६ वृत्तांत लेखनाचे नमुने
६.७ अधिक माहितीसाठी वर्तमानपत्रातील नमुने

## ६.१ प्रस्तावना

वृत्तांतलेखन एक कौशल्य आहे. त्या वृत्तांतातून आपल्याला त्या कार्यक्रमात काय घडले, याची माहिती मिळत असते. अशा पद्धतीचे 'वृत्तांत' लिहिण्याची जबाबदारी एखाद्या बातमीदारावर सोपवलेली असते. अशा सभा संमेलनांचे वृत्तांत कसे घ्यावे याचे एक शास्त्र आहे. ते समजून घेतले तर आपणही अशा पद्धतीने वृत्तांत लिहू शकाल.

वृत्तांत लेखनाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला -

- वृत्तांत लेखन म्हणजे काय ? हे सांगता येईल.
- वृत्तांत लिहिताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे हे स्पष्ट करता येईल.
- वृत्तांत कसा लिहावा हे समजावून घेता येईल.
- वृत्तां लेखनाचे महत्त्व समजेल.

## ६.२. वृत्तांत लेखनाविषयी

विविध प्रसिद्धी माध्यमातून काम करताना अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात. तुम्ही एखाद्या वृत्तपत्रात काम करीत असाल तर सभा - संमेलनांचे वृत्तांत लिहिणे ही जबाबदारी तुमच्यावर सोपवली जाण्याची शक्यता असते. जर 'नभोवाणीत' काम करीत असाल तर 'नभोवाणी वृत्तांत' तुम्हाला सादर करावे लागतात. 'दुरदर्शन' या माध्यमावर काम करीत असाल तर 'दुरदर्शन वृत्तांत' सादर करावे लागतात. पण 'नभोवाणी वृत्तांत' आणि 'दुरदर्शन वृत्तांत' या दोन्ही मध्ये फारसे लेखन कौशल्य लागत नाही. पण वृत्तपत्रातून वृत्तांत लेखन करताना मात्र आपल्या लिखाणातूनच नेमके त्या सभासंमेलनात काय घडले हे वाचकांना कळणे

munotes.in

आवश्यक असते. त्यामुळे वृत्तपत्रातल्या वृत्तांत लेखकावर मोठी जबाबदारी असते. नभोवाणीमध्ये तुमच्या मदतीला प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण असते. किंवा 'दुरदर्शन' मध्ये त्या त्या सभा-संमेलनाचे प्रत्यक्ष ध्वनिचित्र मुद्रण तुमच्याजवळ असते. फक्त त्यातील भाग निवडून तो जोडणारे निवेदन तुम्हाला लिहावे लागते. पण वृत्तपत्रातून वृत्तांत लिहिणाऱ्या लेखकाकडे असे कोणतेही साधन नसते. त्यामुळे त्याला वक्त्याच्या भाषणाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे लागते. यासाठी त्याला लघुलिपी येत असेल तर फारच चांगले. तो जलद पद्धतीने भाषण उतरवून घेऊ शकतो. सभासंमेलनाचा वृत्तांत वस्तुस्थितीला धरुन असला तर लेखकाची आणि पर्यायाने त्या वृत्तपत्राची विश्वासार्हता वाढते. कुठल्याही वृत्तांताला किती जागा द्यायची याचे प्रत्येक वृत्तपत्राचे एक धोरण असते. एखाद्या राजकीय पक्षाच्या कार्यक्रमाचा वृत्तांत असेल तर प्रत्येक वृत्तपत्राचे धोरण वेगवेगळे असू शकेल. जर सांस्कृतिक समारंभ असेल तर त्याला किती जागा द्यायची याबाबतचे धोरणही वेगवेगळे असू शकते. उदाहरणार्थ, अखिल भारतीय साहित्य संमेलनांचा वृत्तांत, बहुतेक वृत्तपत्रांतून विस्तृत प्रमाणात प्रसिद्ध होतात पण जिल्हा पातळीवरील साहित्य संमेलनाचा वृत्तांत त्या जिल्ह्यातील वृत्तपत्रांतून विस्तृत प्रमाणात प्रसिद्ध होईल पण राज्य पातळीवरील वृत्तपत्रांतून त्याला तितकी जागा दिली जाणार नाही. याचाच अर्थ वृत्तांत लेखकाला शब्दमर्यादा पाळून लिहावे लागते. तसेच असे वृत्तांत तातडीने प्रकाशित व्हावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे त्याला 'डेडलाईन' ही पाळावी लागते. त्यामुळे वृत्तांत लेखकाला नेहमीच घाईगर्दीमध्ये लेखन करावे लागते.

सभा-संमेलन जर स्थानिक ठिकाणी असेल तर वृत्तांत लेखकाला थोडा वेळ मिळण्याची शक्यता असते. अशा वेळी सर्व मुद्दे आपल्या वहीत टिपून घेऊन तो वृत्तपत्राच्या कचेरीत येऊन, बातमी विभागाच्या संपादकाशी चर्चा करुन वृत्तांताला किती जागा द्यायची, नेमका कोणत्या मुद्यांवर भर द्यायचा याचा निर्णय घेऊन त्या पद्धतीने वृत्तांत लेखन करु शकतो. पण सभा-संमेलन जर परगावी असेल तर तिथे जाण्यापूर्वी ह्या सर्व गोष्टींची चर्चा करावी लागते. त्या गावारुन असे वृत्तांत फॅक्स, टेलीफोन आता ई-मेल अशा सुविधांचा वापर करुन पाठवावे लागतात.

## ६.३ वृत्तांत लेखन कसे करावे? :

१) सभा-संमेलन, परिषद कुठे चालू होती त्या स्थलाचे वर्णन, व्यासपीठावर कोण बसले होते, वेळ केव्हा होती. कार्यक्रम वेळेवर सुरु झाला की उशिरा सुरु झाला, त्यामागचे कारण काय? वगैरे गोष्टींचा उल्लेख करावा.

२) एखाद्या कार्यक्रमाला अमर्याद गर्दी होते तर एखाद्या कार्यक्रमाला अपेक्षे इतकी गर्दी होत नाही. या दोन्ही घटनांच्या मागे काही कारणे असतात. त्याचा शोध घेतला पाहिजे. त्यावेळी लोकांच्या प्रतिक्रिया काय होत्या त्याचीही दखल घ्यायला हवी.

३) वक्त्याच्या भाषणात एखादा वादग्रस्त मुद्दा आला तर त्याविषयी लोकांची प्रतिक्रिया काय होती, याचाही उल्लेख थोडक्यात करावा, तसेच बोलल्या गेलेल्या वक्त्याबद्दल अधिक खुलासा हवा असल्यास कार्यक्रम संपल्यावर त्या वक्त्याला भेटून तो करुन घ्यावा. आपल्या वयक्तिक मते विसरुन न पटलेला मुद्दाही योग्य त्या शब्दात जसा वक्त्याने मांडला तसा वृत्तांत देणे हे वृत्तांत लेखकाचे कर्तव्य आहे.

४) घोषणा करणे सभा-संमेलनातून करण्याची प्रथा रुढ झालेली आहे. पुढे त्यातून वाद निर्माण झाल्यास 'आपण असे बोललोच नव्हतो' असा पवित्रा घेतला जातो. त्यामुळे अशा घोषणा नेमक्या शब्दात टिपून घेऊन त्या तशाच्या तशा वृतांतातून वापरणे आवश्यक आहे. आता ध्वनिमुद्रणाची छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. त्यामुळे महत्त्वाच्या व्यक्तीचे भाषण त्यावर ध्वनिमुद्रित केल्यास वृत्तांत लिहिण्याचा त्याचा उपयोग होतो. आणि नंतर वक्त्याने शब्द फिरवल्यास आपल्याकडे त्याचे ध्वनिमुद्रण असल्याने आपली बाजू भक्कम होते.

५) आपल्याला दिलेल्या वेळेत आणि दिलेल्या जागेत बसेल असाच वृत्तांत लिहावा लागतो. या मर्यादा पाळूनही वृत्तांत वाचकांपर्यंत पोहचेल असा लिहावा लागतो त्यातून महत्त्वाचा भाग गाळून चालत नाही. ह्या गोष्टीचे भानही ठेवायला हवे.

## ६.४ वृत्तांत लेखन (वर्तमानपत्रासाठी)

प्रसारमाध्यमांमध्ये 'वृत्तांतलेखन' केले जाते. या मध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या प्रसारमाध्यमांसाठी वृत्तांतलेखन करण्याची शैली वेगवेगळ्या प्रकारची असते. वर्तमानपत्रासाठी वृत्तांतलेखन संगतवार माहिती देणारे असते. दुरदर्शन हे श्राव्य आणि दृश्य माध्यम असल्याने त्याचे वृत्तांत लेखन वेगळ्या प्रकाराने करावे लागते. रेडियो हे श्राव्य माध्यम असल्याने रेडियासाठी वृत्तांतलेखन सविस्तर माहिती देणारे करावे लागते. आपण जेथे वर्तमानपत्रासाठी लिहिल्या जाणाऱ्या वृत्तांतलेखनाचा विचार करणार आहोत.

## ६.५ वृत्तांत लेखन म्हणजे घटनेची सविस्तर माहिती :

वर्तमानपत्रासाठी वृत्तांतलेखन करताना घडलेल्या घटनेची सुसंगतीनुसार माहिती द्यावी लागते. घटनेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्या घटनेची माहिती वृत्तांतलेखनातून द्यावी लागते.

वृत्तांतलेखन हा बातमी लेखनाचा एक भाग आहे. बातमी लेखनामध्ये घटनेची ठळक माहिती, महत्त्वाची माहिती दिलेली असते तर वृत्तांत लेखनातून घडलेली माहिती घटनाक्रमानुसार, सविस्तर द्यावी लागते. वृत्तांत लेखनासाठी घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती असणे महत्त्वाचे असते.

वर्तमानपत्रातील वृत्तांत लेखनातून सभा, संमेलने, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम यांची सविस्तर माहिती प्रसिद्ध केली जाते. तसेच राजकीय परिसंवाद, विधानसभा, विधान परिषदमधील अधिवेशनातील माहिती वृत्तांत लेखनातून प्रसिद्ध केली जाते.

munotes.in

## ६.६ वृत्तांतलेखनाचे नमुने :

१) **बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पाल्यांचा गौरव**

**प्रतिनिधी**

बृहन्मुंबई वृत्तपत्रविक्रेता परिवर्तन एक बदल सन्मान सोहळा नुकताच मांटुंग्याच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न झाला.

यावेळी जुने वृत्तपत्र विक्रेते, वृत्तपत्र महिला विक्रेत्या तसेच विविध परीक्षांमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांचा सत्कार करण्यात आला. अलिकडेच निधन झालेले विक्रोळीचे वृत्तपत्र विक्रेते लहू जाधव यांच्या पत्नीला विक्रेता संघातर्फे आर्थिक मदत देण्यात आली तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जागतिक दर्जाच्या व्यंगचित्राबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. या प्रसंगी 'दै. पुढारी'सह अनेक वृत्तपत्रांचे संपादक व वितरण व्यवस्थापक उपस्थित होते. सोहळ्यात उद्योनमुख नामवंत गायकांनी गाणी सादर केली, तसेच किशोरी अंबिये व संतोष पवार यांनी विनोदी कार्यक्रम सादर केले. यावेळी वृत्तपत्र विक्रेता पदाधिकारी हरी पवार, आवटे, शिवसेना नेते सुभाष देसाई आदी उपस्थित होते.

२) **अंबरनाथच्या शिवमंदिराचा ९५५ वा वर्धापन दिन**

**ठाणे / खास प्रतिनिधी :**

शिलाहारकालीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असणाऱ्या अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराचा येत्या रविवारी ७ ऑगस्ट रोजी ९५५ वा वर्धापन दिन आहे. शिलालेखावरील नोंदीनुसार श्रावण शुद्ध नवमीला इ.स. १०६० मध्ये हे मंदिर बांधून पूर्ण झाले. साधारण हजार वर्षापूर्वी तत्कालीन अपरांत म्हणजे आत्ताच्या उत्तर कोकणात (ठाणे आणि रायगड जिल्हा) शिलाहारांनी उभारलेल्या अनेक अप्रतिम वास्तूंपैकी केवळ हे एकमेव मंदिर साडेनऊ शतकांहून अधिक काळ उन्हाळे-पावसाळे झेलत उभे आहे. ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असणारी ही वास्तू अधिक काळ टिकावी आणि जगभरातील पर्यटकांनी ती पाहावी म्हणून शासनाने निधी मंजूर केला असला तरी पुरातत्व खाते आणि स्थानिकांच्या असहकारामुळे या तीर्थक्षेत्राचा विकास मात्र रखडला आहे. तीर्थक्षेत्र विकास निदीतून शिवमंदिर परिसर विकास आणि सुशोभीकरणांसाठी ३ कोटी १८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यातून वाहतळ, नाल्याची संरक्षक भिंत, दशक्रिया विधी घाट आणि नाल्यातील कातळ फोडण्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र बगिचा, धर्मशाळा, दुकाने आणि समाजमंदिर आदी कामे जागेअभावी रखडली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिवमंदिरालगत असणाऱ्या नाल्यात बंधारा खोदण्याच्या कामास पुरातत्व खात्याकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही. मंदिरापासून शंभर मीटरच्या आत कोणतेही बांधकाम करण्यास पुरातत्व खाते परवानगी देत नाही आणि त्यापलिकडे असणारी जागा सुशोभीकरणासाठी देण्यास ग्रामस्थ तयार नाहीत. त्यामुळे इकडे आड तिकडे विहीर अशा कात्रीत या प्राचीन शिवमंदिराचा विकास रखडला आहे. याशिवाय मंदिरालगत बंधारा बांधण्याची योजनाही पुरातत्व खात्याच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार शासनाकडून आलेल्या निधीपैकी ८८ लाख रुपये शिल्लक असूनही परवानगी अभावी मंदिर विकास

munotes.in

योजना रखडली आहे. या मंदिराचे ऐतिहासिक आणि कलात्मक महत्त्व अधोरेखित व्हावे, यासाठी गेली काही वर्षे इतिहासप्रेमी अंबरनाथकर या मंदिराचा वर्धापनदिन साजरा करु लागले आहेत.

३) **राज्यस्तरिय अभंग स्पर्धेत मुग्धा सौदागर द्वितीय**

**सावंतवाडी : वार्ताहार**

जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धेत सावतंवाडीच्या सद्गुरु संगीत विद्यालयाची विद्यार्थीनी कु. मुग्धा सौदागर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. ही भजन स्पर्धा शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणेच्या वतीने आयोजित करण्यात आला होती. या तिच्या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

पुणे येथील बाल गंधर्व रंगमंदिरमध्ये पार पडलेल्या या अभंग व भजन स्पर्धेच्या बाल गटात कु. मुग्धा हिने हार्मोनियम स्वतः वाजवून दोन रचना सादर केल्या. तिला कु. सिद्धेश सावंत व मंगेश मेस्त्री यांनी दिल्यामुळे मुग्धा हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

हा पुरस्कार प्रदान संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. राजीव खांडेकर, स्पर्धा प्रमुख लक्ष्मीकांत खाबीया उपस्थित हाते.

४) **'देऊळ' चा प्रीमियर थाटामाटात**

**मुंबई ता. ४ :** 'देऊळ' चित्रपटाचा प्रीमियर लोअर परळच्या पीव्हीआर मल्टिप्लेक्समध्ये गुरुवारी (ता. ३) तारेतारकांच्या उपस्थितीत झाला. 'मामि'सह अन्य चित्रपट महोत्सवात चित्रपटप्रेमींच्या पसंतीस उतरलेला 'देऊळ'च्या प्रीमियरसाठी नाना पाटेकर, दिलीप प्रभावळकर, मोहन आगाशे, सोनाली कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी या मुख्य कलाकारांबरोबरच उषा नाडकर्णी, ज्योती सुभाष, अतिशा नाईक, विभावरी देशपांडे, स्मिता तांबे हे देखील आवर्जुन उपस्थित होते. निर्माते अभिजीत घोलप व दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

तगडी स्टारकास्ट व 'वळू'फेम उमेश कुलकर्णी यांचे दिग्दर्शन यामुळे निर्मितीपासूनच 'देऊळ' चर्चेत आहे. यावेळी अभिजीत घोलप म्हणाले, "गेल्या वर्षभरात हा महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट पूर्ण केला. याला प्रेक्षकांची पसंती मिळेल याची खात्री आहे. मराठी चित्रपटांनी मोठे व्हावे व मोठा प्रेक्षकवर्ग मिळावा अशी इच्छा आहे. 'देविशा फिल्म'च्या या निर्मितीला पडद्यावर काम करणाऱ्या कलाकारांबरोबरच पडद्यामागे काम करणाऱ्या मंडळींनी मदत केली. हा चित्रपट उमेशने सुरेख दिग्दर्शित केला आहे. नितीन वैद्य व समीर जोशी या सर्वांना मी धन्यवाद देतो," असे घोलप म्हणाले. उमेशने निर्माते अभिजीत घोलप व ज्यांनी 'देऊळ'ला हातभार लावला त्या सर्वांचा ऋणी असल्याचे सांगितले. या वेळी चित्रपटसृष्टीतील नितीश भारद्वाज, अविनाश-ऐश्वर्या नारकर, कांचन अधिकारी, राजीव पटेल, चंद्रकांत कुलकर्णी, तुषार दळवी, स्वानंद किरकिरे, प्रतीक्षा लोणकर, प्रशांत पाटील, तसेच शिवसेनेच्या भारतीय चित्रपट सेनेचे अध्यक्ष अभिजीत पानसे उपस्थित होते. या सर्वांनी चित्रपटाचे कौतुक केले. "असा विषय आतापर्यंत आला नाही. दिग्दर्शन व अभिनय असा सगळ्याच पातळीवर हा चित्रपट सरस आहे." असे नितीश भारद्वाज म्हणाले.

## ६.७ अधिक माहितीसाठी वर्तमानपत्रातील नमुने

# राजकारणात अडकले फेरीवाले धोरण

ठाणे : प्रमोद खरात

फेरीवाल्यांच्या विरोधात वेळोवेळी आंदोलने झाली, नगरसेवकांनी प्रशासनाच्या विरोधात आकांडतांडव केले, मात्र काही किरकोळ कारवाईपलीकडे हा प्रश्न सुटावा, यासाठी प्रयत्न झाले नाहीत. हा प्रश्न आता सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत झालेला आहे. यावर लाखो बेरोजगारांची रोजीरोटी अवलंबून आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या गाइड लाइन्सप्रमाणे राष्ट्रीय फेरीवाले धोरण राबवण्याचे ठरवण्यात आले आहे.

फेरीवाल्यांना ओळखपत्र देऊन त्यांना त्यांचा व्यवसाय करण्यासाठी काही क्षेत्र राखीव ठेवण्याचे ठरवण्यात आले आहे, मात्र याची अमलबजावणी करत असताना बऱ्याच जाचक अटी घालण्यात आल्यामुळे हजारो फेरीवाले या योजनेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच फेरीवाल्यांच्या यादीत नाव घुसवण्यासाठी मोठे राजकारण सुरू असल्याचे आरोपदेखील करण्यात येत आहेत.

फेरीवाल्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या धोरणानुसार आगामी काळात फेरीवाले ही अडचण नव्हे तर त्यांनादेखील पोट आहे, त्यांनादेखील जगण्याचा अधिकार आहे, असे राष्ट्रीय धोरण ठरवण्यात आले आहे. त्यामुळे व्यवसाय करण्याचा त्यांना हक्क आहे हे ठरवण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाढत असलेली बेकारी लक्षात घेता या फेरीवाल्यांच्या समस्यांकडे सामाजिक दृष्टिकोनातून बघण्याची आवश्यकता आहे. हा विचार करता केंद्र सरकारच्या गाइडलाइनप्रमाणे फेरीवाल्यांसाठी देशभरात धोरण आगामी काळात राबवायचे ठरवण्यात आले आहे, मात्र त्याची अंमलबजावणीदेखील ठाणे पालिकाक्षेत्रात अगदी संथगतीने सुरू होती.

त्यामुळे हा प्रश्न बराच जटील झाला होता, मात्र आर. ए. राजीव यांनी आयुक्तपदाचा चार्ज हाती घेताच स्टेशन परिसरात बेकायदेशीर बसणाऱ्या फेरीवाल्यांचा बंदोबस्त केला. पहिल्यासारखेच पुन्हा फेरीवाले बसतील पोलीस तसेच महापालिका कर्मचाऱ्यांना दाद देणार नाहीत, असेच सर्वांना वाटत होते मात्र राजीव यांनी या प्रकरणी काटेकोर लक्ष दिले आणि त्यांची मात्रा बरोबर लागू पडली. त्यामुळे बऱ्याच वर्षानंतर स्टेशन परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला.

फेरीवाल्यांनी शहरातले सर्व मुख्य रस्ते आणि पदपथ व्यापले असल्यामुळे ठाणेकरांचा त्रास वाढत चालला असताना राष्ट्रीय फेरीवाला धोरण राबवण्यास महापालिका प्रशासनाकडून चालढकल होत असल्याच्या विरोधात हायकोर्टात एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर कोर्टाने पालिकेच्या गलथान कारभारावर ताशेरे ओढले होते, तर आता महापालिकेने फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी उशिरा का होइना करायला सुरुवात केली आहे. हे धोरण राबवताना ठेवण्यात आलेल्या अटींमध्ये एकाच ठिकाणी १५ वर्षे व्यवसाय, १५ वर्षांची राज्यात वास्तव्याची अट अशा काही जाचक अटी असल्यामुळे हे निकष पूर्ण करता येत नसल्यामुळे हजारो फेरीवाले या योजनेपासून वंचित आहेत. त्यामुळे काही प्रभागात तर फेरीवाल्यांची संख्या शून्यावर आली आहे.

कळवा प्रभाग समितीत तर फक्त तीन फेरीवाले पात्र ठरले आहेत. हा सर्व प्रकार पाहता हजारो फेरीवाल्यांसमोर रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणार असल्यामुळे फेरीवाला धोरण राबवताना काही निकष बदलण्याची तसेच बऱ्याच ठिकाणी ते काहीसे शिथिल करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

दैनिक पुढारी दि.१९ फेब्रुवारी २०११

# सदनिका घोटाळ्याचा अहवाल दोन दिवसांत

रमेश खोकराळे : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ४ : म्हाडाच्या मे महिन्यातील सोडत विजेत्यांना सदनिकांचे 'प्रोव्हिजनल ऑफर लेटर' विलंबाने मिळण्यास कारणीभूत ठरलेल्या; तसेच 'ऑनलाईन' अर्जप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या ३२७ सदनिकांच्या घोटाळा प्रकरणाचा चौकशी अहवाल दोन दिवसांत सादर होणार आहे.

चौकशी समितीच्या प्रमुख असलेल्या म्हाडाच्या विपणन विभागाच्या संचालक संगीता टकले यांनी आज मुंबई मंडळाच्या बैठकीत ही माहिती दिली. 'ऑनलाईन' अर्जप्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या 'सॉफ्टवेअर'मधील त्रुटीचा गैरफायदा घेऊन दलालांच्या चौकडीने एकसारखे पत्ते आणि मोबाईल क्रमांक वापरून सुमारे १,८०० बोगस अर्ज भरले होते. त्यातील ३२७ अर्ज सोडतीत यशस्वी ठरले. त्यानंतर म्हाडाकडे कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच याविषयी एक निनावी पत्र आल्यानंतर हा गंभीर गैरप्रकार उघडकीस आला होता.त्यानंतर म्हाडाचे उपाध्यक्ष सतीश गवई यांनी या ३२७ अर्जांबाबत तपशीलवार चौकशी करण्यासाठी टकले यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली होती. मात्र दोन महिन्यांहून अधिक काळ उलटल्यानंतरही अहवाल न आल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत होते. त्यामुळे मुंबई मंडळाच्या आजच्या बैठकीत अनेक सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला असता, दोन दिवसांत (८ नोव्हेंबरपर्यंत) मुख्य अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करण्याची ग्वाही टकले यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

**ताबा मार्चदरम्यान**

**गेल्या वर्षी सोडतीत मानखुर्द, वर्सोवा अशा ठिकाणी गृहप्रकल्पांतील घरांचा ताबा 'ओसी'अभावी विजेत्यांना मिळू शकलेला नाही. या पार्श्वभूमीवर, २०११मधील सोडतीतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे, त्यांचे काम पूर्ण कधी होणार आहे, असा मुद्दा बैठकीत उपस्थित झाला.**

दैनिक सकाळ दि.५ नोव्हेंबर २०११

# वाढते कुपोषण आणि आश्रमशाळेचे दशावतार

## मोखाडा तालुक्यातील वास्तव चव्हाट्यावर

म. टा. खास प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे आयुष्य बदलत असल्याचे सरकारी दावे सातत्याने होत असले तरी मोखाडा तालुक्यातील लहान मुलांचे कुपोषण कायम असून आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दुर्दैवाचे दशावतारही संपले नाहीत, हे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

शिवसेनेचे विधान परिषदेतील आमदार डॉ. दीपक सावंत यांच्या मोखाडा तालुक्यातील दौऱ्यात या भागात सुरू असलेले आदिवासींचे हाल चव्हाट्यावर आले आहेत. सावंत यांनी सोमवारी शिरसोन पाड्याला भेट दिली. ६३० लोकसंख्या असलेल्या या पाड्यावरील ११९ मुले अंगणवाडी केंद्रात आहेत. त्यापैकी १९ बालके कुपोषित असल्याची माहिती समोर आली. पाड्यावरील अनेक बालके कुपोषित असून त्यांची नोंदही सरकार दरबारीही नाही. मंगला शिवराम मालक या एक वर्षाच्या कुपोषित मुलीवर गेल्या एक महिन्यापासून मोखाडा ग्रामीण हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. मात्र, तिचे नाव कुपोषित मुलांच्या यादीत नाही. या पाड्यावरील अंगणवाडी कार्यकर्ती सतत गैरहजर रहात असून अधिकाऱ्यांनी तिच्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

दाभोसा येथील आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल संपविण्यातही सरकारी यंत्रणेला अपयश आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भाड्याच्या जागेत भरत होती. त्यानंतर जव्हार आदिवासी प्रकल्पाअंतर्गत २००७-०८ या वर्षात दाभोसा येथील आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले होते. ए. के. इंटरप्राइजेस या कंपनीला या कामाचा ठेका मिळाला असून चार वर्षे लोटली तरी हे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे येथील ५५९ आदिवासी विद्यार्थ्यांची भाड्याच्या खोल्यांमधील कोंडवाड्यातून सुटका झालेली नाही. या आश्रमशाळेत ना विद्यार्थ्यांच्या आंघोळीची सोय आहे ना स्वच्छतागृहांची. त्यामुळे विशेषतः विद्यार्थीनींची कुचंबणा होत आहे. एकाच खोलीत दोन वर्ग भरवले जात असून ती इमारतही धोकादायक आहे.

नव्या इमारतीसाठी १ कोटी ८३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून कंत्राटदाराला ९० लाख रुपयांचे बिल अदा केले आहे. त्यानंतरही या कामाची रखडपट्टी कंत्राटदाराने केली आहे. त्यामुळे त्याला दंड ठोठावत काळ्या यादीत टाकण्याचा विचार सुरू असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनीअर हेमंत भानुशाली यांनी दिली.

दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. २१ सप्टेंबर २०११

# महापौर कार्यालयावरील हल्ल्याच्या निषेधार्थ बेळगावमध्ये कडकडीत बंद,

कोल्हापूर, ४ नोव्हेंबर/ विशेष प्रतिनिधी

बेळगावच्या महापौर मंदा बाळेकुंद्री आणि उपमहापौर रेणू किल्लेकर यांच्या महापालिकेतील कार्यालयावर कन्नड रक्षण वेदिकेच्या गुंडांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र एकीकरण समिती व शहरातील विविध मराठी संघटनांनी पुकारलेल्या बेळगाव बंदला सीमावासीयांनी अभूतपूर्व प्रतिसाद देऊन आपल्या एकीचे दर्शन घडविले. या बंद काळात महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केलेल्या निषेध मोर्चात हजारो मराठी बांधव रस्त्यांवर उतरले होते. या वेळी उपस्थितांनी कर्नाटक सरकार आणि कन्नड रक्षण वेदिकेला इशारा देताना सतत कुरापती काढून ५६ वर्षे सनदशीरमार्गाने सुरू असलेल्या लढ्याला गालबोट लावणाऱ्या कन्नड रक्षण वेदिका या संघटनेवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र एकीकरण समिती व बेळगावातील विविध मराठी भाषकांच्या संघटनांनी एकत्र येऊन दिलेल्या बेळगाव बंदच्या हाकेला सीमावासीयांनी शुक्रवारी उत्स्फूर्त प्रतिसाद



दिला. सकाळी स्वयंस्फूर्तीनेच अनेकांनी आपले व्यवसाय बंद ठेवले होते. परिवहन मंडळाच्या बसेसवर दगडफेक झाल्याने शुक्रवारी प्रशासनाने बस वाहतूक बंद ठेवली. शहरातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली. तर जिल्हा शिक्षण खात्याने दहावी व बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या. शहरातील दोन्हीही बसस्थानके बंद असल्याने सर्वत्र शुकशुकाट होता. तर गणपत गल्ली, मारुती गल्ली, किर्लोस्कर रोड येथील बाजारपेठ पूर्णपणे बंद होती.

दरम्यान कानडी गुंडांच्या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीने निषेध मोर्चाचे आयोजन केले होते. शहरातील धर्मवीर संभाजी चौकात सुरू झालेल्या या निषेध मोर्चात हजारो मराठी भाषक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चात समितीच्या कार्यकर्त्यांसह महिला व तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. सीमा लढ्यासाठी लढणाऱ्या तीन पिढ्या रस्त्यांवर उतरल्याचे एक अनोखे चित्र या निमित्ताने पाहावयास मिळाले. शहराच्या प्रमुख मार्गांवरून कॉलेज रोड मार्गे हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला तेंव्हा तेथे मोर्चातील आंदोलकांनी संयुक्त महाराष्ट्राची ललकारी देऊन परिसर दणाणून सोडला. कर्नाटक शासन आणि कर्नाटक रक्षक वेदिकेच्या गुंडांच्या निषेधाच्या घोषणा देत मराठी भाषकांनी आपल्या एकीचे दर्शन घडविले.

बेळगाव बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राज्य राखीव पोलीस दलाच्या चार तुकड्या तर जिल्हा सशस्त्र दलाच्या दोन तुकड्यांसह प्रचंड पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला

दैनिक लोकसत्ता, मुंबई, दि. ५ नोव्हेंबर २०११

अधिक माहितासाठी काही प्रसिद्ध झालेल्या दैनिकातील बातम्यांचे नमुने

## वीज कर्मचाऱ्यांचे आज धरणे आंदोलन

डोंबिवली, ता. १२ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे 'महावितरण'मध्ये रूपांतर झाल्यानंतर वीज मंडळामध्ये मागासवर्गीयांची १४ हजार ६४७ पदे रिक्त आहेत. मात्र, ही पदे भरण्याऐवजी 'महापारेषण'कडून फ्रँचाईसीद्वारे काम करून घेतले जात आहे. त्यामुळे मागासवर्गीयांवर अन्याय होत असल्याचे सांगत महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतर्फे उद्या (ता. १३) धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

'महापारेषण'ने या कामाचा ठेका ज्या कंपनीला दिला आहे, त्या कंपनीकडून २०० कोटींचे बिल थकीत आहे. मात्र, तरीही विद्युत मंडळाचे खासगीकरणाचा अट्टहास करीत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर अन्याय का केला जात आहे, असा आमचा सवाल आहे, असे महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संजय घोडके यांनी सांगितले. कामगारांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेत असताना कार्यकारी संचालक व समकक्ष पदे मात्र १०० टक्के पदोन्नतीद्वारे भरली जातात. हा अन्याय सरकारने दूर करावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

## सोनसाखळी चोरांना रहिवाशांनी चोपले

डोंबिवली, ता. १२ (प्रतिनिधी) : पादचाऱ्यांच्या अंगावरील दागिने पळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरट्यांना परिसरातील नागरिकांनी चोप देत पोलिसांच्या हवाली केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना कल्याण-डोंबिवली परिसरात घडल्या.

पिसवली गावात राहणाऱ्या संध्या पांचाळ (३०) कल्याण एसटी स्टॅन्डसमोर रिक्षाची वाट पाहत असताना अस्लम शेख (२५) याने त्यांच्या गळ्यातील २२ हजार किमतीचे मंगळसूत्र खेचून पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पांचाळ यांनी केलेल्या आरडाओरडीनंतर परिसरातील पादचाऱ्यांनी अस्लमला पोलिसांच्या हवाली केले.

दुसऱ्या घटनेत संदप येथील लखन पाटील (१९) हा तरुण रविवारी रात्री दुचाकीवरून कल्याण-शीळ मार्गाने जात असताना मानपाडा गावाजवळ पाठीमागून पल्सरवरून आलेल्या दोघांनी त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र लखनने केलेल्या आरडाओरडीनंतर परिसरातील पादचाऱ्यांनी त्या दोघांना गाडीवरून खेचून चोप दिला.

दैनिक सकाळ, मुंबई दि. १३ सप्टेंबर २०११

जोहार चषक हॉकी स्पर्धा

## भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

जोहार बहारू, ८ नोव्हेंबर/पी.टी.आय.

भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ५-१ अशी धूळ चारली व २१ वर्षांखालील युवकांच्या सुलतान ऑफ जोहार चषक हॉकी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

सामन्यात ०-१ अशा पिछाडीवरून बहारदार खेळ करीत भारताने सहज विजय संपादन केला. सामन्याच्या दुसऱ्याच मिनिटाला पाकिस्तानला पेनल्टी कॉर्नर मिळाला. त्याचा फायदा घेत अलीम बिलाल याने संघाचा एकमेव गोल केला. या गोलनंतर मात्र भारताने वर्चस्व गाजविले. हरप्रीतसिंगने २७व्या मिनिटाला गोल करीत सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. मध्यंतरापर्यंत हीच बरोबरी कायम होती.

उत्तरार्धात सामन्याच्या ५०व्या मिनिटाला एम. गुणशेखर याने भारतास २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ६१व्या मिनिटाला मलाकसिंग याने भारताचा तिसरा गोल केला. त्यानंतर तीन मिनिटांनी भारतास पेनल्टी स्ट्रोकची संधी लाभली. त्याचा फायदा घेत अमित रामदास याने संघास ४-१ अशी आघाडी मिळवून दिली. रमणदीपसिंग याने शेवटच्या पाच मिनिटात भारताचा पाचवा गोल केला आणि संघास ५-१ असे अधिक्य मिळवून दिले. हीच आघाडी कायम ठेवीत भारताने विजय संपादन केला. ■

## शीव ते मुलुंड दरम्यानच्या उन्नत मार्गासाठी होणार सर्वेक्षण

मुंबई, ८ नोव्हेंबर/प्रतिनिधी

लालबहादूर शास्त्री मार्गावरील वाहनांची वाढती गर्दी आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन या मार्गावर शीव ते मुलुंड दरम्यान उन्नत मार्ग (इलेव्हेटेड रोड) बांधण्याचा विचार मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री नसीम खान यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासमोर मांडला. या उन्नत मार्गासाठी सर्वेक्षण करून प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्याचा आदेश खान यांनी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिला.

नसीम खान यांनी आज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात जाऊन विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. प्राधिकरणाचे महानगर आयुक्त राहुल अस्थाना यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. लालबहादूर शास्त्री मार्गाचे स्वरूप पाहता रूंदीकरणही शक्य होणार नाही. त्यामुळे या रस्त्यावर शीव ते मुलुंड दरम्यान उन्नत मार्ग बांधावा. उन्नत मार्गामुळे एक ते सव्वा तासाचा प्रवासाचा कालावधी २० ते २५ मिनिटांवर येऊ शकतो. त्यामुळे या उन्नत मार्गासाठी सर्वेक्षण करावे आणि त्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा अशी सूचना प्राधिकरणाला दिल्याचे नसीम खान यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले. ■

दैनिक लोकसत्ता मुंबई दि. ९ नोव्हेंबर २०११

❖❖❖❖

# घटक-७

## अर्जलेखन

**घटक रचना :**

७.० प्रस्तावना
७.१ अर्जलेखन करताना घ्यावयाची काळजी
७.२ अर्ज लेखनाचे नमुने
७.३ संदर्भ सुची

## ७.० प्रस्तावना

अर्जलेखन हा प्रत्येकाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. कारण विविध कारणांसाठी आपल्याला अर्ज करावा लागतो. विविध मागण्या, विविध कागदपत्र, दाखले, आणि नोकरीसाठी अर्ज करावा लागतो. विविध कारणासाठी अर्ज लेखन करण्याची पद्धती वेगवेगळी आहे. अर्जलेखनाच्या विविध पद्धतीचा परिचय व्हावा यासाठी अर्ज लेखन हा भाग आपल्याला अभ्यासक्रमाला लावण्यात आलेला आहे.

**अर्जलेखना विषयी :**

अर्जलेखन हा सर्वांच्याच दृष्टीने महत्त्वाचा प्रकार आहे. अर्ज हा शब्द उर्दू भाषेतून मराठीमध्ये आला आहे. अर्ज याचा अर्थ विनंती असा आहे. अर्जलेखन करणे म्हणजे एक प्रकारे विनंतीपत्र लिहिणे होय. अशा अर्जलेखनाच्या माध्यमातून अर्ज करणारा त्याला आवश्यक असलेल्या बाबीची विनंती अर्ज लेखनाद्वारे करीत असतो. शाळअ-महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज लिहिणे असो की व्यवसाय-धंद्यासाठी कर्ज मिळावे म्हणून अर्ज लिहिणे असो. नोकरीसाठी केले जाणारे अर्ज लेखन महत्त्वाचे आहेच. इथे आपणांस नोकरीसाठी करावयाचे, केले जाणारे अर्जलेखन प्रामुख्याने अभ्यासवयाचे आहे.

प्रत्येक शिक्षित उमदेवार आपणासाठी योग्य अशा नोकरीसाठी प्रयत्न करतो. तेव्हा त्याला ती नोकरी मिळवून देण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक म्हणजेच त्याने नोकरीसाठी लिहिलेला अर्ज. अर्ज हा देणारा नि घेणारा या दोन घटकांना साधणारा दुवा आहे. जोडणारा पुल आहे. योग्य नोकरीच्या शोधात असणारा उमदेवार योग्य व लायक उमेदवाराच्या शोधात असणारा नोकरी देणारा वर्ग, यांना एकत्र आणण्याचे काम अर्जलेखन करते.

अर्ज लेखनात विविध स्वरुपाची मागणीपत्रे, तक्रारपत्रे, विनंतीपत्रे यांचाही समावेश होतो. व्यवहारात कोणत्याही कारणाने पत्राद्वारे केलेली विनंती, मागणी किंवा तक्रार म्हणजे अर्जलेखनच असते. असे असले तरी व्यावहारिक परिभाषेत अर्ज लिहिणे म्हणजे नोकरी

munotes.in

मिळविण्यासाठी अर्ज लेखन असाच अर्थ घेतला जातो. विविध कारणांनी अर्जलेखन केले जाते. नोकरीसाठी अर्जलेखन करणारी व्यक्ती नोकरी लागल्यानंतर, रजेसाठी, कर्जासाठी अर्जलेखन करते. सामान्य माणूस शीधापत्रिका, वाहन परवाना मिळावा यासाठी अर्जलेखन करतात.

अर्ज लिहिणाऱ्या व्यक्तीने अर्ज स्वतःच्या हस्ताक्षरात लिहायला हवा अशी अपेक्षा असते. त्यातून अप्रत्यक्षरित्या अर्जदाराच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येण्यास मदत होते. परंतु संगणकयुक्त अर्जलेखनही संगणकीय प्रक्रियेतून जाताना दिसते. अर्जलेखन करताना अर्जदाराने हस्ताक्षर, शुद्धलेखन, नीटनीटकेपणा याकडे लक्ष द्यावे. अर्जात खाडाखोड असू नये. नोकरी मिळवण्याच्या प्रक्रियेत अर्ज मोठी भूमिका पार पाडत असतो याचे भान अर्जदाराने ठेवायला हवे.

अर्जाचे अनेक प्रकार आहेत. नोकरीसाठी, रजेसाठी, कर्जासाठी, शिफारसपत्रासाठी अर्जलेखन केले जाते. एखाद्या संस्थेचे, क्लबचे सदस्य होण्यासाठी अर्ज लिहिला जातो. असे अर्ज विनंती, मागणी अशा स्वरुपाचे असतात. शासन व्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या कारणांनी केल्या.

अर्ज लेखनासह वैयक्तिक, शैक्षणिक, अनुभवविषयक माहिती पाठवताना सध्याच्या परिस्थितीत अर्जातील माहितीसह अर्जदार स्वतःच्या जीवनालेख म्हणजेच सी.व्ही. किंवा जीवनवृत्तांत म्हणजे बायोडाटा पाठविला जातो. बऱ्याचदा अशा सी.व्ही / जीवनवृत्तांत संगणकाच्या मदतीने तयार केलेला असतो व तो सतत अद्ययावत केला जातो.

पारंपारिक अर्जासह अधिक माहिती पुरविणारा असा सी.व्ही. देताना अर्जात दिलेल्या माहितीसह इतर उल्लेखनीय बाबी, कामगिरी, उल्लेखनीय यश, पारितोषिके मान-सन्मान अपवादात्मक कार्य, विविध उपक्रमातील सहभाग, उपस्थिती, प्रकाशने इ. माहिती अनुषंगाने द्यावी. अर्ज कुठे, कशासाठी करतो आहोत हे लक्षात घेऊन अर्जदाराने आपल्या सी.व्ही. चा योग्य पद्धतीने उपयोग करावा.

पारंपरिक अर्जलेखन पद्धतीसह अलिकडे अनेक विभाग, शासकिय निमशासकीय कार्यालये, संस्था विहित नमुन्यातील अर्ज पुरवितात. अशावेळी अर्जदाराने आवश्यक तेवढी पुरेशी व समर्पक माहिती अर्जात द्यायला हवी. अशा अर्जासह आवश्यकतेनुसार आपला सी.व्ही / जीवनवृत्तांत द्यायला हरकत नाही. परंतु तसा तो देता येणे शक्य आहे का हे अगोदर पाहावे.

## ७.१ अर्जलेखन करताना घ्यावयाची काळजी

**अर्जदाराने अर्जलेखनात पुढील घटकांची मांडणी करावी :**

१. अर्जदाराचे पूर्ण नाव -
२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता -
३. फोन नं. मोबाईल नं, इमेल
४. दिनांक
५. अर्ज ज्यांना करावयाचा त्यांचा हुद्दा, नाव, पत्ता
६. अर्जाचा विषय
७. संबोधन : महोदय, महोदया इ.

८. अर्जाचा संदर्भ
९. अर्जातील वैयक्तिक माहिती : पूर्ण नाव, जन्मतारीख
१०. शैक्षणिक पात्रता
११. इतर गुणवत्ता
१२. अनुभव
१३. विशेष उल्लेखनीय कार्य / बाबी
१४. समारोप
१५. समारोपाचा मायना : आपला / आपली विश्वासू
१६. सहपत्रे

अर्ज नोकरीसाठी असेल तर वरील सर्व बाबी थोड्याफार फेरफारासह अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक ठरेल. अर्जाच्या स्वरुपानुसार अर्जातील माहितीमध्ये बदल होऊ शकतील. सध्याच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात नोकरी मिळविण्याच्या स्पर्धेत सर्वात पुढे रहायला हवे. त्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास घडवून स्वत:ला काळाच्या गतीबरोबर धावते ठेवायला हवे. नोकरीसह कोणताही अर्ज हा अर्जदाराच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असतो. उमेदवाराच्या शोधातील कुणाही व्यक्तीला अर्जदाराच्या व्यक्तिमत्त्वाचे पहिले दर्शन अर्जातूनच होत असते. ते चांगलेच घडावे याचे भान ठेवून आपण आपला अर्ज अद्ययावतरित्या पाठवायला हवा. तो तशा होण्यासाठी अर्जलेखनाचाही अभ्यास व सराव आवश्यक आहे. तो पुढील काही नुमना अर्जाच्या मदतीने होऊ शकेल.

## ७.२ अर्ज लेखनाचे नमुने

प्रेषक
सोहम अरुण शिंदे
मु. खांडपे, पो. कोलठण,
ता. मुरबाड, जि. ठाणे,
पिन - ४२१४०१

प्रति,
मा. प्राचार्य,
जीवनदीप कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कल्याण,

**विषय : लिपीक पदाकरता अर्ज**

महोदय,

आपल्या महाविद्यालयात दै. लोकसत्ता, पुणे या वर्तमानपत्रात दि. १६/०७/२०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनुसार मी लिपीक पदाकरिता अर्ज करीत आहे.

माझा शैक्षणिक पात्रतेचा विचार करुन आपल्या शैक्षणिक संस्थेत काम करण्याची संधी द्यावी ही विनंती.

munotes.in

माझी शैक्षणिक पात्रता व इतर माहिती पुढीलप्रमाणे

पूर्ण नाव - सोहम अरुण शिंदे

कायमचा पत्ता - मु. खांडपे, पो. कोलठण, ता. मुरबाड, जि. ठाणे, पिन- ४२१४०१

जन्मतारीख - १४ जुलै, १९८९

इतर उपक्रम - वक्तृत्व, वादविवाद स्पर्धात सहभाग, कथा-कविता लेखन इ.

अनुभव - दोन वर्ष दोन महिने

जीवनदीप महाविद्यालय, कल्याण येथे कनिष्ठ लिपीक म्हणून अनुभव

शैक्षणिक पात्रता

| **परीक्षेचे नाव** | **विषय** | **परिक्षा मंडळ / विद्यापीठ** | **श्रेणी** | **गुण** | **महिना व वर्ष** |
|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | सर्व | पुणे | प्रथम | ६५% | जून २००५ |
| एच.एस.सी. | सर्व | पुणे | प्रथम | ६३% | जून २००७ |
| बी.ए. | मराठी | पुणे | प्रथम | ६१% | जून २०१० |
| टायपींग | ४० स्पीड | महाराष्ट्र शासन | पास | ६०% | जून २०१२ |
| | | | | | |

माझी माहिती वरीलप्रमाणे सत्य आहे. आपण आपल्या संस्थेत सेवा करण्याची संधी दिल्यास मी ती समर्थपणे व सक्षमपणे पार पाडेन.

सोबत उपरोक्त गुणवत्तेच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

कळावे,

आपला विश्वासू

सही/-

(नाव)

सत्यप्रती

१. दहावी, बारावी प्रमाणपत्रे

२. बी.ए. एम.ए. प्रमाणपत्रे

३. सेट, एम.फिल. प्रमाणपत्रे

४. स्पर्धामधील प्रमाणपत्रे

munotes.in

**अर्जलेखनाचा नमुना २**

अर्जदाराचे पूर्ण नाव : गौरव दौलत कांबळे
पत्ता - डी / ३०२, महालक्ष्मी दर्शन
एम.आय.डी.सी. रोड, डोंबिवली (पुर्व),
जि. ठाणे
दिनांक

प्रति,
मा. प्राचार्य
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
महाड, जि. रायगड,

विषय : लिपीक पदासाठी अर्ज.

महोदय,

आपल्या संस्थेची / महाविद्यालयाची दै. सकाळ, दि. ०९/०९/२००९ मधील लिपीक पदासाठीच्या जाहिरातीला अनुसरुन सदर जागेसाठी अर्ज करीत आहे. माझी वैयक्तिक व शैक्षक पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| नाव | - | गौरव दौलत कांबळे |
| पत्ता | - | डी / ३०२, महालक्ष्मी दर्शन, एम.आय.डी.सी. रोड, डोबिंवली (पुर्व), जि. ठाणे. |
| मोबाईल नं. | - | ९९९६६४४५४६ |
| इमेल | - | kamblevidisha@gmail.com |
| जन्म दिनांक | - | २८-०३-१९९० |
| इतर गुणवत्ता | - | वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, कन्नड टंकलेखन |
| शैक्षणिक पात्रता | - | बी.एस.सी., मराठी ४० स्पीड, इंग्रजी ५० स्पीड, टंक लेखन |
| अनुभव | - | सेवा सदन कॉलेज, उल्हास नगर येथे २ वर्ष लिपीक म्हणून कामाचा अनुभव |

विशेष उल्लेखनीय बाबी

माझी माहिती वरीलप्रमाणे असून आपल्या संस्थेतील सदर पदावर काम करण्याची संधी मिळावी ही विनंती.

सोबत उपरोक्त प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

कळावे,

आपला / आपली विश्वासू

सही
दिनांक
नाव

munotes.in

प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती

१. एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व झेरॉक्स
२. एस.एस.सी. गुणपत्रक व प्रमाणपत्र
३. बी.एस.सी. गुणपत्रक व प्रमाणपत्र
४. मराठी ४० स्पीड टंकलेखन प्रमाणपत्र
५. इंग्रजी ५० स्पीड टंकलेखन प्रमाणपत्र
६. सेवा सदन कॉलेज, उल्हासनगर येथील अनुभव प्रमाणपत्र

**रजेसाठी अर्जलेखन नमुना**

प्राध्यापकाचे नाव
विषय
दिनांक

प्रति,
मा. प्राचार्य,
महाविद्यालयाचे नाव

विषय : रजेसाठी अर्ज.

महोदय,

मी आपल्या महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करीत असून मला दिवसांची रजा मिळावी, माझी चालू शैक्षणिक वर्षातील मागील रजा दिवसांची आहे.

तरी, सदर रजा मंजूर व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला / आपली विश्वासू

munotes.in

**संपादक पदासाठी अर्जलेखन**

निकिता रवळनाथ कांबळे
यशविकास - ३
पर्वती, पुणे - २६
दिनांक - १२ डिसेंबर, २००९

प्रति,
मा. संचालक,
दै. लोकसत्ता,
पुणे.

विषय : संपादक पदासाठी विनंती अर्ज.

महोदय,

मी, श्रीधर विठ्ठल कामत, पर्वती, पुणे चा रहिवासी आहे. पुणे विद्यापीठाची एम.ए. (समाजशास्त्र) ही पदवी प्रथम वर्गात उत्तीर्ण झालो आहे. मला वृत्तपत्रकारितेची आवड असल्यामुळे मी, वृत्तपत्रकारितेच्या सर्व परीक्षा प्रम श्रेणीत उत्तीर्ण झालेलो आहे. तसेच मला प्रवासाचा छंद असून समाजकारणाच, राजकारणाची मला आवड आहे.

माझ्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात मी, विविध वक्तृत्व, वादविवाद, निबंध स्पर्धेत सहभागी होऊ असे आणि अनेक स्पर्धात चांगले यश मिळविले आहे.

महोदय, आपण आपल्या दैनिकातील संपादक पदासाठी माझ्या विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. सदर पदासाठी माझी निवड झाल्यास मी, माझी जबाबदारी अत्यंत सचोटीने, प्रामाणिकपणे, वृत्तपत्रकारितेवरील निष्ठेने, माझ्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहून जबाबदारीने पार पाडेन, असा विश्वास आपणास देत आहे.

सोबत मी माझा बायोडाटा जोडलेला आहे.

आपला विश्वासू

सही

दिनांक

नाव -

munotes.in

## ७.३ संदर्भ सुची

१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी
२) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.
३) व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे.
४) व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
५) व्यावहारिक मराठी - भाग - २ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड.
६) व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार - प्रा. चंद्रहास जोशी
८) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# घटक-८

## भाषांतर

**घटक रचना :**

८.० प्रस्तावना
८.१ भाषांतर म्हणजे काय ?
८.२ भाषांतर लेखनाची तयारी
८.३ भाषांतराचे प्रकार
८.४ भाषांतराचे नमुना
८.५ संदर्भ सूची

## ८.० प्रस्तावना

भाषांतराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण जगात ३ हजारांपेक्षा अधिक भाषा बोलल्या जातात. तशाच त्या लिखित भाषाही आहे. इतर भाषेतील महत्त्वाची साहित्यकृती किंवा एखादा मजकुर दुसऱ्या भाषेत आशयानुसार व्यक्त करणे म्हणजे भाषांतर. इतर भाषेतील श्रेष्ठ साहित्यकृती किंवा मजकूर भाषांतर केल्याने साहित्यकृतीतील विचार किंवा मजकुराचा आशय विचार त्या भाषेतील वाचकांना कळू शकतात. भाषांतर ही एक कला आहे. कारण भाषांतर करत असताना मजकुरामधील आशय भाव न बदलता भाषांतर करणे हे एक कौशल्य आहे. विद्यार्थ्यांना भाषांतर कलेची ओळख व्हावी आणि महत्त्व कळावे या उद्देशाने आपला अभ्यासक्रमामध्ये भाषांतराचा समावेश केला आहे.

१८१८ ते १९७४ या कालखंडाला 'भाषांतर-युग' म्हणून ओळखले जाते. इंग्रजीतील बरेच साहित्य मराठी भाषेत भाषांतरीत झाले. म्हणून या कालखंडाला भाषांतर-युग म्हणून परिचित आहे. भाषांतर या शब्दाला इंग्रजीत Translation (ट्रान्सलेशन) असा पर्यायी शब्द आहे.

## ८.१ भाषांतर म्हणजे काय?

भाषांतर म्हणजे एका भाषेतील ग्रंथ, वाक्य इ. चा दुसऱ्या भाषेत केलेला अर्थ किंवा तर्जुमा होय. एका भाषेतील लिखाणाचा, भाषणाचा, मजकुराचा दुसऱ्या भाषेत केलेला अनुवाद म्हणजे भाषांतर होय. मात्र भाषांतर, रुपांतर आणि अनुवाद यात भेद आहे. हे ही इथे लक्षात ठेवले पाहिजे.

'अन्य भाषा इति भाषांतरम्' अशी भाषांतराची व्याख्या केली आहे. भाषांतर हे आरशातील प्रतिमेसारखे असावे. याचाच अर्थ भाषांतर केल्यानंतर त्यातील मूळ आशयाला बाधा पोहोचू नये असा आहे. भाषांतर करण्यासाठी भाषांतरकाराला कमीत कमी दोन भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. दोन भाषांच्या प्रगत ज्ञानाची नितांत गरज असते. आजच्या युगात खऱ्या अर्थाने सुशिक्षित असणे म्हणजे इतर महत्त्वाच्या भाषाचे ज्ञान असणे.

**भाषांतर म्हणजे ......**

१) भाषांतर म्हणजे एका भाषेतील भाव दुसऱ्या भाषेत मांडून दाखवणे.

२) भाषांतर म्हणजे एका भाषेतील भाव दुसऱ्या भाषेत संक्रमित करणे.

३) भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे.

४) भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत विशद करणे.

## ८.२ भाषांतर लेखनाची तयारी

भाषांतर कौशल्य आत्मसात करण्यासाठी पुढील भाषिक घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भाषांतराशी संबंधित भाषांतील शब्दरचना, वाक्यरचना, विशिष्ट शैली आत्मसात करणे गरजेचे आहे. संबंधित भाषांचे व्याकरण, शब्दसंग्रह, म्हणी व वाक्यप्रचार या घटकांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करणे ही एक कला आहे. कारण प्रत्येक भाषेची प्रकृती वेगळीवेगळी असते. इंग्रजी-मराठी भाषेतील कर्ता-कर्म-क्रियापद यांचे क्रम ठरलेले आहेत. परंतु संस्कृत भाषेत त्याचे थोडे स्वातंत्र्य आहे. भाषेची घटना व प्रकृती कायम ठेवूनच भाषांतर करावे लागते. भाषांतरकाराला दोन्ही भाषेचे ज्ञान आणि भाषांतरावर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. प्रत्येक भाषेच्या लकबी वेगळ्या असतात. त्यामुळे जसेच्या तसे भाषांतर करणे अवघड असते. इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांचा अभ्यास करताना वेगवेगळे इंग्रजी शब्द तुमच्या परिचयाचे होतात. ते शब्द आत्मसात केल्याने आपला शब्दसंग्रह वाढतो. शब्दसंग्रह जसा वाढत जातो तसे त्या भाषेतील आपले ज्ञान वाढते. त्यामुळे भाषांतर करणे सोपे जाते.

## ८.३ भाषांतराचे प्रकार

**१) मूलनिष्ठ भाषांतर**

**२) लक्ष्यनिष्ठ भाषांतर**

### १) मूलनिष्ठ भाषांतर :

'या भाषांतर प्रकारात ज्या भाषेतून करावयाचे आहे. ती मूलभाषा केंद्रस्थानी ठेवून भाषांतर केले जाते.' मुळ भाषेतील शब्द, वाक्य आणि शैली याचे हुबेहूब चित्र मूलनिष्ठ भाषांतरात केले जाते.

### २) लक्ष्यनिष्ठ भाषांतर :

लक्ष्यनिष्ठ भाषांतर करताना ज्या भाषेत भाषांतर करावयाचे ती भाषा केंद्रस्थानी ठेवून म्हणजेच महत्त्वाची मानून भाषांतर केले जाते. या भाषांत पद्धतीतील शब्द, वाक्य, शैली यांच्यात तफावत असते. मुळ भाषेतील अर्थाप्रमाणे भाषांतर केले जाते.

भाषांतर करताना लक्ष्यनिष्ठ भाषांतर करणे योग्य व सोयीचे ठरते. शब्दशः, वाक्यशः आणि मूलनिष्ठ भाषांतरात मुळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत तितक्याच परिणामकारकतेने उतरवता येत नाही. स्वर किंवा लक्ष्यनिष्ठ भाषांतर करताना भाषांतरकाराने मुळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत आणताना ते स्वाभाविक, अकृत्रिम असे वाटेल, अशा सहजपणे करायला हवे. ते भाषांतर न वाटता मुळ लेखनच वाटायला हवे.

**इंग्रजीचे मराठी भाषांतर :**

आपल्याला परीक्षेसाठी इंग्रजीचे मराठी भाषांतर करा असा प्रश्न असतो. भाषांतरासाठी इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांमध्ये प्रभुत्व असणे गरजचे असते. इंग्रजी ही जगातील लिहिता, वाचता, बोलण्यासाठी नि शिकण्यासाठीही सर्वात सोपी भाषा असल्याने आज जगभरात इंग्रजी भाषेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. इंग्रजी आणि मराठी भाषेचे आपल्याला ज्ञान असावे. आपल्याला इंग्रजी उतारा मराठी भाषेत भाषांतरीत करता यावा या उद्देशाने भाषांतर ही भाषा अभ्यासाला आहे, भाषांतराचा उपयोग कोर्टकचेऱ्या, पत्रव्यवहार, धर्मग्रंथ, शिक्षणक्षेत्र, बँका विद्यापीठे, साहित्य आणि संस्कृतीमंडळे, वृत्तपत्रे, आकाशवाणी, विविध इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमांतून केला जातो. भाषांतर करण्यासाठी ज्या भाषेतून भाषांतर करावयाचे व ज्या भाषेत करायचे त्या भाषांशी संबंधित पुढील आवश्यक घटकांचे ज्ञान भाषांतरकारास असायला हवे.

**१) व्याकरण**
**२) शब्दसंग्रह**
**३) वाक्यप्रचार**
**४) सामाजिक संकेत**
**५) वाङ्मयीन संकेत**
**६) संबंधित भाषेची वैचारिक पार्श्वभूमी**

munotes.in

भाषांतर करत असताना भाषांतरकाराला वरील घटकांची पुरेशी माहिती असणे आवश्यक असते. परीक्षेच्या वेळी इंग्रजी उताराचे भाषांतर करताना मुळ इंग्रजी उतारा दोन-तीन वेळा चांगला वाचावा. त्यातील कठीण वाटणारे शब्द अधोरेखित करावे. सर्व उतारा वाचल्यानंतर मराठीला अनुसरुन आपल्याला कशी रचना करता येईल यांचा अंदाज घेता येतो. भाषांतर करताना काही वाक्य आहेत तशीच भाषांतर करावी लागतात तर काही मोठी वाक्ये लहान लहान मराठी वाक्यांच्या आधारे भाषांतर करता येईल. मूळ उताऱ्यात जो आशय सांगावयचा आहे त्याचा आत्मा बिघडनार नाही याचे भान ठेवून भाषांतर करावे लागते.

## ८.४ भाषांतर नमुना

### भाषांतर नमुना १

**Translation :**

It is very easy to acquire bad habits, such as eathing too many sweetso too much food or drinking too much fluid of any kind, or smoking. The more we do a thing, the more we tend to like doing

it; and if we do not continue to do it we feel unhappy. This is called the force of habit, and he force of habit should be fought against.

**भाषांतर :**

जास्त गोड पदार्थ खाणे, खूप जेवणे, कुठलेही पेय जास्त प्रमाणावर घेणे. धूम्रपान करणे यासारख्या वाईट सवयी लावून घेणे फार सोपे आहे. एखादी गोष्ट जितकी जास्त वेळा करु तितकी ती करायला आपल्याला आवड लागते. जर आपण ती करणे सोडून दिले तर आपण दु:खी होतो. यालाच सवयीचे दडपण म्हणतात. अशा सवयीच्या दडपणाचा प्रतिकार करायला पाहिजे.

## भाषांतर नमुना २

**Translation :**

Gandhiji said that the greatest lessons in life are learnt from children, not from learned men. A child will fearlessly try before giving up. As adults, fearing failure, we give up before we try. A child is inherently curious about the world, about relationship, about wantings to understand how things work.

**भाषांतर :**

गांधीजी म्हणत असत की, जीवनातील सर्वात महान पाठ लहान मुलांकडून शिकता येतात. विद्वान माणसांकडून नव्हे? एखादे काम सोडून देण्यापूर्वी एखादे मूल निर्भयपणे प्रयत्न करीत राहते. प्रौढ असून ही आपण अपयशाच्या भीतीने प्रयत्न करण्यापूर्वीच एखादे कार्य सोडून देतो. लहान मूल जगाविषयी, परस्परांविषयी काही गोष्टी कशा घडतात या विषय जाणून घेण्यापूर्वी, जन्मत:च चौकस असते.

## भाषांतर नमुना ३

**Translation :**

In the spring of 1972, David was winding up four a college with top marks. So, far, so good. Ready for the big try, he had applied to ten medical colleges. By eanu April, eight and turned him down. Then on the ofternoon of April 27, a ninth rejection came from a medical college he had counted on the most, and dave was crushed.

**भाषांतर :**

१९७२ च्या वसंत ऋतूत डेव्हिड कॉलेजची चार वर्षे उत्कृष्ट गुण मिळवत संपवण्याच्या मार्गावर होता. येथपर्यंत प्रगती छान होती. मोठी झेप घेण्याच्या प्रयत्नात त्याने दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अर्ज केले होते. एप्रिलच्या प्रारंभीच्या दिवसात आठ महाविद्यालयांनी त्याला प्रवेश नाकारला. नंतर २७ च्या दुपारी दांडगा भरवसा असलेल्या महाविद्यालयातून त्याला नववा नकार आला. तेव्हा डेव्हि पूर्णपणे हताश झाला.

munotes.in

## भाषांतर नमुना ४

**Translation :**

There was a beautiful and frangrant vilotet who lived pacidly amongst her friends, and swayed happily amidst the other flowers in a solitary garden. One morning, as her from was embilished with beads of dew, she lifted her head and looded about; she saw a tall and handsome rose standing proudly and reaching high into space, like a burning torch an emerald lamp.

**भाषांतर :**

एक सुंदर व सुंगधी व्हायोलेटचे फूल आपल्या मित्रांसह शांतपणे राहत होते आणि एका एकाकी बागेत इतर फुलांमध्ये आनंदाने डोलत होते. एका सकाळी त्याचे मस्तक दवाच्या थेंबांनी सुशोभित झाले, तेव्हा त्याने आपले डोके उंचावून आजूबाजूला पाहिले. त्याने एक उंच व देखने गुलाबाचे रोपटे गर्वाने उभे असलेले आणि पाचूच्या दिव्यावर पेटती मशाल असावी असे आकाशात उंच गेलेले पाहिले.

## भाषांतर नमुना ५

**Translation :**

Until she was 80 years of age, mother did morning yoga everyday, swept her own room and washed her own clothers. To me success is about the sense of independence; it is about not seeing the world but seeing the light.

**भाषांतर :**

वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत आई दरवर्षी सकाळी योगसाधना करत असत. स्वतःची खोली झाडून साफ करीत असे आणि तिचे स्वतःचे कपडे धूत असे. माझ्या मते, यश स्वावलंबनाच्या जाणवित असते, ते जग पाहण्यात नसते, तर प्रकाश पाहण्यात असते.

## भाषांतर नमुना ६

**Translation :**

**Pune :**

While buoyancy in vehicle sales in India May be heartening for the industry and economy, it is also leading to a rise in fatal road accidents across the country. In fact, India witnesses the second highest number of road accident fatalities globally, with China topping the dubious list. While 90% of road crashes globally were attributed to “human error”.

**भाषांतर :**

**पुणे :**

उद्योग व अर्थव्यवस्थेला भारतातील वाहन विक्रीची तेजी उत्साहवर्धक असली, तरी ती देशभरातील रस्त्यावरील प्राणघातक अपघाताचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत होत आहे.

वास्तविक पाहता, रस्त्यांवरील अपघातांच्या सर्वोच्च मृत्यूसंख्येच्या शंकास्पद यादीत संपूर्ण जगात चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) जगातील ९० रस्त्यातील अपघातांचा संबंध मानवी प्रमादांशी जोडला आहे.

## भाषांतर नमुना ७

**Translation :**

On the terrible Tuesday, the 29th July 2006 the sky suddenly become an ocean and poured turbulent waters on Mumbai to transform all the pylanes into streams : lanes only the tributaries of the mighty river Brahmaputra knows for flash floods of enormous intensity.

**भाषांतर :**

२६ जुलै, २००५ च्या त्या भयंकर मंगळवारी आकाश अचानकपणे महासागर बनले, आणि त्याने मुंबईवर बेसुमार पाऊस ओतून गल्लीबोळांचे प्रवाहात व रस्त्याचे नद्यात रुपांतर केले आणि सर्व रस्ते अचानक येणाऱ्या झंझावाती पुराच्या प्रचंड तडाख्याकरता प्रसिद्ध असलेल्या बलाढ्य बह्मपुत्रेच्या उपनद्यांसारखे झाले.

## भाषांतर नमुना ८

**Translation :**

It's high enough to cut across roads, rivers and high tension cables, but not so high that clouds obscure vies. People don't look like ants and one can make out that buses are read in Maharashtra and yellow in Tamilnadu. We reaffirmed that India is the most beautiful place in the world, the most colourful too.

**भाषांतर :**

ते उड्डाण रस्ते, नद्या आणि मोठ्या विद्युतदाबाच्या तारा ओलांडून जाण्याएवढे नक्कीच उंच असते. परंतु ढगामुळे दृश्य धूसर (अंधूक) होतील एवढेही ते उंच नसते. माणसे मुंग्यांएवढी लहान दिसत नाहीत आणि महाराष्ट्रातील बस लाल आहेत आणि तामिळनाडूमधील बस पिवळ्या आहेत, हे एखाद्याला सहज समजू शकते. भारत हा जगातील सर्वात सुंदर आणि सर्वात रंगीबेरंगी सुद्धा देश आहे. याचा आम्ही पुनः प्रत्यय घेतला.

## भाषांतर नमुना ९

**Translation :**

A state of laconic disengagement from the everyday routine is vital for creativity, and of course happiness. Now, by no means is the merit of good old 'hard work' being dismissed outright. As anyone who appeared ill-prepared for an examination will testify. Only sweat could effectively replace that uniquely bitter-sweet agony.

**भाषांतर :**

दैनंदिन व्यापारातून अल्पकाळ मिळवणारा विसावा सृजनशिलतेकरता आणि अर्थातच आनंदाकरत खूप महत्त्वाचा असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत पुरातन काळापासून मान्यता पावलेले परिश्रमाचे महत्त्व, पूर्णपणे फेटाळून लावता येणार नाही. जसे जो कोणी अपूर्ण तयारी करुन परीक्षेला बसेल. त्याला खात्री पटेल की, फक्त घामच त्या विलक्षण प्रकारच्या कडू-गोड व्यथेची जागा घेऊ शकतो.

## भाषांतर नमुना १०

**Translation :**

It is very easy to acquire bad habits, such as eathing too many sweetso too much food or drinking too much fluid of any kind, or smoking. The more we do a thing, the more we tend to like doing it; and if we do not continue to do it we feel unhappy. This is called the force of habit, and he force of habit should be fought against.

**भाषांतर :**

जास्त गोड पदार्थ खाणे, खूप जेवणे, कुठलेही पेय जास्त प्रमाणावर घेणे. धूम्रपान करणे यासारख्या वाईट सवयी लावून घेणे फार सोपे आहे. एखादी गोष्ट जितकी जास्त वेळा करु तितकी ती करायला आपल्याला आवड लागते. जर आपण ती करणे सोडून दिले तर आपण दु:खी होतो. यालाच सवयीचे दडपण म्हणतात. अशा सवयीच्या दडपणाचा प्रतिकार करायला पाहिजे.

## भाषांतर नमुना ११

**Translation :**

No so long ago, the dada of mass culture, Marshall McLuhan, said : “We become what we he hold”. In the era of wireless, we become what we hold. Flaunt a mobile phone and you become a symbol of the neo-nomadic tribe; speak SMS and you add status to the symbol. You bring grandeur to the gadget.

**भाषांतर :**

अलीकडच्या काळात सामान्य जनतेच्या मानसिकतेचे जाणकार दादा समजले जाणारे मार्शल मॅकलुहान म्हणाले, “आम्ही जे पाहतो त्यानुसार आम्ही घडत असतो.” वायरलेसच्या या कालखंडात जे आपण स्वीकारतो तसे आपण होतो. सेलफोनचे प्रदर्शन करता आणि तुम्ही नव्या भटक्या जमातीचे प्रतीक बनता, एसएमएसच्या भाषेत बोलता आणि त्या प्रतीकांची प्रतिष्ठा वाढवता, अशा प्रकारे तुम्ही त्या साधनाला महानता (महत्त्व) मिळवून देता.

## भाषांतर नमुना १२

**Translation :**

“55-6 reports that it is presently between the orbits of Earth and Mars and is heading towards us. I will arrange to display the

orbit and it parameters on your TV screen" the chairman said while punching a few buttons on his terminal.

**भाषांतर :**

यूएसएफने जगातील सर्व देशांच्या अवकाश प्रतिनिधींची परिषद भरवली. परंतू ती अज्ञात उडणारी वस्तू आपण सोडल्याचे सर्वांनी नाकारले. एसएस-६० ने, ती वस्तू सध्या पृथ्वी व मंगळ यांच्या भ्रमणकक्षेत असल्याचे व लवकरच ती पृथ्वीच्या दिशेने येत असल्याचे कळवले. डॉ. सिंग या शास्त्रज्ञाने त्या यानाबद्दल कोणती कारवाई करावी याविषयी आपले मत सांगितले.

## भाषांतर नमुना १३

**Translation :**

And so the Trojan horse was prevented from achieving its objective. The anti-PIONEER-10 was pushed further away from the Earth and destroyed. The gigantic Explosion was visible to the naked eye, even in board daylight. Fortunately there were no repercussions felt on the Earth.

**भाषांतर :**

ते वस्तूविरोधक यान पृथ्वीच्या-सर्वनाशाला कारणीभूत होणार होते. त्यातून निर्माण होणाऱ्या उर्जेने विध्वंस व नरसंहार होणार होता. ते ताबडतोब नष्ट करण्याचा निर्णय झाला. त्या यानाला पृथ्वीपासून दूर ढकलून ते नष्ट करण्यात आले. प्रचंड स्फोट झाला. परंतु त्याचे कोणतेही दुष्परिणाम पृथ्वीवर झाले नाहीत.

## भाषांतर नमुना १४

**Translation :**

President Kalam has often proclaimed the goal of becoming a developed country by 2020. This is in itself an ambitious and laudatory goal, but we may want to look even beyond this. These desires of military might and Economic clout are probably reactions to our history of powerlessness and poverty.

**भाषांतर :**

आपले भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी २०२० सालापर्यंत भारत पूर्ण विकसित होण्याचे राष्ट्र होण्याचे ध्येय वारंवार घोषित केले आहे. हे मूळातच एक महत्त्वाकांक्षी आणि स्तुत्य ध्येय आहे. परंतु आपल्याला याही पलिकडे दृष्टिक्षेप टाकण्याची गरज आहे. लष्करी सामर्थ्य आणि आर्थिक प्रभाव यांची अभिलाषा या बहुधा आपल्या ऐतिहासिक निर्बलता (दुबळेपणा) आणि दारिद्र्याविरुद्ध असलेल्या प्रतिक्रिया आहेत.

## भाषांतर नमुना १५

**Translation :**

India carries a historical boggage of caste discrimination and illiteracy, and more recent ills like communal problems, crime and corruption. For such a society, more economic development at a micro-level will not be adequate, if anything, it may intensify some

of its woes, particularly crime. We, therefore, need a more holistic goal : a definition of development that is very broad and multidimensional, or a vision that goes beyond development.

**भाषांतर :**

भारत वर्णभेद आणि निरक्षरतेचे ऐतिहासिक ओझे वाहत आहे आणि त्यात अलिकडच्या जातीय समस्या, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या अनिष्ट गोष्टींची भर पडली आहे. विशाल दृष्टिकोनातून पाहता, अशा समाजाकरता केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही. तसेच काही घडेल तर त्या समाजातील काही संकटे, विशेषतः गुन्ह्यांचे प्रकार अधिक उग्र रुप धारण करतील. म्हणून आपल्याला अधिक सर्वकष (व्यापक) ध्येयाची गरज आहे. विकासाच्या उदार, बहुउद्देशिय व्याख्येची किंवा विकासाच्याही पलिकडे पोहचण्याऱ्या दूरदृष्टीची गरज आहे.

## भाषांतर नमुना १६

**Translation :**

As a step down from my overmight journey on the Mahalaxmi Express, I am at one of the oldest railway buildings still surviving. And I am to stay at the circuit House, which is a heritage structure too.

**भाषांतर :**

महालक्ष्मी एक्स्प्रेसचा रात्रभरचा प्रवास करुन खाली उतरले. तेव्हा मी अजून टिकून असलेल्या रेल्वेच्या सर्वात पुरातन इमारतीपैकी एका इमारतीत उभी होते. आणि मला सांस्कृतिक वारसा म्हणून जपलेल्या सर्किट हाऊस या इमारतीतच मुक्काम करायचा होता.

## भाषांतर नमुना १७

**Translation :**

My mother began developing a catract in her eyes when I was very small. At that time, the eldest among my brothers got a teaching job at the University in Bhubaneshwar and also had to prepare for the civil services-examination. So, it was decided that my mother would move to cook for him. As her appendage, I had to move, too.

**भाषांतर :**

मी खूप लहान असताना, माझ्या आईच्या डोळ्यात मोतीबिंदू वाढू लागला. त्यावेळी माझ्या सर्वात मोठ्या भावाला भुवनेश्वर विद्यापीठात शिक्षकाची नोकरी लागली आणि त्याला मुलकी खात्यातील नोकरीसाठी परीक्षेची तयारीसुद्धा करायची होती. त्याचा स्वयंपाक करण्याकरता माझ्या आईला तिकडे पाठवण्याचे ठरले. तिचे शेपूट म्हणून मलासुद्धा तिकडे मुक्काम हलवावा लागला.

## भाषांतर नमुना १८

**Translation :**

Sometimes life hits you in the head with a brick. Don’t lose faith. The only way to do great work is to love what you do. If you

haven't found it yet, keep looking. Don't settle. And most important have the courage to follow your heart and intuition.

**भाषांतर :**

काही वेळा जीवनात बिकट परिस्थिती निर्माण होते (अशावेळी) विश्वास डळमळू देऊ नका. महान कार्य करण्याचा एकच मार्ग आहे. आणि तो म्हणजे तुम्ही जे काही कराल त्यावर प्रेम करा. तुम्हाला तो (मार्ग) सापडला नसेल, तर तो शोधत रहा. विसावू नका. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या आणि अंतःप्रेरणेनुसार वागण्याचे धाडस करा.

### भाषांतर नमुना १९

**Translation :**

School friendships are taken very seriously. For man are social creatures and like to have friends. Our school friends often remain loves and trusted throughout all our likfe. There is no greater pleasure than to attend a gathering of old pupils of the same school. We remember that James played for the football Eleven, that Bill was our caption at cricket. What a day it was thirty years ago when he made a century against lancing! Our hearts warm still as we think of that exciting match and how we carried him shoulder - high from the field, but in hand.

**भाषांतर :**

माणसे ही समाजप्रिय प्राणी असल्यामुळे आणि त्यांना मित्रांची आवड असल्याने शाळेतल्या ओळखी फार जपल्या जातात. आपले शाळासोबती आपल्याला आयुष्यभर प्रिय नि विश्वासू वाटत असतात. एखाद्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनास उपस्थित राहण्यासारखा आनंद नसतो. जेम्स आपल्या फुटबॉल संघात खेळल्याचे आणि बिल क्रिकेट संघाचा कप्तान असल्याचे आपल्याला आठवते. त्याने लान्सिंगविरुद्ध शतक झळकावले तो तीस वर्षापूर्वीचा दिवस किती अविस्मरणीय! ती रोमहर्षक सामना आणि हातातली बॅट उंचावण्याऱ्या बिलला खांद्यावर घेऊन आपण मैदानाबाहेर कसे नले याच्या आठवणीने आजही अंतःकरण उचंबळून येते.

## ८.५ संदर्भ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी
२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.
३) व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे.
४) व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
५) व्यावहारिक मराठी - भाग - २ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड.
६) व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.


❖❖❖❖

सराव प्रश्नपत्रिका- प्रथम वर्ष कला-

मराठी (अनिवार्य)-**प्रथम सत्र**

(३ तास) (एकूण गुणः १००)

सूचनाः सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र.१. ललित लेखसंग्रह म्हणजे काय ते सांगून ललित लेखाची स्वरूप व वैशिष्टये स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'वडीलधारी माणसे' या लेखाच्या आधारे रा. श्री. जोग सर यांचे स्वभाव गुणविशेष सांगा.

प्र.२. 'वडीलधारी माणसे' मधील प्रमुख व्यक्तिमत्त्वांचा आढावा घ्या. (२०)

**किंवा**

शांता शेळके यांना मंगेशकर कुटुंबाकडून कोणती प्रेरणा मिळाली सविस्तर लिहा.

प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहा. (१०)

१. दुर्गा भागवत

२. मामा वरेरकर

३. श्री. म. माटे

४. प्रसिद्धीपासून लांब असणारे जोग सर

प्र.४. विरामचिन्हाची प्रामुख्याने कोणते प्रकार पडतात. प्रत्येकी एकेक उदाहरण देउन स्पष्ट करा. (१०)

**किंवा**

मराठीतील कोणतीही पाच विरामचिन्हे व त्यांचे वाक्यात रूपांतर करा.

प्र.५ वृत्तलेखन म्हणजे काय ते सांगून उदाहरणासहित सविस्तर माहिती द्या. (१०)

**किंवा**

बातमीलेखन करण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे याची चर्चा करा.

प्र.६. 'वृत्तांतलेखन म्हणजे घटनेची सविस्तर माहिती' या वाक्याचे महत्त्व सांगून वृत्तांतलेखन करताना कोणती काळजी घेतली पाहिजे हे सविस्तर लिहा. (१०)

**किंवा**

अंबरनाथ शीवमंदिराचा १५५ वा वर्धापन दिन संपन्न होत आहे याचे वृत्तांतलेखन करा.

प्र.७. लिपीक पदाकरीता अर्जलेखन करा. (१०)

munotes.in

**किंवा**

अर्जलेखन करताना उपयुक्त असणारी नियमावली लिहा.

प्र. ८. भाषांतराचे प्रकार सांगून भाषांतरकाराला कोणते ज्ञान अवगत असले पाहिजे याची चर्चा करा. (१०)

**किंवा**

खालील उता-याचे मराठीत भाषांतर करा.

**Translation:**

Gandhiji said that the greatest lessons in life are learnt from children, not from learned men. A child will fearlessly try before giving up. As adults, fearing failure, we give up before we try. A child is inherently curious about the world, about relationship, about wanting's to understand how things work.

munotes.in